॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

११०८२

अलीकडील कवि मंडळीनें चालविलेलें

कवितेचें मासिक पुस्तक

श्लोक.

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती। त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेंत आहे, । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

वर्ष ३० वें) आक्टोबर, नोव्हेंबर १९२२ (अंक १०, ११

प्रकाशक—नारायण नरसिंह फडनीस

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव पू. खा.

वार्षिक वर्गणी ट व्ही. पी. सह १॥ रुपया.

## अनुक्रमणिका.

### अंक १० वा.


आत्मनिवेदन [ कै. माधवसुत ] .................... २१७
कर्तृगुप्त, कर्मगुप्त, क्रियागुप्त. [ दु. आ. तिवारी ]........ २३९
गीता [ ना. गं. लिमये ]........................................२४०


### अंक ११ वा.


बंधविमोचन ( अनंततनय )............................२४९
मयूरवाणी ( कै. माधवसुत )............................२५३
मैत्रीचें सिंहावलोकन ( गिरिश )........................२५४
प्रेमविभ्रय ( सहदेव )....................................२५४
विजयि मराठा ( दु. आ. तिवारी )......................२५५
ब्रह्मदेव कवि ( गुणवंत हनुमंतराव देशपांडे )............२५७
लाडक्यास ( कृष्णाजी गंगाधर कवचाळे )............ . २५८
जगांत एखादाच ( विंध्य विहंग बी. ए. )................२५९
मंगलाष्टक ( हरी महादेव समर्थ )........................२६१
गीतामहात्म्य ( हरी महादेव समर्थ )....................२६२



**आजच्या आज मागणी करावी हे चांगलें.**

वार्षिक वर्गणी ) **लोकमान्य** ( टपाल खर्च सु. ३। रु.

संपादकः–एकनाथ यादव निफाडकर

राजकारणाचे लोककारण करणारें हें महाराष्ट्रांतलें पहिलेंच मासिक. वसंतपंचमीपासून सुरू. नियमितपणांत पहिला नंबर. दर अंकांत स्वराज्याचा स्वतंत्र मोहरा ही कादंबरी. म. ग्रंथमालेच्या ग्राहकास रु. २॥ तीन पुष्पें, प्रवेश फी, मासिक आणि टपाल खर्च मिळून रुपये ६।

व्यवस्थापकः–"लोकमान्य मासिक"
लोकमान्य पेठ, धुळें.

काव्यरत्नावली

अंक १० वा.

# आत्मनिवेदन

या जगतीतलावर जन्मास येऊन ज्याप्रमाणें मातृपितृभगिनीसुखानुभव घेणें, व विवाहबद्ध होऊन तज्जनित शिशुमुखावलोकनानंद सेवणें, हीं सन्मत कर्तव्यें मानिलीं आहेत, त्याचप्रमाणें अत्यंत ज्येष्ठ व श्रेष्ठ, अत्यंतोज्ज्वल, अत्यंत श्रेयस्कर, आणि पवित्र कर्तव्य म्हटलें म्हणजे पूर्वसुकृतानुसार—

“ तरी आकाशीं कवणें । केलीं मेघांचीं आभरणें
अंतरिक्ष तारांगणें— । धरी कवण ?
गगनाचा चांदवा— । कोणें ओढिला केधवां ?
पवन हिंडत असावा, । हें कवणाचें मत ?
रोमा कवण पेरी ? । सिंधु कवण भरी ?
पर्जन्याचिया करी— । धारा कवण ?

हे उदात्त विचार मनांत येणें, व ज्यानें या वस्तु निर्माण केल्या, त्याची स्तुती अगर स्मरण, तदर्पित ज्ञानबलावर कांहीं तरी अवश्य करणें हें तें कर्तव्य होय.

पुढील काव्य माझ्या अशाच विचारांचें परिणत फल आहे. आतां हें फल दृष्टोत्पत्तीस येण्यास जीं अनेक साधनें त्या जगन्नियामकानें मला अनुकूल करून

दिली, त्यांपैकीं प्रमुख साधन म्हटलें म्हणजे माझ्या प्रिय पित्यानें मला लहानपणापासून विद्याभिरुचि लावून दिली, हे होय काव्याची अगर कवितेची आवड मला बाल्यावस्थेंतच बीजरूपानें होती. तिची वृद्धि होण्यास अनेककविकृत काव्यांचें अवलोकन कारण झालें, याबद्दल मी त्या सर्वांचा मोठा ऋणी आहे व असेन; परंतु या सर्व कवींहून मला कविवर्य मोरोपंत हेच अत्युच्च प्रतिभाशाली कवि कारणीभूत झाले, याचा मला आनंद वाटतो! शृंगारवर्णनपटु, उदात्त कल्पना प्रसवणारा, व मनोहर उपमा देणारा महाकवि कालिदास; प्रस्तरहृदय हलविणारा शोकरसनिपूण महाकवि भवभूति; वाग्देवीमानसप्रलुब्ध व उज्ज्वल प्रतिभा प्रत्येक शद्बगुंजनांत प्रगट करणारे श्रीज्ञानेश्वरमधुप, यांचीही कविता मला अननुभूत हर्षदायी झाली.

प्रस्तुत काव्याची स्फूर्ति होण्यास मयूरपंडितांची 'केकावली' व आधुनिक विद्वद्वर्य रा. सा. गोविंदराव कानिटकर यांची 'संमोहलहरी' हीं दोन मधुर काव्यें हेतुभूत होत. याबद्दल त्यांचा ऋणी कोण असणार नाहीं? असो; मला अशीच परमेश्वरगुण गुणगुणण्याची स्फूर्ति असो, व आजपर्यंत जसें अकलंकित जीवित गेलें, तसेंच तें शेवटपर्यंत जावो, असें इच्छून मी वाचकांना पंतांच्या शद्बांत इतकच विनवितों—

आर्या

"पुरुषाचा धर्मभ्रम, म्हणवुनि कांहीं पडेल येथ उणें
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें"

पृथ्वी—वृत्त

विरिंचि[1], शुक सोंवळा[2], नगसुताविलास[3]स्पद,
हिमांशु-तनुगौरसा विमल—कांय[4] तो नारद,—
तुझ्या पदसरोरुहीं मधुप हे प्रभो! गुंगती;
धरीं[5] स्वशिरिं त्यां पदां, कवन गुंफण्या दे मति. १

१ ब्रह्मदेव २ या महात्म्यास विषयाचा विटाळही झाला नाहीं, म्हणून त्यांस 'सोंवळा' हें विशेषण योजिलें आहे. ३ शंकर ४ पवित्र आहे देह ज्याचा असा [नारद] ५ मी धरीं

कसें नमन हें करूं भुवनहेतु[1] जो त्या तुला?
दिसे उणिच वाणि ही तव गुणप्रबंधा मला!
अकुंठित मति भ्रमे, कवनशक्ति लोपे कशी!
शशांकजनिता लपे जलदिं चंद्रिका ती जशी. २
धनाढ्य जन भेटता गडबडे दरिद्री भुले!
बघूनि मृगराज वा शशक तें पळे ना हले!
अगाध महिमा तसा तव मला करी मूढसा!
नमूं पदसरोज कीं रजकणींच[2] लोळूं कसा? ३
तुझ्या चरणधूलिनें बनविली शिला कामिनी—
अरण्यभर हिंडुनी रघुपते! अहर्यामिनी;
जडाजडहि तारिले तव पदें, असें ऐकिलें,
ह्मणूनि विनयें प्रभो! चरणसारसां वंदिलें. ४
सुपांलिं तितुका नसे पदयुगां नमाया जरी,
दुरूनि पद वंदितों. मज न लाज याची खरी!
अपक्व मन आमुचें, ह्मणुनि वाटतें हें असें;
प्रकाश रवि सारखा सकल लोकिं तो देतसे. ५

\+ \+ \+

तुझें स्तवन [3]निर्गुणीं मज न साध्य तें माधवा!
नभा गवसणी असे? दिनमणी घटीं लभ्य वा?
तुवांच कथिलें जडां "सगुणरूप माझें भजा,
असें कठिण मार्ग तो[4]", अगुणरूपिं केव्हां न जा. ६

---

१ भुवन दृश्यमान होण्यास कारणभूत. २ पदरजःकणीं. ३ निर्गुण निराकार आहेस असें कल्पून, ४ निर्गुणोपासना.

तुझ्या सदुपदेशिं या सतत संत झाले रत;
तयांस गति उत्तमा तव कृपें मिळे सन्मत,
असेच 'मरणाहुनी' अगुणरूप लाभा 'तिख';
गमे खचित सेवणें कडत घोट किंवा विख! ७

तुला गणुनि निर्गुण स्वकथना करूं मी कुणा?
न ते श्रवणलोचन, प्रभुवरा! तन तेहि ना
करूनि मनिं कल्पना अशि जरी व्यथा बोलतों,
गमेल वनरोदना करित मी कुठें चाललों! ८

\+ \+ \+

तुला कमलजापते! उचित मी कसें वर्णिन[1]?
सचिंत मन जाहलें! तव कृपा कशी पर्णिन?
कुशाग्रमति, बोलके, निपुण वेद झाले खुळे!
सहस्ररसनायुता उरगवाणि तीही चळे! ९

तुझें स्तवन रेखणें कवनहेतु माझा नसे,
मदीय विविधा व्यथा कळविणें तुला, हा असे,
अशा [2]कळवितां तुझें सुयश गावया पात्रता--
जरी किमपि लाभली, मज गमेल हो धन्यता! १०

करीं व्यथितमानसें कवन मी तैरी[3] प्रावृटीं[4]!
प्रभो! कविमति स्फुरे न मधुमासिंची गोमटी.
जशी पतिपुढें दडे, लपवि गाल मुग्धा नवी,
तशीच मति माझि ही मधुर कल्पनातें न वी! ११

---

१ वरीन, मिळवीन, २ कळवितां कळवितां, कळवीत असतां, ३ तरी-बोलून चालून, उघड. ४ प्रावृट्--[वर्षा] कालीं कविप्रतिभा स्फुरत नाहीं; तिला मांध येऊन उत्साह राहात नाहीं, हें प्रसिद्धच आहे.

करी मजसि ही अशी ह्मणुनि कां विलंबा करूं ?
अकाल अथवा दुजा समय नाम घेण्या धरूं ?
अमूल्य मनुजायु हें क्षणिकही दयाळा! तसें;
नसे भरवंसा, खरें मग वृथा बसावें कसें!

दिलें मनुजजन्म हें, तदिव[1] कीं द्विजत्वाहि या,
तशींच सकलेंद्रियें बहु बरीं तुला ध्यावया;
मिळूनि इतुकें जरी यदुपते! बसे स्वस्थ मी,
खराच बनलों वृषापरि तरी महा मत्त मी!

कुणी सुरतरूसुमें उधळितो तुझ्या शेखरीं,
कुणी कनक-केतकी-रज-सुगंध-मोदा करी,
कुणी कवनगुंफनें जगतिं नंदना निर्मितो,
तुला विविध सद्गुणें, मनुज धन्य, जो मोहितो!

विचार मनिं हा असा चमकतां उदासीनता—
अहा! खचित वाटुनी मति वरी खरी मुग्धता!
सभाग्य जन सेवि जें मधुर गोडसें भोजन,
मिळे न गरिबासि तें ह्मणुनि तो उपासी जन?

× × × ×

कसें खचित जाहलें परम—भक्त—संघाग्रणी—
सुवर्णकशिपूदरीं[2] तनयरत्न[3] रक्षोगुणीं!
असो जनन कोणतें, न परवा तयाची हरे!
तुह्मीच पशुयोनिचा गजहि तारिला सत्वरें.

---

१ त्याच प्रमाणें. २ हिरण्यकशिपु. ३ प्रल्हाद.

तुला प्रिय कसा पिसाहि बहिरा असे ब्राह्मण ?
पृथासुतमनोविहारनिपुणा ! तसा बा ! ह्मण ?
अपात्र जन पिंगला तव कृपें सुपात्रा बने;
अया परिस भेटतां कनकरूप त्या लाभणें. १७

खचीत बनलास तूं प्रणयबद्ध गोपांगनां,
किती परम भाग्य तें, विदित होय त्यांच्या मना !
विटाळ सहवे न त्या सुजनमान्य, हो ! मुक्तिचा—
नितान्त दिधला तयां विमल सोहळा भक्तिचा ! १८

धरूनि मनुजाकृती भुलविलें व्रजा सर्वही !
अघा, तशि बका, अहो ! तुरगकेशि नामा, अही,—
अलभ्य गतिलाभ यां रिपु जरी तुझे जाहले.
शिरस्थ मृगमृत्तिका चरणिंही सुगंधीं खुले ! १९

त्यजूनि शिरभूषणा मृगपदा पदीं ठेवणें,
कशास तरि मौर्ख्य हें सुचत त्या ? न या तोलणें.
विरोध धरुनी मनीं सतत आठवावा हरी,
तयांपरिस भक्तिनें नच कसा स्मरावा तरी ? २०

हठें विनवितां पिता बुझवुनी मुला खाउ दे;
तसें हंसुनि मागतां हंसवुनी ह्मणे ' खाउ दे. '
अशा समयिं सोडुनी हठ, हंसूनि सुज्ञें मुलें—
करूनि निज कार्य तें रिझविणें पित्या हें भलें. २१

१ हा सुदाम नव्हे; हा एक दुसरा भक्त होता.

२ याचें विशेष्य ' मी ' अध्याहृत.

३ अघ, बक, तुरगकेशिनांवाचा, हे असुर व कालिया सर्प यांना.

जरी व्यथित संकटीं निज जनां हरे! पाहिलें,
समुद्धरणकारणीं अतुल कष्ट हो! साहिले,
प्रभो हसंडितां[1] निरी भगिनिचीच दुःशासन-
पडो न उघडी खलीं, लुगडिं तीं दिलीं काय न? २२

पृथातनय सर्वही परमभाग्यशाली जरी,
नरेंद्र तिसरा तयीं गणत जीव कृष्णा तरी;
कसा करग एवढा तारि तया रमावल्लभ?
बघे न मजसी जरी भरित मीं रडूनी नभ! २३

नकोच तितुकी दया तशिच एवढी रुष्टता;
असेल अनरूप हो! तदिव ती[2] अम्हो या[3] नैता.
कसाहि जडमूढ हो[4], तव पदाब्ज तारी. तया;
ह्मणूनि विनवीं सदा प्रभुवरा! तुला दातया! २४

× × × ×

पुसाल सदया! मला त्वरित हो! "उतावीळ कां?
प्रपंचसुख गंधही[5] मिळविलें नसे बालका!
नसे स्थिरमती शिशो! मनुज जों, न मी लाभत;
जगास विटला पुरा, प्रिय अती मला भासत." २५

उतावळि नसे प्रभो उचित वेळ मी साधिली;
'प्रपंचसुख ते नको' घडि खरी पुरी लोटली!
दवज्वलन गांठला! न तनुला हवा अंबुद?
[6]जळूनि जारि भस्म ती, विफल होय तो शांतिद! २६

---

१ हसडीत असतां. २ दया किंवा रुष्टता. ३. या नम्र झालेल्या मला ४ असो ५ गंधभरही, तिळमात्रही. ६ अन्वयः—जरि ती (तनु) जळूनि भस्म (जाहली तरी) तो शांतिद (अंबुद) विफल होय.

प्रपंचवनपावकीं निघत पोळुनी हें जग!
मयूर भविं भाजुनी गजबजे दवींचा मृग!
विमोचन करावया करुण हांक ती फोडिली।
अहा! अहिवरें हरे! परिसुनीहि केकावलि! २७

प्रपंचतरुचीं फळें कटु विषापरी सर्वथा,
तशींच जन सेवुनी मिरविती जगीं! हें वृथा—
असें समजुनी मला जखडिलें प्रपंचीं न या,
तरी सकल विश्व हें भविं कसें! न कोपास या २८

असो सकल विश्व हें; मज कशास त्याची स्पृहा?
उगीच पुसिलें तुह्मां यदुपते! त्वरें या पहा
नका मजसि हो हरे! इहपरत्रि नाडूं असा;
मनास अपुल्या पुसा मग कळेल हो राजसा। २९

कराल कशि वंचना अशि तरी मदीया बरें?
कठोर जननी जरी. स्वशिशु भव्य इच्छी खरें।
त्यजूनि भववागुरा वसतसे जगीं जो नर,
तयावरि सदा तुझा अभय, दक्ष देवा! कर ३०

तुका तव सखा पिकासम वदे मुदें नाचुनी।
मला न अनुभूति ही; विफल काय हें वाचुनी
वृथाच कविसंत हे वदति काय सांगा बरें!
विराग वनिंचे हेरी, कशी मृषा गिरा त्यां स्फुरे! ३१

× × × ×

---

१ मी गहिंवरें २ सिंह

'कुठें स्थिर मती?' असें पुससि या, तरी साधनें—
दिलीं तव पदें, तशीं न इतरां भुनीं या धनें[1]
नसेल जरठीं स्थिरा मति अशी, जशी बा मला;
निसर्गमृदु[2] गोडसी[2] प्रकृति नीरसा कोमळी[2]! ३२

क्षणांत मन भंगतें! किमपि शांति ना लाभते!
कठोर, कटु फार या अनुभवीं मति क्षोभते!
असे सहचरी सदा मम खरी निराशा पुरी!
असाधनें[3] जरी, तरी स्थिर मती मदीया खरी! ३३

बनेन तरि मी कसा स्थिरमती? मनोभग हा—
अहा! सतत होतसे! मग कुठून कैशी स्पृहा?
अनेकविध कष्टि या मिळतसे स्थिरप्रज्ञता[4]
अशी मजसि लाभली, विदित कां न हें! हो कथा ३४

× × × ×

छळीत तनुला सदा षडरिंमाजि जो अग्रणी,
अनंग सुमधन्वि तो तरिहि तुच्छ विश्वा गणी!
तयास ठकवावया स्तवन जो तुझें आरभीं,
तिथेंहि शठ दांडगा त्वरित ये! कसा तो न भी? ३५

सुरासुरनरा, तसें विषधरा हरा, नारदा,
तसेंच मुनि गाधिजा, त्रिभि-सुरेश यां आपदा—

---

१ धनें दिलीं तरी माझ्यासारखीं उत्साह भंग करणारीं साधनें मिळणार नाहींत २ हीं तीन विशेषणें प्रकृतीचीं—स्वभावाचीं आहेत. अन्वय—'निसर्ग मृदु, गोडसी, कोमला प्रकृति नीरसा (बनली); ह्म. मूलतः त्या तीन विशेषणांनीं युक्त असा स्वभाव नीरस बनला! ३ या विशेषणाचें विशेष्य मी अध्याहृत आहे. ४ ऐहिक कष्ट अनुभवांनीं चंचल बुद्धि स्थिरावली ह्मणजे ती आपोआप शांत होते, स्थिरावते किंवा निवळते

जेथें चुकविल्या न, धर्मं न मशाका छळी तो मला ?
समूळ बुडवील कीं, ह्मणुनि धांव, हा भागला ! ३६
जरी समर्थि या स्मरो न तुजमी, मला मारिलें !
तुझी सदयता, मला न दुसरें कदा तारिल
जसा अमृतपात्र तो गरलबिंदु दोषान्वित,
तसा सकल सद्गुणां विखरि हें मुदें मातित ! ३७
करूनि तप तीव्रमें अनुदिनीं यशा निर्मळ—
जयें मिळविलें, सलज्ज विधु पाहुनी प्रेमळ !
फिका अमृत वाहिनी-सुविमलै यही ज्यापुढें,
यशोयुत अशा नगा केंरि खरापरी बापुडें ! ३८
कुशालि असला जरी निवटुनी स्वदासावन—
कराल मुरमर्दना ! तरि करीं भुवीं नंदन !
तुह्मां न जड भारि हें निवटणें अशा दुर्जना;
रमा त्यजिलि लाडकी स्वजनसौख्यसंवर्धना ३९

× × × ×

जमापारि न तें असे खचित जन्म माझें बरें;
धराल जरि तें तसें, विफल कल्पना ती हरे !
कुणी अनुभवी सुखा किमपि त्या तरी या जगीं;
अनोळखि सुखा पुरा, असविलेंच चिंतानगीं ! ४०
जया रुचत मी, तयावरि न लोभ माझा असे !
मला रुचत जें, करीं मजसि धिक् ! जुळावें कसें ?

१ वरील वर्ण्यभूत जो अनंग त्यानें
२ याचा कर्ता श्लोक ३५ मधील वर्ण्यभूत अनंग (मदन) हा आहे. ३ हा–अनंग ४ या क्रियापदाचें कर्म पूर्वार्धातील 'यशा' हें आहे; अन्वय–प्रेमळ विधु (ज्या यशा) पाहुनी सलज्ज (होतो). ५ याचा कर्ता 'अनंग' हा अध्याहृत. ६ याचें विशेष्य 'अनंग' अध्याहृत. ७ अनुभवितो. ८ याचें विशेष्य 'मी' अध्याहृत.

अशा विविध कारणीं मज रसा विपर्यस्त रे !
सुचे न पुढतीं मला, यदुवरा ! कसा मी तरें ! ४१

करील मम चिंतना क्षणभरीं, असें कोणि न?
गढूनि निज कार्यिं जो सतत तो असे रे ! जन!
विचारि मग कोण तो? विरस भीषणा ही धरा—
गमे; सुजनबांधवा ! उचित काय हें? श्रीधरा ! ४२

सुधांबुकणसिंचनें रसयुता मही जाहली,
समत्सुक[1], मदालसा, पिकगिरानुकारी, भली—
समीप रमणी जयां प्रणयपूर्ण, ऐसे किती—
मृणालमृदु बाहुच्या उशिवरी निशा लोटिती ! ४३

असें तुजसि सांगतों, मनिं मुळीं न बा मत्सर;
असे न जल दैविं या, तरि न निंद्य तें सत्सरें[2]
तयांस विभवा दिलें. तव विलास सारा असे !
परी रजनि ही मला कटुतरा, करूं मी कसें? ४४

प्रशान्त समयीं अशा बहु मलूल होई कवी !
अधोवदन सारखा बसुनि अश्रुतें वाहवी !
सुनील गगनीं जवें पळत भव्य मंदाकिनी !
विषादजनिता धुनी सतत अश्रुंची लोचनीं ! ४५

बरी मरणयातना तुलिलि ही जरी प्रस्तुता;
असे[3] क्षणच, हें जनु ज्वलनतुल्य वेदस्तुता !
तैया[4] मिळुनि दुःसहा, ढकलणें किती ते दिन?
जरी विदित होय तें, प्रखर काल तो लोटिन ! ४६

---

१ 'समुत्सुक' इ० चार विशेषणें आहेत; त्यांचे विशेष्य तृतीय चरणांतील 'रमणी' हें होय. चांगलें सरोवर. ३ याचा कर्ता 'मरणयातना'. ४ तया दुःसहा मनुला.

असूनि भरयौवनीं जरठताच सारी दिसे!
शशीदिनमणीगणीं उडुगणींहि वृद्धत्वसें!
तृणें मृदुल लाजरीं गमति शुष्क! रुक्षा रसा!
स्थिती विषम ही तरी ढकलितों सुखानें कसा! ४७

× × × ×

असेच कविचित्त हें मृदुल जातिपुष्पाहुन;
अहा! किमपि दुःख त्या त्वरित टाकि कोमेजुन
बघूनि जगतीतलीं विषमता झुरें मी सदा!
तुझे सकल जीव हे, स्थिति तरी अशी तापदा! ४८

लतेवरि झुले कुठें विमल ती कळी तान्हुली,
जिनें न जननीविना इतर सृष्टि ती पाहिली;
खुडूनि अधमें तिला चुरिलि तोंच मूर्खं वृथा!
ह्मणूं अनय कीं कसा नय तरी अशा या पथा? ४९

किती गतधवा अशा विनयशील दिव्यागरें[1]—
लहान अनभिज्ञ या, जनन होय ज्यांना मरें[2]!
प्रभातशशिपांडुरा कृश सुगात्रि येतां पथीं,—
अहा! विकल चित्त हें! ह्मणिं न मोह कोणा मथी? ५०

तसेच नर भूतलीं असति बुद्धिचे सागर;
सरस्वतिहृदब्जषट्पदच ते बहू नागर[3]!
किती जपति शील ते! द्वितिय जीव त्या मानिती!
दरिद्र नर हे परी! वद सुरीति ही काय ती? ५१

अशापरि किती पहा विषमता जगीं श्रीपते!
जगास कळेंहं तुवां विसर्जिलें, तुला शोभतें!

1 दिव्य+आगर—दैवी संपत्तीचें निधान-स्थान 2 विष 3 रसिक, चांगलें.

जसा कुनृपदोशिं त्या विविध दुःखिं गांजे जन,
तुझ्या भुवनिं या तसें कळवळे न कैसें मन ? ५२

× × × ×

सदोष वदलों तुह्मां; पतित, मंद मी केवढा !
सुगुढ कृति आपुली विदित काय होई जडा ?
क्षमा-कवच सर्वदा यदुवरा ! तुह्मी लेइलें,
ह्मणूनि अपराध वा इतर पाहिजे साहिलें ५३

अहा ! स्थिति वसे रमाहृदयवल्लभा ! ही खरी;
खरें वचन बोलण्या भय कसें धरावें तरी ?
मनोहराहि सत्य तें क्षितितलीं मिळे का ? वद.
जरी मदपराध हा, धरितसें नमूनी पद. ५४

कथूं तरि कुठें बरें हितगुजा ? न याला स्थळ;
युगासम गमे मला गिरिधरा ! जरी तें पळ.
विचार तरि हे किती उसळती मनीं या सदा !
असे विदित कां न हें ? प्रभुवरा ! खरें हो वदा ५५

अतर्क्य कुतुकान्विता किति तरी सुलीला तव–
व्रजीं सुलभ जाहल्या ! स्मरणिं देति मोदा नव !
प्रचंड किति पातकी निवटिले तुवां दानव !
पुनीत बहु पातकी सहज जाहले मानव. ५६

सुरेशपदवंदना[1] निवति गोप सारे जण,
तयांसहित जाउनी नटविलें तुह्मीं तें वन;
तेयांसि[2] कथिलें " नमा सुरपती न, गोवर्धन;[3] "

---

१ इंद्र २ अन्वय–( तूं ) तयांसि कथिल " सुरपतीं न नमा, गोवर्धन [ नमा ]
३ या नांवाचा पर्वत.

बघुनि मघवा चिडे, बहुत तप्त त्याचें मन। ५७
सरोष शचिवल्लभें जलधरीं व्रजा झोडिलें,
हंसुनि मान तेधवां सकल गोकुळा रक्षिलें;
करांगुलिवरी तया नगवरास नक्तंदिन,
स-गोप-वधु-गोधनें व्रजपुरा दिलें हें ऋण ५८
बरें मरण वाटलें गतमदा सुरेंद्रा तया।
सुलीन पदपंकजीं विनवि आपुली तो दया.
मदोद्धत असे किती विमद स्पष्ट केले जन;
नसे इतर हेतु या, खचित एक भक्तावन ५९
सुदाम तरि मित्र ते मिळविले गुरूच्या गृहीं;
दरिद्रजन भूसुरा न दुसरा तुलाया महीं.
क्षणांत सदया! स्वसाम्य दिधलें, रुचे तो जन।
तयाहुनि सुदीन मी, तरिहि कां वळे ना मन? ६०
शशी विमल चंद्रिका, तरु लता, प्रभा भास्कर,—
वियुक्त कधिं जाहलीं? वद कृपांबुधे! तूं तर!
अशाच वसल्या सती विमल-मानसा गोपिका!
सदा रिझवितीं तुला, तशि न ती पिकांही पिका! ६१
अनन्यरत योगिनी हरिणिलोचना सुंदरा—
तुझ्यास्तव न मानिती पतिसुतादिकांच्या दरा
क्षणांत त्यजिल्या अशा, प्रणयपात्र कुब्जेस्तव!
दयाब्धि ह्मणुनी तुझा वद कसा करावा स्तव? ६२
परी खचित अंतरीं मृदु कठोर नोहे मन.
तुह्मी प्रणय उद्धवा कथुनि गोपिंचा धाडुन—

१ इंद्र २ भीति.

दिला[1] व्रज-वधू-प्रताप-शमना, खुळा जाहला !
शुचि-प्रणय-कांक्षिणी बघुनि त्या मनीं लाजला ६३

सबाह्य-मधु शर्करा गवळणी तशा त्वन्मया;
नसे विषय ठाउका तुजविना दुजा कीं तयां
स्वदास जरि लोटिला सतत चित्त त्याच्यावर,
स्वभाव तुमचा असा विदित होय विश्वंभर ! ६४

करग्रहणलोलुपा सुगुणशालिनी भीमकी—
उतावळपणें लिही गणुनि अक्षरें मोजकीं !
तुह्मीं हृदय जाणिलें, बहिरुपाधि दृष्टी न ती
असे बुधमता कथा विदित ही; वृथा बोलती ! ६५

तशीं गणुनि अक्षरें लिहित मी जसें येतसे;
परी विमल भाव हा विखुरला तयीं हो असे !
तया समजुनी करांबुर्जि धरा, करा मान्य हो !
गणीन मग भूतलीं मजसमान मी धन्य हो ! ६६

मृता गुरुसुता नतावनपटो ! दिलें आणुन;
खलावृत-मही-विमोचन-परा ! कसें मानुं न ?[2]
'करीं न कधिंही दया तुजवरी' प्रतिज्ञा अशी—
असेल, तरि चित्रें[3] हें ! टिकलि ती न युद्धीं[4] कशी ? ६७

*　*　*　*　*

"तसा परम भक्त तो[5], तुज कशास त्याची सरी !"
असें जरि ह्मणाल, हो परम दुःख मातें तरी !

---

१ यांचा अध्याहृत कर्ता 'उद्धव' हा आहे. २ मी हें कसें न मानीन ३ आश्चर्यकारक. ४ भारतयुद्धांत ;५ अर्जुन

ह्मणेन, तुलना असे कनकपर्वता वारुळ?
करि समचि वर्षणा; घन न भेद तो पाहिल! ६८
तुझीच झिडकारिलें, तरि शरण्य विश्वीं नसे;
अकारण नका करूं अवकृपा, न शोभेलसें!
नसेल छळ जाहला अरिगणीं तुझ्या मत्साम;
असा परम दोष तो कवण बा! असे कीं मम? ६९

× × × ×

अलभ्यहि मनोज्ञ वा परम रम्य बाल्यस्थिति!
मला स्मृति न त्याचि तों त्वरित संपलें! संप्रति–
तरी पुसट आठवे शिशुपणा मलागोड तो!
अहा! समय सत्य हा कटु गराहुनी वाटतो! ७०
कुठें बकुल पुष्प तें, तदिव तें कुठें धत्तुर?
कुठें सुभग चांदणें, तमहि तें कुठें भेसुर?
शिशुत्वहि तसें कुठें, छळक हें कुठें यौवन
उदास करि सर्वदा मृदुल थोर माझें मन! ७१
सभाग्य जन जे तयां, परम रम्य हें यौवन
सुखा विविध, पात्रता मिळतसे नरा येथुन,
वसंतसख संचरे शारिरिं, भू करी नंदन!
कळे न मज काय हें, परि विभग्न माझें मन! ७२

× × × ×

असे मजसि शील हें बहु अभेद्य कीं पंजर!
तयास्तव मनीं सदा झुरत, धांव बा सत्वर!
धरीं हृदयिं शील हें जनु गमे महा–तापद!
सशील त्यजितां ह्मणे जन 'कुशील'; हें शोकद! ७३

१ याचा कर्ता 'यौवन' २ यौवनारंभापासून. ३ मदन.

सरे दिवस आजचा! लय कसा उद्यांचा घडे?
मळेल मम शील का, जपत मी जया एवढें?
स[1]दा दहनकारि ही कृश तनू करी काळजी!
तुह्मां विदित नाहिं कां? श्रमत विश्वि हें बाळ जी! ७४

× × × ×

अशा कवण पातका कठिन, मी बरें जोडिलें?—
अ[2]भेद्य तारि जाहलें तव करस्थ चक्रा भलें?
जयद्रथवधीं सुदर्शनविलुप्त केला रवि!
मनांत जारे कामना, दगड बोलका हो कवि! ७५

असेल तुमच्या मनीं, जन असे बरा गांजण्या,
तरी उचित सर्वही; स्थल कुठें बरें बोलण्या
अनाथ जनिं एवढी अवकृपा कुठें दाविली—
नसे, उरलि ती मला, सढळ हस्तिं का घातली? ७६

पिऊनि मधुराधिकाधरसुधा[3], तशी केलि वा—
करूनि सुहृदांसवें समय लोटिला केशवा!
मदीय कठिना स्थिती! कशि हिची तुह्मा कल्पना?
सभाग्य जन वांच्छितो कुं[4]दिनिं त्याहि शाल्योदना! ७७

रुचेल अपुल्या मना तदि[5]वें हो करा पालन,
परी प्रबल वासना हृदयिं एक नक्तंदिन;
करीं[6] सफल तेवढी मग छळा, ळळा वा करा;
नसे कठिण वा अनर्ध्य, ह्मणुनी अहो! स्वीकरा. ७८

---

१ अन्वय—ही दहनकारी काळजी सदा तनू कृश करी. २ तव करस्थ चक्रा तारि भलें अभेद्य जाहलें; अशा कवण कठिन पातका मी जोडिलें बरें? ३ अमृत ४ दुष्काळाच्या दिवसांत देखील. ५ त्याप्रमाणें. ६ जी वासना सफल करण्याविषयीं येथें मागितलें आहे ती पुढील ७९ व्या व विशेषेंकरून ८० व्या श्लोकांत प्रगट केली आहे.

सुरेशपद वा तसें धनपतीपदा इच्छि न;
सुखीं परम भौतिकीं रमत हें न माझें मन
प्रयत्न करुनी बहू मम अशी मनोभूमिका -
सुवां बनविली, ऋणा तव बरें असे फेड का? ७९

× × × ×

सुभक्ति सुरवल्लि ती, सुजनसंग मंदार तो,
विरूढ करिं यांत कीं मति, सदा तिथें ती रतो.
जरी मजसि लाभ हा करविसी रमानायका!
उदास धरणी करीं[1] विबुधवाटिका, आयका. ८०

इथें खचित वाहवीं[2] अमृत-पाट मी भूवर!
नभस्त उडुबालिकांसह[3] शशी किती तो तर?
करूनि विधुमालिका करिन मी विहारा बरें!
मिळे सुजनसंग तो, तरि अशक्य कोठें उरें? ८१

अहा! स्मरण साधुचें पुलकिता तनू ही करी!
तशी गमत तत्कथा श्रुति-मुखीं सुधा ती खरी!
जरी क्षणभरी मिळे सुसहवास तो मंगल,
अलभ्य सुख तें कसें, कवळण्या मती पांगुळ! ८२

जणूं यशाच साधुचें सुरधुनीमिषें वाहतें!
छटा मधुर दुर्मिळा चमकतां मही डोलते!
पवित्र करि व ढूना खचित हें यशोगायन!
अहा! सुजनसंग हा महिवरी करी काय न? ८३

---

१ मी करीन. २ मी वाहवीन. ३ अन्वय--तो शशी नभस्थ उडुबालिकांसह तर किती [अमृतपाट] वाहवी? अर्थात मजपुढें तो फिका.

निमज्जन सदा घडो मज कथामृतीं साधुच्या,
जसा कृपण रक्षितो धन, तसेंच मी तद्वचा!
गमो सकल मोद तो चरणपद्मिं त्यांच्या निका,
प्रमुग्ध-नव-यौवना-प्रणयदानिं जो कामुका! ८

सुतप्त मन जाहलें विविध कष्टिं जें माधवा!
प्रशान्त करण्या मिळे सुजनसंग तो केधवां?
सकाम तरि मी बहू विकलही तसा चिंतनीं!
परोपरि किती असें सतत घाबरा मी मनीं! ८

छळीत खर काम हा निशिदिनीं मला दांडगा!
सुमार्गरत सज्जनां वधितसे पथीं दांडगा!
विनाश जरि जाहला भुवनवंद्य! या दुर्धरा[1]
सुवर्णखचिता[2] करीं[3] सुकविता बहू सुंदरा! ८

वसो परम मंगला मम मुखीं सुनामावलि;
घडो किमपि सेवना ह्मणुनि वाणि ही धांवली
खपे[4] न अगदीं गदीं शठ करीत जो व्याकुल!
पदाब्ज तव अंतरे, ह्मणुनि चित्त चिंताकुल! ८

× × × ×

नको कुजनसंग तो निरयवास जो भूतलीं,
सुशील मनुजा करी पशुपरी जसा हा कली;
रवितनय[5] मावळे करुनि संग दुर्योधनीं;
सुधाकणरुची गरीं[6] असुहरीं[7] न वांच्छी कुणी ८

---

१ या दुर्धर 'कामा' चा विनाश इ. २ सोनें पक्षी सु-वर्ण (चांगली अक्ष यांनीं खचित जडित ३ मी करीन ४ अन्वय–जो शठ (काम) गदीं व्याकुल क (तो मला) अगदीं न खपे. ५ श्रीमान् कर्ण ६ विषांत ७ प्राणहारक.

करो सतत वाणि ही मधुरनामसंकीर्तन !
डुलेल बुधशीर्ष तें, मम असें असो वर्तन।
तुझ्या गुणकथा, तुझें मनन या, तुझें पूजन,—
अशांत वय वेंचु दे, अतुल भाग्य मी मानिन ? ८९

* * * * *

रमाहृदयहारका ! पतित-दीन-उद्धारका !
सहाय मज संकटीं कुणि नसेच कंसांतका !
चुकोनि अपराध मी प्रणतवत्सला ! हो ! करीं;
धरूनि पदपंकजा कळवळूनियां हाकेरीं ! ९०

अफाट अवनीतलीं निपट मी खरा दुर्बळ !
पुरें मजसि नाडुनी विधि मदीय मांडी छळ !
पुरें तपहि लोटलें, सतत चित्ति चिंतानल—
करीत दहना प्रभो ! जरि न येसि हा होमिले ! ९१

सचिंत नर जो तया वैरि न झोंप, ठावें असे,
पृथातनयरक्षणीं अनुभवास येई जसें;
अनाथ जन हा तुला दिसत कां न विश्वंभरा !
घडीघडि लोटितों कशितरी मनीं घाबरा ! ९२

अहा ! चुरुनि जाय मी प्रबळ घोर दुःखाचलीं !
स्वसामरणरूपि ती उरिं सुरीच कां खोंचली ?
स्मरूनि भगिनीपदां, शिरिं धरूनि तीं पाउलें—
पडो विसर कांहिंसा म्हणुनि कृष्णजी ! वाहिलें ९३

१ (मी) बोलावितों २ जाळील ३ वरीत नाहीं अर्थात् येत नाहीं ४ अर्जुनानें जयद्रथवधाची प्रतिज्ञा केली त्या वेळीं.

उदास परिपूर्ण मी इहसुखास झालों असें;
कृपा त्वरित दावुनी शमवि चित्त, हो जें पिसें
दुजी न मम याचना सुजन मीन-तोयाकरा!
करा धरुनि माझिया मुदित एकदां या करा. ९४
कुमारपणिं शोषिली विकट पूतना घातकी!
सरोग तव दृष्टिही नुरवि धैर्य त्या अंतकीं!
तुह्मी परम थोरले, स्मरणिं नाश व्हावा दरो
नयेच अनुभूति कां? वद खरेंच दामोदरा! ९५
नसेच भवपाश या तदिवही कुणी प्रेमळ!
भयाण दुनियेंत मी भटकतों सदा कोमळ!
नसेल कुणि विश्वि या मजसमान दुःखी जन;
तरीहि करुणार्णवा! न वितळे कसें बा! मन? ९६

× × × ×

असें मजसि भासतें यदुपते! वृथा रे वृथा!
दयाच नसती तुह्मी, कुठिल काव्य हें दक्पथा?
उभा बसुनि पृष्ठिं तूं लिहवितोसि काव्यास या!
प्रमूढ तरि मी किती, जरि न लभ्य होती दया? ९७
अशक्त बहु रोडका विविध संकटीं गांजलों!
अपूर्ण तरि राहतें कवन खिन्न मी जाहलों!
परी तव असे कृपा क्षम पुढें गमे लेखना;
जरी न असती तरी सतत शल्य होतें मना! ९८

× × × ×

---

१ सप्रेम; तुह्मी सप्रेम दृष्टिसुद्धां अंतकीं (यमाचे ठायीं) धैर्य उरवीत नाहीं. मग तूं क्रुद्ध झाल्यावर तो गर्भगळीत होईलच, हें उघड आहे. २ भीति, भय. ३ मन कोंवळे असल्यामुळें सदा उद्विग्न असा. ४ याचा कर्ता ३ ऱ्या चरणांतील 'कृपा'

सुमंद पद टाकितें शिशु धरुनि तातांगुली;
पडे कधिं, कधीं रडे, हंसुनि दावि दंतावली!
अहा! सकल चेष्टितें बघुनि तात तो गुंगतो!
तसें ग्रथन मानणें, विनवुनी तुम्हां सांगतों! ९९
अदोष कृति सर्वथा प्रभुवरा कुठें आढळे?
सदोष तशि सर्वही मधुहरा! मुळीं नाढळे!
विवेक करुनी असा बुधजनीं जरी वाचलें,
सुधासरसबिंदु त्या कवनिं गोडसे सांचले! १००
असें सुजनचित्त तें विमल, थोर, ना मत्सर
अशा सुगुणसागरा नमिन मूर्त जे ईश्वर!
मला भरवंसा नसे इतर सज्जनावांचुन,
असा सुजन हो! सदा मुदित काव्य हें वाचुन १०१
जसें कनकभूधरा नमुनि वाहणें कोरटा,
स्वयंप्रभ दिवाकरा मुदभरें दिवा धाकटा—
करूनि, जन भक्तिनें यदुवरा! न ओंवाळि ती?
तशी तव पदीं कृती मम असे; प्रभो! घ्यावि ती १०२

[ शार्दूलविक्रीडित ]

विश्वाद्या! करुणाकरा! नमन हें ॐकाररूपा तुला!
केलें या कवना पुरें सुखभरें; मोदास नाहीं तुला!
वारंवार अशी घडो सतत वा सेवा तुझी या जना!
लाभे सौख्य कुठें असें क्षितितलीं? सांगा बरें हो मना. १०३

कै. माधवसुत

——×——

१ चौथ्या चरणांत उल्लेखिले हें 'कवन' हें 'वाचलें'. याचा कर्ता आहे.

## कर्तृगुप्त.

कर्तृदर्शक शब्दाजवळ दुसऱ्या अशा शब्दाची योजना करावयाची कीं दोहोंमिळून होणारा सामासिक शब्द कवितेंत अभियुक्त वाटावा असें झालें कीं कर्तृपद साहजिक गुप्त राहतें.

आर्या

पशुपति दयिते! दुर्गे! दानवसमरांत साह्य तुजसि करी
राहुन नित्य जवळीं स्वामिनिला सेवितात पदधारी

खुलासा:—हे दयिते! दुर्गे! राक्षसांच्या युद्धांत पशुपति (सिंह) तुझा साह्य करितो. याला उदाहरण:—चाकर स्वामिनीच्या जवळ राहून तिची सेवा करितात.

असा अर्थ आहे परंतु पशुपति शब्दाचा अर्थ 'शंकर' असाही आहे. व त्याच्याजवळ 'दयिता' शब्द योजिल्यानें पशुपति—दयिते! हें दुर्गेचें विशेषण वाटून करी या क्रियापदाचा कर्ता गुप्त राहतो. यावरून लक्षांत येईल कीं कर्तृपद हें श्लेषात्मक ह्मणजे द्व्यर्थी असलें पाहिजे व पुढील शब्दही मोठा मार्मिक पाहिजे. अशींच कर्मगुप्त व क्रियागुप्ताचीं उदाहरणें पहा:—

## कर्मगुप्त.

(अनुष्टुप)

नगतनया अति प्रेमें। संरक्षी त्र्यंबकेश्वरी
कर्म स्पष्ट इथें आहे। भ्रमती बुध कां तरी?

खुलासा:—येथें नगतनया [हिमालयाची मुलगी] त्र्यंबकेश्वरी (पार्वती) असा अर्थ भासतो, पण मग कोणातें संरक्षी? तें कर्म दिसत नाहीं!

न–गत–नया [ गेला नाहीं न्याय ज्यापासून अशा न्याची भक्ताला ] असा पदच्छेद केला ह्मणजे नगतनया हें कर्म स्पष्ट होतें.

## क्रियागुप्त

हरप्रिये! उमे! जें जें। कुजन-स्तुति-पाप तें
त्याला मज जरी देहीं। माता दे सुतशुद्धितें

खुलासा:–प्रिये! उमे! माझें जें जें कुजनस्तुतिपाठ तें हर [सुत] जरी देहीं मल त्याला तरी माता सुतशुद्धीतें दे. असा अन्वय आहे.

हर शब्दाजवळ प्रिये शब्दाची योजना केल्यानें हरप्रिये असा सामासिक शब्द भासून हर क्रियापद गुप्त राहतें।

——×—— दु आ. तिवारी

## गीता

(चाल:--पिया की न जरिया)

असो प्रणति गीते! नित तुला।
पावनता तव ठायिं अतुला ॥ धृ० ॥
संकटकालीं होउनि वाली–।
बोल तुझे गुरु होति मजला ॥१॥
व्यसनोदय जगिं लागे इतरां।
उदयचि ठाउक देवि! तुजला ॥२॥
शाश्वत वचनें श्रीकृष्णाचीं–।
सांठवुनी तूं देसि सकलां ॥३॥

——×—— ना. गं. लिमये

काव्यरत्नावली

अंक ११ वा.

# बंधविमोचन !

(दोनशें वर्षांपूर्वीचें एक सामाजिक शद्बचित्र)

## कथासूत्र—

इ. सन १९१४ मध्यें एक अकबरकालीन कादंबरी वाचण्यांत आली. तींत एका धर्मभ्रष्ट हिंदु कुलवधूची हकीकत ग्रथित केलेली होती. तिची ती करुण कहाणी काव्यमय वाटल्यावरून त्या प्रकारची एकादी कविता लिहावी असें मनानें घेतलें. व त्याचें दृश्य स्वरुप ह्मणजेच हें खंड काव्य होय. कादंबरी केवळ काल्पनिक असते ह्मणून त्या वेळच्या धार्मिक कल्पना कशा तऱ्हेच्या असत हें समजण्याकरितां कांहीं ऐतिहासिक माहिती शोधीत असतां खालील माहिती उपलब्ध झाली.

इ. सन १७६१ त पानिपतच्या लढाईचा सोक्षमोक्ष झाल्यावर जे कांहीं लोक जीव बचावून दक्षिणेंत परत आले त्यांतच नाना फडनविसांची गणना होते. लढाईवर जातांना नानांनीं आपल्या मातुःश्रीला काशियात्रा करविण्याच्या हेतूनें बरोबर नेलें होतें. दुर्दैवानें ही बाई गिलच्यांच्या हातीं पडून धर्मभ्रष्ट झाल्याची अफवा कानीं आल्यावरून नानानी दिल्लींतील पेशव्यांचे वकील दामोदरपंत हिंगणे यांस पत्र लिहिलें कीं, "—याकरितां माझ्या शक्तिप्रमाणें जें द्यावयास पडेल तें देऊं करून

निदान माझें सर्वस्व देऊं करून–त्यांची (मातुश्रींची) मुक्तता होय. हेंच करावें. मुक्त जाहलियावर जातिविशीं शोध पुरता करावा. जर यथास्थित प्रकार आहे तर देशास पाठवावी. नाहीं तर प्रयागास (गंगेंत देहत्याग करण्यासाठींच) परभारें रवानगी करावी" तात्पर्य मातुःश्री शुद्ध असो वा नसो सर्वस्व भरीस घालून तिची मुक्तता करण्यांतच तिच्या पोटीं जन्म घेतल्याचें सार्थक. याप्रमाणें जरी त्यांचा संकल्प दृढ होता तरी पण ती भ्रष्ट झाली असल्यास तिनें गंगेंत देह टाकावा हेंच विदित होय. तिचें आपल्यास दर्शनही नको असा त्यांचा (नानांचा) निर्धार होता! असो. या काळाच्याही मागें आपण शंभर वर्षे गेलों तर श्रीशिवाजी महाराजांनीं निंबाळकरांच्या घराण्यांतील एका धर्मभ्रष्ट पुरुषास पंक्तिपावन करून घेतल्याची गोष्ट सांपडते.× परंतु तें पतितपरावर्तन राजकारणाचे पायावर घडवून आणिलें होतें. तात्पर्य सामान्य जनसमूहाचें मत नानांच्या मतासारखें असावें. असें वाटल्यावरून तेवढ्या आधारावर प्रस्तुत काव्याची उभारणी केली आहे तेव्हां सरासरीं दोनशें वर्षांपूर्वींच्या समाजाचें आपण एक शब्दचित्र पहात आहोंत इतकी भावना जागृत ठेऊन प्रस्तुत काव्य वाचल्यास त्यांत अस्वाभाविक असें कांहीं वाटूं नये असें वाटतें.

(पदाची चाल.)

"कसला हेतू अथवा किंतू धरुनि मनीं तूं मजमागें,
येशी येथें कां न कळे तें परत गृहातें जा सुभगे! १
कां वद छळसी ऐसें मजशी रात्रंदिवशीं सांग तरी,
आल्या मार्गें जाई वेगें परतुनि मागें सुकुमारी! २
शब्दानें वा कृतिनें किंवा दिला न केव्हां त्रास तुशीं,
उगीच कां मग करुनी तगमग लाविशि भगभग ही ऐशी?" ३
"मी लग्नाची सद्धर्माची सखी जिवाची प्रिय कांता,
असुनी कांता! मजला त्यजितां! योग्य गमे का नयवंता! ४
दुःख कोणतें तरि यापरतें अधिक असे तें युवतीतें?
पदर पसरतें आतां नाथा! नका सोडुं या दासीतें." ५
"धर्माभिमता तूं मम कांता मान्य तत्वतां सखि! मातें,
धर्म यावनी घेशि म्हणोनी तुटे भामिनी! तें नातें! ६

गमरीने
× मुसलमान केलेल्या ब्राह्मणास शुद्ध करून घेतल्याचें उदाहरण छत्रपति राजाराम महाराजांच्या आज्ञेनें घडलें – राजवाडे खंड ८ लेखांक ७० (१६।३।१६८६)

अद्भुत गाथा तुझी कुलकथा सकलविश्रुता पहा असे,
जरि गे ! स्वामी तुझा असे मी तरि तुजधामीं घेउं कसें ! ७
भार्या समजुन तव संगोपन कसें कळेंचि न करुं आतां ?
जनता अधिकृत मला बहिष्कृत करील निश्चित तिज कळतां" ८
"स्वधर्म सोडुनि झालें यवनी तरीहि पत्नी ही अपुली,
द्यावापृथ्वीदेवद्विजरविसमक्ष यांच्या परिणियली ! ९
पतिपत्नीचें तरुलतिकेचें नातें साचें हृदयाचें,
तोडायाचें पुण्य जयाचें धन्य भाग्य त्या सुजनाचें ! १०
पति युवतीचा भर्ता भ्राता पतिच रक्षिता सुखदाता,
सत्पथनेता, शिक्षणदाता संकटहर्ता उद्धर्ता. ११
पति हें दैवत पतीच जीवित तत्त्व समुन्नत हें मातें,
कळण्यापूर्विंच अंतरलें मी दुर्दैवें या चरणातें ! १२
दोष न माझा हा पतिराजा ! हे सुखभाजा ! मज गमतें,
अज्ञानत्वें, कर्म घडे जें पाप नसे तें विबुधमतें. १३
स्वयेंचि होउन समजुनउमजुन धनास मोहुन लोभानें,
स्वधर्म सोडुन परकी धर्म न केला सेवन जग जाणें ! १४
खल यवनांनीं उन्मत्तांनीं बाटविलें हो आम्हांला,
पहा विचारें सारासारें दोष न याचा कोणाला ! १५
एक दृष्टिनें वस्तुपरीक्षण कधींहि वास्तव होत नसे,
कार्यासंगें कार्यकारणा नको बघाया काय तसें ? १६
कर्तृनिरीक्षण केलें आपण, कारणतर्पण म्यां केलें
कार्यविचारण कीं उद्घाटन करूं उभयतां बुद्धिबळें ! १७
अन्तःशोधन केल्यावांचुन धर्मविचारण कधिं न घडे,
इन्द्रियगोचर नच धर्मांतर सूक्ष्म विचारें पडा गडे ! १८

धर्म न वसतो बहिःप्रदेशीं परि हृदयाच्या गाभारीं,
पारावारीं जलाभ्यंतरीं वडवा न वसे जळावरी १९
धर्मांतर म्यां केलें, धरलें, अंतर पडलें परि काय?
जशि मी होतें पूर्वी अगदीं तशीच आहे पतिराय! २०
करस्थलीं कर, पदस्थलीं पद, शीर्षस्थानीं शीर्ष असे,
हृदय हृत्स्थलीं, मनःस्थलीं मन अंतर कोठें लवहि नसे! २१
विशिष्ट चिन्हें हिंदुत्वाचीं दृश्य पहा हीं पूर्वींपरी,
अजूनि दिसती अंगावरतीं बुजलीं नसतीं खरोखरी! २२
शिवत्वदर्शक चंद्रकोर जी कपाळपटलीं बाळपणीं;
जशी गोंधली तशीच आहे मावळली ती नच अजुनी! २३
रूपशालिनी मनोमोहिनी मधुरभाषणी पूर्वींपरी,
असें निखालस मुळीं न साहस नसेचि तसनस वचांतरीं! २३
जसा न कांहीं पालट बाह्यीं तसाचि नाहीं हृदयींही,
प्रेमळ कोमल जळसम निर्मळ नसे निरर्गल वाणी ही! २५
अपूर्व चित्तीं नसेचि पालट उलट परी तें पहा कसें
मागें वळुनी लागे चरणीं स्निग्ध होउनी प्रेमरसें. २६
स्थूल दृष्टिची व्यवहाराची निरीक्षणाची रीति जरा,
दूर सारुनी दया करूनी तत्त्वान्वेषण सूक्ष्म करा. २७
यदा जन्मलें जगांत आलें तेव्हांपासुनि आजवरी,
धर्मांतर मीं कितिदां केलें जाणिव याची कुणा परी? २८
शैशवि होतें मातृपूजिका खेलनभजका बालत्वीं,
जनकसेविका कौमार्यी मी भर्तृदारिका तरुणत्वीं! २९
शिशुधर्मातुनि बालत्वीं कीं बाल्यांतुनि कीं कौमार्यी,
आलें, कितितरि अंतर पडलें देहीं तैसें हृत्कार्यी! ३०

कौमार्यातें त्यजुनी दयिता! झालें जेव्हां विवाहिता,
पितृधर्मातें मुकलें, झालें इकडिल धर्मीं मी निरता! ३१
किती विलक्षण हें धर्मांतर सर्वचि कांहीं पालटलें,
हृदयमनानें तशि अभिधानें विभिन्न अगदीं मी झालें! ३२
नूतन जीवन नूतन भूषण वसनहि तें पण तसें नवें,
नूतन सृष्टी नूतन दृष्टी फिरे पूर्व मनु किती जवें! ३३
जननीस्थानीं सासूबाई जनकपदीं हो मामंजी,
बहिणी गेल्या, वन्से आल्या, झाले भाऊ भावोजी! ३४
धर्मांतर कीं रूपांतर कीं स्थित्यंतर कीं कांहिं ह्मणा,
याचें कारण केवळ आपण करीं आपुल्या नियंतृणा. ३५
आपण ह्मणजे काय खरें वदुं देव्हाऱ्यांतिल देव जसे,
मी तर साक्षात् सदनमंगला गणिलें मजला लक्ष्मीसे! ३६
धर्मांतर तें आपण करविलें पटलें, रुचलें, मानवलें
न कळे कां हें परी खपावें कारण एकचि म्यां केलें! ३७
येउं नये तो प्रसंग आला वदलें—वदतें अधिक उणें,
नसे पथ्य परि जरी सत्य तें क्षमा करावी थोरपणें. ३८
धर्मांतर मम नाहीं झालें, आपुलेंच हो परि गमतें,
वृथा न वदतें, सिद्ध करुनि तें मी अपुल्यातें दाखवितें ३९
प्राण सहावा मना विसावा अपुल्यातें जी पूर्वि असे,
दृष्टीलाही नको आज ती धर्मांतर हें काय नसे! ४०
दाक्षिण्यादिक गुण पूर्वींचे विलया गेले आजि कसे?
प्रेमस्थानीं वसे तिरस्कृति धर्मांतर हें काय नसे? ४१
हृदय सदय जें पूर्वीं होतें अदय जाहलें आजि असे.
सांगा नाथा! सुविचारानें धर्मांतर हें काय नसे? ४२

तुजविषयींची तिरस्कृती कीं प्रेमादृति ही काय बरें ?
धर्मांतर कीं अजुनहि वाटे झालें माझें तुज चतुरे !" ६७
" जरी खरें हें, मजवरती वा प्रीति आपुली गणूं खरी,
सेवा माझी कां न घेतसां ? कां न येउं द्या गृहांतरीं." ६८
" धर्माचीच न, सुष्ट दुष्ट कीं हृदयभावना ज्या असती,
त्या सर्वांची गूढगूढतमिं अंतर्यामीं सुखवसति ! ६९
प्रीति न वसते बहि:प्रदेशीं परि हृदयाचे गाभारीं,
राजमंदिरीं न वा कुटीरीं न वा कल्पना-बाजारीं ! ७०
प्रीति वदतसे मुकीच भाषा पेसपाड ना तिज असती,
समागमाची तिज न अपेक्षा वि-रह वि-योगीं तिची रति ! ७१
कोठें चंद्रिर कोठें अंबुधि कोठें घनतति शिखी कुठें ?
दर्शनमात्रें केवळ उभयां आनंदाची लहरि उठे ! ७२
अमूर्त ईश्वर कुठें निवसतो ! परि भक्ताच्या हाकांना,
कसा काय कीं कुठुनि काय कीं, दयार्द्र होउनि दे काना ! ७३
गाय गोठणीं सोडी पान्हा हंबरतां तो वत्स घरीं,
भूलिंगातें पाहीं घडतें अभिसिंचन तें एकसरीं ! ७४
घरीं न इच्छा सहवासाची बळेंचि घररिघि व्हायाची,
प्रेमलोप जरि नसे परस्परिं काय अपेक्षा वद त्याची ? ७५
परस्परांना परस्परांवरि दूर राहुनी प्रीति जरी—
करितां येते; समागमाची सांग अपेक्षा काय तरी ? ७६
समयपरत्वें भेटूं बोलूं ज्ञानसुधारसपान करूं,
ऐक एक परि समागमाचा नको तेवढा हट्ट धरूं !" ७७
" इतुकें मजला जें जें वदलां बोध सर्वही मनिं ठसला,
समागमाची करुनि परवडी भीक एवढी मज घाला, ७८

अभिमानाची वृत्ति निमाली ईर्ष्या सगळी मावळली,
झुकली राधा ठायीं आली, ह्मणा कृष्णजी निज अपुली। ७९
एक खोपटें रुचिर गोमटें येथें कोठें बांधुनियां,
मला रहाया संमति सखया द्यावी सेवा करवाया ८०
लोटिन अंगण, सडाहि घालिन, भांडीं घाशिन, धुइन धुणीं
वेलफुलें मी करुनी सुखविन, घेइन ह्मणवुनि गुणिल गुणी। ८१
डोळे भरुनी पहात निशिदिनिं वेंचिन उरले दिवस सुखें,
ठेविन काया पदिं मी सखया, करुणानिलया गात मुखें। ८२
राहुल दुसरीं, दृष्टि सुख तरी घेऊं द्या मज पोटभरीं,
दयाविधूच्या शीतल किरणीं उसळू द्या ही दुरित दरी।" ८३
"हीन जनांनीं ज्ञान मिळवुनी यत्न करावा वरि जाया,
परि न पहावें चढलेल्यांना, पुन्हां खालती ओढाया। ८४
व्युत्क्रम याचा करुनी वदतों श्रेष्ठांनींही नीचांना,
हात देउनी घ्यावें वरि, परि नच सोडावें स्वस्थाना। ८५
उद्धारित्यानें दक्ष असावें कर देतां नर बुडल्याला,
कीं नच बुडता बुडविल बुडतां गळां पडोनी अपल्याला। ८६
सहवासातें फलकामुकता तनुस्पर्श हें फल पुढतीं,
तनुस्पर्शनें अतनूची त्या सतनु सुतनु गे। उत्पत्ति। ८७
उत्पत्तीची काय वाट त्या भड न हिंदु कीं नच यवन,
जननिंदेचें प्राप्त मात्र त्या कुजन्म पैतृक सौख्यधन। ८८
'वादे वादे तत्त्वोत्पत्ती' बुध हें कथिती; शिमग्याचें–
कवित्व झालें इकडे येथें उद्दीपन कीं विषयाचें। ८९
क्षणावधीच्या सहवासाचा, घडला ऐसा परिणाम,
अखंड–अक्षय समागमानें होय वृत्ति कीं बेफाम। ९०

कांहीं झालें तरीहि अपुलें मन हें असलें बहु दुबळें,
कुणिहि न त्याची द्यावी ग्वाही; महाज्ञानिही लटपटले! ९१

पुन्हां त्यांतुनी बघ मी अजुनी साधक आहें सिद्ध नसे,
यवनजवन हा मनोवारु मज फेकिल ऐशी भीति असे! ९२

घनकांतारीं दरीकंदरीं व्रतपालन तों सामान्य,
' वनितावलयीं व्रतस्थ वसणें ' केव्हांही या प्राधान्य! ९३

जरी खरें; परि यथाशक्ति करिं होइल जें तें साधावें,
उंचावोनी पाय वामनें चंद्रग्रहण न वांच्छावें. ९४

बघुनि बलाबल बुद्धि पुरःसर बुधें अबाधित बांधोन–
धोरण पुढलें पद टाकावें; स्वतांस निजकृति बाधो न. ९५

स्वधर्म ह्मणुनी प्रीति करीं मी स्वधर्म ह्मणुनी धर्म तसा
प्रतिपाळीं मी स्वकृत्य ह्मणुनी अन्यासाठीं नच सहसा! ९६

प्रीति स्वार्थी धर्म परार्थी परार्थरक्षण केव्हांही,
स्वार्थपालनाहुनी श्रेष्ठ तें न दुजें श्रेयस्कर कांहीं! ९७

धर्म सूक्ष्मतम सकल भावनीं धर्माची गे! त्वरित गति,
सर्वस्वाचा होमहि पटतो धर्मत्याग न मतिप्रति! ९८

धर्मज्ञात्या बुधविबुधांनीं स्वधर्मरक्षण साधाया,
सहेतु घालुनि दिलीं बंधनें हवीं निग्रहें पाळाया. ९९

धर्म हवा परि कुणां उपाधिक बंधनकारी निर्बंध,
रुचति न; मंदां काय वदावें? कैचा निरुपाधिक गंध? १००

दुःखाभावीं कशी अनुभवीं सौख्यमाधुरी उतरावी?
देहाभावीं जीवधारणा क्षम वद कैशी सखि व्हावी? १०१

बंधन मूळाधार सृष्टिला, सृष्टिक्रम त्यावांचून,
अगतिक निश्चित, बंधविमोचन अनर्थकारण तें जाण! १०२

पंचभूतिं ज्या विश्वाचिनिर्मिति की स्थिति तैसें संहरण,
करी नियंता तयांसही पण घालुनि बंधननियंत्रण १०३
एक भूत जरि विमुक्त झालें बंधच्छेदुनि विश्वाची,
घडी विघडवी, दृष्टांतानें जाणिव होइल तुज त्याची १०४
जशि अतिवृष्टी अनावृष्टि तशि करिते विश्वा वैराण,
सागरतल किति नौका बघती झंझा करितां थैमान ! १०५
एकक्षण जरि रवि न अंबरीं अनर्थ होती किती जनीं,
जाणिव याची सूर्यग्रहणीं खगही देतिल तुज करुनी ! १०६
'बंधोच्छेद न करोत भूतें' ! इच्छावें हें ज्या मनुजें—
तुडवावीं पदिं तयें बंधनें नवल याहुनी काय दुजें ? १०७
हेंचि विबोधुन करी प्रबोधन भारतभूषण पार्थाचें,
अनुस्मरुनि तो उद्घाटन कीं अनुवादन मी करिं त्याचें १०८
जनकादिक जन झाले पावन कर्मचि करुनी जनिं पार्था !
जगद्धितास्तव तुजांहि वास्तव कर्म करावें स्वहितार्था १०९
आचरितो जे श्रेष्ठ पुरुष कीं आचरती जन तेंच खरें,
मानी तो तें प्रमाण त्यातें अनुसरती ते मोदभरें. ११०
लोकत्रयिं या नुरेचि सखया कर्म कराया मज उर्ता,
दुर्लभ कांहीं जरि मज नाहीं कर्म करीं मी तरि पार्था ! १११
कर्माचरणा जरि न करीं मी आळस सारा टाकोनी,
लोकहि माझ्या पथेंचि येतिल सारे कर्मा सोडोनी. ११२
संकरकर्ता लोकनिहंता असुनी जगता मी त्राता,
होइन ऐशापरी अकारण कारण लौकिक जनघाता ११३
तुज मी म्हणुनी विनवीं रमणी हेंचि निदानीं परोपरी,
सहजाचाची गोष्ट तेवढी तुम्हां न कांहीं याउपरीं ११४

विमोहकलिली अधर्मजाळीं मज या काळीं गुरुफडुनी,
मदृष्टीनें पाप गमे जें नच घडवी तें मजकडुनी! १९५
अगाणित तीर्थे असती येथें ह्मेल तेथें राहोनी,
तनू सार्थकी लावुनि अपुली निजोद्धार घे साधोनी. ११६
प्राप्त जाहला, धर्म तुला जो प्राग्जन्मार्जित कर्मानें,
त्यांताहि ईश्वर असे अधिष्ठित केवल संज्ञाभेदानें. ११७
ईश्वर ध्यावा ईश्वर गावा, चुकल्या जीवा निजधाम,
तोचि दाखवी, स्वरूपिं मिळवी, देउनि अक्षय विश्राम! ११८
काय अश्रुचें कारण आतां? इहजन्मींचा संबंध,
तुटला अपुला जावें जिकडे नेइल मन तें स्वच्छंद! ११९
कथिल्या मार्गी अचुक वागतां पडेल कोठें तुज न उणें,
करोनि घेई धनी जगाचा आत्मवश्य तो आत्मगुणें. १२०
मजला तारि वद काय राहिलें येथें आतां विलोभन,
तुझ्याच मागोमाग निघालों सोडुनि मीही हें भवन!" १२१

× × × ×

(श्लोक मालिनी)

परुष सरल शब्दीं बोधुनी कामिनीला,
द्रुतपदिं वळला तो जावया झोंपडीला
भरभर किति चाले सूर्य अस्तीं नभांत,
पथिंच जणुं गमे कीं गुप्त झाला क्षणांत! १२२

× × × ×

स्वागता

वंचिता विधिहता हतकामा, । चिंतित स्मरुनि त्या गुणधामा—
क्लांतखिन्नवदना उभि राहे, । कान्त सेवित पथाप्रति पाहे. १२३

× × × ×

दिंड्या

परमकष्टें निजनाथ कुटीराला
सजल नेत्रीं प्रणिपात तिनें केला;
पदां टाकी एकेक विकल काय,
परी येती ना उचल हाय! हाय! १२४
पुन्हां चाले परतोनि पुन्हां पाही,
पथीं पतिच्या चामके पुढें कांहीं;
बघे मुरडोनी श्वास दीर्घ सोडी,
परम सायासें पाय पुढें ओढी! १२५

सौर्यतिलकनिर्याण शके १८४४ अनंततनय

## मयूरवाणी.

श्लोक

प्रमुग्ध मति हो[१] खरी सुकवनीं! कसें भूवरी-
मयूर सृजि काव्य हें रसिकवृंदचेतोहरी!
करीत गुणगान तो भ्रमर पंकजा, तें कमी!
असेंच मज भासतें! मग मुदें न मी त्या नमीं? १
जशी मुदित मानसें तटिनि धांवते चंचला,
तशी कवनवाहिनी धरुनि ती परी अंचला!
ध्वनिप्रमुख अर्थ हे, मिळति उक्ति मुक्ता तशा!
लहानपणिं लोभलों, जनक दावि त्या गोडशा! २

कै. माधवसुत

———o———

१ पंताच्या कवनवाहिनींत सभ्य स्त्रीपुरुषांनीं संकोचरहित अवगाहन करावें तींत श्रृंगाराचा अतिरेक कोठेंहि दिसून यावयाचा नाहीं.

## मैत्रीचें सिंहावलोकन.

श्लोक

तेव्हां रम्य उषा! जरा उमलली कोठें जिवाची कळी!
होतीं स्वैर कुठें नभांत फिरुनी चंडोल हीं मानसें!
वारा गोड, सुरम्य रंग नभिंचे, पाहूनि गालीं खळी—
बाल्याची हसरी पडे; मन जडे; सौख्यास सीमा नसे.
मध्यान्हीं रवि तापला! क्षणभरी वुरायलों आपण;
गोडी लोपुनि जाय! होरपळलों खातां छपेटा किती!
लागे आंच जिवास; किल्मिष जळें चित्तांतलें 'मी—पण';
देहीं दूर; परी मनें मिळतसूं, घेऊन वाऱ्यागती.
'होती रात्र पुढें भयाण'—कळलें नाहीं जिवां, ही जरा
आले मेघ गडाडुनी! कडकडे विद्युल्लता—वादळ!
गेले तुंबळ अंबुधी खवळुनी! भंगोनि गेली धरा!!
दो—टोकांस परंतु पाहत उभे होतों किती निश्चल
दुर्दैवी सरली निशा! विमलता पूर्णत्व दे प्रीतिला.
येई रम्य उषा! उषामय पुढें रस्ता असे आपुला ४

गिरीश

———×———

### प्रेमविषय.

(प्रेमाशिवाय जिणें व्यर्थ आणि अशक्य आहे अशीच बहुतेकांची ठाम समजूत आहे.)

श्लोक (शार्दूलविक्रीडित)

विश्वीं या करतो खरोखर जयां माझ्या जिवाचे सखे
ते सारे पडले दुरी त्यजुनियां मीही सुखाला मुके
आई, भाऊ, सखे असोनि आजि हो! गांवात माझ्या सुखें
प्रामा पालटुनी उगा विपदिं गी, सर्वा सुखाला मुके! १

येथें मोद मना सदा मिळविण्यां राघू स्वतः पाळिला
त्याला आवडती अशीं बहु फळें घालोनियां ठेविला,
माझा राघूवरीच जीव जडुनी प्रेमा बहू वाढला,
तों एका दिवशीं परी पळुनियां सोडी मला एकला ! २
त्याचा दुःसह तो वियोग मजला होवोनियां या मनीं
एकाकीसम वाटुनी मग तधीं पाळीत मांटी मनीं
हा ! हा ! एक दिनीं परी बनुनियां कालाननीं खाद्य ती
गेली सोडुनियां मला करुं कुठें प्रेमास मी पूढतीं ! ३
दुःखानें परिपूर्ण जीवन जधीं होवोनियां या जनीं
जीवा जाचितसे, तधीं मनुज तो आनंद होण्यां मनीं
कोणा पक्षि–पशूंस सादर करी प्रेमोनिधी आपला
प्रेमस्थान जगीं कुणास नसतां आनंद ना लाभला. ४

सहदेव

—×—

## विजयि मराठा.

(चालः–चंद्रकांत राजाची कन्या)

महाराष्ट्राच्या भालपटाची रेषा उजळीत
विजयि मराठा आला वेगें घोडा उडवीत
जन्मभूमिच्या भंवती नाचे रिपुची तलवार
करून आला धडकीभरशी बोथट ती धार ।
रायगडाचा धुरंधराचा हा पंचीप्यारा
विजयि भवानी समशेरीच्या मुठींतला हीरा
महाराष्ट्रलक्ष्मीच्या मुकुटीं रत्नांची माळ
वीररत्न हें एक त्यांतलें तेजस्वी लाल

परवशतेच्या दारांतूनी उठला आक्रोश
मूर्तिमंत मावळच्या रक्ताचा हा आवेश
निजभाग्याच्या सोपानानें देशाचें भाग्य
बद्धपरिकर प्रगाढ चढवी वीर महाभाग
शौर्यशालिनी समर्थ वाणी समर्थ दासांची
भिनली यत्हृदयांत मूर्ति ही मर्द मराठ्यांची
जिजाउच्या उपदेशाचीं जीं उत्तेजक वाक्यें
कानीं पडलीं ओझरती, तत्प्रभाव हा फाके
सह्यगिरीचा असह्य विक्रम हा त्याचा गोळा
पातशाहिच्या दारावरची फोडी जेजाला
खडाड झालें, ढाल उडाली, पडली धरणीला
"छत्रपतीकी जय" बोलोनी लपेटिला शेला
घाव लागले, रक्त वाहिलें शुद्धि न देहाची
एक महत्वाकांक्षा भरली शिवमांगल्याची
चंद्रकोरिचें निशाण भिडलें भगव्या झेंड्याला
'दीन' शब्द तो दीन जहाला 'हर हर' घोषाला
पुण्याकांक्षा पुण्यमनीषा यांचा समवाय
पुण्य जयाच्या जयमुद्रांनीं सजून हा जाय
मृत्यूच्या छातीवर रोखुन अजस्र भाल्याला
स्वातंत्र्याचा वीर पुकारा करीत हा आला
रायगडाची भव्य पताका ही स्वागत करिते
जयलक्ष्मीच्या जयवंताला 'जयोऽस्तु ते' वदते १९

—x—

दु. आ. तिवारी

## अग्रदेव कवि.

( चाल:—ईश्वर पंकज )

विधी—सुकवीची कविता दुहिता सृष्टीकाव्यमयी ।
विधि कवी खरा भुवनीं। अगम्य जरी ॥ ध्रु० ॥

कवि जैसा निज कवितेला
नटवी खुलवी बहु वेळा
विधिहि तैसा सृष्टीला
नाना सुगुणें नटावीत बसणें ऐसा खेळ करी ॥ विधि ॥ १

सृष्टी-काव्या विधि रचितो
निराकृता आकृति देतो
सगुणीं निर्गुण दाखवितो
अदृश्याला दृश्य कराया रुचिर रूप वितरी ॥ विधि ॥ २

या काव्यांतिल रम्य स्फुटें
मोद बघुनिया मज वाटे
कविहृदयाची साक्ष पटे
कीं तो साचा काव्यरसाचा निर्झर होय तरी ॥ विधि ॥ ३

रस सगळे दिसती येथें
शृंगारासम नच पारि ते
रमविति मानव चित्तातें
श्रमसागरिं या जगता अजवरि शृंगारच सुतरी ॥ विधि ॥ ४

शृंगारीं जग नटलेलें
स्थिरचरही अवघें भुललें
पाहुनि कविमानस डोलें
ज्योत पतंगीं भा रविरंगीं रत कलिका भ्रमरीं ॥ विधि ॥ ५

कुसुमकोष बहु लुटुनी तो
मधुकर जैसा मधु घेतो
निज सदनींही साठवितो
विधिच्या काव्यावरुनी तैसा मानव काव्य करी ॥ विधि ॥ ६
विधिचा सर्वहि हा खेळ
वर अंतरिं जो अति विमल
वाटे मजला तो अतुल
विधि-किंकर हा नर कैसा निज कवनीं गर्व धरी ॥ विधि ॥ ७

———×——— गुणवंत हनुमंतराव देशपांडे

## लाडक्यास.

[ शार्दूलविक्रीडित ]

होतें पुष्कळ पूर्वपुण्य पदरीं—चित्तीं गमे हें मला—
वेल्हाळा! ह्मणुनीच ह्या मदुदरीं त्वज्जन्म रे! जाहला!
सच्चिन्मूर्तिच साच तूं कितितरी आनंद देशी मना!
—होतें जें मज सौख्य आज करवे कोणा न तत्कल्पना!— १
जैसा नील नभीं प्रसन्न दिसतो तो रम्य राकापति
तैसा हा तव चेहरा विलसतो, आनंद देतो अति!
स्रष्ट्यानें स्रजितां तुला मज गमे, चातुर्य तें आपुलें
केलें खर्च असेल सर्व ह्मणुनी सौंदर्य हें लाभलें! २
शोभे! षट्पदवर्ण केश कुरळे, चांफेकळी नाक तें
नीलेंदीवर नेत्र, कामधनु हे भ्रू तान्हुल्या वाटते.
संध्याराग सुरम्यसा विहरतो ह्या लाल गालावरी,
बाळा! बालमृणालकोमल तनू आहे तुझी गोजिरी ३
दोन्ही आंवळुनी मुठी दृढ किती तोंडांत त्या कोंबिशी,
त्यांतें चोखुनि काय तूज मिळतें पीयूष सांगे मशीं,

यापूर्वीं वसती तुझी सुरपुरीं होती सख्या राजसा!
वारंवार ह्मणोनि ऊर्ध्व नभ तें तूं पाहसी कां असा? ४
गालीं काय ह्मणोनिया उमटली ही रम्य हास्यच्छटा?
गोष्टी मूक कुणासवें करिशि तूं सांगे मला चावटा!
कोणीही नच ह्या जगांत दुखवी त्वन्मानसातें कदा;
प्रत्यक्ष प्रभु खेळवी सवंगडी होओनि तूंतें सदा! ५
पंचप्राण मदीय तूं छकुकल्या! आहेस ह्या भूवरी!
दुःखाचा परिहार नित्य करिशी साक्षात् सुधन्वंतरी!
प्रेमोत्कर्षभरें अहा! चिमुकल्या! लीला तुझ्या पाहुन
आनंदाश्रुपयःसमाकुल सदा होतात मल्लोचन! ६
'आ आ आ' स्वर काढुनी करिशि तूं वेडेंच मातें पुरें!
आतां खूप असे मटामट मुके घेईन तूझे खरे!
लाभो ही तव शैशवस्थिति तुला आजन्म बाळा! जनीं
प्रार्थी श्रीजगदेकरायचरणीं हें मी अहर्यामिनी! ७

——×—— कृष्णाबाई गंगाधर कवचाळे

## जगांत एखादाच

[पदाची चाल]

सुख सेवावें दुःख वगळुनी सकळा मनुजा वाटे
मऊ मखमाली गादी असतां कुणा आवडे कांटे?
सदासर्वदा स्नानासाठीं आनंदाची गंगा
असतांना दुःखाचें डबकें रुचेल कोणा सांगा?
मिष्टान्नांचा सुवास जेव्हां दरवळतो त्या कालीं
सुकी भाकरी कधीं कुणातें बोला कीं आठवली?
डोईवरती सूर्य तळपतो पडे सुखाचें ऊन

उद्योगें अमला ह्मणोन सकला जें चंद्र धार्डी भला
साधो स्वास्थ्य अखंड तें तुमचिया कार्यीं सदा मंगला! ६

अन्नें तृप्त गजाश्व हे, तरि मधू भक्षून ही मक्षिका,
मिष्टान्नें द्विज तुष्ट हा बहुतही त्याच्या करी कौतुका,
सर्वांच्या अशना अनेक रचनासंभार संपादिला
जेणें तें प्रभुवत्सलत्व तुमच्या साधो सदा मंगला! ७

इच्छा उद्भवतांच कार्य घडतें, सारें न लागे क्षण,
लीलेनें रचिलें अनंत जगतें, त्यांचें करी पालन
विश्वांचा अतुल प्रकार अवघा जेणें असा साधिला
तें सामर्थ्य अगाध नित्य तुमच्या साधो महा मंगला! ८

भूतीं प्रेम, अखंडही कुशलता कर्मांत सौरम्यही,
सौंदर्यातिशय प्रधान गुण तो साधेपणा त्यांतही,
वृत्ति स्वास्थ्य अभंग, अक्षय जनीं वात्सल्य, सत्ताबल,
ही अष्ट प्रकृती पूजोनि प्रभुची साधा सदा मंगल ९

———×——— हरी महादेव समर्थ

## गीतामाहात्म्य.

प्रारब्धानें बुद्धि भ्रष्ट झाली असतां तुझी भक्ति घडत नाहीं; तर यथार्थ भक्ति घडून मुक्ति प्राप्त व्हावी ह्मणून काय केलें पाहिजे? असा प्रश्न केल्यावरून पृथ्वीस विष्णूनीं गीतामाहात्म्य सांगितलें:—

आर्या

[1]भगवंता, परमेशा, देवा, तव शुद्ध भक्ति केविं घडे
प्रारब्धभोगयोगें जीवाची बुद्धि या जरी बिघडे? १

---

१ पृथ्वी ह्मणते.

प्रारब्धें भोग भोक्ता गीताभ्यासीं रमेल जरि नित्य
होईल मुक्त तेणें, स्पर्शेना कर्म त्यास गे! सत्य. २
गीताध्यानस्थाचे दोष, महादोषही न उरतात
नलिनीदलास जैसे नच, गे! ते अंबुबिंदु हसतात. ३

गीतापुस्तक जेथें, जेथें तत्पाठ, त्या स्थलीं वसतीं
मूर्त प्रयाग आणिक सकलहि तीर्थें प्रसिद्ध जीं असतीं. ४
देव, ऋषी, पन्नग ते, योगी, गोपाळ, गोपिका सुमती,
नारद, उद्धव, वसती तेथें, बुध सर्व मागती सुगती. ५

साह्य, धरे! शीघ्र करी गीता, तत्पठन चिंतन श्रवण
जेथें होय तिथें मी निश्चित निवसें सदैव, गे! जाण. ६
गीताश्रयें असें मी, गीता मद्गेह उत्तमोत्तम गे!
गीताज्ञानबळानें भुवनत्रय पाळितों धरे! बघ गे! ७

गीता परमा विद्या माझी ही ब्रह्मरूप निश्चित गे!
मात्रार्ध अक्षराची, नित्य, अनिर्वाच्यरूपमय अंगें. ८
तत्त्वार्थज्ञानमयी, वेदमयी, परम हर्ष देणारी
कृष्णें आनंदघनें प्रोक्त असे स्वाननें जया स्मरीं. ९

अष्टादश जप हीचा निश्चल चित्तें करी सदा मनुज
विज्ञानसिद्धि घडते मिळतें पद परम त्यास गे! सहज. १०
संपूर्ण पाठ न घडे अर्ध घडे पाठ मात्र नित्य जरी
गोदान पुण्य मिळतें निश्चित गे! भ्रांति यांत तूं न धरीं ११

पाठ त्रिभाग घडतां गंगेचें स्नान जाहलें समज
जपतां षडश होतें प्राप्त, धरे! सोमयागफल सहज. १२
एकाध्यायाचि केवळ पढतो जो नित्य भक्तिभावयुत

२ विष्णु भगवान ह्मणतात.

रजिष्टर्ड नं बी ५३७

# "मराठ्यांचीं संग्रामगीतें"

कवि दु. आ. तिवारी यांच्या रोमांचित करणाऱ्या सर्व ऐतिहासिक कवितांचा संग्रह यांत–'गारदी कटोनी मेला' 'संताजीची घोडदौड' 'वडगांवावरचा वीर' 'धन्य जननि जनकोजीची' 'मिळवा खाशाशिर्शीं मारील' वगैरे सर्व वीरश्रीच्या कविता आहे. इब्राहिमखान गारदी, सदाशिवराव भाऊ, मेहेंदळे, महादजी व जनकोजी शिंदे, मल्हारराव होळकर यांच्या अतुल पराक्रमाच्या वर्णनांनीं हें पुस्तक सुंदर झालें आहे. पृ. सं. ११०, ८२. तिकिटें पाठवा व्ही. पी. नें ८११.

के. एम्. सोनाळकर वकील
जळगांव–पूर्वखानदेश

---

# जाहिरात.

तरुण वाचकांच्या मनाचा कल उद्यमीय वाङ्मयाकडे वळविणें महाराष्ट्रीयांस अत्यंत अवश्य झालें आहे. व हें कार्य घडवून आणण्याची कामगिरी नियतकालिकें, वाचनालयें आणि सुशिक्षित गृहस्थ यांजवर महाराष्ट्र व्यापारी परिषदेनें सोंपविलें आहे. करितां काव्यामोदानें प्रसन्न चित्त झाल्यावर

उद्यम

मासिक वाचण्याकडे लक्ष दिल्यास उद्योगधंद्याकडे मन वळून पोटापाण्याचा प्रश्न सुटून चिरकाल काव्यास्वाद घेण्यांत आनंद वाटेल.

वा. व. ट. खर्चासह रु. ५

फुकट. विनयमूर्ति अर्धा आणा पाठविल्यास.

महादेव कृष्ण पाध्ये बी. ए. बी. एल.
संपादक "उद्यम" ऑफिस टाऊन
नागपूर.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

११०८२

अलीकडील कवि मंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती । त्या त्याच अर्थाप्रति दाविताती
कौशल्य मोठें रचनेंत आहे, । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

वर्ष ३० वें) डिसेंबर सन १९२२ (अंक १२

अनुक्रमणिका


आत्मवंचित (वि. गो. साठे) ........................ २६५
माझी निराशा (नारायण केशव बेहेरे) .............. २७२
प्रिया विरह (आनंदीरमण) .......................... २७७
कवि राधारमण निमाले (आनंदीरमण) ................ २८१
भगवत्सूक्ति (अनुवादक) ............................ २८३
संशोधन (दु. आ. तिवारी) .......................... २८५
प्रल्हादाचे उद्गार (ह. म समर्थ) .................... २८७



**प्रकाशक—नारायण नरसिंह फडनीस**

बाबजी प्रिंटिंग प्रेस जळगांव पू. खा.

वार्षिक वर्गणी पोस्टेज व्ही. पी. सह १॥ रुपया

कवि, विषय व पद्यसंख्या — पृष्ठांक

४ विनायक गोविंद साठ्ये (१५५)

३८ दैवाचा खेळ ... ... ... ... १७
२ तारुण्याचें ध्येय ... ... ... ६६
२२ शोकलहरी ... ... ... ... ६१
१० इंद्रधनुष्य ... ... ... ... ११५
१८ आशाभंग ... ... ... ... १३८
७ कांहेर ... ... ... ... १४२
२२ गंगावतरण ... ... ... ... १७७
३६ आत्मवंचित ... ... ... ... २६५

५ कै० माधवसुत (१४३)

२२ वसन्ततिलक ... ... ... ... ६९
७ कृत्रिम कोप ... ... ... ... ९५
९ हृदयनिवेदन ... ... ... ... २०७
१०३ आत्मनिवेद ... ... ... ... २१७
२ मयूरघाणी ... ... ... ... २५३

६ अनंततनय (१२१)

१२५ बंधविमोचन ... ... ... ... २४१

७ केशव नारायण वैद्य (१०३)

७२ लोकमान्य प्रशस्ति ... ... ... १२१
३१ कैकयी ... ... ... ... १९३

८ भागीरथीतनय (४६)

४६ काव्यरत्नावलीचा वाढदिवस, ईशस्तवन ... १

९ नारायण केशव बेहरे (४६)

४६ माझी निराशा ... ... २७२

कवि, विषय व पद्यसंख्या | पृष्ठांक


१० आनंदीरमण (३९)

११ गुलाब ... ... ... ... ११२

२१ प्रियाविरह ... ... ... ... २७७

७ कवि राधारमण निमाले... ... ... २८१

११ हरी महादेव समर्थ (३७)

९ मंगलाष्टक ... ... ... ... २६१

२३ गीतामाहात्म्य ... ... ... २६२

५ प्रल्हादाचे उद्धार ... ... ... २८७

१२ सिताराम बळवंत बोंद्रे (३५)

१८ ऋष्याश्रम ... ... ... ... ११७

१७ शारदीपौर्णिमा ... ... ... १८१

१३ कै. पांडुरंग गोविंद शास्त्री (३२)

३२ आर्यविलाप ... ... ... ... ७३

१४ काव्यशेखर (२७)

२ रम्यबालपण ... ... ... ... ९३

२ दुःखांतीं सुख... ... ... ... ९४

७ शैशवसहचरी... ... ... ... १०८

१६ कविता रुसली! ... ... ... १४०

१५ विंध्य विहंग (२४)

९ सृष्टीचा राजद्रोह ... ... ... ८८

१५ जगांत एखादाच ... ... ... २५९

१६ अ. द. लवकरे (२१)

२१ माझी पहिली कविता ... ... ... ७९

१७ गुणवंत हणमंतराव देशपांडे (१८)

७ वृद्ध गोपी म्हणते ... ... ... ९

४ दैव ... ... ... ... ६४

७ अज्ञात कवि ... ... ... ... २५७

१८ विष्णुसुत (१८)
१८ सापत्नभाव ... ... ... ... २०९

१९ जननीजनकज (१७)
१७ समजूत ... ... ... ... १८३

२० गणेशसुत गुणे (१६)
५ राष्ट्रगीत ... ... ... ... १५५
६ स्वतंत्रताविजय ... ... ... १५६
५ असहयोग ... ... ... ... १६८

२१ हरी सखाराम गोखले (१६)
१६ आईसाठीं आणलेलें फूल... ... ... १६७

२२ लक्ष्मण जगन्नाथ आकूत (१५)
१५ दुःखनिवेदन ... ... ... ... २१

२३ गांग (१४)
१४ भ्रातृभक्ति ... ... ... ... १०९

२४ सदाशिव अनंत शुक्ल (१४)
१४ स्वर्गसोपान... ... ... ... १५४

२५ गोविंद विठ्ठल फाटक (१४)
१४ द्वादशपंजरिका ... ... ... १५७

२६ कापशीकर वैद्य (१४)
१४ मराठ्यांचीं संग्रामगीतें ... ... २१५

२७ रामानुज (११)
११ वेणी ... ... ... ... ६१

२८ उद्धव (१०)
८ काळाच्या काळजीला लिहिलेलें पत्र ... ६२
२ जन्ममरण ... ... ... ... ८६

२९ नारायण धोंडो ताम्हणकर (१०)
१० वन्देमातरम् ... ... ८०

काव, विषय व पद्यसंख्या पृष्ठांक


३० यशवंत (१०)

२ आमचा इतिहास ... ... ... १२०

८ अभाग्याचें धीरोद्धार ... ... ... १५६

३१ वासुदेव (१०)

३ स्मृति चित्र ... ... ... ... १७५

७ दवबिंदु ... ... ... ... १८५

३२ नारायण रामचंद्र मोरे (८)

८ श्रीयुत तिवारी यांस ... ... ... ८७

३३ वा. ना. सोनटक्के बी. ए. (८)

८ जीवाची तळमळ ... ... ... १३५

३४ पुष्पशील (८)

८ उत्कंठा ... ... ... ... १७५

३५ अनुवादक (८)

८ भगवद्वाणी ... ... ... ... २८३

३६ सुंदरराव भास्करराव वैद्य (७)

७ नमूं कृष्णदेवा... ... ... ... १४३

३७ कृष्णाजी गंगाधर कचवाळे

७ लाडक्यास ... ... ... ... २५८

३८ शारदाग्रज (६)

६ प्रेम ... ... ... ... १०

३९ श्रीराम गोविंद बेडेकर (६)

६ शिलेदार म्हणवितां कुणाचे ? ... ... १६१

४० रामचंद्र अनंत राईरकर (५)

५ उत्कंठा ... ... ... ... ११३

| कवि, विषय व पद्यसंख्या | पृष्ठांक |
|---|---|
| ४१ रामचंद्र [४] | |
| ४ वाजवि गोपाळा ... ... ... | १०७ |
| ४२ तारानुज [४] | |
| ४ वसुधा ... ... ... ... | १५९ |
| ४३ गिरीश [४] | |
| ४ मैत्रीचें सिंहावलोकन ... ... ... | २५४ |
| ४४ सहदेव [४] | |
| ४ प्रेमविषय ... ... ... ... | २५४ |
| ४५ नारायण गंगाधर लिमये [३] | |
| ३ गीता ... ... ... ... | २४० |
| ४६ काशिनाथ [१] | |
| १ मार्झे गाणें ... ... ... ... | ६८ |
| ४७ यादवसुत [१] | |
| १ एक कोडें ... ... ... ... | ८८ |
| ४८ व. तु. पणशीकर [१] | |
| १ वेदांतील काव्य ... ... ... | २१२ |
| ४९ गोविन्दनन्दन | |
| १ प्रबोधन ... ... ... ... | २१३ |

# काव्यरत्नावलीचें दप्तर.

रा. रा. कुंटे यांचें पत्र ६, ७ च्या अकांत आह्मी प्रसिद्ध केलें आहे सदर गृहस्थ रत्नावलीचे हितचिंतक असून रत्नावलीचे एक कवि आहेत आधुनिक काव्याची आह्मी सेवा करीत आहोंत याबद्दल आमचा ते गौरव करीत आहेत. परंतु ह्या गौरवास आह्मी मुळींच पात्र नाहींत. हें आह्मी प्रांजलपणें कबूल करितों. आमच्या हातून जी कांहीं वेडीवाकडी सेवा झाली असेल किंवा होत आहे याचें सर्व श्रेय रा. रा. कुंटे यांच्या सारखे जे निरपेक्ष कवि व हितचिंतक आहेत त्यांच्याचकडे आहे. त्यांच्या उदार वाणीच्या अभावीं ही रत्नावली कधींही चालली नसती ही गोष्ट प्रामुख्यानें येथें नमूद करणें अवास्तव होणार नाहीं.

त्यांच्या सूचनेप्रमाणें येत्या जानेवारीपासून रत्नावली अगदीं नियमित रीतीनें काढण्याचें आह्मी ठरविलें आहे. नियमितपणाची जाणीव आह्मास नाहीं असें नाहीं. परंतु तिची सांपत्तिक स्थिति मुळींच चांगली नाहीं चार चौघे कविमित्राच्या व स्वतःच्या हौसेकरितां हा प्रयत्न आह्मी चालविला आहे. हल्लींचीं मासिक पुस्तकें कशीं चाललीं आहेत व कवितेचे वाचक किती आहेत हें पाहिलें ह्मणजे अनियमितपणाच्या दोषातून रा. रा. कुंटे आह्मांस मोकळे करतील अशी आह्मांस आशा आहे. आह्मी स्वतः छापखान्याच्या धंद्यावर पोट भरतों. घरीं आह्मांस जहागिरी नाहीं. जेमतेम चारशें वाचकांवर ती कशीबशी चालवितों. वर्षाच्या अखेरीस प्रत्येक वर्षाच्या दोनशे तीनशे प्रति आयतीं बचलेलीं पुस्तकें विक्रीकरितां पैशाच्या लोभानें बांधून ठेवतों. परंतु आतां हीं

तीस वर्षांचीं बांधलेली चार पांच हजारांचीं पुस्तकें निवळ ठेवण्यास जागेची पंचाईत पडूं लागली आहे. लिपटनच्या जाहिरातीप्रमाणें प्रसिद्धी करण्यास मूळ किंमतीपेक्षां जाहिरातीसच खर्च करावा लागेल. अशा आपत्तींतसुद्धां आह्मास दर वर्षास तीनशे रुपये निव्वळ बुडित खर्च करावा लागतो प्रत्येक वर्षाचे सबंध पुस्तक निव्वळ आठ आण्यांत देण्यास आह्मी आज तयार आहोंत. पण ही कवितेची वेडी हौस आमची कोण पुरी करणार? चांगल्या श्रीमंत बुकसेलरकडे वशीला लावावा तर तो कवितेचे नांव ऐकून दारांतसुद्धां उभे राहूं देत नाहीं. अशी स्थिति आहे

कवितेच्या निवडीविषयीं जी रा. रा. कुट्यांनीं सूचना केली आहे ती यथायोग्य आहे. ही गोष्ट आह्मीसुद्धां जाणतों, पण ज्या अर्थी जुन्या कवींनीं व नांवाजलेल्या कवींनीं रत्नावलीवर प्रेम कमी केलें आहे तेथें आह्मी तरी काय करणार? कंपाझिटर मॅटर मागण्याची गर्दी करूं लागला तर कशी तरी वेळ मागवावी लागते! बाकी साधारण कवीपेक्षां अनंततनयासारख्या कवीकडे आह्मी केव्हांही आशाळभूतपणानेंच पहात राहणार! कुंटयांच्या इच्छेप्रमाणें आह्मीं निवड करण्याचें ठरविलें आहे. व त्याकरितां चांगल्या कवींची आह्मी प्रार्थना करणार आहोंत. आह्मांस कै. मित्र--मनोरंजनकार यांचें शिष्यत्व करण्याचें कारण नाहीं. कै. मित्र हे किती भिडस्त होते याची माहिती आमच्यापेक्षां कुंट्यास कमीच असेल वीरतनय कोल्हटकर हे किती सामान्य दर्जाचे शब्द जुळावणारे आहेत हें सर्व रसिकवर्गास माहित आहेच. त्यांच्या छत्री

वरच्या कवितेच्या सावलींत काव्यवाचक कसा तापून निघतो, ही कै. मित्राची भीड कुंट्यास माहित नाहीं असें वाटतें. छत्रीची कविता छापल्याचा प्रमाद कै मित्रांनी कोल्हटकराच्या कानावर घातल्यावर रा रा. कोल्हटकर कै मित्रावर फारच रागावले व कित्येक दिवस त्यानीं त्यांच्यावरची कृपादृष्टि कमी केली होती तेव्हां अशी भीड रत्नावलीनें ठेविली नाहीं. कवितेचें निवड करण्याचें ज्ञान काव्यरत्नावली-कारांस नाहीं हें म्हणण्यापेक्षां काव्यरत्नावलीच्या भोजनागारांत रसिक-श्रीमंताकरितां पाट मांडून ठेवले आहेत ते जर पाट रिकामें टाकूं लागले तर गरिब बिचाऱ्या होतकरूं तेलंगी भिक्षुकांस तरी कां वाटेस लावावें? रसिक श्रीमंतांनीं नक्की आमंत्रणें कबूल केल्यावर आम्ही भीड न ठेवतां सगळे पाट भरले गेले आहेत असें खुशाल त्या तेलंगी गृहस्थास सांगण्यास व त्यास परत लावण्यास रत्नावलीकार केव्हांही तयार आहेत.

निवड करण्याचा शिव्या शाप मिळूं नये म्हणून रत्नावलीच्या आरंभीं आह्मी एक काव्यपरीक्षक विद्वान् व रसिक कमिटी नेमली होती त्यावेळचीं प्रकरणें व तपासणीचें काम चांगलें होत असे. पुढें पुढें चांगलेच कवि रत्नावलीत येऊं लागले. परंतु ही परीक्षक कमीटीची कल्पना कित्येक मानी कवीस आवडली नाहीं. कै. केशव-सुत हे ह्याच मताचे होते. ते एकदां जळगांवीं आले असतांना आह्मी त्यांस त्यांच्या कच देवयानीच्या प्रकरणांत एक सुंदर पाठ घालण्यास सांगितला तो त्यांस आवडला नाहीं. पुढें गोफण या

कवितेंत एक शद्ब आह्मी घालण्यास सांगितला. तो इतका अनुरूप त्यांस वाटला कीं हुबळीहून त्यांनीं आह्मास त्याबद्दल आनंददर्शक पत्र पाठविलें मार्मिक कवींच्या नजरेखालून कवितेची निवड किंवा दुरुस्ती झाली तर कांहीं वाईट नाहीं. ह्याच दृष्टीनें परीक्षक कमिटीची त्यावेळीं योजना होती.

आह्मी मागें कांहीं वर्षांपूर्वीं पुरुषोत्तमकविकृत संस्कृत श्रीशिव-काव्याचें भाषांतर केलेलें आहे. तें त्यावेळीं रत्नावलींत आलेलें आहे. त्यांत एक श्लोकाचें आह्मी खालील प्रमाणें भाषांतर केलें:—

जथा मानसीं पुत्र कल्याण वागे
नृपाकारणें बाह्य हेतूस सांगे.
पदाशीं जरी प्राप्त झाला शिवाजी
सहस्त्रां द्विजां तुष्टवीतो सुभोज्यीं

मूळ संस्कृत श्लोकाचें स्वारस्य आह्मांस चांगलें आणतां आलें नाहीं. शिवाजाच्या मनांत पुत्रकल्याणाची उत्कट इच्छा होती. परंतु बादशहाकरितां बाह्यात्कारानें तो ह्मणाला जर कोणी माझ्या दुष्ट मुलास येथें धरून आणील तर त्या प्रीत्यर्थ मी हजार ब्राह्मणभोजन घालीन. असा ह्या श्लोकाचा गर्भितार्थ आहे. हा सर्ग आह्मी कै. एल्. आर. वैद्य एम ए. एल्. एल्. बी. अॅडव्होकेट यांजकडे तपासण्यास पाठविला त्यावेळीं काव्यपरीक्षक कमेटींत ते एक मेंबर होते. यानीं वरील श्लोकांत " जथा " शब्दाच्या एवजीं फक्त " जरी " शद्ब घालून दुरुस्ती केली. ही दुरुस्ती किती अन्वर्थक झाली आहे. व मूळ संस्कृत श्लोकांचें किती स्वारस्य त्यांत उतरलें

आहे हें मार्मिक वाचकांस कळून येईल व त्यासही ह्या दुरुस्तीचा आनंद होईल. ह्या ठिकाणीं एवढें रामायण सांगण्याचें कारण नव्हतें परंतु ह्याच प्रसगांत आह्मास आमचे कविमित्र रा. रा. बेडेकर यांची क्षमा मागावयाची आहे. ह्मणून येथें थोडा विचार करावा लागत आहे. ज्या ६।७ व्या अंकांत रा रा. कुंट्यांचें आह्मी पत्र छापलें आहे त्याच जोड अंकांत रा. रा. बेडेकर यांची "शिलेदार ह्मणवितां कुणाचे?" ही कविता छापली आहे. ह्या कवितेंत आह्मी कांहीं दुरस्ती केली आहे. तिच्यांतील कांहीं स्थळें आम्ही पुढील अंकांत दाखविणार आहोंत. ही दुरस्ती पाहून बेडेकर यांस फार संताप आला. आणि त्यांनीं आमचे कान चांगलेंच उपटले, ही आठवण आह्मी कधींही विसरणार नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यापासुन आह्मी चांगलाच बोध घेऊ. निदान बेडेकराची कविता आहे तशीच, आणी कित्येक कवींची रचनेची तऱ्हा कशी असते हें कळण्याकरितां ह्मणून छापीत जाऊं. रा रा. बेडेकरांनीं आमची बरीच षोडशोपचारें पूजा केली आहे. ती सगळी स्थलसंकोचास्तव येथें सादर करितां येत नाहीं तरी पण वाचकांपुढें आह्मी आपला गुन्हा लपवू इच्छित नाहीं. बेडेकर आह्मांस लिहितात कीं:—

"माझ्या कवितेंत अनाधिकृत ढवळाढवळ केली आहे. सहा पानांच्या कवितेंत पन्नासांवर दुरस्त्या आहेत व रसभंग केला आहे मजकूर, भाषाशैली, मतें, रस वगैरे गोष्टींस मूळ लेखकच जबाबदार आहे. त्याच्या परवानगीशिवाय जावाई शोध घालण्यास प्रकाशकास अधिकार नाहीं. या बाबतींत आपण बेसुमार उल्लंघन केलें आहे. रसपरिपोषणासाठीं दुरस्ती मला कळविली असती तर ती मी केली असती किंवा नसती. माझ्या परवानगीशिवाय असें करणें युक्त नव्हे. संपादकाला ही सत्याची चाड असली पाहिजे. ह्या कृत्याबद्दल आपण

जबाबदार आहांत. व ह्याचा जबाब द्यावा. व ही जबाबदारी ( चूक ) रत्नावलींत सादर करावी. शक्य असल्यास कविता मूळप्रतीबरहुकूम पुनः छापावी. ह्मणजे वाचक निर्णय देतील. नाहींतर ती कविता गाळलेली आहे असें वाचकांनीं समजावें वगैरे."

बेडेकराचा संताप थोडक्यांत पण समळ्या अर्थाचा व्यक्त केला आहे. बेडेकराचा संताप द्राक्षापाकाचा आहे. नारिकेलपाकाचा नाहीं. ही त्यांतल्या त्यांत आमच्या नशीबानें मोठी आनंदाची गोष्ट आहे. आह्मी चूक कबूल करून त्यांची क्षमा मागावी असा त्यांचा हेतु दिसतो. आणि यजमान जर याचकांस सर्वस्व देण्यास तयार आहे तर तो त्याच्या इच्छेकरितां क्षमा कां मागणार नाहीं ? क्षमा मागितल्यानें याचक जर संतुष्ट होत आहे तर त्याचा संतोष हीच दात्याची धन्यता होय आह्मी सर्वस्वी बेडेकराची क्षमा मागतों. त्याबद्दल आह्मांस कांहींच वाईट वाटत नाहीं. आह्मांस वाईट वाटणार नाहीं तर बेडेकराचा संताप व आमचें वाईट वाटणें दोघे एकाच जागेंत रहातील. मात्र त्यांची सगळी कविता पुनः छापणें हा त्यांचा आकाशांतील चंद्र मागण्याचा हट्ट मात्र आह्मांस पुरवितां येणार नाहीं. याबद्दल आह्मी दिलगीर आहोंत. स्थल संकोचास्तव त्यांची मूळ कृति व आह्मी केलेली दुरुस्ती पुढील अंकीं देऊं, येवढें आश्वासन देतों.

पुन्हा आतां रा. रा. कुंट्यांच्या सूचनांकडे वळतों. वर सांगितल्याप्रमाणें रत्नावली नियमितपणानें काढण्याचें ठरविलें आहे. व जानेवारीचा अंक महिना अखेरीस बाहेर पडेल, अशी आह्मी उमेद बाळगितों. नियत काळीं अंक बाहेर पडल्यानेंच जर वर्गणीदार वाढतात तर आमचा त्यांत फायदाच आहे काव्येतेच्या निवडीसंबंधानें वर उल्लेख आलेलाच आहे. तेव्हां पुनरुक्ति नको. मात्र रा. रा. कुंटे यांनीं "कवितांची निवड व

कोणी करावी " याबद्दल सविस्तर मजकूर लिहून आह्मांस सहाय्य करावें येवढी आमची त्यास विनंति आहे. " बारीकशी बार्डर " घालण्याचे ते सूचवितात, परंतु त्याचा आह्मांस बोध होत नाहीं. सर्व पेजभर बारीक बार्डर घालण्याचे ते सूचवित असतील तर हें त्यांचें रुचिवैशिष्ट्य आहे परंतु कित्येकांच्या मतें कवितेस बार्डर नको असेंच मत पडेल असें आह्मांस वाटतें. प्रसंगाला उचित अशी चित्रांची योजना कांहीं वाईट नाहीं अशीं चित्रें तयार करून देण्यास काव्यरत्नावलीचे हितचिंतक व आश्रय दाते रा. रा. विश्वनाथ अंबादास उमरावती हेही तयार आहेत. त्याबद्दल आह्मी त्यांचे आभार मानतों. व तसा योग आल्यास आह्मी त्यांच्याशीं पत्रव्यवहार करूं. चित्रें चांगलीं निघण्यास आर्टपेपर व खर्चाची (हाफटोनची) छापाई करावी लागेल. हा खर्च आह्मांस करितां येणार नाहीं. हौस चांगलीच असते. परंतु जमाखर्चाचा मेळही पहावा लागतो. मात्र येत्या जानेवारीपासून रत्नावली क्रौनसाईज ग्लेज कागदावर काढण्याचें ठरविलें आहे. टैपही नवा वापरण्यांत येईल. एकंदर रत्नावळीचें साधें पण सर्वांगपूर्ण रूप करण्याचें ठरविलें आहे. असलेल्या वर्गणीदारांनीं थोडी किंमत जास्त दिल्यास इष्ट हेतू साधेल. मिळालेल्या वर्गणीत सर्व भागलें ह्मणजे आह्मी कृतकृत्य होऊं, इतकेंच नव्हे तर थोडीबहूत ठरविलेली पदरमोड आह्मी करण्यास तयार आहोंच खर्चाचें जमापत्रक व झालेला खर्च वगैरे हिशोब लौकरच आह्मी वाचकांपुढें सादर करणार आहोंत. रा. रा. कुंटे ह्मणतात तशी खटपट करून पैसा जमविणें हें आह्मांस रुचत नाहीं. व तशी जबाबदारी घेणें हें आमच्या शीलाच्या विरुद्ध आहे. साहित्यसेवी श्रीमानाकडे विनंति करावी अशी शिफारस करण्याचें रा. रा. कुंटे आह्मांस सांगतात, व आम्ही त्यांस विनंति करूं, परंतु साहित्य श्रीमानाची याद आमचे जवळ नाहीं. रा. रा. कुंटे यांस

ह्या गोष्टीची कल्पना नाहीं. आज २९ वर्षें आम्हांस सगळा अनुभव आला आहे. प्रत्येक वर्षाची तीन हजार कविता आयतें बांधलेलें पुस्तक आठ आण्यांत देण्यांस आह्मी तयार आहोंत पण एकही साहित्य श्रीमान आम्हास भेटत नाहीं. ह्या सर्व बोलण्याच्या गोष्टी आहेत. रा रा. कुंटच्यानीं कविता करावी, ती रा. रा. फडनीसांनी छापावी व थोडे बहुत कवितेचे वाचक धुंडून काढून हौस पुरी करून घ्यावी, यापेक्षां जास्त अपेक्षा करितां येत नाहीं. साहित्य श्रीमान कमरेचे आठ आणे सोडित नाहीं व कांहीं कविलोक इतके दरिद्री आहेत कीं कविता पाठविण्यास रत्नावलीजवळ पोष्टेजचे पैसे मागमागतात. तेव्हां कवितेचा व्यापार किती हीन दशेला गेला आहे याची कल्पना रा रा. कुंटे यांनीं करावी. तेव्हां काव्याचे भोक्ते व रत्नावलीचे हितचिंतकांनीं मनापासून खटपट करावी व चार चार इसम आह्मास मिळवून द्यावे, ह्मणजे वाचकांस आठ आण्यांत तीन हजार कविता आह्मी त्यास देऊं. कुंटच्याच्या इच्छेप्रमाणें रत्नावली सुबक करण्याचें आह्मी अभिवचन देतों. सन १९२३ सालापासून आह्मी रत्नावलीची किंमत वाढविणार होतों. परंतु मनोहररूप व उत्कृष्ट कविता वर्षभर वाचकांस दाखवून मग पैसा दोनपैसे वाचकापाशीं मागणें बरें ह्मणून सन १९२३ ची वर्गणी वाढविण्याचें रहित केलें आहे. रा. रा. कुंटच्याच्या सूचनेवर आह्मास जें प्रांजळपणें लिहावेसें वाटलें, तें आह्मी लिहिलें आहे. खाजगी पत्राचा उपयोग रत्नावलींत करूं नये असें त्यांचें ह्मणणें आहे. परंतु आह्मास सर्व गोष्टी वाचकांपुढें मांडण्यास रा. रा. कुंटच्यानीं सवड दिली ह्मणून त्यांनीं याबद्दल दिलगीर होऊं नये एवढें सांगून त्यांची आह्मी रजा घेतों.

काव्याच पुस्तकांवर व मासिक पुस्तकांवर अभिप्राय देण्याचे राहिले आहेत ते पुढील वर्षापासून दर महिन्यास क्रमाक्रमानें देण्यांत येतील.

---

# काव्यरत्नावली

अंक १२ वा.

## आत्मवंचित

व्यसनें तितकीं सर्वथैव त्याज्य ही गोष्ट कोणास मान्य नाहीं? अशा सर्वमान्य गोष्टीला सोडून जाऊन जाणते लोक देखील व्यसनी होतात तर मग ते आत्मवंचित नव्हेत काय?

[ शार्दूलविक्रीडित ]

पूर्वेला विभवाढ्य बालरविचा होऊन बिंबोदय
तेजें दिग्विजया करीत गगनीं येतांच विश्वंजय
आली सन्मुख मोहिनी प्रणयिनी त्या खूणवी वारुणी[1]
श्रीमंता तरुणा अशाच जडती वारांगना वारुणी[2]! १

ती बाही "तरुणारुणा! प्रियकरा! माझ्याकडे लौकर--
ये ये! आतुर संगतीस्तव तुझ्या मी, धांव! जीवेश्वर!"
भोळा सूर्य भुले गणी तिज खरी आत्मानुरक्ता सखी
कंठालिंगन लुब्ध सत्वर करूं धांवे स्वताला सुखी! २

---

१ पश्चिम दिशा २ दारू

"ते शोभे रमणीय पश्चिमनिधीकाठीं तिचें मंदिर
तेथें वैभव सर्व पूर्ण भरलें पाहीन चेतोहर
ठाके सोत्सुक ती सजून रमणी माझें करूं स्वागत"
चित्तीं चालति हे विचार[1] विच्या जों त्या दिशे चालत ३

येतां सूर्य समीप धांवत मिठी त्या वारुणी घालि ती
गालीं लाल तिच्या विलास करि जो प्रेमा वदावा किती?
सूर्योष्ठा भिडतांच उत्कट तिचा तो विंबबिंदूत्तम
झाला मूढ दिनेश दीन पडला! व्यापी निशेचें[2] तम! ४

शिखरिणी

निशा येतां सारे कैर विकल होऊन गळले
मुखाला काळोखी सहज चढली एकचि पळें
दिवा जावा घातें अवचित तसा सूर्य लपला
कशाचा तेजस्वी अमल मदिरा ज्या करि खुळा! ५

शार्दूलविक्रीडित

' नाशा जातच वारुणीवशपणें चंडांशुही प्रत्यहीं
हें पाहूनहि टाकिती जन कसे ना वारुणी निंद्य ही?"
मी आश्चर्य मनीं करीत असतां संवाद कानीं पडे
आईला लडिवाळ बाळ पुसतो कोणी वदे बोबडें! ६
"आई का ललतीश" 'बाळ तुज रे! सांगू कशी मी तुला!"
"बाबा का दललोज मालिति तुला!" "छे: बाळ बोलूं नये!"
"हे अंगावल केव्हले वळ तुझ्या आले कश्यानें बये"
"भारी चौकस तूं! बरें न असलें मातें पुसावें मुला!" ७

---

१ पिकल्या तोंडल्याप्रमाणें लाल २ रात्रपक्षी दारुची निशा तम–काळोखपक्षी तमोगुण ३ हातपक्षी किरण दारू प्याल्यानें हात गळता ... 

"आधी थांग मला" "उगीच मळता घ्यावा बरें हट्ट कां!"
"झाला थिज भिजून कां पदूळ गे!" "पाणी मग्ना आणिलें"
"हे गालावल थेंब का?" "झुचमळे डोयीं घडे वाहिले"
"दोळे लाल कथे" "चुलीजवळ मी आहें न कां बाळका?" ८

"मी सुद्धा बतलों इथेंच"—"न तुला पीडा करी दूर हा"
"तें कां?" "कारण चूल त्यास पाहिल्या पासून सांगे तसें
ना ऐकी पग तो तुझ्यापरि धरी वेडा पुन्हां आग्रहा
झाली थंड रुसून चूल!" चिमण्या मीही करूं कां तसें?" ९

हा कोटिक्रम ऐकतांच थिजली ती प्रश्नमाला तदा
त्या बाळें भय घेतलेंच न घडो की थंड माता कदा!
कार्या कारण शोधतें न अथवा बाळा कितीसें कळे
नेत्रीं त्या शिशुवंचनें न चुकलीं मातेस तीं आसवें! १०

तीं आलीं टिपलीं तशीच सतिनें वेगें टिपें पालवें
कामा लागलि आपल्या जरि तिचें तें चित्त हो कालवे
ती जोडी कर भक्तिनें विनविण्या "देवा कृपा ही कर
या बाळा तरि दे सुबुद्धि! न घडो हा बापसा पामर!" ११

\+ \+ \+ \+

"बाळाचें तुज तोंड बंद करितां आलें कसेंही तरी
काळाचें करवेल काय? तुमच्या दुष्काळ माते घरीं!
बाळा मागविण्या उपाय सुचवी ही चूल जी थंडशी
मध्यान्हीं निजसाक्ष काळ पटवूं येतां—करी कां तशी!" १२
प्रश्ना यापरि मी तिला निजमनीं योजून टाकूं निघें
नाहीं ... तों त्या स्थलीं मी मनें

झोके खात घडोघडीं अडखळे जो बोलतां चालतां
आला ओकत खाकरीत नवरा झाला तिला बोलता १३

"दे पैसे चल दे अगोदर"—"नसे हातांत पै देखिल"
"जा कोठूनहि आण माग उसने"—"आतां कसे देतिल?"
"टाकीं कांहिं गहाण"—"एक फुटकें भांडेंहि आतां नुरे"
"जा चोरी कर वा कसेंहि कर दे पैसे मला जा त्वरें!" १४

"चोरी! हाय कशी करूं?" "शिर कशीही कोणत्याही घरीं"
"देवा! हें भलतेंच काय वदतां" रांडे न तोंडा करी"
"कोठें लौकिक! आपलें कुळ कुठें?" "हो हो! कळे तें मला!"
"अब्रूला"—"जड भ्याड भीति—न गणी मी धीरवेत्ता तिला!" १५

"आह्माला ह्मणतील काय जन हो"—"मातींत गेले जन"
"मूर्खे मी नवरा तुझा!"—"प्रियकरा देवा! तुला वंदन!"
"माझा शद्ब तुला न मान्य कुलटे!"—"हां हां! न कोपा करा!"
"लोकाची धरतेस भीड"—तर कां आतां उपेक्षा करा? १६

माझा मित्र उदार रोज मजला आकंठ पाजी सुधा
जीवाचा कलिजा कलाल! दुनिया ज्याशीं सदाही फिदा
गोपांना प्रिय नंदलाल—मधुपा आह्मा तसा तो भला
दारीं याचकसा उभा मज पुसे "द्या द्रव्य आधीं चला" १७

त्याला विन्मुख मी कसा दवडणें? शोभेल कां तें मला?
दे पैसे-मम सत्व राख! अथवा मारीन आतां तुला
नन्नाचा न अजून बंद तव कां पाडा तरी या क्षणीं
ही घे लाथ शिरीं—तुझा हारि तुझ्या बोल

स्वागता

लाथ एक दुसरी तिसरी तों
त्या शिरीं मउ उरीं खल देतो
कोसळून सहसा धरणीला
ती पडे पण दया नच त्याला। १९

\+ \+ \+ \+

शार्दूलविक्रीडित

व्हावी थंड चुलीपरी न जननी आणून चित्तीं असें
खेळू खेळगडी निघे जमविण्या बाहेर लीलारसें
तत्कर्णीं सहसा पडे करुण तों अत्यार्त मातृस्वर
आला धांवत बाळ आंत जनका जोडून बोले कर। २०
"बाबा मारुं नका गरीब कतली आई किती तांगली"
"ये दाबीन तुझा चिरीनच गळा रे! कारट्या या पळीं"
"थांबा हो! गळतें बगा तलि किती हें लक्त तोंदातलें
दोले हे उघले तली न बुबुलें हीं हालतीं कां बलें? २१

\+ \+ \+ \+

ती झाडी जरि हातपाय—पडल्या नाड्या ढिल्या त्या जरी
तो घावावर घाव घालि पळही हातास मा आवरी
जागोजाग फुटून देह धरणीं रक्तें तिच्या माखली
दीना वाग्विषबाणमूर्च्छित सती ती कोसळे भूतलीं। २२
माता कोसळतां बघून सहसा तो बाळ घाली उडी
पाहे सावरण्या तिला—पण शके ना वामनी बापुडी—
त्याची मूर्ति! परंतु कौतुक मला तें होय हो केवढें!
[illegible] अंध! न कधीं पाही जितें वा मढें? २३
[illegible]

स्वागता

कोसळे स्वजननीसह बाळ । न द्रवे तरिहि निर्दय काळ
तो मदांध मदिराहृतभान । बोलला मरणही नुमजून २४

शार्दूलविक्रीडित

“ढोंगी तूं नटवी अशीच ! पुरती आहे मला माहित
मी भ्यावें तुज नित्य हेंच कुलटे ! आहे तुझें इंगित !
भ्यालों आजवरी अजाण जनसा मी मात्र आतां नभी
ही हाणून उरांत लाथ करितों आतां तुला मी उभी ! २५

वसंततिलका

लाथेबरोबर तिचा तिज जीव टाकी
बाहेर जीभ पडली जणुं पाहण्या कीं
“हा मारिता सतिस तत्पति वा कृतांत
ही मानवाकृति धरून फिरे जगांत ?” २६

\+ + + +

शार्दूलविक्रीडित

सोहाळे पुढचे घडून सगळे त्याचे खुनी माणसा
साजे जें स्थल तेंच त्यास गवसे, झालाच तेणें पिसा
आतां मुक्त फिरे जगांत; पुसतां कोणी कुणा कौतुकें
“दारूचा इतिहास ?” लोक वदती “त्याला पुसा जा निकें !” २७

चिंध्यापीर खुशाल आसन सदा मांडून भीक्षेकरी
हा रस्त्यावर कोपऱ्यास बसला राहून लोकां करी--
प्रेमानें उपदेश “ ना सुजन हो ! दारू दुकानीं शिरा
ऐका हो, अविचार केवि करितां ? आधीं फिर[illegible]घरा !” [illegible]

मित्रांनो, समजा न केवळ जशी वांगीं पुराणांतलीं
हीं माझीं वचनें—स्वत्या अनुभवें मी सांगतों आपलीं !
हीं आधीं रुचतील ना तरि पुढें येतील हां प्रत्यया
त्यासाठीं तरि लक्ष द्या मज मिळो ही भीक येवा दया ! २९

शिखरिणी

सखी माझी दारू अतिशय तिचा मी प्रिय सखा
कपा कोणी केला स्मरत न मला तो जन निका
सख्यानें त्या माझ्या मम खचित नेली मनुजता
कळेना ही सद्यःस्थिति अमरता वा असुरता ! ३०

मला मद्यस्पर्शें सुख सुतमुखस्पर्श न रुचे
सुरा-वासें नाकीं मज सुख न नाकीं वसतिचें
सुरापानालापें श्रुतिसुख सुरालापें कटु ते
सुराभावें व्हावें मज जग सुनें नीरसचि तें ! ३१

सुरा नामैक्यें मी निशिदिन उराशीं धरि सुरी
मनी ये कोणाचा तरिहि करि मी तत्क्षण चुरा
खरें खोटें किंवा स्वपर कसलें ना मज कळे
मुखें ये तें बोलें ! उचलिन करीं जें मज मिळे ३२

न शंका सोन्याची विपुल मम लंकाच सदन
सपंका ती गर्ता घडलि मज रंका अनुदिन !
तदंकाच्या भेका मज कुलकलंका यम कदा
अलंकारा—पाशा चढविल गळां फार सुखदा ! ३३

---

१ दारूच्या धाणीनें. २ स्वर्गी. ३ दारुड्यांचें बरळणें. ४ कानाला सुख देणारं ५ देवगंधर्वांचें गाणें. ६ मोठी सुरी. ७ यमपाश हें आतां गळ्यांत दागिन्य प्रमाणेंच वाटतील हा भाव.

यमाधीना झाली तरुण गुणशाली मम सखी
सुपुत्राला आली स्थिति कटु अकालींच परकी !
मुखीं त्याच्या घालूं छाणिन जरि कोंडा कणभर
तरी होणें नाहीं व्यसनहत मी धिक् महि--वर ३४

अशी दारूपायीं मम गृहरमा व्यर्थचि मरे !
अहो दारूपायीं--घरघर उपाशी सुत फिरे !
अहो दारूपायीं--मम कुल तशी कीर्ति बुडली
अहो दारूपायीं--मज अवदशा कोण चुकली ? ३५

\+ + + +

वसंततिलक

साष्टांग वंदन सुरे ! तुज पूर्णभावें
कोणीं कधीं तुजपुढें कुशलें निभावें
या भारतास तव संग नकोच आई !
जेथून आलिस तिथें परतून जाई ! ३६

———×——— वि. गो. साठ्ये.

## ' माझी निराशा '

अंजनीगीत

मन बावरलें ! वेडें झालें ! । आनंदाचें ठाणें उठलें !
भीषण ओढे वाहुं लागले । दुःखी हृदयांत ! १
दुर्दैवाच्या फेऱ्यामाजीं । सांपडलेले मोठे गाजी
दीन होउनी करिती जी जी । पाड काय माझा ? २

१ घरची लक्ष्मी अर्थात् कुलस्त्री.

शाळू सोबती जे जे होते । सोडुनि गेले मजला ते ते
कोण विचारी अकिंचनातें । खडतर समयाला ! ३

मोळ्याभोतीं गोळा होती । जळूसारखें त्यास बिलगती
रक्त तयाचें शोषुनि घेती । नंतर त्या त्यजिती ! ४

भाग्य संपलें ! मित्र पळाले ! । सगे सोयरे दूर जाहले !
कठीण समयीं कामीं पडले । आजवरी कोण ? ५

तीच दशा ही माझी झाली । लक्ष्मी गेली नुरला वाली !
सोडुनि जाती मज त्या कालीं । मनुजे--पाषाण ! ६

पृथ्वीवरचीं भूतें पाहुनी । मानस माझें गेलें भ्रमुनी !
वाटे तेव्हां परके कोणी । नाहीं कामाचे ! ७

गृहीं रहावें एकांतांत । पत्नीच्या मधु सहवासांत
प्रेमळ पुत्रांनीं वेष्टित । दिन हे कंठावे ! ८

अशा विचारें जगा सोडुनी । रहावयाला मी निज-भवनीं
आलों, तेव्हां वाटे त्यजुनी । जाइल दुर्दैव ! ९

पवित्रता ती तिथें नांदते ! । प्रीतीचें मधु हास्य झळकतें !
कसा स्थलीं त्या येइल वाटे । दुःखाचा लेश ! १०

\+ + + +

आशा साऱ्या नष्ट जाहल्या ! । प्रीति-कल्पना पार जळाल्या !
दुःख-ज्वाला हृदीं भडकल्या ! । दग्ध हृदय झालें ! ११

स्वर्ग-प्रेमा ज्याला म्हणतीं । कसा रहावा तो या जगतीं ?
खुळे कवी ते उगिच वर्णिती । नश्वर वस्तूंना ! १२

स्वार्थी प्रेमें आहे भरली । खरोखरी ही अवनी अपुली ?
[illegible] मजलेली-- । मधुर गंध कुठला ? १३

प्रीतीची मी उच्च कल्पना । केली; पारि ती हाय जल्पना
ठरली! याचें दुःख मन्मना । होई अनिवार ! १४
होता जेथें मम विश्वास । वाटे जेथें प्रीतिनिवास
स्थळीं त्याच परि मजला फास । दैवें लावीला ! १५
स्वर्गसुखाचें आनंदाचें । या लोकींच्या विश्रामाचें
स्थान असे जें- त्याच गृहाचें । वासे पारि फिरले ! १६
पत्नी-पुत्रांची मज आशा । होती परि ती होय निराशा !
पाहुनि सारे माझ्या नाशा । तिरस्कारा करिती ! १७

\+ \+ \+ \+

गृहसौख्याचा वारा फिरला । उलट दिशांना वाहूं लागला
मन-नौकेला आवरण्याला । क्लेश फार झाले ! १८
प्रयत्न केले नावाड्यानें; । पाठ पुरविली परि वाऱ्यानें !
तुफान लाटांच्या जोरानें । नौका ती बुडली ! १९
क्षणांत गेली बुडुनी खालीं । पारि जोरानें घेतां उसळी
वरती आलों; फळी लागली । हातीं शांतिची ! २०
त्याच फळीच्या आधारानें, । माझ्या संतत परिश्रमानें,
पार पडे मी अति कष्टानें । भीषणाब्धिमधुनी ! २१
गेलों जगतां कंटाळोनी ! शेवटचा मी प्रणाम करुनी
नगर सोडुनी मग उद्यानीं । गेलों धात्रोनी ! २२
मला वाटलें, हर्ष मनानीं । होइल भारी शोभा पाहुनी !
रम्य फुलांच्या गुणगंगानीं । दुःखा विसरेन ! २३
विचार असले मनीं राहिले ! । स्वप्न सुखाचें [illegible]
आरशांतलें चित्र पाहिलें । कोणी चिरकाल [illegible]

दर्पण फुटला, चित्र नष्टलें । सत्य मन्मना तेव्हां कळलें ।
जें मी तेथें चित्र पाहिलें । । होतें प्रतिबिंब । २५
डोळ्यावरचा सारा गेला । उद्यानाचा रंग बदलला ।
प्रेमनिधी तो मजला गमला । दुःखाचा उदधी । २६

कितीक कलिका खिन्न मुखानें । झुरती रडती, अति विरहानें
सुकुनी गळती; मातिस मिळणें । होतें विधि–लिखित । २७
प्रियकर त्यांचे भुंगे काळे । सुखार्थ गेले होते सगळे ।
तेही परि हा ! कमल कोमळें । कोंडुनि मारीले ! २८

कितीक वेली वृक्षा त्यजिती । कवटाळाया अन्या जाती ।
काळ्याठिक्कर होउनि पडती । भूवर लज्जेनें । २९
वृक्षांचीही तशीच रीति । अन्येकांच्या ठायीं प्रीति ।
दुष्कृत्यांची फळें लाभती । त्यांना तात्काळ । ३०

नाना रंगी रुचिर फळें तीं । वृक्षांना त्या नित्य लागती
दुजे परि त्या तोडुनि नेती– । हें फळ पापाचें । ३१
कितीक ओढे वहात होते । करिती अस्फुट शब्द–रवातें ।
झालें त्यांचें गढूळ जल तें । निंदागानानें । ३२

मनुजांनीं हें केलें आहे । दुर्गंध इथें म्हणुनी वाहे ।
डबक्यामध्यें सुम जें राहे । त्यास गंध कुठला ? ३३
म्हणोत कोणी या उद्यान । मला भासते परी स्मशान ।
पापांचें हें वास स्थान, । सोडाया सजलों । ३४

× × × ×

वाटे मजला कृत्रिम हेंही । म्हणुनि दुष्टता येथें राही ।
सोडुनि त्याला मी लवलाही । निबिड वनी शिरलों । ३५

सृष्टि–सुंदरी तिथें राहते, । ऐसें मजला वाटत होतें,
सर्व परी तें ठरलें खोटें । जातां मी जवळ ! ३६
दुरुनी डोंगर फार साजिरे । दिसती त्यांची शोभा विखरे
भीषण भेसुर परि ते सारे– । खोल दऱ्या पूर्ण ३७
हिमाच्छादित त्यांचीं शिखरें । चकमक करितीं; शोभा पसरे !
चांदीचा मग रंग पाझरे ! । गोटे परि हृदयीं ! ३८
स्थिती तीच ही माझी झाली, । मूळ कल्पना पार निमाली !
सौंदर्याची मूर्ति फुटली ! । 'सुंदर' 'भीषण' हो ! ३९
हिंस्र पशू ते येथें वसती, । प्रत्येकाची दुसऱ्या भीती !
जीवाची मग पडते धास्ती । कांहीं नच सुचतें ! ४०
भीषण, भेसुर अजस्र झाडें । दिसती नयनां जिकडे तिकडे !
खोल दऱ्या वा उंच जे कडे । मानस भिववीती ! ४१
जिकडे तिकडे भेसुर छाया, । रवि–किरणांना वाव न ठाया
काळोखाचे राज्य व्हावया । कालावधि कुठला ! ४२

\+ + + +

भीषण वनिंची भीषण रचना । ज्याची नव्हती मला कल्पना
पाहुनि वाटे भीति मन्मना । खळबळ हो हृदयीं ! ४३
भेसुर चित्रें, भेसुर सृष्टी ! । बावरली ज्या बघतां दृष्टी
हृदयहि केलें ज्यांनी कष्टी– । वर्णु कसे त्यांना ? ४४
व्याकुळ झालों, मग ओरडलों ! । भीतीनें मी कंप पावलों !
पुढें काय तें सर्व विसरलों ! । काय वदूं पुढती ? ४५

\+ + +

श्लोक

झालें पुढें तें मज आठवेना । ना गोचरा तें मुळिं कल्पनांना ।
अदृश्य झालों जगिं या विशाल ! । कोठें भ्रमे मी ? मम हे विलोल ४६

——×—— नारायण केशव बेहरे एम्. ए.

## प्रिया-विरह

शार्दूलविक्रीडित

आनंदी ! प्रियवल्लभे ! मजसि तूं सोडून जाशी कुठें
मृत्यूनें तव आपणांमधिल गे ! संबंध सारा तुटे
नामाच्या विपरीत कां करिशि गे ! आतां कृती ही अशी
आनंदामृतदान थांबवुनि तें दुःखार्णवीं लोटिशी १

हा ! हा ! हा ! प्रियवल्लभे ! झडकरी ये भेट देईं मला
माझा आश्रय तूं उदार असशी हेतू असे गुंतला
चित्तासी न सुचे मतीसि न रुचे कांहीं तुझ्यावीण गे !
आतां काय करूं कुणा मन वरू सारें मला वाउगें २

कोठें ती वदनप्रभा शशिनिभा आतां असे लोपली
वाणी मंजुळ सत्य सुंदर तशी प्रेमामृतें दाटली
कोठें चंचल नेत्र लाजविति जे उत्फुल्ल नीलोत्पलां
कोठें देह तुझा शिरीषकुसुमस्पर्शी असे राहिला ३

कोठें भोग अनंत दिव्य तसले आतां रहाती प्रिये !
जे मी प्रेमळ संगतींत तुझिया भोगीत होतों सये !
छाया जेंवि पदार्थ सेवित तशी सेवेंत माझ्या रत
कोठें न्यून कधीं नसेंचि पडलें आहेस कोठें बत ४

माझ्या हातुनि काय चूक घडली जी मानवे ना तुला
कीं गोत्रस्खलितप्रमाद घडला ये कोप त्या ना तुला
हें गे! सर्व जरी खरेंहि असलें मर्त्य प्रमादास्पद
पत्नीतें नारि काय हो घसरलें त्याज्य प्रियार्थे पद ५

कोठें शील दया कुठें विनय तो कोठें वसे नम्रता
पातिव्रत्यगुणाधिराज विलसे कोठें असे तत्त्वतां
धर्मा कोण सखा तुझ्याविण अतां प्रेमासि वा आश्रय
किंवा निर्गुण तत्त्व तें तुजसवें पावोत हा निश्चय ६

ये मेघांतुनि खालती उतरुनी पर्जन्यधारेंतुनी
किंवा चंद्रसुधेसवें उतर गे त्या पौर्णिमेच्या दिनीं
ये ये तूं अथवा सुहास्यवदने! वायूवरी वाहुनी
कीं पूर्वस्मृतिच्या अखंड अपुल्या धाग्यावरी बैसुनी ७

शोकें कंठहि दाटला हृदयिंच्या प्रेमासवें आज गे!
आवेगें उर फाटला नयनिंच्या ओघासवें, हा जगे
आश्चर्या जनि दाखवीं सकल या स्वार्थप्रयत्ना परा
सेवोनी मम बुद्धि अन्य न दिसे धिःकार या पामरा ८

गौरीचा करिती सुखोत्सव घरीं चैत्रांत त्या कामिनी
आनंदें रमती प्रमोद करती जैशा नभीं दामिनी
आमंत्रोनि परस्परांस सदनीं सौभाग्य संपादिती
कुंकू त्या हळदीसवेंचि लुटिती, हर्षास नाहीं मिती ९

त्या मासींच तुवां खरोखर सये! शुक्लांत जी अष्टमी
पश्चिमे अपराह्णकाळिं रविचें जैं बिंब लोंबे नभीं
मांगल्या सुभगा असेंचि लुटिलें पुत्रासवें घेउनी

ठेवोनी मज मागुनी गजगती शुक्लागती लक्षुनी १०
आनंदाब्धि उचंबळे हृदयिंचा चंद्राननालोकनें
प्रीतीचा तव चंद्र जीवकुमुदा माझ्या विकासास ने
लोटे काळ असा विकास करितां गर्भास येई स्थिती
तेव्हां चंद्रकलेपरी प्रतिदिनीं वाढे तयाची द्युती ११
होतां काळ तयास पूर्ण मग तो व्यक्ता दशेतें वरी
घेई रूप जगीं न नाश अपुला तो बाळ गे ! सुंदरी
देवांही बहु हर्ष होत मग ते आमंत्रिती बाळका
देखायां निजसद्मिं, जात सह तूं संस्कारयुक्ताळका १२
झाला वत्सर त्या नसोचि सरलें कीं कार्य बिंबाधरे !
माघारी परतोनि येइं झणिं तूं हा धीर माझ्या सरे
अस्मत्पुत्रमुखावलोकनपरा स्वर्गीं जशी मंडळी
गुणरत्नपूर्णनिजप्रभावचतुरा आहे तशी भूतळीं १३
एकांतीं बकुलप्रसूनरचिता माळा तुझ्या अर्पिली
प्रेमानें दयिते नकार न मनीं आणोनि वक्षःस्थळीं
ऐसे योग अनंत ते स्मृतिपथीं माझ्यापुढें धांवती
त्या सर्वा पुनरस्त अश्रु तरि मी दुःखाश्रुमाळा किती १४
त्या या दुष्ट करें कृशानु सखये ! देही तुझ्या ठेविला
कोठें भक्षक अग्नि, सुंदर तनू कोठें तुझी कोमला
योग्यायोग्य विचार सर्व मुकला या कारणें कां मला
सोडोनी दिधलें पुन्हा परत ये आहेस तूं प्रेमळा १५
हा दुष्टा ! जगदंतका ? तुज कशी लज्जा नसे मानवी

१ देवयान मार्ग. जे प्राणी उत्तरायणांत, दिवसा, शुक्लपक्षांत मरतात ते देव-यान मार्गानें [illegible] परम गति पावतात.

कविदोष अल्प विसरा हो
गुणसंघ स्मरणीं राहो
काव्याचा घ्यावा लाहो
इतिहास काव्य उभयांचा । होतसे लाभ तर याचा ३

ते टिळक शंकराचार्य । त्रिभुवनीं धन्य कृतकार्य
करुनियां स्पर्श तच्चरिता । मांगल्य पावली कविता
पंतांचा प्रभुशीं द्रोह । केकांचा पाडी मोह
ऋतुचक्र सृष्टिचें काव्य
गंभीर कल्पना भव्य
रिझविती हृदय नवनव्य
मांडिला मेजवानीचा । कीं थाट खाद्यपेयांचा ४

वृक्षांची वेलफुलांची । रचिलिसे बाग नवलाची
जाहालमवाळां थारा । सांपडला काव्यद्वारा
'कवि–शिरोमणी' ही पदवी । योग्यता कवीची पटवी
प्रेममृत्युकर्तव्यांचें
शतकत्रय विरचायाचें
संकल्प असे चित्ताचे
जाणुनी यमानें त्यांस । ओढिलें टाकुनी पाश ५

कालिदास आणिक पंत । कविमणिंचा धरिला पंथ
वाचुनि आंग्लकवितेस । रंगविलें निजवाग्वधुस
वेंचुनी सकलही शक्ती । साधिली गजाननभक्ती

होतात प्राण जेंव गोळा
लावेला विनायकिं डोळा
करि अंतक चोळामोळा
स्वानंदभूमिला गेले । कवि राधारमण निमाले ६

काव्याचें मंदिर अपुरें । भाविवासमंदिर अपुरें
उठुनी आपुल्या मार्गे । गळत निघुनि कां रागें
पुष्पाहुनि मोठी कलिका । वाटली तुम्हांला खरि का
जी छालगणांवरि छाप
अध्यापन बसवि अमूप
करिल कोण त्याचें माप
आनंदिरमण शेवटिं । भवदीय धरी पदकमल ७

टीपः—वरील कवितेंत राधारमणांच्या पुढील काव्यास अनुलक्षून लिहिलें आहेः- फडनीस काव्य, आर्यमाताविलाप, आह्मी मराठे गडी, मोरोपंताचा प्रभुद्रोह, एका मराठ्याचें स्वप्न, जहाल व मवाळ, ऋतुचक्र आणि वनविहार [ केतक, गुलाब, माड, वड वगैरे स्फुट ] हीं पूर्ण काव्यें व गजासुर, आचार्य चंपू, प्रेमशतक आणि किरातार्जुनीय [ रूपांतर ] हीं अपूर्ण काव्यें.

आनंदीरमण

## भगवदुक्ति

॥ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ॥ गीता

श्लोक ( पृथ्वीवृत्त )

स्वकर्मरत तूं रहा, इतर सोडुनी साधन
स्वकर्मनिरतत्व हें, घडत ईश्वरोपासन

प्रिय प्रभुवरास हो मनुज तो स्वकर्मे भजे
स्वकर्मविधिनें तया, भजुनि सिद्धि तू पाविजे १
स्वकर्मभजनीं नरा, करुनिया उपेक्षा करी
दुजाच पथ सेवितां, विफल हो मुमुक्षा तरी
असे भ्रम तुला पहा! नियतकर्म सर्वेहुनी
प्रभू सुलभ लौकरी सुकरशा दुज्या साधनीं २
सदोष जरि वाटलें नियत आपलें कर्म गा
विकल्प परि त्यानिशीं मनिं न आणणें वाउगा
असे कवण कर्म तें? विगुणता नसे ज्यामधीं
ह्मणून करणें भलें, त्यजुं नये स्वकर्मा कधीं ३
स्वकर्मपथ हा बहू कठिण काय कष्टप्रद
असें ह्मणुनि टाकितां तरि न तेंहि सौख्यास्पद
'स्वकर्म त्यजणें नव्हे' खचित कर्मसंन्यास हा
न चालत अकर्मशा स्थितिंत देहयात्रा पहा ४
नव्हेच जडकर्म हें खचित हेतु दुःखाप्रती
वसे सतत मानसीं प्रबळ जी, फलासक्ति ती
त्यजून फलकामना करुनि बुद्धि ईशार्पित
स्वकर्मपथ आचरीं, दुरित नातळे निश्चित ५
स्वकर्म समजूं नये, कधिं नरा उपेक्षात्मक
समाजहितधारणा सकल कर्म आवश्यक
यथाधिकृति ज्यास जें नियत कर्म भागास ये
जरी मरण पातलें, तरि अनुष्ठिजे तें स्वयें ६
फलीं न अधिकार तो निज, असे स्वकर्मावर
स्वकर्म करुनी रहा, धरुनि शांतिवृत्ति स्थिर

कृतीच अशि काय ती? हृदिं विचार ये कोणता
न जाय कधि तोहि या विफल जाण हें तत्त्वता ७
स्वकर्म परिपाळ तूं, धरुनि एकनिष्ठा मनीं
तयेंच तरशील या भवमहापयाब्धींतुनी

पहा गतकथा तरी बहुत कर्मयोगाश्रयें
विमुक्त 'जनकादि' ते असति जाहले निश्चयें ८

अनुवादक

—×—

## संशोधन

पृथ्वि–वृत्त

जिथें धवल मीन ते विलसती वरी खालतीं
तटोपगत होउनी मकरभक्ष्य आलोकिती

तृषाकुल सरोवरीं वळति नीर प्याया करी[1]
तिथें अमुन शोधिलें तुज गजार्तहारी हरी! १
प्रमत्तनृपमंदिरीं अनयपापचारी सभा
करीत असतां तुझ्या भजकमानभंगास वा!

घडेल तव दर्शन प्रिय म्हणून खांबाकडे
बघें नरहरी! तरी सफल हेतु तो ना घडे २
तुझ्यास्तव वरी हरी! विमल दानधर्मी सुधी
कुणास वदलों असा मुखि न शब्द 'नाहीं' कधीं

त्वदागमन–मार्गि तें बहु विलोभवीलें मना
मिळे तव बघावया बटु सुमूर्ति ना वामना ३

---

1 हत्ती.

सुरेश्वर असो, तथा अपुलि जन्मभूमि प्रिय
कुठेंहि वसला, तिचा करिल शेवटीं आश्रय
भवच्चरणभूषिता भटकलों मही सत्वरीं
विशून्य 'मथुरा' तुझ्याविण तशी 'अयोध्या पुरी ४
समस्त जगिं राहशी परि विशेष साधुस्थलीं
सुतीर्थि वसणें तयाहुनहि आवडे भूतळीं
सुतीर्थनिकटीं तुला ह्मणुन बाहिलें ईश्वरा!
न तूं उघडिलें तरी नयन अद्रिनाथश्वरा! ५
फणीश्वर दिसे, तया पुसतसे:—'कुठें श्रीहरी!'
न शब्द वदता शिरे अहि वसुंधराभ्यंतरीं
नभीं उडुन दावितो गरुडवास तैसा तुझा
शिरूं महि कसा? उडूं नभिं कसा तुझ्यासाठिं बा! ६
सुनील नभ पाहतां उतरशी गमे शामला!
नमस्तटिनि ही नसे तरल वैजयंती गळां
निशापति न हा तिच्यामधिल कौस्तुभाचा मणी
तमालतरुशामला! मुख न तें दिसे लोचनीं! ७
प्रभातसमयीं बघे नयनरम्य पीतांबरा!
गमे उदय पावशी मिरवित स्वपीतांबरा
दिनेश्वर गमे तुझ्या किरिटभूषणाचा मणी
दिसे रुचिर मूर्ति ती परि न चक्रधारी ह्मणीं ८
इथें असति 'देवकी' सुतवती 'यशोदा' किती
मुखीं वदत 'कृष्ण' त्या निजसुतासही बाहती
असे गृहिं गृहीं किती दिसति कृष्ण संकर्षणा
"कृतीविण न येतसे गहति नामधारी जना' ९

* पयोदघनपंक्ति[1]चा गडगडाट तो गाजतां
सुवर्णनिभ दावितां चमक तीव्र-विद्युल्लता
तुझा भरतगोकुळीं विकलदास रक्षावया
घडेल अवतार हा प्रगट हेतु आई ह्या

—×—— दु आ तिवारी

## प्रल्हादाचे उद्गार

असुरांचा राजा हिरण्यकशिपु यास आपला पुत्र प्रल्हाद विष्णुभक्तींत मग्न झालेला खपेना; त्याला ठार करण्याच्या हेतूनें त्यानें प्रल्हादास तरवारीनें मारावें असा हुकूम सोडला; तरवारीच्या घायानें तो मरेना; तेव्हां त्याला अग्नींत जाळावा अशी हिरण्यकशिपूनें आज्ञा दिली; अग्नींत तो जळेना; मग डोंगराच्या कडेवरून त्याला ढकलून देण्याची योजना केली; तरीही तो मरेना; पुढें त्याला समुद्रांत नेऊन बुडवावा अशी आज्ञा दिली; समुद्रांतही तो बुडेना; शेवटीं त्याला विष प्यावयाला देऊन मारावा म्हणून विषप्रयोग करण्यांत आला; तरीही तो वांचला.

श्लोक-शिखरिणी.

[2]खळीं मोठे मोठे बहुत वधुनी शोणितजळें
तयाच्या तूंते हें लखलखित पाणी चढविलें

---

* गोकुळाष्टमी वर्षंतुन येते तिला धरून हें वर्णन आहे,

१ हा पुनरुक्तवदाभास अलंकार आहे. एकाच अर्थाच्या दोन शब्दांची जवळ जवळ योजना झाली पण प्रत्येकाचा अर्थ भिन्न असला म्हणजे हा अलंकार होतो. 'पयोदघनपंक्ति' यांत पयोद आणि घन या दोन शब्दांचा अर्थ मेघ हा असावासा वाटतो. पण येथे घन शब्दाचा अर्थ 'दाट' असा आहे. 'हस्ती करी वलय उंच आशा उपायीं' हेंही या अलंकाराचें उदाहरण आहे. ७ व्या शतकांतील अलंकारज्ञ वामनभट्ट यानें हा अलंकार शोधिला.

२ खड्गास उद्देशून.

जया पायीं गंगा नरहरी पिता तो मम खरें
तरी पाणी खड्डा तव सहज रे! सर्व उतरे १

पुरा शोषी सिंधो! सहज मुनि कुंभोद्भव तुला
तदा माझ्या तातें तुज जगविलें देउनि जला
स्मरें तूं तें आतां जनक सुखवी तो नरहरी
उडी घेतों बंधो! प्रियकर मला ठेव उदरीं २

नगीं जातो पृथ्वी सदय जननी वाट बघते
त्वरें येतों आई! पदर उघडीं जीवजनिते!
ह्मणे आला तान्हा नरहरि सखा बंधु नमुनी
फुटे पान्हा माते तनय दिसता सज्जन मुनी ३

अगा अग्ने! होसी प्रबळ सकळां भस्म करिसी
समर्थाशीं झुंजे नच अबल मी बाल मजसी
स्मरे झालें कैसें नरहरिसखे गोप छळितां
धरूं देहीं आम्हां भय न तव देहांत शिरतां ४

रमा माता माझी उदधिदुहिता वंद्य अमरां
तिचा भ्राता होसी जलनिधिज तूं मातुल खरा
सखा मामा आतां नरहरि करो शुद्ध उदरा
विषा! ठेवायातें ससुख तुज शंभुप्रियकरा! ५

हरी माधव समर्थ

———×———

१ सिंधूस उद्देशून, २ डोंगर व पृथ्वी यांस उद्देशून. ३ अग्नीस उद्देशून
४ विषास उद्देशून.

# प्रमोद मासिक

प्रख्यात विद्वान् व कमलेल्या येथील व परद्वीपस्थ महाराष्ट्रीय लेखकांचे भारदस्त लेख, अनुकरणीय चरित्रें, हृदयंगम ओजस्वी व स्फूर्तीप्रद कविता, मार्मिक पुस्तकपरीक्षण, आरोग्यवर्धनाची माहिती, प्रवासवर्णनें आणि मोहक व बोधप्रद गोष्टी, चटकदार चाण लेख तसेंच सामाजिक, धार्मिक, नैतिक, शैक्षणिक, औद्योगिक व राजकीय इ. राष्ट्रोन्नतीप्रद वाङ्मय व चित्तवेधक चालूं कादंबरी दरमहा वाचावयास देऊन प्रमुदित करणारे असें हें महाराष्ट्रांतील पहिलेंच सर्वोत्कृष्ट मासिक. कागद ग्लेज, छापाई सुबक, व आर्ट पेपरचें सचित्र सुंदर कव्हर असून वार्षिक वर्गणी ट. हं. सह ३ रुपये अगाऊ मनिआर्डरीनें पाठवून नांवें नोंदवावीं. जाहिरात देणाऱ्या व्यापाऱ्यास अपूर्व संधि पत्रव्यवहार करावा.

पत्ता:—वि. कृ. नेरूरकर बी. ए. संपादक "प्रमोद"
मालवण जि रत्नागिरी

---

## आजच्या आज मागणी करावी हे चांगलें.

वार्षिक वर्गणी ) **लोकमान्य** ( टपाल खर्च सु. ३। रु.

संपादकः—एकनाथ यादव निफाडकर

राजकारणाचे लोककारण करणारें हें महाराष्ट्रांतले पहिलेंच मासिक. वसंतपंचमीपासून सुरूं. नियमितपणांत पहिला नंबर. दर अंकांत स्वराज्याचा स्वतंत्र मोहरा ही कादंबरी. म. ग्रंथमालेच्या ग्राहकास रु. २॥ तीन पुष्पें, प्रवेश फी, मासिक आणि टपाल खर्च मिळून रुपये ६।

व्यवस्थापकः—"लोकमान्य मासिक"
लोकमान्य पेठ, धुळें.

रजिस्टर्ड नं बी ५३७

# "मराठ्यांचीं संग्रामगीतें"

कवि दु. आ. तिवारी यांच्या रोमांचित करणाऱ्या सर्व ऐतिहासिक कवितांचा संग्रह यांत–'भारती बाटोनी मेला' 'संताजीची घोडदौड' 'वडगांवाचरचा वीर' 'धन्य जननि जनकोजीची' 'गिलच्या खाशाचिर्दीमारील' वगैरे सर्व वीरश्रीच्या कविता आहे. इब्राहिमखान गारदी, सदाशिवराव भाऊ, मेहेंदळे, महादजी व जनकोजी शिंदे, मल्हारराव होळकर यांच्या अतुल पराक्रमाच्या वर्णनांनीं हें पुस्तक सुंदर झालें आहे. पृ. सं. ११०, ८९. तिकिटें पाठवा व्ही. पी. नें ८११.

के. एम्. सोनाळकर वकील

जळगांव-पूर्वखानदेश

---

# जाहिरात.

तरुण वाचकांच्या मनाचा कल उद्यमीय वाङ्मयाकडे पळविणें महाराष्ट्रीयांस अत्यंत अवश्य झालें आहे. व हें कार्य घडवून आणण्याची कामगिरी नियतकालिकें, वाचनालयें आणि सुशिक्षित गृहस्थ यांजवर महाराष्ट्र व्यापारी परिषदेनें सोंपविलें आहे. करितां काव्यामोहानें प्रसन्न चित्त झाल्यावर

## उद्यम

मासिक वाचण्याकडे लक्ष दिल्यास उद्योगधंद्याकडे मन वळून पोटापाण्याचा प्रश्न सुटून चिरकाल काव्यास्वाद घेण्यांत आनंद वाटेल.

वा. व. ट. खर्चासह रु. १

फुकट. चित्रसूचि अर्धा आणा पाठविल्यास.

महादेव कृष्ण पाध्ये बी. ए. बी. एस्.

संपादक "उद्यम" कॅटॉक टाऊन

नागपूर.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळांनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती । त्या त्याच अर्थाप्रति दाविताती ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे । सत्काव्य तेणें नव वाटताहे.

वर्ष ३१ वें ] फेब्रुवारी सन १९२३ [ अंक २ रा

नारायण नरसिंह फडणीस यांनी आपल्या
बावजी प्रिंटिंग प्रेस जळगांव पू. खा. येथें छापून
जळगांव येथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## अनुक्रमणिका.


स्वर्गारोहण [ केशव नारायण डांगे ]......................२५
कथोपनिषद्रहस्य [ ह. म. समर्थ ]......................२९
वीणा [ तांबे ]......................................३२
हे सुंदरी! [ दु. आ. तिवारी ]........................३४
दैव फिरल्यावर [ ह. म. समर्थ ]......................३६
वसंत [ ह. म. समर्थ ]................................३७
निसर्गप्रणय [ बाळकृष्ण गणेश पानसे ]..................३७
पुढच्या जन्मीं [ उद्धव विहेकर ]......................३९
काय सांगूं! [ दु. आ. तिवारी ]......................४१
वर्षाकाल [ पन्नालाल मूळचंद्र व्यास ]..................४२
हॅम्लेटनाटकाचें सार [ श्रीकृष्ण ]......................४३
एक विरही [ केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर ]..................४३
जडजीवाचें जगणें [ वि. ल. आगाशे ]....................४४
फलार्थी फलाच्या सजे मारं हातें! [ माधव गोविंद भिडे ] ४४
उषःकाल [ आनंदराव कृष्णाजी टेकाडे ]..................४८



वर्षारंभ-वर्ष-प्रतिपदेपासून — **संजीवन.** — वार्षिक वर्गणी ट. ख. सह ३॥-

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत नियमानें प्रसिद्ध होणाऱ्या ह्या मासिकांत सर्व उपयुक्त विषयांवर विद्वान व अनुभवी लेखकांचे लेख प्रसिद्ध होत असतात; मासिकाचें धोरण व्यापक व उदारमतवादीपणाचें असून प्रत्येक खालावलेल्या समाजाला इतर कोणत्याही समाजाचा द्वेष अगर मत्सर न करतां आत्मोन्नति व त्यामुळें राष्ट्रोन्नति करून घेणें कसें शक्य आहे ह्याचा धडा ह्या मासिकाच्या द्वारें शिकविण्यांत येतो; जाहिरातीचे दर माफक.

मॅनेजर
संजीवन कार्यालय दादर.

# काव्यरत्नावलीचें दप्तर.

## शोचनीय मृत्यु

१ वऱ्हाडांतील प्रसिद्ध विद्वद्रत्न रा. ब. वि. मो. महाजनी एम्. ए. हे मागील महिन्याच्या १६ व्या तारखेस आकोलें येथें परलोकवासी झाले. हे धुळे हायस्कूलचे त्या वेळचे प्रसिद्ध विद्यार्थी ह्या नात्यानें सर्वत्र परिचित आहेत. यांचे समकालीन स्नेही व कॉलेजचे मित्र कै. विष्णू कृष्ण चिपळूणकर हे होत. यांची वाङ्मयांतील योग्यता लोकोत्तर होती. यांचा सगळा काळ वाङ्मयांतच गेला हें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. विविधज्ञानविस्तार वगैरे मासिकांत यांचे दरेच लेख प्रसिद्ध झालेले आहेत. यांची कवि नात्यानें प्रसिद्धि सर्वत्र आहे. एके काळीं हे काव्यरत्नावलीचे परीक्षक होते. कवितेची मार्मिक दुरस्ती यांची वर्णनीय होती कुसुमांजली नांवाचें एक लहानसें काव्यपुस्तक यांचें प्रसिद्ध आहे. यांतील कविता जरी इंग्लिश भाषांतर ह्मणून प्रसिद्ध आहेत तरी त्यांत प्रतिभा चांगलीच दिसून येते. यांची कविता गोड असून फारच शुद्ध अशी आहे. व त्यांत क्लिष्ट रचना नसून त्यांतील सरळपणा विशेष वाखाणण्यासारखा आहे. मागें १९०७ सालीं जें पहिलें कवि-संमेलन कै० कीर्तिकर यांच्या अध्यक्षतेखालीं जळगांव येथें भरलें होतें त्या वेळीं हे आले होते. त्या वेळीं कवि व काव्य या विषयावर यांचें झालेलें भाषण फारच उत्कृष्ट असें होतें. हे केवळ एक साधु वृत्तीचें विद्वद्रत्न होते. वयोमानानें अलिकडे ते फार थकलेले होते. शेवटपर्यंत त्यांचा विद्येचा व्यासंग चालू होता तुकारामाच्या गाथ्याचें यांनीं इंग्रजी भाषेंत भाषांतर केलेलें आहे ह्मणून

कळतें. त्यांचे चिरंजीव रा. सा. रामभाऊ महाजनी हे कायदे कौन्सीलचे मेंबर आहेत. ईश्वर रा. ब. आण्णासाहेब यांच्या आत्म्यास शांति देवो

२ अजमीर येथें तेथील कांहीं काव्यप्रिय व कवि मंडळीनें तांबे मंडळ नांवाची एक संस्था स्थापून काव्यरत्नावलीचे प्रसिद्ध व जुने कवि रा. रा. भास्कर रामचंद्र तांबे यांचा गौरव करून त्या संस्थेस तांबे मंडळ हें नांव दिलें आहे. हा गौरव अन्यथा नाहीं असें आमचें मत आहे. रा. रा. तांबे यांची सर्व कविता रा. रा. मायदेव यांनीं छापून काढिली आहे. सदर मंडळानें रा. रा. तांबे यांच्यापासून "महाप्रस्थान" नामक एक प्रकरण काव्यरत्नावलीकरितां मिळविलें असून १० कुसुमांचा एक एक गुच्छ पुढील अंकापासून येईल. याबद्दल त्यांचें व तांबे यांचें आह्मी अभिनंदन करितों. जुने कवि पुन्हां रत्नावलीस भेट देत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. तसेंच अनंततनय कवीही चांगल्या कविता मिळविण्याबद्दल खटपट करित आहेत असें त्यांच्या नुकत्याच आलेल्या पत्रावरून कळतें.

३ आनंदीरमण—अलिकडे आनंदीरमण नांवाच्या एका कवीच्या कविता रत्नावलींत येत असतात. परंतु याच्या पूर्वींही एक आनंदीरमण नांवाच्या कवीच्या कविता आलेल्या आहेत. व हे आनंदीरमण आमचे जुने कविमित्र आहेत. त्यांनीं आह्मास कळविलें आहे कीं दोघा कवींचें एकच नांव असणें चांगलें नाहीं. तेव्हां हक्काप्रमाणें नव्या आनंदीरमणानें आपलें नांव बदललें पाहिजे. वास्तविक ही चूक आमचीच आहे. नव्या आनंदीरमणास आह्मी हें कळवायाला पाहिजे होतें. परंतु ही चूक अझूनही नव्या आनंदीरमणास दुरुस्त करतां येईल. जुन्या आनंदीरमणानें आतां तरी बंद केलेला काव्यलेखनक्रम चालू करावा ह्मणजे नामसादृश्याचा फायदा दुसऱ्या कवीस घेतां

येणार नाहीं. हल्लींच्या केशवसुत कवीची अशीच गोष्ट आहे. अलीकडे ह्या कवीच्या बऱ्याच कविता रत्नावलींत आलेल्या आहेत. प्रसिद्ध केशवसुत दिवंगत झाल्यावर हे केशवसुत आणखी कोणते? असा आह्मास पुष्कळ वाचक प्रश्न करितात. आणि हा त्यांचा प्रश्न विचारांत घेण्यासारखा आहे. पुष्कळ वर्षांनंतर हें कविनामसादृश्य घोटाळा उत्पन्न केल्याशिवाय रहाणार नाहीं. ही गोष्ट हल्लींच्या केशवसुतास आह्मी समक्ष कळविली. परंतु नांव बदलण्याचें त्यानीं नाकारिलें. यामुळें आमचा निरुपाय झाला. हल्लींच्या तीस चाळीस वर्षांत कवीनीं टोपण नांव घेण्याची जी पद्धत काढली आहे ती चांगली किंवा वाईट हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. प्राचीन कालीं वामन, मोरोपंत, रघूनाथपंडित वगैरे जे नामांकित मराठी कवि होऊन गेले त्यानीं टोपण नांवें कधींच घेतलीं नाहींत. इतकेंच नव्हे तर कित्येक ठिकाणीं त्यांनीं आपलें नांव गांव खाणाखुणा व आपला वंश यांचा नामनिर्देश केलेला आढळतो. तेव्हां आमच्या कविमंडळीनें ह्या गोष्टीची एक दिशा ठरविली तर बरें होईल असें आह्मास वाटतें.

४ महाराष्ट्र कृषिवल मासिक पुस्तक–पुणें वार्षिक वर्गणी ट. सह पांच रुपये. संपादक हे अमेरिकेचे एम्. एस्. आहेत. तेव्हां शेतकीच्या प्राविण्याविषयीं त्यांची निराळी शिफारस नको.

५ लोकमान्य–मासिक–धुळें यांचें संपादक निफाडकर हे प्रसिद्ध लेखक व कादंबरीकार आहेत. शिवाय हे एक रत्नावलीचे कवि आहेत. यांतील चालू परिस्थितिविषयीं लेख फार मार्मिक असतात, शिवाय वाङ्मयात्मक लेख व कविताही यांत येतात.

६ हिंद महिला-साप्ताहिक-मुंबई. हें एका सुशिक्षित स्त्रीनें चालविलेलें पत्र आहे. यांतील लेख बऱ्याच उच्च दर्जाचे असतात पुरुषावर दोषारोप करण्याच्या बाबतींत हें पत्र बरेंच अलिप्त आहे. ही संतोषाची गोष्ट आहे.

७ सहविचार त्रैमासिक बडोदें-हें बडोदें सहचारिणी सभेच्या विद्यमानें प्रसिद्ध होतें. तेव्हां आंतील सुंदर व उपयुक्त लेखा· विषयीं निराळी शिफारस नको. प्रसिद्ध चंद्रशेखर कवीची कविता अलिकडे कोठेंही आढळत नाहीं. नुकतीच यांची प्रसिद्ध झालेली कविता ह्मणजे रंगराव हर्षे व चिंतोपंत उदास हीं दोन प्रकरणें वाचनीय आहेत. यावर प्रसंगोपात आह्मी आपले विचार व्यक्त करण्याचें वाचकांस अभिवचन देतों. या पुस्तकाच्या संपादकाचें काम रा. रा. जोशीह्र्याकडे आहे. वार्षिक वर्गणी १॥= आहे. एकंदर हें त्रैमासिक संग्रहास योग्य आहे.

८ संजीवन-हें एक गोवर्धन समाजाचें सुंदर मासिक आहे. यांतील लेख चांगले वाचनीय व अनुभविक असे असतात. हे जरी व्यक्तिवाचक समाजाचें मासिक आहे तरी संपादकानें उदारमतवादीपणाचें धोरण यांत ठेविलें आहे. पत्ता दादर-मुंबई वार्षिक वर्गणी ३-५-० रु. आहे. ही जरा जास्त दिसते.

९ इस्लामी धर्म-हें एक इस्लाम धर्माचें त्रैमासिक रा. रा. शिकंदरलाल आतार पो-भिलवडी जि-सातारा हे काढित असतात. इस्लामी वाङ्मय व इस्लामी ऐतिहासिक माहिती मिळण्यास हें एक सर्वोत्कृष्ट साधन आहे. मराठी वाचकांनीं यास जरूर आश्रय द्यावा. पहिल्या अंकांत चांगलीच चर्चा आली आहे. संपादक हे मराठी भाषेचे चांगले लेखक ह्मणून प्रसिद्ध आहेत. त्यावरून हें त्रैमासिक चांगलेंच निघेल असें अनुमान करण्यास पुष्कळ जागा आहे. टपाल खर्चाशिवाय वार्षिक वर्गणी २ रुपये.

वर्ष ३१ वें. फेब्रुवारी सन १९२३.

# काव्यरत्नावली

## अंक २ रा.

## स्वर्गारोहण

कुंतीपुत्र युधिष्टिर स्वर्गांत गेल्यावर, त्यास आपल्या मृत बांधवांना आणि नातलगांना पाहण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणें एका देवदूतानें त्यास एका दिव्य सभेंत बसलेले दुर्योधनादि शत्रुपक्षीय दुर्जन दाखविले व आपली जागा त्याच सभेंत आहे असेंही कळविलें. त्या सभेंत युधिष्ठिरास आपले भीमार्जुनादि भाऊ दिसेनात. नंतर देवदूतानें त्यास एका तमोमय नरकांत नेऊन, तेथें तुझे भाऊ आणि इतर सज्जन आहेत असें सांगितलें. युधिष्ठिर त्या नरकांत आल्यानें तेथें असलेल्या मंडळीस सुख झालें व त्यांनीं युधिष्ठिरास तेथेंच राहण्याची प्रार्थना केली. थोड्या अवकाशानें इंद्र, युधिष्ठिरास पूर्वोक्त दिव्य सभेंस नेण्याकरितां, त्या घाणेरड्या जागीं आला. त्या प्रसंगीं उभयतांचें झालेलें संभाषण खालील कवितेंत ग्रथिलें आहे. युधिष्ठिर म्हणतोः—

आर्या

झटले निरपेक्ष जगत्कल्याणा त्यास लब्ध गौरव तो
कौरव तो कुलकंटक, स्वर्गी तयाला खुशाल गौरवतो! १
चुकतात देव किंवा चुकती मानव कळे मुळीं न मला
येथें तरी विपर्यय ऐसा मजला अशक्यसा गमला २

कीं हा अनर्थ येथें टाळाया आणिलें मला काय?
यावी तुला[1] ह्मणुनि कीं भूशीं मी जेथ झिजविला काय. ३
आतां कशास त्याचें स्मरण, विभो! मज कळें अहो! पुरतें.
शतपट ह्याहुन माझें वाटे रमणीय हस्तिनापुर तें. ४
अस्तोदयीं रवीचे पाहुन सौवर्णमेघ, लोकाची–
पलिकडल्या मज येई कांहींशी कल्पना, नसे त्याची. ५
रात्रीं रम्य पहाव्या लखलख सुरमुनिसभा नभांत किती,
अस्पष्ट ध्वनि त्यांचे तेथुन ज्यां ऐकिले तयां न मिती. ६
तें दिव्य सर्व सुस्वर विरलें वाऱ्यांत येथ येतां तों
जो जो कर्णीं येतो भासे भेसूर सूर मज तो तो. ७
एकाकी हिमगिरिवरि गंगोद्भवभागिं रुचिर संचरतां,
प्रतिपदिं मज वाटावें स्वर्भूची शीव लंघितों आतां. ८
साधूंच्या वीरांच्या मानधनांच्या कथारसा पिउनी,
कल्पावें सुरलोका, जेथुन हे येति पुण्य संपवुनी. ९
अत्युच्च शिल्प, शास्त्रें विविध, कलाललित पाहुनी वाटे,
साक्षात् स्वर्ग असावा कैसा पण पसरले इथें कांटे. १०
आठवतें कीं व्यासें आह्मां वनिं दाविलें मृतोत्थान,
स्वर्गीं असेल समता गमलें मज तंव चुकून अनुमान. ११
तो भास, भास किंवा हा, हा भ्रम मन्मना पुन्हां झाला.
कविकल्पनाच केवळ, प्रत्यय त्यांचा पुरा पुरा आला. १२
मागें अर्जुन आला होता अस्त्रें शिकावया येथें,
–ज्यांचें अमानुपत्वचि मनुजांच्या नाशहेतु मज पटतें. १३
ढळतां सत्वगिरी तो, देतां तुमच्या वचांस जरि कान,
अच्युत नीतिपथाहुन, तो कुंतीसुत ह्मणून, परका न. १४

---

1 तुलना.

नसतील इंद्रियें वश ज्याचीं तो पुरुष काय? मानव तो;
तो नर नरपशु, पशुहि न, तदतिक्रम त्यांसही न मानवतो. १५
मन मोहलें इथें कां, वळलें, कळलें, असून फोलपण,
तुज तें रुचेल; माझे गुरुजन मज लावितील बोल पण. १६
ह्मणतिल कुरुवृद्ध मला काय कुलाला कलंक लागेल,
भागेल भरतकुलयश गातां सुरगुरु, कुणींहि सांगेल. १७
हीं अमुचीं आर्यकुलें, येथूनच निखिल नीतिचा उदय,
हीं चाललीं लयाला, या लावा हातभार व्हा सदय, १८
सर्व सुखें साधावीं, लोक उभय हें मनांत; पण, हरि! तें
निष्फळ सहसा झालें, प्राक्तनकर्मच, समग्र संहरितें, १९
नव्हतें सुख कैसें तें ठाउक कुंतीसुतांस आजवरी,
-असलें तरि तें क्षणिकचि-परलोकींही तयांस लाज वरी! २०
निज हृदयें उघडावीं, हृदयस्थप्रभु जगांस दावाया,
पर हृदयांत शिरावें, चित्तविशुद्धी हळूंच करवाया. २१
ऐसा क्रम मम होतां, स्वमुखें कथुं काय काय तुज आतां!
मद्वृत्त ठाउकें त्या भीष्मद्रोणादिकां, विदुरताता. २२
नीच मनोवृत्तीशीं अपुला संग्राम आजचा न नवा,
प्रतिसमयीं पण आह्मीं केला रणघोष गर्जुनी बरवा. २३
ह्मटलें मेलों गेलों स्वर्गाचें द्वार तरि अह्मां उघडें,
मरणोत्तरिंच्या अमुच्या दिव्यात्म्यांचा तदाच भास घडे. २४
आशा कीं, सर्वत्र अमुचें साम्राज्य सत्य होणार,
भूवर ना तर स्वर्गी स्वानंदीं तर अह्मीच रमणार. २५
आशा होत्या, असतिल, आज पुढें दृश्य हें पहा नीट,
हो धीट मना! याचा वंधूस्तव तरि नको धरूं वीट. २६
सांग, सुरेंद्रा! पुसतिल जे जे तुज त्यांस हेंच वच माझें,
स्वजना स्ववत्र स्वजनीं रमतो हा धर्म जेथ तम माजे. २७

जेथें स्वर्वांश्ववांचा वास तया शुचि करीन नरकाही,
हरतिल सुर तेथेंही, पाहीं, करणी करील नर कांहीं. २८
जेथें मी स्वर्ग तिथें माझा निर्मीन मी नवीन दुजा,
सांग, सुरांच्या राजा! स्वर्गी तव हेंच ना? सुखें जा, जा. २९

आयुष्यकाव्य आलें संपत शेवट कळे न पण कविला,
होइल कैसा अथवा होइल जैसा कुणी न दाखविला ३०
उपसंहार तयाचा प्रभो करीं तूं, तुझीच तारक-धी,
मानवकृत कार्याचे शेवट होतील काय दिव्य कधीं?" ३१
"धन्योऽसि धर्म!" वदला सुरपति त्या शांसिलें तयें वरती
संत न अंत पहातां पतितां पडत्या क्षणींच उद्धरिती. ३२
"तुजसम सुत व्हायातें महि करि ते नवस नेम नित्य नवे,
तुजसम संतति म्हणुनिच तिज 'बहुरत्नावसुंधरा' म्हणवे. ३३
ग्रीष्मीं तपते, सहते हिम, फिरते, फिरवि भवति वपु अपुलें,
याकरितां कीं यावीं कामा हीं नांव काढितील मुलें. ३४
त्वत्सम वीरवरावर सोंपवुनी सर्वभार स्वर्गांत,
आम्हीं स्वस्थ असावें, होतां कां मग हताश मार्गांत. ३५
म्हणतिल म्हणोत कांहीं होवो कांहीं करोत जन कांहीं,
वीरांनो! मन अपुलें सोडुं, नका मम विनंति ऐका ही ३६
अपवादें सुखदुःखें हर्षविषादें भुलोत भलते ते.
क्षत्रियकुलावतंसें वीरें मोहूं नयेच पंडुसुतें. ३७
महिमंडळ डळमळलें तरि लव ज्यांचा चुकेचि ना तोल,
ते कां विरोध पाहुन वरवरचा बोलती असे फोल. ३८
गर्व कशाला व्हावा ज्ञानाचा, कारणें किती खोल
कार्य करावें अपुलें आयुष्याचेंहि देउनी मोल. ३९

जीवित सुखकर व्हाया देवांनीं ह्या दिल्या कला मनुजा,
राजा ! तूंच तयांचा पालनकर्ता, तुझ्याच त्या तनुजा. ४०
नैराश्यें दग्धांकुर तरुच्या शाखाच ह्याहि सुकतात,
छाया कुठून मिळते ! मिळतें कोठुन तुह्मांस सुख ! तात ! ४१
आशावृक्षावरची प्रथम फळें नर तुह्मीं, तुह्मांकरितां-
करितात यत्न नाना सुर, करिती स्वर्गही समस्त रिता ४२
आठवतें का कांहीं, जाऊं दे, स्मरण मरण तुज त्याचें-
विस्मरण पण न हो तुज, चुकतों आह्मी कधींकधीं, ह्याचें ४३
जाणोनी अभिलाषा, दाखवितों सुरसभा तुझे पितर,
तें विसर हस्तिनापुर, विसर सभा, त्या चमत्कृती इतर. ४४
हो सर्व सुंदर इथें सुरसरिता स्नान करिं, अगा साधो !
तो भास भास तोही, स्वर्ग तुला जेथ तूं तिथें साधो. ४५

———×——— केशव नारायण डांगे

## कथोपनिषद्रहस्य.

उपनिषदांत कथोपनिषदाची प्रामुख्यानें गणना आहे. तें संवादात्मक आहे. पित्यानें सर्व गोधनादि द्रव्य ब्राह्मणास दिलेलें पाहून गौतमपुत्र **नासिकेत** यानें प्रश्न केला कीं 'मला कोणाला देणार ?' 'तुला यमाचे स्वाधीन करणार' असें पित्याचें उत्तर ऐकून, नासिकेतानें स्वतः यमधर्मास प्रसन्न करून घेण्याचें योजून यमाकडे धाव घेतली. तीन दिवस यमाचें द्वारीं उभा राहिला परंतु यमधर्माची गांठ झाली नाहीं. गांठ पडल्यावर त्याजपासून नासिकेतानें आत्मज्ञान संपादन केलें. त्यांचा संवाद पुढील आर्यांत वर्णन केला आहे.

आर्या

'विप्रसुता, तिष्ठविलें आतिथ्याविण तीन रात्र तुला
मागे वर तीन, सुखें देतों' यमधर्म त्या मुला वदला १

'मुक्त करीं पितयातें, पाहो तो शांतचित्तयुक्त मला
मृत्यो ! तव प्रसादें' मजवर हा प्रथम पाहिजेच मुला २
'जेथें वास्तव्य तुझें नाहीं क्षय-भीति दुःखशोक नसे
तो स्वर्ग मिळो आह्मां' वर हा दुसरा वदान्य ! मागतसे ३
देहासवेंचि जातो जीवात्मा एक बोलती, देवा !
ह्मणती इतर अमर तो, वर्म कळे, हा तृतीय वर द्यावा ४
यमधर्म ह्मणे दिधले दोन तिजा माग अन्य शोधून
देईन निश्चयेंसीं मागें मद्वचन सत्य जाणून ५
धनधान्य पुत्र, मागे, विभव वरें आयु, विविध सुखभोग
दुर्लभ जे या लोकीं सर्वहि देईन बा तुला, माग. ६
परि हट्ट नकोचि धरूं आत्मज्ञानाचिया वराचा रे !
तें गुह्य कसें शिकवूं ? बाळा ! उमजे न जें बुधा सारें ७
'भोगीं रोग, सुखीं क्षय, विभवादिक सर्व नष्ट व्हायाचें
त्याची काय कथा ? तीं क्षणिक नको सर्व तें न हो ! साचें ८
देशील तरी देवा ! मागितला त्वां तृतीय वर तो दे
लोकीं रीति असे कीं दाता दे दान याचका मोदें ९
तूं बहु समर्थ न घडो कष्ट तुला दातया वरा देतां
प्रेमें भरे पिता तो बाळातें सत्पथीं करें नेतां १०
बाळ मला वदुनी त्वां देवा, बहु गोड जोडिलें नातें
मागितलें तें देई श्रमवूं, रडवूं नकोचि बाळातें ११
देव ह्मणे आत्म्यातें मृत्यु न वा जन्म, अणुचि तो विभुही
वादीं न आकळे तो, बाळा ! कीं ग्रंथ धुंडितां बहुही १२
गुरुच्या कृपें प्रकटतो हृदयीं हृदयस्थ आतुरा जीवा
अनुभव-शुद्ध मिळे मग ज्ञान, बुधें तोचि मार्ग साधावा १३
देह रथी शरिर-रथीं सारथि बा ! बुद्धि इंद्रियें हय ते
मनिच्या वृत्ति लगामा, मार्ग मनोभाव बोलती ज्ञाते १४

वाग्दमन करीं चित्तें, चित्त करीं स्वस्थ बुद्धिनें ज्ञानें,
स्थिर बुद्धि करीं आत्मीं, आत्मीं सर्वात्मतेस अनुभवणें १५

नाद नसे, रूप नसे, स्पर्श नसे, रस नसे, नसे गंध
आद्यंतहीन आत्माराम असें श्रेष्ठ जाणती बुद्ध १६

जीवात्मा, जगदात्मा, पिंडब्रह्मांड, जीव शिव तोच
भिन्न अविद्या माया भासविते अज्ञ मानवा साच १७

आदित्य रूप गगनीं, आवरणीं वायुरूप, जगतांत
होता, सोम घटीं, या रूपें वसतें प्रबुद्ध ह्मणतात १८

जलधींत जन्म घेतें, यज्ञ, गिरी, भूमि यांत उद्भवतें
तें ब्रह्म नित्य जीवीं जीवात्मारूप होउनी वसतें १९

उच्छ्वासें निःश्वासें मर्त्य जगे ना, दुजा असे त्यांना
वर्तवितां हृदेशीं वसतो तो जीव त्या असे संज्ञा २०

मूळ स्वरूप असतां एक वसे अग्नि विविध रूपानें
जगतांत ब्रह्म जीवीं वसतें बापा ! तशा प्रकारानें २१

नानारूपें वर्ते वायु जगीं मूळ रूप तरि एक
जीवीं ब्रह्म खरोखर वर्ततसे नित्य त्यापरी देख २२

बाहेर बरें पाहे रवि परि दे तेज सारखेंच जसें
ब्रह्मस्वरूप वर्ते व्यापुनिया जीव मात्र सर्व तसें २३

तत्वें बघतां एकचि वर्ते जगतीं अनंत रूपानें
ब्रह्म, अखंड सुखानें वरिती बुध सत्य सत्य या ज्ञानें २४

सुस्थिर बुद्धि करावी दमुनी इंद्रिय-गणास योगानें
निरसोन वासनेतें मग व्हावें ब्रह्मभूत सद्ज्ञानें २५

———×———

ह. म. समर्थ

## वीणा

[ अर्ध तनू वारुळीं बुडाली. या चालीवर ]

वीणे वर्णन करण्यापूर्वी तुजला करितों नती
वर्णनक्षम मजला दे मती १
या कार्यास्तव आहे धरिली आज करीं लेखणी
असासि तूं सकळ गुणांची खनी २
विष्णुनाभिकमळांतुनि उदया पावे कमळासन
होतसे सकळ-जगद्भावन ३
वेदाभ्यासा करुनी मिळवी सर्गशक्ति तो सुर
निर्मितो विश्व यशोभासुर ४
दश मानसपुत्रांतें देउनी जन्म सुखी जाहला
सुरमुनि श्रीनारद त्यांतला ५
निजकर्मवशें शाप पावुनी भ्रमतो दिङ्मंडळीं
पेटवी जाय तिथें तो कळी ६
सद्गुणयोगें कुणि या दोषा स्वमनीं नेदी स्थळ
गमतसे तव भक्तीचें फळ ७
हरिकीर्तन पद्धतीस जन्मा या मुनिनें आणिलें
तई गे तुज शोधुनि काढिलें ८
तुम्बीफळ तरुकाष्ठ घेउनी रचना केली निकी
त्यापुढें विधिरचनाही फिकी ९
पंचरशी धातूच्या तारा शिल्पकुशल ताणितो
स्वरांचें ज्ञान सकळ जाणतो १०
तेव्हांपासुनि वीणा संज्ञा प्राप्त तुला जाहली
तव तनू सुरकार्यी लागली ११

नारदमुनिनें करीं घेउनी स्कंधीं तुज वाहिलें
तुझ्यांतुनि रव मंजुळ काढिले १२
स्तुतिरवनिनदीं तुझ्या मिसळुनी एकरूप जाहले
ऐकुनी देव सकळ तोषले १३

नारदभगिनी ब्रह्मसुता ती मनिं हर्षे शारदा
सुविद्याशास्त्रकलाकोविदा १४
तीही तुजला अत्यानंदें मांडीवरि वागवी
तुजकडुनी ती मधुरवचें बोलवी १५
नित्यनिरंजन निर्विकार जगदात्मा विश्वंभर-
-मुकुंदस्तव करिते निर्भर १६
एकतानता तद्धृदयाची झाली गे! तुजसवें
गाळिते भक्तीचीं आसवें १७

सरस्वतीची भक्तमंडळी सभोंवार बैसली
रसभरें डोल डोल डोलली १८
कृपाप्रसादें त्या देवीच्या, गान भक्त जाणिती
क्लेश लव मनिं नच ते आणिती १९
तेव्हांपासुनि विशाळ कीर्ती पसरे तव निर्मळ
व्यापिले सकळ लोकमंडळ २०

स्वर्लोकीं किन्नर गंधर्वहि गाती तुज घेउनी
कोणती गोष्ट असे तुज उणी? २१
सूत्रधार-हरिदासादिक ते गवई वंदिति तुला
प्रतिष्ठा खास तुझी निस्तुला २२

नादपूर कर्णांचीं विवरें सर्व भरुनि टाकिती
अनंतर हृदयसिंधु गांठिती २३
आनंदाच्या एकसारख्या ऊर्मि तेथ नाचती

स्थितीचा विसर जना पाडिती २४
नानात्वीं एकत्व कोंदुनी पुरेपूर राहिलें
तत्त्व हें संतजनीं पाहिलें २५
या तत्त्वाची क्षणभर ओळख सूर तुझे वितरिती
गुरुसम वाटे मज ही रीती २६
कोठें वैभव पुण्यशील तव वीणे! रसिक-प्रिये!
लेखणी दुबळी कोठें सये २७
झेंपत नाहीं मजला ओझें कामाचें या अतां
ठेवितों खालि यास तत्त्वतां २८

तांबे

## हे सुंदरी!

श्लोक

मोठाही! घडला प्रमाद तुझिया हातें मनोमोहिनी!
गे! सौंदर्यवती! तरी विसरतों मी त्वन्मुखालोकनीं
शोभा होइल हीन का सुमुखिची आनंदसंवर्धिनी!
शंकेनें बसतों पहात वदनीं मौनास गे! सेवुनी १
त्वन्नेत्रावरुनी कुणास सुचती पद्मोपमा-कल्पना
ओष्ठातें बघुनी कुणास उठती बिंबोपमा-भावना
चंद्राशीं कुणि तोलुनी तव मुखा पावेल हर्षा कवि
मातें तूं गमतेस रम्य-लहरी भाग्योदधीची नवी २
मोठा शूर सशस्त्रही कुणि तुझ्या येतां पुढें कामिनी
शस्त्रास्त्रें नसतांहि तूं विजयिनी होशील गे! शालिनी!
शास्त्राभिज्ञ तपोधनांतिल कुणी ऋष्याग्रणी पातला
शास्त्रावीण विरुद्ध त्यास करण्या सामर्थ्य आहे तुला! ३

दुःखानें मन गांजलें अधिक जें वाटे उदासीनता
पाहावें तुझिया मुखा क्षणभरी तें येतसे शांतता
दुःखाची हननी, सुशांति-जननी, कल्याणसंवर्धिनी
तूं पुण्याचरणी सखी अमरिणी किंवा असे यक्षिणी! ४
'हा संसार असार दुःखद' असें तत्वज्ञ जें बोलती
गे! सौभाग्यवती तुला बघुनिया सानंद होते मती
स्वर्गाचें सुखसार तूं, अनृतही वाचा बुधांची नसे
मातें या विषयांत गूढ पडलें आणू तरी तें कसें? ५
सौगंधातिशयें जिला त्रिदश हे तारे जणों लाहती
आला घालुनि देवनायक अशी मंदारमालाहि ती
तो द्यायास सजेल नंदनवन स्वामी मला तो जरी
हृन्माला मम तूं, तुला कचलुनी हांसेन त्याला तरी ६
हंसी पीनपयोधरातें तनुशीं स्पर्धा करूं पाहती
कंठाशीं करण्यास साम्य मधुरा या कोकिला बोलती
सादृश्यांत तुझ्या मनोज्ञगमना या चालल्या हस्तिणी
एकीला समता तुझी न करितां येईल गे! कामिनी ७
सौंदर्यांत कुणी प्रसिद्ध असती, शीलांत कोणी स्त्रिया
पातिव्रत्य गुणांत कोणि असती विख्यात लोकांत या
तूं सर्वांहि गुणांत देवि गमते संकीर्तनीया सती
वर्णील प्रगुणी महाकवि तरी साध्वी स्त्रियेला किती? ८
येई वाहत मंदमंद मलयश्रेष्ठाद्रि-वायू यदा
शंका पद्मिनि येतसे तव मुखोच्छ्वासानिलाची तदा
जेव्हां ध्वांतविनाशिनी प्रगटते गौरी शरच्चंद्रिका
साश्चर्यें बघतों कपोल तव मी आलें तिथें हास्य कां? ९

———×———

द. आ. तिवारी

## दैव फिरल्यावर

नेपोलियन बोनापार्ट ह्या जगद्विख्यात नररत्नानें फ्रान्स देशाला मोठ्या वैभवाला चढविलें हें महशूर आहे. फ्रान्सनें त्याला बादशहा पदावर चढविलें. त्यानें अनेक लढाया मारून फ्रान्साच्या नांवाचा जयजयकार करून सोडला. परंतु दैवगती विचित्र आहे. असा मोठा नेपोलियनही दैवाच्या फेऱ्यांत सांपडला, शत्रूंच्या हातीं लागला आणि कैदेंत पडला. देशमातेचा निरोप घेते वेळीं तो तिला ह्मणालाः—

श्लोक—वसंततिलका

आतां, यशेंदु विगतप्रभ जाहल्या गे!
देशी निरोप मजला जननी विरागें
येतों, तुझें यश जगांत भरोनि राहें
माझ्या यशेंचि इतिहास वदेल गे! हें १
गेलों रिपूस नच हार कधींहि एका
नेतां परी विजयलोभ सुदूर लोका
वेष्टूनि बद्ध करिती, मज शत्रु सारे
कांटे, तरूस, पुरुषा रिपु दुष्ट सा रे! २
माझे शिरीं चढविलें मुकुटा तुवां तें
पृथ्वींत वर्तवुनिया जयनाद थैं थैं
केली वितीर्ण तव कीर्ति, तुझें अकालीं
दौर्बल्य पूर्वपद आणितसे कपाळीं ३
स्वातंत्र्यसूर्य उगवेल सुदैवयोगें
तेव्हां त्वदश्रुजलसिंचन होउनी गे!
कोमाइलें फुल फुलेल पुन्हाहि माते!
धाडीं निरोप मज मागुनि यावयातें ४
वाटे सुदुस्तर तरीहि विमोड झाला
यांत्रा अजूनहि करीन गमे मनाला;

राहो; करो प्रभु तुझे प्रिय सर्व, माते!
येतां, कधींहि न सरे सुतमाय नातें ५

ह. म. समर्थ

## वसंत.

चांदण्या रात्रीं कोणी स्त्रीपुरुष एका उद्यानांत बसलीं आहेत; समोर मालती फुलून राहिली आहे; जवळच शंकराची पिंडी आहे; अशा समयीं ती स्त्री पतीस ह्मणते या ऋतूला वसंत हें नांव कां ठेविलें असेल? दृष्टीपुढील प्रकार थोडक्यांत गोंवून त्या पुरुषानें उत्तर दिलें, तें असें:—

श्लोक—इंद्रवज्रा.

कां ठेविलें नांव वसंत याला ।। कीं रंजवो हा तव मानसाला
यातें करीं घेउनि मालती ही। डोले, करी कौतुक केंवि पाहीं १
दोघांसही इंदु सुरम्य वाटे। भेटे असे शंकर त्याच वाटे
त्याच्यापुढें सुंदर कृष्ण-लीला। होतां समाधान असो जिवाला २
आनंदुनी त्या विजय प्रभावें। खंडून माया मन आवरावें
चित्तीं प्रभूचे गुण मात्र आण। प्रेमें ह्मणे जें जयरामकृष्ण ३

ह. म. समर्थ.

## निसर्ग-प्रणय

श्लोक

प्रेरूनि भानु जरतारि सुरम्य शेला
झांकीत पश्चिम-दिशा-मुख-पंकजाला
मागूनि पूर्वरमणीस विशंक चुंबी
कांती किती पसरली, वदनीं गुलाबी १
जादूच काय रविनें पहिलीस केली
या कारणें करुं सजे रमणीय केली,

ती भामिनी त्यजिल काय उगाचि रोषा
प्रेमासि काय विपरीत असेल भाषा २
जेव्हां बघे सवतिसंनिध नाथ गेला
तेव्हां जिचा मुख-मृगांक विवर्ण झाला
चाले तदा श्वसनही अति दीर्घ जीचें
ईर्ष्यातरंग उठती वदनींहि तीचे ३
जी भामिनी कुरळ केश मुखावरील
सारावयास नुचली कर एक वेळ
अश्रू जिचे स्थिरचरांसहि दुःख देती
तत्सानुकंप-हृदयीं मिसळून जाती ४
आतां तिनें कुरळ कुंतल आवरीलें
तत्सोज्ज्वलीं वदनिं हास्य हळूंच आलें
रोषें तिला ठकविलें मुळिं सांपडेना
तो दांडगा तिज कुठें लपला कळेना ५
ती बापडी करिल काय हताश झाली
लज्जा तिची करित मान बळेंचि खालीं
ती नागवल्लि--दल सुंदर घेत एक
तांबूलही मग तसाचि रची सुरेख ६
देवांगना रचित दिव्य जया विड्याला
तो वर्णवेल तरि का कवि--लेखणीला
योजीत वस्तु किति काय सती तयाला
कौशल्य तेविं करि काय रचावयाला ७
पुष्पें तयावरि किती तरि देखियेलीं
संमिश्रही कितिक होति तयांत वेली
जे त्यांवरील जळ--बिंदु दिसून येती
ते प्रीतिला गमत उल्हसिताश्रुपंक्ती ८

तांबूल हा जणुं सहस्रगुणी खचला
तन्नाथ सिद्धहि सहर्ष तदर्थ झाला
लज्जा-विनम्र परि हस्त तिचा वळेना
श्वासासि रोधि- परि तो मुळिं सांवरेना ९

पाहूनिया स्थिति अशी रविनें प्रियेची
धन्यत्वपूर्ति बहु मानियली स्वतांची
हस्ता पुढें पसरुनी जंव हास्य केलें
तांबूल-पुष्प सखिचें तंव त्यांत आलें १०

शाखाग्रही न चळतां कुसुमें गळावें
पुष्पावरूनि अथवा अलिनें पळावें
तांबूलही कर-पुटांत तसाच येई
प्रीति-स्थलासि उसळूनि उडीच घेई ११

तो मानिनीस मग आकळि हस्तपाशीं
तों ती वृथाचि करिते प्रतिकार त्याशीं
तेव्हां सख्या हंसति तीस चहूंकडून
रानांतही मधुर नाद खळे मुळीं न १२

बाळकृष्ण गणेश पानसे

टीपः—प्रस्तुत कवितेंत पश्चिम दिशेस रवीची स्त्री आणि पूर्व दिशा ही सवत अशी कल्पना केली आहे परंतु ही पूर्वकालीन कविसंप्रदास धरून नाहीं.

संपादकः—काव्यरत्नावली.

## पुढच्या जन्मीं.

(शार्दूलविक्रीडित)

होतों दिव्य जरी मनोरथरथीं बैसून या भूतळीं
स्वेच्छेनें करुनी विहार गणुनी 'आह्मां न शास्ता मुळीं;'

दुर्दैवें अवघा मनोरथ अहा! भंगून तो टाकिला
या ऐशा विजनींच धूलिपथ हा सेवावया लाविला १

केव्हां केलि करीत काळ क्रमिला कंठीं करा घालुनी
केव्हां आणुनि आसवें नयनिं तूं घेसी वरा मागुनी,

मिथ्या राग कधीं वळेंच करुनी हा दास संत्रासिला
क्रीडेनें नयनाश्रु ढाळुनि परी आनंद अंतीं दिला २

केव्हां शांतमनें प्रकार वदने! अंकीं शिरा ठेवुनी--
होतों निद्रित मी परंतु गणिलें नाहीं कधीं गे! मनीं

कीं ही मत्कृति सत्य होइल पुढें मृद्धंगिला तापदा
किंवा कोमलवल्लरी सुकुनिया पावेल ही आपदा ३

या जन्मीं जरि त्वत्समागमसुखा झालों असे पारखा
या जन्मीं जरि पाहणें नच घडे आतां तुझ्या कौतुका

या जन्मीं जरि मी सुदीन बसतों सेवून रानें वनें
या जन्मींच परी परेश स्तवुनी मागेन त्याला मनें- ४

'नाहीं इच्छित संपदा प्रभु तसें दीर्घायु मातें नको
देशीं कीर्ति जरी नकोच मज ती लक्ष्मी तुझीही नको

या जन्मीं जरि हें असें घडविलें दैवें महा दुर्धरें
देई जन्म अह्मां पुढें जननिच्या एकाच पोटीं वरें ५

किंवा देउं नको अह्मांस दुबळी ही मानवाची कुडी
मात्सर्यें परिपूर्ण जेथ असती हीं मानवें बापुडीं

जेथें क्रोध मदादिकां षडरिंचा होईल साचा लय
आत्मे तेथ सुखेंच नित्य अमुचे पावोत देवा लय' ६

———×——— 'उद्धव विहेकर'

# काय सांगूं!

वाचा बंद झाली, कंठाला घरघर लागली पण सुंदरीचा प्राण कांहीं केल्या सुटेना. "तुझी शेवटची इच्छा तरी काय ती सांग?" ह्मणून तिला विचारिलें असतां तिनें फक्त पाळण्यांत निजलेल्या आपल्या ६ महिन्यांच्या मुलीकडे बोट दाखविलें व प्राण सोडिला!

आज कार्यव्यग्रस्थितींत आपल्याकडून त्या मुलीची आबाळ होतेशीं वाटून व प्रियपत्नीचा तो अंत्य अंगुलीनिर्देश आठवून डोळ्यांत पाणी आलें. मुलगी हातांत आईचा फोटो घेऊन जवळच खेळत होती. तिनें अभागी बापाच्या गळ्यांत हात घालून "बाबा! तुह्मी कां हो रडतां?" ह्मणून विचारिलें! रुद्ध कंठानें तो एवढेंच ह्मणाला "मुली मी तुला काय सांगूं?"

श्लोक

"इच्छा अंतिम सुंदरी वद तरी–" आर्तस्वरें बोलतां
गेली तर्जनि दाउनी तुजकडे स्वर्गीय ती देवता!
छायाचित्र तिचेंच हें; स्वजननी घे पाहुनी यांत ती
अश्रू वाहविले तरी प्रशमना येई न ती मागुती १
बाळे! होतिस तूं अजाण अगदीं दुग्धोपजीवीच गे!
आतां आठवतां प्रसंग पिळुनी हें चित्त माझें निघे
निद्रा अल्प तुला, अलोट तिजला, मी एकटा जागृत!
अश्रूंचीं उदकें मुखावर तिच्या तैं बैसलों वाहत २
होशी जागृत तूं क्षुधाकुल, तुवां आरंभिलें रोदन
दोन्ही हात तिच्याकडे पसरिशी माझ्याकडे पाहुन
एका अंकिं तुला, तिलाहि दुसऱ्या अंकावरी घेउनी–
ती माझी मजलाच ठाउक, कशी मी काढिली यामिनी! ३
कार्यव्यग्र मनस्थितींत घडते आबाळ कांहीं यदा–
इच्छादर्शिनि तर्जनी दिसतसे स्वर्गामिनीची तदा

कष्टें आवरितां तरीहि गळती खेदाश्रुधारा पहा,
बाळे कंठ धरून हेतु पुससी मी काय सांगूं अहा! ४

——×—— दु. आ. तिवारी

## वर्षाकाल.

[ मदाक्रांता वृत्त ]

वर्षाकालीं सुरुचिर अशी भासते मेघमाला
पाहूनीया मयुर करिती हे जयां नृत्यलीला
जैसा लोभे जनमन शरच्चंद्र रात्रीं चकोर
तैसा शोभे नटवर अहा! नाचतांना मयूर १
शैलाग्रीं हे तरुवर कसे शोभती पल्लवांनीं
वृक्षच्छाया अति घन दिसे पुष्पिता-वल्लरींनीं
मेघाच्छादें वनपथ वनीं सर्व ते लुप्त झाले
वायूवेगें विनत-लतिका वृक्षशाखाहि डोले २
आकाशस्था गजसम-घना पाहुनी विस्मयानें
दावी नाथा चपल-नयनें ही कुरंगी भयानें
तों गर्जे हे जलधर नभीं तोंच वेगें पळोनी
गेली रानीं पवनसम ती पाहि ना कीं वळोनी ३
रे! रे! मेघा! त्वरित गतिनें जात आकाशमार्गीं
स्वैर क्रीडा करित पतिशीं शैलभागीं कुरंगी
गर्जोनीयां बहु भिवविली सुंदरी ही मृगाक्षी
हा! हा! मेघा किति उपजली भीति तीच्या कटाक्षीं ४
होतां स्त्रीचा विरह पतिला लालसा चुंबनाची
होऊनीयां घडिघडि जशी वर्धता क्षीणतेची
ग्रीष्मीं भेटे नच विमल ते मेघबिंदू मुखाला
वर्षर्तूच्या प्रथम गमते क्षीणता चातकाला ५

वाहे वेगें विमल सरिता जेंवि मुग्धा प्रियाला
आलिंगाया चपल गतिनें तेंवि ही सागराला
तीरीं जीच्या मधुर सुमनें गंधही लोटिला जो
मुग्धा नारी नव परिमलें मानसीं मोद लाहो ६

———×——— पन्नालाल मूळचंद्र व्यास

## 'हॅम्लेट' नाटकाचें सार.

श्लोक (वृत्त–भुजंगप्रयात)

विवेकातिरेकें कृतिक्लैब्य येतें
जनीं दीर्घसूत्रत्व नाशास देतें
जगीं शाठ्य, शैथिल्य, चालो कितीही
स्वकर्मानुयायी जना मृत्यु पाहीं १

———×——— श्रीकृष्ण.

## एक विरही.

शार्दूलविक्रीडित

साराया विमनस्कता, क्षणभरी व्हाया तुझी विस्मृति,
घेतों मी स्वकरीं सुरम्य सुमनें, त्यांच्याकडे पाहतों
वारंवार निरीक्षितों, मम परी वाढे उदासीनता;
जी जादू तुझिया मुखांत, तसली नाहींच पुष्पांत या १
पुष्पांतील मरंद, आसव तसें, तें पेय उत्तेजक
घेतों मी, परि अल्प त्यांत मजला गोडी न गे! लागते
प्रेमोन्मत्तच होतसे कितितरी बिंबाधरस्पर्शनें
तत्पानस्मरणें सरे रस अतां वाणींतला माझिया २
नेत्रांतें भ्रमवी, तसा भिवविही काळोख गे! बोलती
मातें स्पष्ट दिसे घनांधतिमिरीं कांते! तुझी आकृती

बोला रात्र असे, घनांध पसरे अंधार मी बोलतों
काळाच्या हृदयांतलीच विझली ती ज्योत कीं प्रीतिची
प्रीतिज्योत मदंतरीं, तिमिरिही तेणें दिसे लोचनां,
जेथें प्रीति नसे, तिथेंच असतो अंधार हें निश्चित.

——×—— केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर.

## जड जीवाचें जगणें.

(पदाची चाल)

चराचराचा ध्यास लागला जीवाचे होती खेळ
रोज नव्या खेळांत रंगण्या जीव पळे रानोमाळ
अस्मानाच्या लुकलुकतीचा ध्यास जरी जीवा लागे
नैराश्याचे काळे फत्तर प्रेमाला करिती जागे!
हृदयाच्या बागेंत नाचती प्रेमाशा राघू मैना
नाच नाचतां पीळ पाडिती जगतावरि या जगताना
दुनियेची वाटिका बहरली रंगी रंगी जीवानीं
बेरंगी प्रेमाची तेथें कशी टिकावी जड वाणी!
ओसाडाच्या एकांताचा आश्रय केवळ मिळणार
तोंच घेउनी लाथ जगावरि मारण्यास कां जाणार!
जड जीवाचें जगणें मुष्किल जगतावरि जरि झालेलें
मरणाचें सुख कसें मिळावें दैवच तेथें फिरलेलें

——×—— वि. ल. आगाशे.

## फलार्थी फलाढ्या सजे मारुं हातें!

श्लोक [भुजंगप्रयात]

मरावें त्वरें, ग्रंथकारीं मरावें।
स्वलेखीं सुखी क्षीणचित्ता करावें

कुडी सांडितां कीर्ति लोकीं उुणावें
जनासाठिं आघोन मार्गे उरावें ! १
अह्मां नाडिती तूमचे हो ! दलाल
धनी निर्धनाचे करीतात हाल
शुभप्रेरणा लाउनी घोर चावी
पहा नेदिती घेउं आह्मां परावी २
असे तूमच्या शक्ति शद्बीं प्रचंड
असे आमुच्या भूक पोटीं उदंड
परंतु प्रभा तूमची झांकतात
धनावीण बोलूंच नेदीच मात ! ३
शहाणे कराया जयां येथ आला
तयांना तमीं ठेवितां निर्धनांला
न वाटे कशी लाज सांगा बरें हो !
किती काळ आह्मी वदा नग्न राहों ? ४
पहा आपणीं मांडुनी पुस्तकें हीं
कसें बैसलें नष्ट हे पुष्ट देही
सुजाणा सुविद्या सुधा दावितात्ती
तयेच्या पदीं शीर्ष वाहों न देती ५
तुह्मा देउनी दक्षिणा बोळवीती
अह्मां मागुती स्वस्थ हो ! घोळवीती
कसे गांजिती भाजितीं हे दलाल
विरोनी तुह्मी तस्करामाजि जाल ६
भले नक्कलेच्या वरी हक्क कैसे
पहा सांगती आयतोजी अपैसे
असेना जयां चाड ती भारतीची
जणों दास्यता योग्य तीतें तयांची ७

तुह्मापाशिं विद्या परी द्रव्य नाहीं
नयापाशिं तें द्रव्य विद्या न कांहीं
इथें तोड ही एक आहे पहा हो!
मरावें तुह्मी या अशा ज्ञानलाहो ८

जरी मृत्यु होणें असे हो! अवश्य
तरी होइजे सत्कर्मी कालवश्य
करा मोकळा मार्ग लोकांकरीता
अहो! जीवनाशा कशाला धरीता? ९

जगावें तुह्मी कल्प कोट्यानुकोटी
अशी आमुच्या वासना शुद्ध पोटीं
तरी लेखकांनो असे नाडिलों मी
तुह्मा स्वार्थ साधावयालागिं होमीं! १०

स्वसामर्थ्यविस्तार तो वाचनानें
करावा असें घेतलें मन्मनानें
तुह्मीं पुस्तकें अल्प मूल्यें विकावीं
मनोभूमिका आमुची ही पिकावी ११

वसंतापरी तुमची दिव्य दृष्टि
फुले पाहतां सर्वही चित्तसृष्टि
निजोन्मेष देवोन मी डोलवीन
तुह्मा आणखी तूर्ण मी बोलवीन १२

मला प्रेरणाशक्ति हे पूरवावी
दया निर्धनाचेविशीं या भरावी
करीतां तुह्मी प्रेरणा ग्रंथरूपें
असे प्रेरिजे दास राज्यांत भूपें १३

चढे वाचकां तूमचेनी हुरूप
दिसे ग्रंथिं या तूमच्या स्वस्वरूप
अह्मी शूर शार्दूल आहों असें तें
अह्मां पुस्तकादर्शिंही दाविजेतें १४

करोनी अकर्ते असा साक्षिभूत
परी शद्ब ते तूमचे देवदूत
तमोमत्त मूढत्व गाडावयाला
तुह्मी सिद्ध पंचाक्षरी सत्य झाला १५

असोनी तुह्मी यापरी लोकमान्य
असें तूमचें कृत्य लोकीं वदान्य
वरा मृत्यु ऐसें वदे मी तुह्मांतें
फलार्थी फलाढ्या सजे मारुं हातें ! १६

दरिद्रा फळें चाखण्या द्याल आतां
तरी मागुती अन्य नाहींच चिंता
नका हक्क सांगूनियां दूर ठेवूं
विनामूल्य सुग्रास दिव्यान्न सेऊं १७

विचारोदधी तूमचा हा अथांग
तयांतून द्या घेउं आह्मास खाग
नका बोलण्याचा धरूं अल्प राग
भुकेसारखी अन्य नाहीं कजाग ! १८

करा प्रार्थना एवढी मान्य सर्व
असे पातले ज्ञानदानार्ह पर्व
करा धर्म सत्कर्म सोडोन गर्व
सुदीर्घायु संपत्ति देईल शर्व १९

माधव गोविंद भिडे

———×———

## उषःकाल

पदाची चाल

हें कोण मनोहर बालक जन्मा आलें
कीं, कवि-हृदयाला स्पर्शें पुलकित केलें
ही जोत्स्ना त्यजुनी भयें स्वमंदिर गेली
हा लाजें लपला तारापुंज विशाली
या घोर तमाला विविध शरें संहारी
ही जगतीं काढी तयांतुनी बाहेरी
तदुपकार ह्मणुनी कंठीं घालायाला
ती रम्य गुंफि दंव-मौक्तिकाबिन्दूमाला
मोह-निद्रा-मयां नवजीवन तें देई
सर्वांग सुंदरा सृष्टि तयां ही दावी
यशगीता प्रेमें विहंग गायक गाती
तरुलता तयावरि मुदें फुलें उधळीती
दिग्वधू गोजिरा बघुनी सस्मित झाली
चुंबनें आणिली गालिं गुलाबी लाली
निज कटीं घेउनी कुंतल मृदु कुरवाळी
त्यासवें करी ती प्रमुदित चित्तें केली
हा मंद सुगंधित शीत समीरण दूत
तत्कीर्ति पसरवी जगभर, सोडी प्रांत

——×—— आनंदराव कृष्णाजी टेकाडे

## शेतकीचें नवीन मासिक.

# महाराष्ट्र कृषीवल.

वार्षिक वर्गणी ट. ख. सह
५ रु व्ही. पी. नें ५ रु. ४ आ.
सहामाही रु. २॥१०
तिमाही रु. १॥६

नमुन्याच्या अंकास
८॥ आण्याचीं तिकिटें

संपादकः—वा. रा. गाडगीळ
बी. एजी. (मुंबई) एम्. एस्. (अमेरिका)

**मासिकांत येणारे विषय.**

सामान्य कृषिकर्म, फलसंवर्धन, फळांचें इतर पदार्थांचें दीर्घकालीन रक्षण, गोपालन, दूधदुभतें, मधमाशा पाळून मध पैदा करणें. बागाईतपिकें, फुलझाडें व बगीचा, कृत्रिमखतें, पिकांचे रोग व किडी वगैरे वगैरे. पृष्ठें ४०. जाहिरातीचे दर पत्रद्वारें.

पत्ताः—महाराष्ट्र कृषीवल कार्यालय.
७०२ सदाशिव पेठ, पुणें.

---

इंग्रजांतील प्रसिद्ध 'माडर्न रिव्ह्यू' मासिकाचे धर्तीवर
चालणारें मराठींतील नवें सचित्र मासिक.

व्ही. पी. पद्धत बंद. ] **शारदा** [ जाहिरातदारांनीं व एजंटांनीं पत्रव्यवहार करावा.

वर्षप्रतिपदेपासून (ता. २३।३।२३) नियमितपणें प्रसिद्ध.
अगाऊ वर्गणीचे दर वार्षिक ४ रु. सहामाही २ रु. तिमाही १ रु.

☞ आगाऊ वर्गणी पाठवून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

पत्ताः—भारतीय साहित्य मंडळ.

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

# इस्लाम धर्म.

अथवा

## महाराष्ट्रीय-मुसलमान-साहित्य-पत्रिका.

महाराष्ट्र भाषेंत इस्लामीधर्म, इस्लामी इतिहास, इस्लामी संस्कृति, आणि इस्लामीसाहित्य, यासंबंधानें माहिती देणारें भारदस्त त्रैमासिक. वर्षाअंतीं 'कुराण-परिचय' नामक ग्रंथ बक्षीस, केव्हाही वर्गणीदार होतां येतें. वार्षिक वर्गणी ३ रुपये शिवाय ट. हंशील.

पत्ताः—शिकंदरलाल आतार

चिटणीस, इस्लाम-साहित्य-मंदीर , पो-भिलवडी

जि-सातारा

---

दुसरें वर्ष माघापासून सुरू झालें!

पहिल्या वर्षांत प्रचंड लोक-जागृति करणारें

संपादकः—
निफाडकर व
दु. आ. तिवारी

## लोकमान्य

वार्षिक वर्गणी रु.
३।= एक पुस्तक
बक्षीस.

मासिक यापुढें स्वातंत्र्याचा बाहुटा साऱ्या मराठे मंडळांत नेणार. दोन कादंबऱ्या, अनेक गोष्टी, खरमरित लेख, प्रासंगिक कविता, प्रासंगिक हृदयस्पर्शी चित्रें अशा सुंदर स्वरूपांत व लो. टिळकांचा मंत्र, व म. गांधीची भरारी हें मासिकांत येणार. वर्गणी भरा व जाहिराती द्या,

व्यवस्थापक लोकमान्य, धुळें.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळींनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस यांनी आपल्या**
बावजी प्रिंटिंग प्रेस जळगांव पू. खा. येथें छापून
जळगांव येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] मार्च सन १९२३ [ अंक ३ रा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## अनुक्रमणिका.


छंद आणि अलंकार } ( ह. म. समर्थ ) ........................४९
बंधु संजीवन ........................५४
चंद्रांक ........................५७
अकस्मात् भेट ( दु. आ तिवारी )........................५८
भीति ( गों. वि. ताडफडे )........................६२
केवळ प्रसाद ह्मणून ( सिताराम विष्णू केळकर )........६३
अंधःसृष्टि ( गोप )........................६४
नादब्रह्म ( भवानी शंकर )........................६५
हा काय न्याय ! ( शि. भि. पारकर )........................६५
अभागी ( मनोहर )........................६६
मनास ( अनंततनय )........................६७
विघ्नहरिणी } ( दु. आ. तिवारी ) ........................६८
अभंगरत्नमाला ........................६९
प्रेमगीत ( अ. र. चिंचाळकर )........................७१


---


वर्षारंभ-वर्ष-प्रतिपदेपासून **संजीवन.** वार्षिक वर्गणी ट. ख. सह १॥-

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत नियमानें प्रसिद्ध होणाऱ्या ह्या मासिकांत सर्व उपयुक्त विषयांवर विद्वान व अनुभवी लेखकांचा लेख प्रसिद्ध होत असतात; मासिकाचें धोरण व्यापक व उदारमतवादीपणाचें असून प्रत्येक खालावलेल्या समाजाला इतर कोणत्याही समाजाचा द्वेष अगर मत्सर न करतां आत्मोन्नति व त्यामुळें राष्ट्रोन्नति करून घेणें कसें शक्य आहे ह्याचा धडा ह्या मासिकाच्या द्वारें शिकविण्यांत येतो; जाहिरातीचे दर माफक.

मॅनेजर
संजीवन कार्यालय दादर.

काव्यरत्नावली

अंक ३ रा.

# छंद आणि अलंकार.

काव्य विषयाकडे लोकांचें लक्ष अधिकाधिक लागावें हा काव्यरत्नावलीच्या प्रधान हेतूंपैकीं एक हेतु होय. ह्या हेतूस पोषक ह्मणून गेल्या ज्यानुआरीच्या अंकांत रा. **हरी महादेव समर्थ** यांच्याकडून आलेल्या **काव्य, काव्यरस** आणि **काव्यगुण** यांच्या **व्याख्या** प्रसिद्ध केल्या. प्रस्तुत अंकांत रा. **समर्थ** ह्यांच्याकडून आलेली **छंदव्याख्या** आणि **अलंकारांचा शोध** हीं प्रकरणें दिलीं आहेत. वृत्तांच्या व्याख्या कशा तयार केल्या आहेत तें एक उदाहरण देऊन दाखविलें आहे. शार्दूलविक्रीडितवृत्ताची व्याख्या '**बारा आणिक सात वर्ण चरणीं शार्दूलविक्रीडित**' अशी केली आहे. यावरून शार्दूलविक्रीडिताच्या प्रत्येक चरणांत एकोणीस अक्षरें असून बारा आणि सात हीं यति-विराम स्थानें आहेत असें दर्शविलें आहे. शिवाय व्याख्याचरण शार्दूलविक्रीडित छंदांतच रचिला आहे ह्मणून वर्णांचा ऱ्हस्वदीर्घानुक्रम अन्य रीतीनें सांगण्याचें प्रयोजन राहत नाहीं. व्याख्याचरण तोच छंदचरणांतील ऱ्हस्वदीर्घाक्षर क्रमाचें, वर्णसंख्येचें आणि यतिस्थलांचें

उदाहरण झाला आहे. या योजनेनें **गणांची भानगड मिटवून चार ओळींचें कार्य एकत्र ओळ पाठ केली असतां व्हावें** अशी सुलभ व्यवस्था केली आहे. **अलंकाराचा शोध** हें प्रकरणही वाचनीय आहे. कवितेंत कुठें, कोणता अलंकार साधला आहे त्याचा शोध लावण्याकरितां 'मास्टर की' अथवा 'गुरुकिल्ली' तयार करण्याचा रा. **समर्थ** यांचा यत्न आहे.

## छंदव्याख्या.

| व्याख्या चरण | अक्षरें | यति-विराम |
|---|---|---|
| १ अनिश्चित **अनुष्टुप** | ८ | अंतीं |
| २ लघू गुरु **प्रमाणिका** | ८ | ” |
| ३ **विद्युन्माला** दीर्घस्पष्टा | ८ | ” |
| ४ पांच दुहेरी **पंचकमाला** | १० | ५-५ |
| ५ पंचमा यती **कामदा** पदीं | १० | ५-५ |
| ६ यति सहावरी **शुद्ध कामदा** | ११ | ६-५ |
| ७ घे **इंद्रवज्रा** यति पांच साहीं | ११ | ५-६ |
| ८ **उपेंद्रवज्रा** अकराक्षराची | ११ | अंतीं |
| ९ आ हो, अ हो वा **उपजाति** आद्य | ११ | ” |
| १० **दोधक** घे अकरा पदिं वर्णां | ११ | ” |
| ११ घेइ वर्ण अकरा **रथोद्धता** | ११ | ” |
| १२ पंचमाक्षरीं **ललित** घे यती | ११ | ५-६ |
| १३ चारा साता वे पदा **शालिनी** ते | ११ | ४-७ |
| १४ **स्वागता** पदिं धरी अकरा ते | ११ | अंतीं |
| १५ ती **इंद्रवंशा** यति पंचमावरी | १२ | ५-७ |
| १६ पदिं **तोटक** द्वादश वर्ण धरी | १२ | अंतीं |
| १७ **द्रुतविलंबित** घे यति शेवटीं | १२ | ” |
| १८ द्विषट्कीं यती घे **भुजंगप्रयात** | १२ | ६-६ |

| | | |
|---|---|---|
| १९ विराम **वंशस्थ** पदांत द्वादशीं | १२ | अंतीं |
| २० पांचा साता घे पादिं ते **वैश्वदेवी** | १२ | ५–७ |
| २१ द्वादशीं यति तिज्यावर **यूथिका** | १२ | ३–९ |
| २२ बारा धरी अक्षरें पादिं **सारंग** | १२ | अंतीं |
| २३ पदिं नऊ अधिक चार **विभावरी** | १३ | अंतीं |
| २४ अंतीं **वसंततिलका** यति आठव्याचे | १४ | ८–६ |
| २५ दीर्घ ऱ्हस्व दीर्घ ऱ्हस्व **चामर** प्रकार हा | १५ | अंतीं |
| २६ विरमति जरि आठीं सातवीं **मालिनी** ती | १५ | ८–७ |
| २७ लघू गुरू क्रमेंच षोडशांत **पंचचामर** | १६ | अंतीं |
| २८ विराम प्रथमांष्टमीं मग नवींच **पृथ्वी** पदीं | १७ | ८–९ |
| २९ **मंदाक्रांता** चरणिं सतरा, चार, सा, वर्ण सात | १७ | ४–६–७ |
| ३० धरी वर्णा साहा अधिक अकरा ते **शिखरिणी** | १७ | ६–११ |
| ३१ सततहि सहा, चारा, साता धरी **हरिणी** पदीं | १७ | ६–४–७ |
| ३२ बारा आणिक सात वर्ण चरणीं **शार्दूलविक्रीडित** | १९ | १२–७ |
| ३३ वर्णांचीं **स्रग्धरा** ते निजपदिं धरिते सप्तकें तीन पाहे | २१ | ७–७–७ |
| ३४ आद्यंतिं चौवरि मधें सात सात वरि घे **अमृतध्वनि** यति | २२ | ४–७–७–४ |
| ३५ तीन सहा मग चार असे पदिं बेविस वर्णांचे घेइ **उमा** | २२ | ६–६–६–४ |
| ३६ चारापुढें तीन वेळां सहा वर्ण बेवीस **मंदारमाला** पदीं | २२ | ४–६–६–६ |

३७ तीन सहा मग पांच असे पदिं तेविस वर्ण
धरी **मदिरा** ते २३ ६-६-६-५

३८ तीन सहा मग पांचचि तेविस वर्ण पादिं
धरि नित्य **सवाई** २३ ६-६-६-५

३९ 'विषमीं दश अक्षरा गणा। १०
समिं एकादश ती **वियोगिनी**' ११

४० बारा पहिल्या तिसऱ्या अठरा दुसऱ्या तशाच चवथ्याही ॥
**गीति** पदीं घे मात्रा, विश्रुत लोकांत **पंत-आर्या** ही ॥

४१ नवापुढती येतात दहा मात्रा ॥
पदीं **दिंडीचे** मोज काव्य-मित्रा ॥

४२ प्रमाणें कमी अधिक मात्रा। देऊनि आणी बळ गात्रा,
वर्ण न गणी गुणसूत्रा। **ओवी ज्ञान** कवी **मुक्त** ॥

४३ न मोजी अक्षरा, घेई रसस्वाद, **अभंग** प्रसाद कवतुका ॥

**टीपः**-वरील व्याख्याचरणांतील संख्यावाचक शब्द छंदाच्या चरणांतील अक्षर संख्यांचे आणि यति स्थलांचे वाचक (शब्द) होत.

## अलंकारांचा शोध.

कवितेंत कुठें कोणते अलंकार झाले आहेत तें पहावयाचें असल्यास स्वतःस पुढील प्रश्न करावे.

### शब्द-रचना-अलंकार

१ अक्षरांची आवृत्ति झाली आहे काय? असल्यास **अनुप्रास**
२ अनेकार्थी शब्द वापरले आहेत काय? **श्लेष**
३ विशेषण साभिप्राय योजिलें आहे काय? **परिकर**
४ विशेष्य साभिप्राय योजिलें आहे काय? **परिकरांकुर**
५ एकादी म्हण गोंवली आहे काय? **लोकोक्ति**

### वर्णनीय अर्थ-समर्थन-अलंकार

६ आशीर्वादात्मक वर्णन आहे काय? **आशी**

| | |
|---|---|
| ७ जात्यादिकांच्या स्वभावाचें वर्णन आहे काय ? | स्वभावोक्ति |
| ८ सरळपणा सोडून तिखट मीठ लावून वर्णन आहे काय ? | पर्यायोक्ति |
| ९ प्रस्तुत अर्थाचें अप्रस्तुत अर्थानें समर्थन आहे काय ? | अन्योक्ति |
| १० म्हणून इत्यादि शब्दांनीं अर्थ--समर्थन आहे काय ? | काव्यलिंग |
| ११ विशेष व सामान्य दोन्हीं अर्थ निर्दिष्ट आहेत काय ? | अर्थांतरन्यास |

## गुणदोष वर्णन--अलंकार

| | |
|---|---|
| १२ अचेतन वस्तु सचेतन कल्पिली आहे काय ? | चेतनागुण |
| १३ एकाद्या वस्तूवर गुणाचा आक्षेप केला आहे काय ? | आक्षेप |
| १४ गुण म्हणून दोषाचें ग्रहण केलें आहे काय ? | अनुज्ञा |
| १५ गुण दोषांची आवड निवड केली आहे काय ? | परिसंख्या |
| १६ विरुद्ध गुणांचें तुलनात्मक वर्णन आहे काय ? | विरुद्धगुणन्यास |
| १७ वरून स्तुति किंवा निंदा परंतु वास्तविक त्याच्या विरुद्ध अर्थ आहे काय ? | व्याजस्तुति |
| १८ अनेक गुण वर्णून शेवटीं सार दिलें आहे काय ? | सार |

## कार्य-कारण-भाव-अलंकार

| | |
|---|---|
| १९ कार्याचें समृद्धीपर प्रौढ वर्णन आहे काय ? | उदात्त |
| २० उपड्या घड्यावर पाणी असें वर्णन आहे काय ? | निदर्शना |
| २१ कारणावरून कार्याची असंभाव्यता सांगितली आहे काय ? | असंभावना |
| २२ कार्याचें असंबंध-अतिशयोक्तीनें वर्णन केलें आहे काय ? | अतिशयोक्ति |
| २३ कार्याचें कारणावरून अनुमान केलें आहे काय ? | अनुमान |
| २४ कारणावांचून कार्यसिद्धी सांगितली आहे काय ? | विभावना |
| २५ कार्यगुणाच्या क्रमाविरुद्ध कार्योत्पत्ती वर्णिली आहे काय ? | विषम |
| २६ कार्यकारणांचें व्यापार-भिन्नत्व वर्णिलें आहे काय ? | असंगति |
| २७ कारणानुरूप कार्यसिद्धि वर्णिली आहे काय ? | सम |
| २८ एका कारणाला दुसऱ्याची पुष्टि वर्णिली आहे काय ? | समाधि |
| २९ अनेक कारणांनीं कार्यसिद्धि झाली आहे काय ? | समुच्चय |

३० एका कियेनें अनेक कार्यें झाल्याचें वर्णन आहे काय ? अनुषंग
३१ दोन कारणें एकच कार्य करितात असें वर्णिलें आहे काय ? सहोक्ति
३२ कारणसामुग्री असून कार्य न झाल्याचें वर्णन आहे काय ? विशेष

## दृष्टांत आणि उपमा

३३ दृष्टांत—दाखला देऊन वर्णन केलें आहे काय ? दृष्टांत
३४ कोणा वस्तूचें साम्य दुसऱ्या कोणा वस्तूस दिलें आहे काय ? उपमा
३५ तूंच तो, हें तेंच अशा प्रकारचें वर्णन आहे काय ? रूपक
३६ हें औषध नव्हें अमृत आहे अशा प्रकारचें वर्णन आहे काय ? अपन्हुति
३७ तुझ्यासारखा तूंच अशा प्रकारचें वर्णन आहे काय ? अनन्वय
३८ उपमेय जणूं उपमान आहे असें वर्णन आहे काय ? उत्प्रेक्षा
३९ उपमानाला उपमेयाची उपमा दिली आहे काय ? प्रतीप
४० उपमान--उपमेयाचें साधर्म्य--वैधर्म्य वर्णिलें आहे काय ? व्यतिरेक
४१ उपमान--उपमेयाला परस्पर उपमा दिली आहे काय ? उपमेयोपमा
४२ तुलनात्मक उपमा आहे काय ? तुल्ययोगिता
४३ उपमानाचे अनेक धर्म सांगितले आहेत काय ? उल्लेख
४४ उपमेयाचा अस्पष्ट निर्देश आहे काय ? रूपकातिशयोक्ति
४५ उपमेयावरून उपमानाचें स्मरण झालें आहे काय ? स्मरण
४६ उपमेय जणूं उपमान आहे असा संदेह झाला आहे काय ? संदेह
४७ उपमेय--उपमान आहे या भ्रांतीनें क्रिया झाली आहे काय ? भ्रांतिमान्

## बंधु–संजीवन

द्वैत वनांत पांडव असतां एकदा मध्यान्हीं धर्मराजाला तीव्र तृष्णा लागली; तेव्हां त्यानें नकुळास पाणी आणण्यास सांगितलें. नकुळ पाण्याचा शोध करीत करीत एका रम्य सरोवराजवळ आला आणि तेथील पाणी घेणार

तोंच सरोवराचा रक्षक पुढें होऊन ह्मणाला अरे पांथा, 'मी या मानस सरोवराचा रक्षक यक्ष आहें; माझ्या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें न देतां या सरोवराच्या जलाचें प्राशन करणारा मृत्यु पावतो, हें लक्षांत आण आणि मग पाणी घे. यक्षाचें ह्मणणें नकुळानें अभिमानानें ऐकिलें नाहीं आणि जलपान केलें. तो तत्काळ मरून जमिनीवर पडला. त्याच्यामागून सहदेव आला त्याचीही तीच स्थिती झाली. पुढें अर्जुन आला त्याचीही तीच अवस्था झाली. नंतर भीमसेन आला, तोही अभिमानानें भरलेला, त्यानेंही यक्षाचें ह्मणणें मानिलें नाहीं; तोही मरून पडला. शेवटीं धर्मराज येऊन पोहोंचला. धर्माचा आणि यक्षाचा संवाद झाला आणि धर्म--बंधूंचें संजीवन झालें.

आर्या

जलपान करील जरी माझ्या देतां न उत्तरें प्रश्ना
सुरही, मरे न मर तूं धर्मा निज बंधु उद्धरे प्रश्ना १
धर्म ह्मणे अग्निपुढें सांगे पांडित्य काय कापूस
देईन उत्तर सुखें तैसें गा! यक्षनायका पूस. २
कोण सुखी? नवल खरें काय? कवण मार्ग? कोणती वार्ता?
धर्मा उत्तर देई, होई तूं हे स्वबंधु उद्धरता. ३
पंच महायज्ञ करी सद्नीं दिनिं पांचवे सहावे वा
ऋणहीन अप्रवासी, त्याचे ठायींच होय सुख-ठेवा. ४
प्रतिदिवशीं यमसदना जाती प्राणी अनेक हें पाहे
लोक तरी वांच्छितसे नश्वर आश्चर्य केवढें या! हें. ५
तर्क, श्रुती, ऋषीही वादी, बहु गूढ तत्व धर्मांचें
धोपट मार्ग खरा कीं जाणें मागोन थोर लोकांचे. ६
रवि--अग्नि, इंधनें--दिन, दुर्वी--ऋतु--मास--साधनें काळ
शिजवी मोहकढाहीं भूतें हीं वार्तिका न का बोल? ७
विप्रास दान कां तें द्यावें, नट नर्तका, नृपा, भृत्या?
यक्ष ह्मणे वद राया उठवी या आपुल्या प्रिय भ्रात्यां ८

ज्ञानार्थ भूसुरीं वा ! रंजन-कार्यार्थ नर्तकीं नाना
भयवारणार्थ भूपीं देणें सेवार्थ सेवकीं दाना. ९

बोले यक्ष गुरुगणीं देवगणीं श्रेष्ठ कोण राया रे !
पवनाहूनहि चंचल कोण? वदे बंधु उद्धराया रे ! १०

माता थोर गुरुजनीं, देवगणीं जनक, थोर मानों हें
चंचल मानस जैसें खचित तसा पवनवेगही नोहे. ११

'यक्ष वदे कौंतेया ! पांडित्यें या गुरूहि तुज लाजो
झालों प्रसन्न चवघांतून उठो एक इष्ट तुजला जो !' १२

धर्म ह्मणे प्रिय मातें माद्रीचा तनय हा, उठो नकुळ
यक्षा ! तेणें माझें वांछित सारेंहि होय रे ! सफळ. १३

यक्ष ह्मणे धर्मा ! हे भीमार्जुन मान्य जे शतक्रतुला
ते तुज नकोत, वाटे नवल सुधेहून गोड तक्र तुला. १४

धर्म ह्मणे मजला तों माता माद्री पृथासमा, नावें
दोघींचींहि असावीं, अधिक उणें स्यां कधीं न मानावें १५

'उरलों मी कुंतीचा माद्रीचा ज्येष्ठ पुत्र उरवा हो !
स्वर्गीं न अश्रुधारें त्या मातेचा कदापि उर वाहो' १६

यक्ष ह्मणे धर्मा ! तूं प्रश्न खरा एक सर्व जगतांत
बंधु न वाटे होसी यातें तूं सत्य सर्वजग तात १७

'मग यक्षवरें उठले सुखसुप्त तसे पळांत चवघे ते
पांच निवाले, जेवीं सोमाची देवपंक्ति चव घेते.' १८

धर्म पुसे आह्यां हो ! कोण तुह्मी अद्भुत प्रभावाचे
लीलेनें असु दिधले, जेणें ही आमुची प्रभा वांचे. १९

वल्कल कटीस, माथां दीर्घ जटा, कुश, मयूरपिच्छ करीं
यज्ञोपवीत उज्ज्वल, ऐसें यमधर्मरूप यक्ष धरी. २०

वंदी चरण तयाचे धर्म पुढें, बंधुही तसें करिती
झाला प्रसन्न बहु तो धर्मपिता श्रीहरी तयांवरती २१
मानस सरोवर पहा जीवाचें ह्रदय, विश्व जल हो! तें
धर्मैं सेवन करितां उदक सुधा गरळ अन्यथा होतें २२
आत्मा रक्षक साक्षी उत्सुक बहु जीव विश्वजलपाना
'सावध' वदतो रक्षक गर्वें तें जीव हा जुमानीना २३
विषयोपभोग दुःखें पीडित होतो रडे पडे मृतसा
ज्ञानें अहंकृति गळे, धर्मबळें होय तोच अ-मृतसा २४
सर्वात्मा होय पिता, जीवात्मा तनय रूप दोघांचें
एकचि होय खरें हें संवादांतील सार घ्यायाचें २५

ह. म. समर्थ

## चंद्रांक

श्लोक-उपजाति

कलंक हा प्राप्त कसा मुखातें?
चंद्रा! सख्या! सांग खरेंच मातें
घे त्वत्प्रिया चुंबन कामयुक्त
तच्चिन्ह हें कज्जल कां विमुक्त? १

हा! हा! नव्हे कज्जल हें प्रियेचें
कोठून ये तें विरहीं सखीचे
वियोगदुःखानल सूचवीता
हा धूम माझें मुख लाजवीता २

हो धूम कीं कज्जल तीं अनित्य
कलंकवक्त्रीं तव होय नित्य
हें शोभवी चिन्ह तुझ्या मुखाला
'श्रीवत्स' जैसें हरिच्या उराला ३

लोपे तुझ्या हा किरणीं कलंक
गुणाकरीं दोष तसाचि एक
सदुक्ति ही साक्ष तुझ्या गुणांची
प्रौढी न वर्णी कवि दूषणाची ४

दुर्योधना सज्जन आढळे ना
धर्मा जगीं दुर्जन तो मिळे ना
दोषाकडे दृष्टि असज्जनाची
गुणींच कीं वृत्ति महामतीची ५

दारिद्र्यदोषें गुणराशि नासे
गर्वें करी एक कवित्व ऐसें
क्षारांश कीं दुग्धगुणापहारी
वदे असें अन्य महत्वधारी ६

गुणागुणांचा करितां विचार
हे हिंडती भूवरि काव्यकार
नभीं कविश्रेष्ठ करी विहार
शीलें गुणें जो शशिमित्र थोर ७
दारिद्र्य ठावें नच कालिदासा
क्षारीं नसे अल्प तथा पिपासा
श्रीमंत तो काव्यसुधासमुद्र
हे सर्प तो कीं विषकंठ रुद्र ८

ह. म. समर्थ

## अकस्मात् भेट

श्लोक

उगा न वद कोकिळा ! श्रुतिसि ताप देऊं नको
नको मलय-मारुता ! मज मुळींच स्पर्शू नको

अहा कितिक! संज्वरें प्रबल ताप होतो मनीं
कसा न परतोनि ये अझुनि जीविताचा धनी १
प्रयाण-समयीं प्रिया! पुसुनि अश्रु माझे तुवां
दिलें वचन कीं प्रिये! खचित मी वसंतोत्सवा-
असेन तव सन्निधीं, वचन तें स्मरोनी मनीं
तुझा विरह कंठिला प्रतिदिना प्रिया! मोजुनी २
सखी-जन मला ह्मणे; "चल सखे! वसंतोत्सवीं"
वसंत जवळीं नसे मन कसें रमे उत्सवीं?
सख्या, न वदल्यापरी गहिंवरें मला पाहती
मदीय हृदयस्थिती उमटली गमे तन्मुखीं ३
सुगंधयुत ये किती पवन आम्रराईतुनी
पिकस्वर गमे मनीं रुचिर पंचमाचा ध्वनी
करी श्रुतिमनोहर भ्रमर मंजु गुंजारवा
नव प्रणयिनी पहा हसत चालिल्या उत्सवा ४
त्वदागमन काल हा प्रियकरा! असें जाणुनी
तुझी बहुत वाट मी बघितली गृहीं त्या दिनीं
फुलेंहि मिळवोनिया रुचिर हार मी गुंफिला
कळे न हृदयेश्वरा! प्रियकरा! कुठें गुंतला! ५
कदंबतरु हालती, मधुलता डुले मालती,
रसालतरु डोलती, लवुनि नम्रता दाविती;
असा समय योग्य हा प्रणयसेव्य नारीजनां
न शांति कविसज्जना! तुजविना गमे मन्मनां ६
तरू बकुल तो डुले, मधुप तत्सुगंधें भुले
फुलें गळति त्यामुळें, सलिल फेनवत् जाहलें
असा सुखद काल हा जगीं चराचरां मोहवी
अशा सुखद वर्णनीं मुदित जाहले सत्कवी ७

रसालतरुमंजिरी मधुप सेवुनी तुष्टला
यथेच्छ मधुपान तें सुखद कां न तें त्याजला
सरोजिनि सभोंवती फिरति त्या तसे हंसही
कुणी तरि पडेल कां! प्रियजनीं वृथा संशयीं? ८
पलाश तरु रक्त तो दुरुनि पाहतां वाटला-
निसर्गवनदेविचा निटिलिं कुंकुमाचा टिळा.
भला शुकहि त्यावरी उडुनि येउनी बैसला
समानसुखसेवनीं समय हा प्रिया! जाहला ९
निदाघपरितप्त तूं परतला न कां? यावया
सशीत उपचार मी करिन शांतवाया प्रिया!
सुखें प्रणय-बंधनीं मग परस्परा शांतवूं
कथूनि विरहव्यथा ह्रदय पूर्ण संतोषवूं १०
असे किति विचार मी प्रतिदिनीं मनीं योजितें
अनागमन हें तुझें विफलता बहु आणितें
असे खचित दुर्बला जगतिं मानवाशा जरी
तिच्याच परिबंधनीं सकल राहती अंतरीं ११
जसा गगनचंद्र हा कुमुदिनीस संतोषवी
तुझा वदनचंद्रमा मजसि कां न तो तोषवी?
नभीं उदय पावतां दिनमणी खुले पद्मिनी
परी प्रियतमा तुझी झुरतसे तुझ्यावाचुनी १२
तुझा उगवला जरी वदनचंद्रमा सोज्ज्वल
दिसेल गृह दिव्य, त्या अनुपमा प्रभा येइल
तयाविण न शांति या मम मनश्चकोरा कधीं
निघूनि कधिं जाइल त्वरित दुष्ट कालावधी १३
अगा! ह्रदयवल्लभा! दिन कसा तरी जातसे
परंतु रजनी प्रिया! परम दुःसहा होतसे

गमे न मन वाटतें सकल शून्य चित्तास या
न शांति लवही मिळे तपविती जिवा वस्तु या १४
बळें पडुन राहतें कठिन भूमिशय्येवरी
बळें नयन झाकितें मुळिं न झोंप येई परी
तुझी रुचिर मूर्ति जी हृदय-मंदिरा व्यापुनी-
असे, न सखया ढळे अणुहि दृष्टिपंथांतुनी १५
निघे कटुक 'किर्र' ये श्रवणिं कीटकांचा ध्वनी
उलूक किति घूं करी कठिण शब्द दुर्भाषणीं
निशासमयिं होतसे सकल मेदिनी निद्रित
सुतप्त परि मी असे अहह! एकली जागृत १६
तनू फिरवितें क्षणोक्षण पुन्हांहि ह्या त्या कुशीं
स्थिरे न किमपी प्रिया! स्थिति तुला कळावी कशी?
सुदुर्बल करास या उचलतें पुन्हा टाकतें
सबाष्प नयनांस मी उघडतें पुन्हा झांकतें १७
हळूहि जरि जाहला क्वचित नाद मी आतुर
घडे, चकित मी कुणी सहज बोलतां सत्वर
सशंक बघतें झणीं मजसि पाहिलें कां कुणी?
निशा न गमते महा कठिण ही मला डाकिणी १८
उठें हळुच चालतें पद न वाजवीतां अशी
गृहीं मम फिरावया मजसि होय चोरी जशी!
निराश मग होउनी शयनिं येउनी मी पडे
जशी वनचकोरिणी झुरझुरूनि दुःखीं बुडे १९
कपोल करिं ठेवुनी करिं विचार मी सारखा
तुझ्यासम नसे जगीं ठक दुजा मनोहारका!
मनास कळतें जरी सकळ तेंच कापट्य या
धरून बसतें तुझ्याजवळ मंदिरीं हट्ट या २०

विचार करितां असा मजसि झोंप येई जरी
तुझी प्रियकरा ! किती पडति गोड स्वप्नें तरी
कधीं हसतसें, कधीं रुसतसे, कधीं गातसें,
कधीं उठतसे मधें दचकुनीहि, निंदीतसे. २१
अगा ! हृदय-वल्लभा ! मदन-सुंदरा ! प्रेमळा !
कुठें विरमला मला ठकवुनी प्रिया ! निर्मळा !
असें ह्मणुनि बैसतें कर करावरी ठेवुनी
कुठें तरि विशूल्य या सजल दृष्टितें लावुनी २२
उषासमय जाहला उडतसे खगांची तती
स्त्रिया रमणबाहुतें हळुहळू पहा सोडिती
असे शयानिं मी इथें बसुनि ही जशीच्या तशी
निशा प्रबल तापिनी मजसि जातसे ही अशी २३
मदीय जरि दूतिका सहज मंदिरीं पातली
त्वदागमन-सूचक-श्रवण रम्य वार्तावली-
कथील, ह्मणुनी समुत्सुक तिच्याकडे पाहतां
तिचें वदन वाढवी मम मनांत उद्विग्नता २४
करील तनुदाहसंहरण चंदनाची उटी
ह्मणूनि बहु चर्चुनी उपवनीं फिरे एकटी
करी न किमपी कमी उलट दाह ती वाढवी
सुखांत भवितव्यता ह्मणति येतसे आडवी २५

( अपूर्ण )

## भीति

शार्दूलविक्रीडित.

आहे भीति पदार्थ काय न कळे, नाहीं मुळीं कल्पना
होतें धस्स खरें कुठून परि तें कांहीं कळे ना मना

याचा फार विचार मी करितसे मातें परी ना कळे
बोला पंडित वस्तु काय भय ही, कोडें करा मोकळें १
बाहू जाति गळोनि पादहि तसे गात्रें तशीं सर्वही
सर्वांगीं बहुही दराकुनि पहा घामास ये पूरही
तेव्हां काय करूं, कुठें तरि पळूं, होतें कसें हो! मना
आहे पंडित काय हें तरि अहो! संतोषवा कामना २
गोळे येति कसे तरी झडकरी पायांत पाहूनिया
रानीं गर्द सुशांतशा वनपशू कीं सिंह कीं व्याघ्र या
धांवा धांव तसे करूनि ह्मणतो या रे! मुळीं शक्य ना
बोला पंडित कैवि हो! तरि असें होतें कळे ना मना ३
आहे हें जरि हो! खरेंच असलें छातीहि ज्याची असे
त्याला देखुनि सिंह वाघ सगळे जातात कोठें कसे?
कैसा तो शिवबा कसा तरि अहो! तानाजि कैसा गडी
त्यांना भीति पळून दूर अवघी जाते कशी तातडी ४

———×——— गो० वि० ताडफडे

## केवळ प्रसाद ह्मणून

श्लोक

देवा! देशिल तूं उदार हृदयें जें जें करीं माझिया
तें तें घेइन मी प्रसाद ह्मणुनी, स्थापीन शीर्षी तयां
'आहे फोलच हें' असें न वदतां संतुष्ट त्याच्यावरी
होवोनी, ह्मणि मी तयास सुमनें घेईन मोदें हरी १
माती देशिल तूं जरी तरिहि मी घेऊन ती आदरें
यत्ना थोर करून सुंदर घटा बांधीन माझ्या करें
वाटे मानसिं हेंच कीं कृति अशी पाहून माझी बरी
आनंदुनि मनांत देशिल मला उत्कृष्ट कांहीं तरी! २
मातें देह दिलास नश्वर असा-आहे मला ठाउकें
त्याची मी परि दुर्दशा न करितां ठेवीत तो मोहक

वाटे मानसिं हेंच कीं कृति अशी पाहून माझी वरी
आनंदूनि मनांत देशिल मला उत्कृष्ट कांहीं तरी ३

———×——— सिताराम विष्णु केळकर

## अंधःसृष्टि

अंधळीचेंच जग हें! त्याची कल्पना डोळ्यास कशी होणार. त्याकरितां शरिरानें अर्थात् डोळ्यानें-तें शक्य नसल्यास मनानें तरी घटकाभर सूरदासच बनलें पाहिजे.

शार्दूलविक्रीडित

डोळीं आंधळि ही, ह्मणोनि जनता प्रीती मुदानें धरी
चित्तीं पाझरुनी, फुटोनि, नयनीं अश्रू त्वरेनें झरे
प्रेमानें फिरवीत हात वदनीं, काळीजही चर्चरे
दाटे कंठ तिचा तदा बघुनियां ही प्रीति त्यांची खरी १
'दृष्टीचित्र समस्त सृष्टि' वदुनी चेष्टीत कोणी मुदें
'नूरा सोडुनि नेत्रिच्या' जगिं मजा कोणी वदे आन न
प्रीतीचा कुणि दाविती कळवळा, वासे कुणी आनन
'देवा निष्ठुर तूं कठोर हृदयी' कोणी स्वतांशीं वदे २
नाना रंगि फुलें फुलोनि हंसती, लीला शिशूंची मुली
संध्यादेवि, उषा, प्रकाश दिसणें, कां गे! असावें वजा
नौरंगी दुनियेंतला मुळिं तुला कांहीं मिळेना मजा
ऐकोनी मनिं कोपली, हंसुनिया, बाला तदा बोलली ३
"दिक्कालां, नभ, चांदण्यां, उदधिनां, स्वर्गास लंघोनियां
फोडोनी गिरिगव्हरा भिडतसे, मज्जाव जेथें तुह्मां
होते दृष्टि दिगंतपार, स्वबळें ब्रह्मांड भेदोनिया
देखे वस्तु अलक्ष्य जी न दिसली ब्रह्मादिकां आगमां
डोळे पाहुनियां तुह्मी फुगतसां या क्षुद्रशा सृष्टिला
सृष्ट्या मी असल्या किती तरी बघे ज्या शक्य ना दृष्टिला ४

———×——— गोप

## नाद-ब्रह्म

[ शार्दूलविक्रीडित ]

पायांना कळ लागली सतत त्या कोनीं उभे राहुन
वक्षीं कोंडत जीव, चित्त द्रवलें, ही दुर्दशा पाहुन
वीणेला उचली करांत ह्मणुनी विश्रांति मी द्यावया
अंकीं झोपवि, देउं लागत तदा आळेपिळे ती बया १
मोडायास्तव खोड कायम तिची लोटोनिया खालती
कानाला पिळिलें, रुसे, पुटपुटे तोंडामधें कांहि ती
आतां ठीक न काम, कांहि विघडे हें जाणुनी मी हळु
पायांना करि गुद्गुल्या हंसत तों गालामधें ती हळूं २
छेडायास्तव अंगुल्या गुदगुल्या जों जों करूं लागल्या
तों तों एकवटून तंत्रि तरला झंकारण्या जागल्या
त्यामाजी ह्रदयामधील जुळल्या तारा मिळोनी त्वरें
झाल्या एक सुरांत दोन्हि, पडली रागा रङ्गाला छरे ३
भेटायास्तव आपसांत ढरल्या दाही दिशा ह्यापुढें
भेटे व्योम धरेस, विश्व अवघें त्या नादब्रह्मीं बुडे
आनंदाविण कांहिं एक न अतां कल्लोळ तो सारखा
मोडूं खोड कशी? चिरंतनिच मी झालों मला पारखा ४

भवानी शंकर

---

## हा काय न्याय

[ शार्दूलविक्रीडित ]

गंधी रम्य फुलें खुले परिमलें ज्याचेनि सारी क्षिती
आरोग्यावह माधुरीयुत फलें भाग्यें जया बाधती
झाडें तीं तरुवल्लरी बहरतीं वर्षांत वा! एकदां
एरंडास फलें सदाफुलि फुले आतां उद्यां सर्वदा १

श्रीमंती अलकावती पतिदुजी पत्नी निरोगी पती
दासीदास सुरम्य हर्म्यं बगिचे भाग्यें सुखें रावती
दंपत्या न अपत्य थोर नवसं कां एकही लाभत
कंगाला चुकतीं न वार्षिक मुलें भारें बिचारा हत २
थंडी ऊन गणी न रात दिन वा केव्हां न आरोग्य घे
सेव्यासेव्य न पाहि कष्ट सहतां मोहीं न केव्हां रिघे
ही का रीत उपासमार नशिबीं त्याच्या सदा वारसीं
चिंता स्वप्निंहि ठाबुकी नच सुखीं खातीपिती आळशी ३
सेवी कांतपदा सदा गुणवती स्वार्थी न लक्षी कदा
वाली झांकुनि दुर्गुणा पतिरता दक्ष स्वकार्यीं सदा
देहा वस्त्र नसे पुरें दिन किती राही उपाशी सती
हा का न्याय विलासि वारवनिता वस्त्रांवरें शोभती ४
कन्या पुत्रहिना अनाथ विधवा तो वृद्ध वृद्धा तशी
रोगग्रस्त अभागि उत्सुक अती आलिंगण्या मृत्युशी
त्यांतें पाहुनि दूर अंतक पळे मारुनि मोहें मिठी
ज्यांच्या जों न कुठें कली उमलली त्यासीं मुलें गोमटीं ५
गोष्टी वस्तु अवश्यमेव जगता ज्या वाढवीती सुखा
ज्या उत्साहेंनि कल्पना नच नवी सामर्थ्य देवे रुका
भाग्य धान्य धनीं विशेषण जनीं जें दैवयोगें मिळे
सांभाळी न त्रिधी सुखी तरि कशी व्याख्या सुखाची खुळे ६

——×—— शि. भि. पारकर

## अभागी.

( पद्मावती चाल )

सौंदर्याची सृष्टी दिसतां पहिल्या दृष्टीला !
बालमनाला गमलें कीं जगुं करीं स्वर्ग आला
त्रिभुवनीं मग लावुनि दृष्टी सौंदर्यी रमली !

काळ कंठिला कसातरी त्या अंधाऱ्या रातीं !
कितीक डोंगर नैराश्याचे चढुनी धैर्यानें !
कितीं तुडविलीं अपमानाचीं काटेरीं रानें !
बाहुबलानें विषण्णतेच्या सरिता तरतांना
खळला नाहीं जीव न भुलवी रूप जशीं कोणा !
दुःखाचाही असह्य वारा झोंबे शरिराला
भाविसुखाच्या प्रेमाचें परि विमल वसन तनुला !
बाल्यामधुनी तारुण्याच्या नव सीमेवरती
पाय ठेवितां, सुंदर, आशा लहरी मनिं उठती !
अंतर तुटलें मुग्धपणाचें ये रूपाअवळीं
प्रेम तुडविलें पायीं, झाली आशेची होळी !

मनोहर

———×———

## मनास

अभंग

मना रे सज्जना । जरी तीर्थजल ॥
दिलें न प्रेमल- । पूजारियें १
कासयातें सांग । व्हावें तूं हिंपुटी ॥
अशीच रहाटी । जगाची ही २
क्षिति नाहीं ज्यासी । तीर्थप्रसादाची ॥
पूजारी त्या यात्री । 'घ्या घ्या' शब्दीं ३
जयां ना वाण । कधीं भोजनासी ॥
आमंत्रिती त्यासी । आग्रहानें ४
अन्न वस्त्रीं उणें । जया न कदापी ॥
जो तो आपें ओपी । तयासीच ५
वस्त्राविण ज्याचें । कुडकुडे अंग ॥
त्यासी वस्त्र सांग । कोण देतो ? ६

झाला अन्नावीणें । पोटाचा कोनाडा ॥
कोण तो बापुडा । जेववीतो ? ७
सुशील साध्वीचे । दारीं जळे वत्ती ॥
वेश्ये दारीं हत्ती । झुलतसे ! ८
भरीवर भर । करावी ही रीती ॥
जगाची ही नीति । नवलाई ९
जितुकें बा! जग । भरलें जगतीं ॥
सारें तें निश्चितीं । तीर्थ जाण १०
गंगा भागीरथी । तापी सरस्वती ॥
भीमा भीमरथी । तीर्थजल ११
कृष्णा इंद्रायणी । कावेरी नर्मदा ॥
पंचगंगा गोदा । तीर्थजल १२
कूप वापी ओढे । नाले नद्या तळीं ॥
सारीं हीं भरलीं । तीर्थोदकें १३
प्राशी त्यांतुनीया । हवें तितुकें तें ॥
'नाहीं' म्हणे तूंतें । कोण पाहूं ? १४
विश्वंभराचें त्या । खरें पादोदक ॥
हेंचि तीर्थ एक । मना माझ्या १५
कोणी या आंबट । म्हणो सम धान ॥
तुजसी कारण । काय त्याचें ? १६
आणसी कयास । तूंचि अंतरींचा ॥
म्हणे अनंताचा । तनय हा १७

अनंततनय

---

## विघ्नहारिणी

श्लोक

विश्रांतिस्तव ज्या मनोहर लता-कुंजीं कुरंगानना-
होती ओंपत आज भग्न-हृदया दुःखें त्यजी त्या वना

भक्षोनी हरितांकुरास सलिल प्राशीत होती जिथें
आतांना वननिर्झरास वळुनी मागें पुन्हां पाहतें ! १
बाळें दोन तिचीं वनीं दुडदुडू मागें तिच्या धावती
ती बाळास्तव मंदमंद चरणीं व्याकूळ चाले सती
नेत्रीं मोहक तें दिसो, प्रियजन स्थानीं सुखें त्या वसो
अेथें प्राणविनाश; तेथ वसती एका क्षणाची नसो २
जी झाली शुभदर्शनीय कितिदां मार्गी शुभेच्छू जना
होती सुंदरि सृष्टिच्या करित जी सौंदर्यसंवर्धना
यन्नेत्रीं 'मृगलोचना' म्हणविल्या सौभाग्यवंती स्त्रिया
जाते येथुन ती अभागिनि अहा दुर्भाग्य भोगोनिया ! ३
वर्षा येइल भूप्रदेश हिरवा होईल चौहीकडे
मोठे निर्झर धांवतील गिरिचे उल्लंघुनीया कडे
स्वच्छंदें विहगावली तरुवरी गाईल काव्यें नवीं
होवो हें रमणीय कानन, मृगी केव्हां न येईल ही ४
ज्या व्याधें शर हाणिला, चुकविली तत्क्रूरदृष्टी कशी?
आपत्तींतुन पाडसें तरि हिनें संरक्षिलीं हीं कशीं
दुःखें चौंहिकडून एकसमयीं दुःसह्य आल्यावर
आपत्तींत निराश्रितास असतो मातापिता ईश्वर ५

———×——— दु. आ. तिवारी

## अभंगरत्नमाला

१

देवा ! तुझी इच्छा-राजा मी असावें-रंक वा असावें-संतोषी मी
प्रभो ! तुझा हेतु-उदासी असावें-आनंदी असावें-आनंदी मी
विभो ! तुझा भाव-विरागी असावें-विलासी असावें-विलासी मी
तुझ्या लीलेवरी-माझें देव नाचो-दास मात्र असो-पायाचा मी

२

सौंदर्यानें जेव्हां-नेत्र मोहताती-नेत्रांना मी स्मृती-तुझी देतों
ऐश्वर्यानें जेव्हां-उपजे आश्चर्य-तुझें दानशौर्य-आठवतों
औदार्यानें जेव्हां-आनंदतों साच-बुद्धिदाता तूंच-तुला गातों
आनंदाश्चर्यांत-आणि प्रमोहांत-मिटल्या नेत्रांत-तुला ध्यातों

३

पंढरीचा मार्ग-आक्रमीतो कष्टी-जेजुरीच्या गोष्टी-बोलतसे !
पंढरी पंढरी-विठ्ठल-नगरी-खंडोबाची वारी-मागतसे !
मार्तंडाचा लावी-भंडार कपाळीं-बुक्का लोकभाळीं-लावीतसे !
एक देव नाहीं-एक भाव नाहीं-द्वैतभक्ति कां ही-पावतसे ?

४

हिंसकाला सांगा-कितीही पापाच्या-कथा त्या हत्येच्या-फळ काय
वेश्येलागीं सांगा-सजवोनी ओष्ठीं-पातिव्रत्य गोष्टी-फळ काय ?
नास्तिकाला सांगा-जगन्नायकाच्या-लीला कौतुकाच्या-फळ काय ?
स्वभावाचें मूळ-विषारीच जेथें-बोधजल तेथें-करी काय ?

५

फणसाची गोडी-सेवीतां सेवीतां-कंटकांची निंदा-कशाला हो ?
चंदनाचा गंध-लावीतां लावीतां-सर्पसंग-वार्ता-कशाला हो !
कोकिलाचा स्वर-ऐकतां ऐकतां-त्याची जन्मकथा-कशाला हो ?
गुणश्रेष्ठ जे जे-गुणानंदीं त्यांच्या-अवगुणचर्चा-कशाला हो ?

६

आम्राच्या छायेंत-स्तविला तो आम्र-प्रशंसिला निंब-निंबाखालीं
समुद्राच्या तीरीं-समुद्र वर्णिला-नदीतीरीं तीला वाखाणिली
केतकी वर्णिली-पुष्पवाटिकेंत-निर्गुंडी वनांत-प्रशंसिली
कार्यसाधू जे जे-अभिप्रायें त्यांच्या-निर्णयाची इच्छा-कोणी केली ?

——×—— दु. आ. तिवारी

## प्रेमगीत !

( विरहाकुल राधिका मानसिं या चालींवर )

शांति रवीची जशि न विसंबे अपुल्या नाथाला
प्रेम तसें तें अढळ असावें धर बळकट त्याला १

प्रेम जरी तव हृदयीं असलें चिंता मग कसली ?
प्रेम हरितसे भीतो सारी जरि मानासिं असली २

दुःखाचें हें सौख्य करितसे प्रेम गडे ! खास
प्रेमावाचुनि व्यर्थ व्यर्थ या जगतामधिं वास ३

प्रेम असे तर सर्वचि गमतें गोड जगामाजी
प्रेमईश्वरा ! प्रेम मला दे ही इच्छा माझी ४

प्रेमसृष्टि ही अगम्य सारी रुचते परि मजला
प्रेमहीन तो जीव जन्मुनी विफल जगीं आला ५

प्रेमाची किति वर्णूं महती शब्द न भाषेंत
प्रेमालाची 'प्रेम' ह्मणावें जिव्हा स्थिर होत ६

असेल जर त्वद्हृदयिं प्रेम तर सद्गुण येतील
नव्हे प्रेम त्या बळें ओढुनी त्वत्सव अणतील ७

ऊठ ! घट्ट धर प्रेमालागीं येइल मग धीर
दिसेल सृष्टी सुंदर आधीं दोषांना मार ८

प्रेम धरुनिया हृदयीं मग तूं पहा मजा मोठी
सत्प्रेमाचा प्रकाश दीप्तीयुत हृदयावरती ९

प्रीतिदेवते ! भेट सखीला दे येउनि आतां
कृपाप्रसादें प्रेमपूरिता कर माझी कांता १०

वेडा जग मज ह्मणेल ह्मणुं दे खंति न परि धरि न
गाण्यानें मी अंबर सारें नादयुक्त करिन ११

प्रेमगीत हें गातां गातां कवि साजणि! हरला
धरला कवितेनें परि त्याला प्रीतीनें धरला! १२

काव्यशेखर

## मानवी दुर्बलता

( चालः-जोर मनगटांतला पुरा! घाल घाल खर्चा )

टांच देउनी अश्वालागीं ॥
मार मारिशिल दौडो ॥-
ती सागरसीमा जागीं ॥
जिरवील तुझी प्रौढी ॥ १

हिमालयींउंचोवरती ॥
फार फार चढशील ॥-
पहाशील खोली जर ती ॥
क्षणांत तूं पडशील ॥ २

क्षितिज दिसे जवळी ह्मणुनी ॥
जाशील धराया त्यास ॥-
देईल दुजें तें अणुनी ॥
उमज मनीं हें खास ॥ ३

ज्ञान ज्ञान ह्मणुनी तूं ॥
शोधशील रे! फार ॥-
उपजेल मनीं किंतू ॥
होशील अंतिं बेजार ॥ ४

धाव धावशिल सरळ्या ॥
फार कुंपणावेरी ॥-
लागतील तव नरड्या ॥
काट्यांच्या धारी ॥ ५

अ. र. खिचाळकर.

# सूचना.

कविता एकचतुर्थांश कागदाच्या एकाच बाजूवर स्पष्ट लिहिलेली असावी. आरंभीं कवितेचें कथानक थोडक्यांत दिलेलें असावें. शक्यतर अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ टीपा द्याव्या. संस्कृत मराठी शब्दांचे अग्राह्य समास, दीर्घास्तव र्‍हस्व व र्‍हस्वास्तव दीर्घ, यमकासाठीं शब्दांची ओढाताण, यतिभंग, दूरान्वय, समास नसतांना संधि, समास असतां असंधि, कठोर वर्णांचा भरणा, संस्कृत शब्दांची रेलचेल, अयुक्त विभक्ति प्रयोग श्लेषरहित शब्दांची आवृत्ति ह्या गोष्टी जितक्या टाळतां येतील तितक्या टाळाव्या. एकच विषय विविध वृत्तांत वर्णिला असतां साधारणतः गैरसोईचें होतें म्हणून तशी योजना होतां होईल तों करूं नये. पद्याच्या चालीवरच्या कवितेचें प्रमाण कमी असावें. व मथळ्याखालीं चाल लिहावी. कवितेच्या कागदाबरोबर कवीनें पत्र लिहावें, निराळें लिहूं नये संपूर्ण नांव व पत्ता आणि इतर टोपण नांव हीं स्पष्ट लिहून कळवावीं, मात्र जुन्या प्रसिद्ध टोपण नांवाचा नवीन कवींनीं उपयोग करूं नये. स्थलाच्या मानानें कविता बरीच येते म्हणून प्रसिद्धि व अभिप्राय ह्यास विलंब होणें अपरिहार्य आहे. उत्तर हवें असल्यास पोष्टाचीं तिकिटें पाठवावीं. वर्गणीदारांची संख्या जशी वाढेल त्याप्रमाणें मासिकाचीं पानें वाढवून अधिक कविता प्रसिद्ध करितां येईल. ह्या सूचनांचा आमचे कविमित्र यथायोग्य विचार करितील ही पूर्ण आशा आहे.

संपादक, काव्यरत्नावली.

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

# इस्लाम धर्म.

अथवा

## महाराष्ट्रीय-मुसलमान-साहित्य-पत्रिका.

महाराष्ट्र भाषेंत इस्लामीधर्म, इस्लामी इतिहास, इस्लामी संस्कृति, आणि इस्लामीसाहित्य, यासंबंधानें माहिती देणारें भारदस्त त्रैमासिक. वर्षाअंतीं 'कुराण-परिचय' नामक ग्रंथ बक्षीस, केव्हांही वर्गणीदार होतां येतें. वार्षिक वर्गणी ३ रुपये शिवाय ट. हंशील.

पत्ता:—शिकंदरलाल आतार
चिटणीस, इस्लाम-साहित्य-मंदीर पो-भिलवडी
जि-सातारा

---

## शेतकीचें नवीन मासिक.

# महाराष्ट्र कृषीवल.

वार्षिक वर्गणी ट. ख. सह
५ रु व्ही. पी. नें ५ रु. ४ आ.
सहामाही रु. २।८।०
तिमाही रु. १।८।३

नमुन्याच्या अंकास
८॥ आण्याचीं तिकिटें

संपादक:—वा. रा. गाडगीळ
बी. एजी. (मुंबई) एम्. एस् (अमेरिका)

## मासिकांत येणारे विषय.

सामान्य कृषिकर्म, फलसंवर्धन, फळांचें इतर पदार्थांचें दीर्घकालीन रक्षण, गोपालन, दुधदुभतें, मधमाशा पाळून मध पैदा करणें. बागाईतपिकें, फुलझाडें व बगीचा, कृत्रिमखतें, पिकांचे रोग व किडी वगैरे वगैरे. पृष्ठें ४०. जाहिरातीचे दर पत्रद्वारें.

पत्ता:—महाराष्ट्र कृषीवल कार्यालय.
७०२ सदाशिव पेठ, पुणें.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळींनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येतां ।
त्या त्याच अर्थाप्रति दावितांतां ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बाबजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] एप्रिल सन १९२३ [ अंक ४ था

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## अनुक्रमणिका.


अकस्मात् भेट ( दु. आ. तिवारी )....................७३

सख्य-भक्ति ( अनुवादक )....................७७

महाप्रस्थान ( भास्कर रामचंद्र तांबे )....................८२

तो हा सखा ( आनंदराव कृष्णाजी टेकाडे )....................८३

महांकाळी ( दु. आ. तिवारी )....................८५

बुद्धिचातुर्य ( ह. म. समर्थ )....................८८

सूक्तमाला ( ह. म. समर्थ )....................९४

घाली तयाला जग पुष्प-माला ( विनायकानुज )....................९४

विमनस्कता ( शरदाग्रज )....................९५

प्रेमाचा हलवा ( केशव नारायण वैद्य )....................९६



आकार वाढला! दुसरें वर्ष सुरू झालें! सुंदर चित्रें येऊं लागलीं

**अल्पावकाशांतच लोकप्रिय झालेलें उत्तर हिन्दुस्थानांतील**

**मराठी भाषेचें एकुलतें एक सचित्र मासिक**

ब. ट. सह २॥ रु. **विजय** व्ही. पी. नें २॥। रु.

**यांत सुरस कविता, मनोवेधक गोष्टी, चैतन्योपादक चरित्रें, बोधप्रद धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक लेख, चटकदार विनोद, कूटप्रश्न, जगाचा संसार, उपयुक्त माहिती इ. विषय येतात. नमुना अंकास ०॥ आण्यांचीं तिकिटें पाठवा. जाहिराती सवलतीनें घेऊं.**

पत्ता—म्यानेजर विजय लष्कर-ग्वाल्हेर.

# काव्यरत्नावली

अंक ४ था.

## अकस्मात् भेट.

[ मागील अंकावरून पुढें चालू ]

श्लोक

सुधाकर कसा जनीं ह्मणविशी विधो! गा भला
विषागरचि भाससी उदय पावतां तूं मला
'न ये उगीच योग्यता जगतिं नामरूपें कुणा'
मला न हृदयीं गमे लवहि बोध हा बा! उणा २६
समस्त विषवृक्ष कां उपवनांत या लाविले?
किती तळमळे अहा! हृदय पुष्प गंधानिलें
वनींहि विमनस्कता मजसि मोहवी यापरी
भ्रमिष्ट असते स्थिती अहह! कामुकांची खरी
समुच्छ्वसित हृद्व्यथा शमवितां उपायें बहू
शरें मदन विंधितो असुख-युग्म कैसें सहूं
मनस्थिति कुणासही मुळिंच सांगतां येइना
सलज्ज जगतीं अशी प्रकृतिसिद्ध ह्या अंगना! २८
वसे मदन हा जणो हरित आम्रवृक्षावरी
करूनि मधु-पंक्ति 'ज्या,' कुसुम सायकातें वरी

करी सतत वृष्टितें अद्य हाय! देहावरी
विलज्ज अबलेवरी अहह! शस्त्र कैसा धरी? २९
अरे! अधम मन्मथा! कुसुमसायका! निर्दया!
जनास परिपीडितां तव मनीं नसे ती दया
मलाच परि ताडिशी प्रियकरा न कां पीडिशी
उगाच असुखानलीं मजसि कां बरें पाडिशी ३०
कितीक विषयीं जनां त्वदिय ताप हा पोळवी
वियुक्त युवती जनां विरह-पावकीं लोळवी
कुठेंहि मन ना रमे प्रिय न कांहिंहि तें गमे
स्मशान सुरसद्मनापरि गमे प्रियासंगमें ३१
सुवृक्षपरिवेष्टिता मधुलता सुमालंकृता
बघूनि हसती पहा अद्यता त्वदंगीकृता
सुमंजिरिमिषें च्युत प्रचुर साश्रु त्यातें करी
असे अहह! निर्दया पुरुषजाति लोकीं खरी ३२
नसे जवळ मत्सखा खचित जाणुनी अंतरीं
तिथूनि वळलें जरी तनुसि सोडिना तो तरी
असे शयनिं भोजनीं कुसुमचापधारी उभा!
वितेज मुख जाहलें उतरली तयाची निभा ३३
तनूवरिल भूषणें सकल काढुनी ठेविलीं
गळ्यांमधुनि तत्क्षणीं कुसुममालिका काढिली
नको बकुलमंजिरी ह्मणुनि दूर ती फेंकिली
परी न लवही मला हृदयशांतता लाभली ३४
सशीत जलनिर्गमीं धवल मौक्तिकाचे परी
तुषार बहु घेतले बसुनि तेथ आंगावरी
मदीय वसनें जरी भिजुनि चिंब झालीं तरी
मला न विमनस्कतेंत कळलीं परंतू खरीं ३५

मनास रमवूं जरा क्षणभरी असें योजुनी
प्रबद्ध शुकसारिकेजवळ पातले येउनी
अधोवदन होउनी नयन आपुले झांकिती
खगांतहि दिसून ये प्रिय सहानुभूती किती ३६
तुझा रसिक हा असे जवळ गे! सखे सारिके!
तुला सकल सौख्य तें मिळतसें मनासारखें
मदीय नच भोग हा अजुनि संपला साजणी
तुझी सदयता बहू बघुनि तोषलें मी मनीं ३७
पयोधर सख्याविना तटिनि ती दिसे व्याकुला
प्रवाह तनु शुष्क हो मलिन देहही जाहला
बघूनि समदुःखिताजवळ जाउनी बैसले
तदा नयनबिंदुही खळखळां जलीं वाहिले ३८
तुझ्यासह कितीकदां प्रियकरा! इथें पातलें
सशीत जलबिंदुनीं कितिकदां तुला न्हाणिलें
मला स्मरण होउनी सुखद काळ तो आठवे
परंतु तुजसी कसा विरह काळ हा कंठवे? ३९
पुन्हां उडवितां तुवां सलिलबिंदु माझ्यावरी
"पुरे प्रियकरा! पुरे"–म्हणुनि आर्जवी त्यावरी
तुवां न परि ऐकतां तुजवरी बळें कोपुनी
रुसून बसलें इथें फिरवुनी मुखातें क्षणीं ४०
तदा जवळ येउनी हसवुनी विनोदें सया!
हळूच पुसिलें मुखावरिल बिंदु ते माझिया
अजी फिर फिरूनही निटिलबिंदुधारा गळे
परी न परिमार्जना वपु मनोहरा नाढळे ४१
जिच्या परिमळें दिशा दरवळे मना तोषवी
वरूनि मधुमालती कचकलाप संभूषवी

तुवां प्रथम त्या दिनीं निजकरें जशी घातली
तशीच कबरी असे; अजुनि मुक्त ना जाहली ६२
मुखावरि तयामुळें अलक येति हे वाकुडे
नसे विकल चित्त हें परि मुळींच त्यांच्याकडे
कुणास्तव करूं बरें रुचिर सर्व शृंगार तो
न हंस तरि पद्मिनी परिविकास हो व्यर्थ तो ४३
सुमग्रथित जाहली शिथिल सर्व धम्मीलिका
गुणत्रुटित जाहली गलित कंठसन्मीलिका
गळून कटिमेखला सरकते नितंबावरी
तुझ्याविण वद प्रिया ! कवण येउनी सांवरी ? ४४
उशीर मज जाहला क्षणहि यावया मंदिरीं
तुला न सहवे सहे विरह हा कसा अंतरीं
न विप्रिय तसें घडे मजकडूनही कारण
कठोर असतें स्त्रियांहुनि खरें नरांचें मन· ४५
मदीय परि जीवित प्रियकरा ! तुझ्या आधिन
त्वदर्थ नियमव्रतें करुनि पूजना साधिन
'सतीस पतिवांचुनी जगिं नसे दुजें दैवत'
असें वदति जे महापुरुष नित्य धर्मीं रत ४६
मनोहर तुझी हृदीं प्रिय सुमूर्ति आणून मी
मनःसुमन वाहुनी परमपूज्य भावें नमी
कधीं नयनिं ती दिसे मजसि पाहण्या सर्वथा
कळे न सखया ! कधीं शमित होय ही हृद्व्यथा ४७
सख्या ! तव मनोहरा वपु शिलातलीं रेखुनी
त्वदंगिकृत मत्तनूविरचना करी मोहुनी
भरूनि मम कंठ ये, नयनपूर ये दाटुनी
उदास बसलें तदा सकल लेखना टाकुनी ४८

नियुक्त अभिसारिका प्रियकराकडे जातसे
विलाससुख सेवुनी परत ती गृहीं येतसे
निवास असता तुझा विदित सत्य मन्मानसा
प्रवृत्त असत्यें अशा तरि करावया साहसा ४९
सुरम्य अभिसारिका समचि वेष तो घेउनी
अशा घन तमांतही तुजसि भेटतें येउनी
जरी भिववितां पथीं कुणिहि पाहुनी एकटी
कटींतुनि कट्यार मी उपसतें तदा धाकुटी ५०
अजी मम पुनः पुन्हां सजल वाम नेत्र स्फुरे
सकंप तनु होतसे रुचिर मूर्ति नेत्रीं फिरे
कलध्वनि करी गृहा पुढतिं येउनी चातक
त्वदागमनसूचकं गमातें सर्व नैसर्गिक ५१
मला बघुनि सारिका करितसे बहु नर्तन
तसाच शुकही करी तवाचि नामसंकीर्तन
मयूर निजपुच्छही उभवुनी कसा नाचतो
नवीन शुभसूचकें बघुनि हर्ष हा साचतो ५२
असा करि विचार तों प्रिय तिचा तिथें पातला
अकास्मित विलोकुनी हरिख अंतरीं दाटला
परस्पर अहा! तदा पडति गाढ आलिंगनें
कवीस न अतां पुढें करवतील तीं वर्णनें ५३

———×——— दु. आ. तिवारी

## सख्य–भक्ति

(वसंततिलका)

कोणीं दिलें तुज ‘दयानिधि’ हें सुनाम?
मातें दिसे न परि त्यांत मुळींच राम!

त्वां दाविला तरि दयागुण काय ऐसा?
मातें तदीय लवलेश दिसे न कैसा! १
"देती उदारपुरुषा उपमा घनाची
साजे न ती तुज, तुझ्यासम एक तूंची"
कव्युक्ति ही अतिशयोक्तिच साच आहे
औदार्यसिंधु मज बिंदु न दे, कसें हें? २
देवा न आज पहिल्यापरि काळ भोळा
आतां चिकित्सक जगीं जन फार झाला
साक्षात्प्रमाण न, तरी न गणोचि कांहीं
त्या मालिकेंतिलचि हा मणि एक मीही ३
आत्मस्तुतिप्रिय तुझा बघतां स्वभाव
त्वत्स्तोत्रपाठक तुला स्तविती मृषैव[1]
आहेस 'निर्गुण' परी करिती 'गुणाढ्य'
साधे न तेंहि मज, कारण बुद्धिजाड्य ४
हें ब्रीद काय तव दीन सहायतेचें
मोठें प्रशंसन कवी करितात ज्याचें
कामादिकीं षड्रिंनीं मज गांजियेलें
येणें न कां मदवनार्थ[2] अजून झालें? ५
काढावयास बुडत्यास महापुरांत
पाहे न कीं, सदय तो कधिं जात गोत
झालों अधीर जरि मी भव-सिंधुमाजी
तूं पात्रताच बघतोस अजून माझी! ६
ये धांवुनी अवसरीं विषमीं[3] सहाय्या
त्यालाच आप्त ह्मणणें इतरांस वाया!

---

१ खोटेंच २ माझ्या रक्षणाकरितां ३ कठिण समयाला

हा 'काल-सर्प' गिळितो मज हाय! हाय!
माझा सखा असुनि तूं उपयोग काय? ७
दुःखी जनांस अवलोकुनि तुष्ट होणें
हें कां सुलक्षण कुणी ह्मणती शहाणे?
आहे परी मन तुझें किति थोर साचें
भक्तां बळें छळुनि पाहसि सत्त्व त्यांचें ८
ज्याचें न आचरण होय वचासमान
त्यातें जनीं सकल लेखिति 'अप्रमाण[1]'
लोकीं प्रसिद्ध तव काय असे प्रतिज्ञा
ती मी कथीन तरि होय तुझी अवज्ञा ९
राहे विसंबुनि तुझ्या वचनीं चुके हें
आश्वासना विफलता तव येउं पाहे
शद्वास फार जपतीं निज लोक थोर
विश्वासघात अघ सर्व अघांत घोर १०
होतें मनांत असलें तरि सर्व कांहीं
माझ्याविशीं तव मनीं सदयत्व नाहीं
येशी न हा तरि गमे मनिं तत्प्रभाव
जाणें न काय लव मी मनुज-स्वभाव? ११
मारावया सुत जरी जननीच पाही
राजा न रक्षण करी पडतां अपायीं
तूं लोटितां मजसि दूर तसेंचि देवा!
होईल अन्य करणार नसेंचि केवा १२
ये, तीव्र कोप इतुका तुजला कशाचा
आहें अनन्यगति पायिक[2] मी पदाचा

---

[1] लबाड [2] चाकर

दे! आलिया शरण शत्रुहि जीवदाना
मातें क्षमाहि करणें तुज कीं घडेना १३
देवा तुह्मां 'प्रभु'-पणीं धरणें स्वचित्तीं
शोभायमान गुण एक सहिष्णु वृत्ति
हा मानवी सहज धर्म असे 'प्रमाद'
आह्मी चुकों तरि कुणाप्रति यांत शब्द १४
कां मूक होसि मजसी वद शब्द दोन
'सर्वार्थसाधन' ह्मणून धरी न मौन
हो कोपयुक्त अथवा करुणार्द्र चित्तीं
कोणेपरीहि मिळुं दे श्रवणा त्वदुक्ति १५
दाता नव्हेस दिसतोस ऋणी जगाचा
जो येइ तो तुजकडे करितोच यांचा[1]
तेव्हां फला वितरिशी, जंव घेसि सेवा
अभ्यर्थना तव पदीं विफलाच देवा! १६
जातां करूं तुजसवें व्यवहार वाया
ना एक नांव तुज, वागवितोस 'माया[2]'
रूपें अनंत, तव छंद धरील तो तो
अंतीं पहा 'सदनदारविमुक्त[3]' होतो १७
देवा कळे न मज तोंड चुकाविशी[4] कां
निष्कामभक्त तव मी, मनिं घे न शंका
दावी स्वकीय मुखचंद्रच एकवार
तद्दर्शनाविण न आस धरी चकोर १८
'स्वार्थी' तसाच 'अकृतज्ञ' असा प्रभो तूं
वागे तुझ्या न हृदयांत उदात्त हेतू

---

१ मागणी २ कपट ३ सर्व संग परित्याग करितो, हा भाव. + जन्मदात्री आई सावत्र दत्तक वगैरे नव्हे. ४ चुकवितोस

दासां-करीं[1] फुकट घेशि करून सेवा
चिंता तदीय कधिं वाहसि काय देवा १९

मी मागतों किमपि यांत तुझें न वेंचे
ऐश्वर्य-भोग-सुख तुच्छ नकोच साचें
देणेंच भेट, परिसें[2] मग आयसाचें[3]
जाण्यास हीनपण कारण ना कशाचें २०

प्रत्यक्ष भेट तव इच्छित व्हावयास!
माझेंच घे मन अशा परि संशयास
त्याही न गम्य, ह्मणती श्रुति 'नेति नेति'
तो तूं मला सुलभ होशिल कोण-रीति[4] २१

तूं काय बा! 'पतित-पावन' आडनांवें
चित्रांतल्या कधिं न तारण होय नांवें[5]
कामा न येइल सुवर्ण 'शिलंगणाचें'
नांवापरी कृति न, तें तरि फोल साचें २२

बांधून सेतु कपि सिंधुवरी शिळांचा
उत्तीर्ण होत, परि विक्रम हा न त्यांचा!
यन्नाम अद्भुत कृती करितें अशी ही
तो कां स्वयें पतित-तारण-शक्त[6] नाहीं? २३

ग्रासीयलें जगत हें अवघेंच काळें[7]
त्वन्नाम एक 'अविनाश' असें निराळें
केलें ध्रुवादिकिं तन्नामृतनामपान[8]
झाले तयें 'अमर' 'अक्षयजीवनाम[9]' २४

---

१ भक्तांच्याकडून २-३ लोखंडाला परिसमण्यानें नुसती भेट दिली कीं पुरें. ४ कोणत्या मार्गानें ५ नौकेनें ६ पतित लोकांना तारण्याला समर्थ ७ मृत्यूनें ८ तुझ्या अमृतनामाचें सेवन ९ चिरंजीव.

कांहीं गणां न निजनाममहत्त्व तूह्मी
तें जाणतों परि पदांबुजभक्त आह्मी
पद्मास तत्सुरसमाधुरि काय ठावी
जो सेविता भ्रमर त्याप्रति ती पुसावी २५

(अपूर्ण)

## महा-प्रस्थान

### कुसुम १ लें.

( चालः—बघुनि त्या भयंकर भूता... )

दैत्यशी छातिवर ठेली तुज पुढें रात्र अंधारी !
चल, जिवा! चालणें आलें; कां उगा बघसि माघारीं ?
मुरडोनि कुणाला बघसी ? ये कोण तुझ्या सांगातीं ?
चल, उचल बोचकें अपुलें, जोडिलें तूंच जें हातीं.
कडु, गोड, तिखट, खारट जी जोडिली शिदोरी अंगें
घे उचल तीच कामीं ये ! दे कोण आपुली संगें ?
ये हांक किती निकडेची ! लागला तगादा पाठीं !
राहु दे शाल, पागोटीं ! राहु दे वहाणा काठी !
या घरीं दिवे लखलखती ! तुजपुढें परी अंधार !
परि सराय न मिराशी, हें काय तुझें घरदार ?
येथले हार डोळ्यांचे, बाहूंचे सुंदर शेले-
गुंतविती तुजला मोहीं ! जरि जिवा आडवे ठेले-
तरि काय तुला थांबविती ? कधि कुणा रोकिलें यांहीं ?
मग कासाविस कां होसी ! चल मार्ग आपुला पांहीं ?
येथल्या सतारी वीणा, येथल्या लकेरी ताना,
स्वर पंजरिं कोंडूं बघती ! परि तयां तुला धरवेना !
मग चाल मुकाट्या पुढतीं ! आठवी कुलस्वामीला !
डोळ्यांस अमंगळ पाणी, आणी न अशा शुभ वेळा.

ऐक ती क्रूर आरोळी! दरडावुनि येती हाका!!
वाढ वेळ आधिच झाला, मग उशीर आणिक हा कां?
जरि वाट तुला नच ठावी, ती ऐक पाउलें, प्राणा!
रे! धीर धरी तूं पोटीं! संगि ये जगाचा राणा!

———×——— भास्कर रामचंद्र तांबे

## तो हा सखा—

[ धापेवाडा ( जि० नागपूर ) येथील श्रीपांडुरंग चरणीं ह्या पाकळ्या भक्तिभावानें अर्पण केल्या आहेत. कार्तिक त्रिपुरी पौर्णिमा शके, १८४४ ]



श्लोक

ज्यानें मंजुळ बासरी घुमवुनी त्रैलोक्य संमोहिलें
सत्या बोधुनि भारतीयसमरीं धर्मास संस्थापिलें
ज्ञानेशादिक थोर जीव रमती यद्गायनीं प्रेमल
ताराया जगता विटेवरि उभा तो हा सखा विठ्ठल १
निर्मी सुंदर विश्वगोल अपुल्या चेंडूस खेळावया
जो त्याशीं रमला तसाचि हंसला नानापरी लीलया
ठेवी हस्त कटीं, सुखें भुवनिंच्या लीला बघे केवल
ताराया जगता विटेवरि उभा तो हा सखा विठ्ठल २
भीमा आणिक चंद्रभाग म्हणवी त्या चंद्रभागाजलीं
हर्षें घे जडरूप, नाम सिकता, स्वर्गस्थ आत्मावलि
कीं लाभो शिरिं भक्तपादरज ज्या ताईत कंठांतिल
ताराया जगता विटेवरि उभा तो हा सखा विठ्ठल ३

द्वारीं सेवक मारुती, फणिरिपू आज्ञेस सेवावया
ठायीं तिष्ठत जोडुनी कर परी आज्ञाविना जो तया
कोणी तापद होइ काय सुजना हें लक्षि जो निश्चल
ताराया जगता विटेवारि उभा तो हा सखा विठ्ठल ४
ज्याचे बाजुस दोन्हि आर्त हृदयें राई तशी रुक्मिणी
जो केव्हां तरि एक वेळ अपणा पाहील कीं लोभुनी
पाहीना मुळि, भक्त येइल कुणी दुर्लक्ष तें होइल
ताराया जगता विटेवरि उभा तो हा सखा विठ्ठल ५
नामाचा जयघोष नित्य घुमतो पृथ्वीवरी अंबरीं
वाजे टाळ, मृदंग एकचि रवें तालावरी सुस्वरीं
स्वर्भूसंगम ज्यामिषें अनुभवा जीवास ये मंगल
ताराया जगता विटेवारि उभा तो हा सखा विठ्ठल ६
साम्यानें नटला जलीं, स्थलिं, नभीं काष्ठीं तसा प्रस्तरीं
अस्तित्वें परि नाममात्र उरुनी जो राहि कोठें तरी
भक्ता कष्टवि भानु उग्र ह्मणुनी निर्मी शशी शीतल
ताराया जगता विटेवारि उभा तो हा सखा विठ्ठल ७
नाहीं चातक एकतार नयनें कादंबिनीच्या जला
किंवा रामपदा अनंत वरुषें ध्याई अहल्या-शिला
अठ्ठावीस युगें तसें त्यजुनिया सौख्योपभोगाकुल
ताराया जगता विटेवारि उभा तो हा सखा विठ्ठल ८
नाहीं अंत मुळीं 'अनंत' ह्मणुनी नामारुपा पावला
शक्ती अर्थविहीन शद्वनिकरीं ज्या गुंफितो हा खुळा
घेई गोड करोनि जो जरि चुके भक्ती खरी निर्मळ
ताराया जगता विटेवरि उभा तो हा सखा विठ्ठल ९

——×—— आनंदराव कृष्णाजी टेकाडे

## महांकाळी

### ( तोफ )

[ चाल:-चंद्रकांत राजाची कन्या ]

हिंदविजय लक्ष्मीची भगिनी तोफ महांकाळी !
त्वांच चढविली राज्यलक्ष्मिच्या सौभाग्यीं लाली १
तुझ्या जिवावर विंध्याद्रीच्या फोडुन कोटाला
तीक्ष्ण मराठी भाला नाचत गेला दिल्लीला ! २
भीमथडीची टाप उसळली तुझ्या दमावरती
हालाविली सल्तनत उधळिली तख्तावर माती ! ३
जरिपटक्याचें पुच्छ उभारुनि शिवनेरी कुहरीं
करित गर्जना केली कितिदां शर्थ महासमरीं ४
रिपुसेनेचे प्रचंड जलधर गर्जत असतांना-
लाल लाल रक्ताचे नद रणिं वाहत असतांना- ५
तुझी गर्जना, तुझी धडाडी, तुझीच मर्दुमकी
पडती बाजू सांवरण्याला सहाय झाली कीं ६
पंचरसाच्या सप्तरसाच्या तोफांचा ताफा
ठिकऱ्या केल्या, नभीं उडविल्या रिपु टाकी धापा ७
धैर्य गळालें, धैर्यासह कर कृपाणही गळले
गोळे सुटले, तोंच त्यासवें प्राणहि ते सुटले ! ८
निनादिनी ! तव निनाद जों नच ऐकाया आले
नवजयनिश्चय नवोत्साह तों परहृदयीं भरले ९
हाँ हाँ म्हणतां धूर पसरिला नभास व्यापियलें
दिनमणिच्या साम्राज्यांतूनी तारे नाचविले ! १०
सूर्यज्योती चंद्रज्योती यांची बरसात
न पाहिलेली दाखविली तूं तुर्की समरांत ११

गोळ्यांचा सोपान रचियला भूस्वर्गामाजी
रणतीर्थी वपुखंडित झाले ते चढले गाजी १२
बार ठासला, गोळा चढला, ठिणगी जों शिवली
मृत्युलोकिची वीर मंडळी स्वर्गावर चढली ! १३

होळकरांची उजवी बाजू, डावीला शिंदा
तुझ्या दमावर भिडवित गेले खांद्याला खांदा १४
निधडे निधडे निदानसमयीं निकराला आले
धडड्ड् धडड्ड् तुझ्या निनादें धडाडिनें लढले १५

अष्टदिशांच्या पडद्यामागें दडलेले वैरी
त्यांवरही अनिरुद्ध झाडिल्या फैरीवर फैरी १६
रक्तपिपासा मुंडावलिची इच्छा जी त्याली
त्या कालीची एकाकालीं तृप्ति तुवां केली १७

भैरव भूत प्रेतानंदी वेतालादिक जे
समूह त्यांचा त्वत्कंठाच्या नादें धाउन ये १८
शिर गेलें शिरिं हिमालयाच्या, कर सिंधूतीरीं
धड न राहिले धड जय संगरिं, जीव सुरद्वारीं १९

स्वराज्य आणि स्वतंत्रतेची त्रिभुवन मातोश्री !
त्वद्भक्तीनें भोगुन गेले स्वतंत्र राज्यश्री २०
भिवरावाचा प्रणाम माते ! फडक्यांचें नमन
सलाम इब्राहिमखानाचा, तुजही ते मान्य २१

\+ \+ \+ \+

विजनकाननीं वितेज कोठें वससी एकांतीं !
कुरुभूमीच्या अंत्य श्रमाची कां ही विश्रांती ? २२
सर्वसाक्षि होतीस भयंकर नाशाच्या कालीं
सांग ऐकुं दे कसा उमटला दैवलेख भाळीं ? २३

काबुलच्या खड्गावर झाली अखेरची फेंक
तो दख्खनच्या शौर्यश्रीचा अखेरचा झोंक २४
श्रीवर्धनच्या धैर्यमेरुचा विलास शेवटचा
तेजःपुंज कसा मणि तुटला तो पुण्यश्रीचा? २५
वसईच्या निश्चयवंताचा गर्भ निश्चयाचा
बुडी मारण्यापूर्वी वदला सांग काय वाचा? २६
निजस्वामिच्या निर्वाणीच्या आज्ञा पाळाया
ग्वालेरीनें केंवि मानिली तृणापरी काया? २७
जरिपटक्याच्या भंवतालींचे वेढे फोडोनी
पुनःपुन्हां आणून दाविला भाऊला कोणी? २८
कुणीं कुणीं आईचें केलें दुग्ध तिथें सार्थ?
कालमुखीं घातल्या सुखानें माना देशार्थ? २९
कडनिकडीला, निर्वाणीला, अंतिमसमयाला
झाडित तोडा केंवि गाडदी गढून तो गेला? ३०
"अब क्या हटना, अब है मरना, सलाम साहेबजी"
संगीनींच्या फेकी सेळत निजला रणगाजी! ३१
मेलें सारें शौर्य, मरूं दे, मरणाच्या पूर्वी-
कसें चमकलें तेज ऐकुं दे, हृदयाला सुखवी. ३२
समशेरीसम नित्य कटारीशीं कटि भिडउन लढला
रक्ताचा 'समशेरबहाद्दर' कसा कुठें पडला? ३३
पहिल्या जोमासवेंच गेला धुरांत तोफांच्या
अंधारींतुन 'धन्य दमाजी' उठली ही वाचा ३४
कडाडुनी रिपुसेनेवरतीं गायकवाडाचा
शर्थ करोनी गर्द जाहला वीर विक्रमाचा! ३५

+ + + +

स्वातंत्र्याची चौबाजूला एकमुखी आग
लागोनी झटतील सर्वथा आर्य महाभाग ३६
त्यांतुन होइल शिवसंभव जें अवतारी भक्त
गर्जाया लावील तुला अजि उपासना युक्त ३७
ज्वलत्पर्वतीं आग धुमसते उठेल डोंबाळा
"दीर्घतपाचें पुण्य उजळितें भविष्य काळाला" ३८

———×——— दु. आ. तिवारी

## बुद्धि-चातुर्य.

'मौज कशांत आहे' याविषयीं बोलत असलेल्या चार मुली पाहून कुणीं राजानें त्यांच्या भाषणाकडे नीट कान दिला. एक ह्मणाली मद्यपानांत मोठी मौज असली पाहिजे, दुसरी ह्मणाली मांस भक्षणांत फार मजा असावी, तिसरी ह्मणाली नटण्याथटण्याची मौज कांहीं निराळीच आहे. सर्वांत लहान मालती नांवाची मुलगी होती ती ह्मणाली खोटेंच पाहणें, खोटेंच बोलणें यांत खरी मौज असली पाहिजे; पहा सारे लोक हेंच करितात. राजा देखील त्यांतलाच असें दिसतें; दिसतें एक आणि ह्मणतात दुसरें, असतें एक आणि सांगतात दुसरें, आहे कीं नाहीं मौज? हीं भाषणें ऐकून राजा चकित झाला. मुलींच्या जवळ गेला आणि आपापलें भाषण सत्य कसें तें दाखवावें ह्मणून त्यानें एकेकीस सांगितलें. पहिल्या तिघींनीं आपलें भाषण स्वानुभवसिद्ध नसल्याचें कबूल केलें. मालतीनें आपलें ह्मणणें बुद्धिचातुर्यानें खरें करून दाखविलें. कसें तें पुढील कवितेंत सांगितलें आहे.

दिंडी

चार बाला एकत्र बोलतांना-
सहज पाहे कुणि एक गुणी राणा
कौतुकें मग त्यांचिया मधुर बोला-
आयकें तो, ऐकुनी चकित झाला. १

विप्रकन्या चौघींत एक होती
मद्यपानीं बहु मौज ह्मणे हो ती
दुजी होती बालिका क्षत्रियाची
ह्मणे मांसाशन देइ मौज साची २
होय तिसरी जी वैश्य बालिका ती
ह्मणे नटण्याची मौज हो! किती ती
धूर्त चौथी मालती ह्मणे ऐका
गड्यांनो जें आवडे सर्व लोकां ३
वृथा खोटें पाहणें बोलणेंही
गमे लोकातें मौज कीं नव्हे ही
जरी झाला भूपाल तरी त्याला
तेंच आवडतें, नवल का न बोला? ४
स्तब्ध झाल्या मग मुली अवघियाही
भूप आला त्यांचियाजवळ कांहीं
ह्मणे राजा ऐकिलें मधुर बोल
परी गमती ते सकल मला फोल ५
थोरलीतें तो वदे काय तूंतें
मद्यपानाचें ज्ञान सांग मातें
विप्रकन्या तूं मद्य तुला प्याया
कसें लाभे? बोलसी बोल वाया ६
ह्मणे बाला ती आयके नृपाला
मद्य प्यालें मी नसे एक प्याला
नसे राया अनुभूति मुळीं मातें
साक्ष माझ्या जनरीति भाषणातें ७
किती पडती लोळती जणुं भिकारी
तरि न गुत्त्यामधि रीघ भरदुपारीं

जरी येतीना मौज नृपा मद्यें
गाठ खर्चोया लोक काय गद्धे? ८
राव बोले बालिके मद्य खोटें
पान त्याचें जाणिजे दुष्ट मोठें
मद्यप्यांतें वाटते मौज मद्यें
गांठ खर्चोनी खचित होति गद्धे ९
भूप बोले दुसरीस तूं लहान
मांस खाया नाहींत दांत तीक्ष्ण
मौज कैशी तुज मांसभक्षणांत
कसें पाहों वद सत्य भाषणांत १०
ह्मणे बाला दुर्गंध-मक्षिकांनीं
असें भरलें जरि मांस, डोळियांनीं-
पाहवेना तरि थोर थोर घेती
मौज नसतां कां विकतमूर्ख होती ११
राव बोले बालिके सत्य जाण
मांस खातां होतात दांत क्षीण
पडुनि जाती मग पुढें मौज काय?
मांसभक्षण गे! इष्ट कसें होय? १२
वैश्य बाले तुज काय कळे सांगें
नटायाचें सुखदुःख कोमलांगे;
वृथा नव्हती मम बोल, लोक सारा
कष्ट सोसोनी त्यास देइ थारा. १३
भूप बोले त्यामधें नसे प्रीति
साधुलोकीं, बालिके, लोकरीति
जरी आहे ह्मणतेस तशी स्पष्ट
मौज थोडी घडतात महाकष्ट १४

मालतीतें भूपाल ह्मणे बोल
तुझे अवघेही वाटतात फोल
काय सारा जन भूपही वृथाच
हिरा त्यजुनी घेईल हीन कांच? १५
सत्य लोकां आवडे ह्मणे जो तो
तुझ्या वचनें विपरीत अर्थ होतो
ह्मणुनि करुनी दाविजे बोल सत्य
जरि न करिशिल तरि करिन पारिपत्य १६
भूप पाहे निरखोन त्या मुलीला
भीति शंका शिवली न मुळीं जीला
ह्मणे बाला दावीन मी प्रचीत
जरी देशिल मज अवधि आणि वित्त १७
राव बोले गे माग दिलें वित्त
अवधि दिधला तुज दाविजे प्रचीत
द्रव्य दिधलें मग इष्ट तें नृपानें
दिवस वेळा नेमिली बालिकेनें १८
एक तंबू चौकांत ताणवीला
मालतीनें तो फार शोभवीला
नृपा दिधला संदेश बोलवावें
लोक ध्याया अनुभूति तुह्मी यावें १९
सभेमाजी सरदार मंत्रि कैक
उच्च-नीचासनिं बैसले अनेक
मनीं ह्मणती बालिका महा धीट
करूं पाहे लटिक्यासही अवीट २०
दार तंबूचें पूर्ण उघडीलें
एक एकातें हंसत बोलवीलें

हात धरुनी मग त्यांस आंत नेलें
पृथक् सर्वां मालती हेंच बोले २१
येथ आहे भगवंत मूर्तिमंत
तोच पाहिल जो शुद्धबीजभूत
असें ह्मणुनी ने त्यांस पटा आंत
होय अद्भुत ठेविलें दाखवीत २२
पुसे दिसतो कीं देव चक्रपाणी
होय वदती तद्वचन आठवोनी
नृपें पुसतांही ह्मणति चक्रपाणी
पाहियेला जाण ही सत्य वाणी २३
राव नेला मग शाहण्या मुलीनें
बोधियलें पूर्वोक्त त्यास तीनें
रूप अद्भुत ठेविलें दावियेलें
ह्मणे राया हा कोण दिसे बोले २४
तया रूपा निरखोन राव पाहे
चकित होवोनी ह्मणे बालिके हें
पाहिलें कां रूप मज्जनांनीं
ह्मणे बाला पाहिलें हेंच त्यांनीं २५
तुह्मां दिसतो कीं देव, अन्य कोणी
दिसे, बोला मद्वचन आठवोनी
भूप ह्मणतो मानसीं काय लोक
शुद्ध बीजें अन्यथा मीच एक २६
काय सांगूं मालते धूर्त बाले
'देव दिसतो' बालिका हंसे डोले
ह्मणे त्यांतें राजया झुके लोक
त्यास झुकवी तो बुद्धिमंत एक २७

भूप आला बैसला मंडपांत
पुसे सर्वां पाहिलें काय आंत
एकशद्बें ते वदति चक्रपाणी
नृपा आह्मीं पाहिला सत्य मानी २८
रूप अद्भुत मग तेथ आणविलें
गर्दभातें सर्वांस दावियेलें
ह्मणे सांगा कीं हें न देखियेलें
वदति होतें कीं हेंच आंत ठेलें २९
कसें वदला पाहिला चक्रपाणी
वदुनि शस्त्रीं घातला नृपें पाणी
ह्मणे जिव्हा छेदितों सकळिकांच्या
वृथा बघतां बोलतां मृषा वाचा ३०
अश्रु नेत्रीं वाहती सकळिकांचे
राव उठला, कांपती सकळ, त्याचे-
हात धरुनी मालती ह्मणे त्यास
स्मरे वदलासी तूंही देव हास ३१
नृपें दिधली तळवार तिचे हातीं
छेदि जिव्हा या ह्मणे भी न चित्तीं
भूप चरणीं ठेवुनी मस्तकातें
काय वदली बालिका आयका तें ३२
देव आहे सर्वत्र सारखाच
तया ठायीं ना भाव नीच-उच्च
गर्दभीं कीं मानवीं असो जीव
वदति वेदांती जीव तोचि देव ३३
मालतीतें उचलोन करीं घेई-
भूप, घेती मग लोक सर्व तेही

माचवोनी तिज, चुंबुनी सुखानें
राजकन्या पद दिलें राजयानें ३४
बुद्धिमंतातें मान सकल लोकीं
बुद्धि जोडोनी ठेविजे विवेकीं
कार्य सारें मग होय सिद्ध जाणा
बुद्धिपुढती वांकवी मान राणा ३५

——×—— ह. म. समर्थ

## सूक्तमाला.

( वसंततिलका )

काठिण्य नारळ फळा बहिरंगदेशीं
माधुर्य फार वसतें परि गर्भदेशीं
संतीं जरी वरिवरी अदयत्व भासे
कारुण्य फार हृदयांत परी नभासें १
कांटे वरी बहु फळा फणसाचिया रे!
गर्भांत पेंव अतिगोड तयाचिया रे!
बाहेरुनी जरि दिसे बहु उग्रदेही
आंतून संत मृदु फार सदंगमोही २
संपूर्णही नद-नद्या जरि पाणियानें-
पीती न नीर, तरु पूर्ण जरी फळानें-
ते भक्षिती न फल, मेघ न धान्य खाती
लोकोपकारपरमात्रचि त्या विभूती ३

——×—— ह. म. समर्थ

## ॥ घाली तयाला जग पुष्प-माला ॥

( इंद्रवज्रा-वृत्त )

कोठें तयाचा कधिं जन्म झाला। कीं, थोर वंशीं कुलही न याला
विद्या-कला-साधन काय केलें। यासी जगाचे बघती न डोळे

सामान्य वृत्तीहुनि भिन्न ऐशी । येतां दिसोनी हरिखे तियेसी
सृष्टि-क्रमा चार-पथीं कसोटी । लावूनि कीं ते बघतें चळे ती
कर्तव्य-सोपान करावयाला । आरंभ कोणी नुकतांच केला?
तों ठाकला प्रश्न युगांतरींचा । लक्ष्मी-कृपा-साधन-पात्रतेचा
तीतें करी दूर सरस्वतीचा । हा भक्त झेंडा मिरवी यशाचा
मार्गावरोधी रिपु कीं नुराला । संसार-पाशावश तोंचि झाला
वारूनि तन्मोह सदैव भावी । ध्येयैक-मार्गावरि लक्ष्य लावी
ऐकूनि कल्लोळ, गमे, मतांचा । ये काल हा सत्त्व-परीक्षणाचा

( वसंत-तिलका )

शांती-सुनिश्चय-दयायुध-सज्ज होई
सत्यानृताब्धि मथुनी पर-तीर पाही
निंदा-छलाद्यनृत-जन्य विषांसि प्याला
सच्छोधनामृत समर्पुनियां जगाला ६

( इंद्रवज्रा )

कर्तृत्व-चिन्हांकित-भू-तला या
भावी सुखाचा पथ दावुनीयां
अक्षय्य शांतींत मिळोनी गेला
घाली तयाला जग पुष्प-माला ७

———×——— विनायकानुज

## विमनस्कता

[ चाल:-चंद्रकांत राजाची... ]

### चतुर्दशिका

काय करावें कोठें जावें कळत नसे आतां;
वेड्यापरि मी उगाच बसलों कांहीं नच करितां!
या मम हृदया काय हवें तें समजत ना मजला!

खळबळ उडते अंतःकरणीं सांगुं काय तुजला?
दिशा दाहि या अंधारानें व्याप्त पहा झाल्या,
हृदयामध्यें ज्यानें केली वसती या समया!
श्रमिष्ट झालें मन हें त्यानें, थांग न मुळिं लागे;
आशेच्या त्या किरणांसाठीं पहावया लागें
जगांत ह्मणती सौख्य वहरतें, क्रीडा करि मोद
परंतु मजला गमे न कांहीं दाहि दिशा सुंद!
तिमिर तिमिर तो बरा वाटतो नयनां न उजेड,
निराशतेनें काबिज केला अंतःकरण गड!
मार्गि सुखाच्या मनःस्थितीच्या आड असे लपुनी
कोण बसे तो दुष्ट रिपू मज छळण्याला टपुनी?

———×——— शरदाग्रज

## प्रेमाचा हलवा

[ चालीवरची कविता ]

सुंदर विमलांबरी विलसती-गिरि शिखरें कोठें!
भव्य मनोहर दुर्ग त्यांवरी-मधुनि मोठमोठे १
तयाभोंवती थोर पसरलें-वन दिसतें जें हें
सह्यसुताऽपांझरी[1] सुंदरी-तयामधुनि वाहे २
नगावरुनि जलनिर्झर दडदड-धांवतची येती
प्रेमल वत्सें जशुं मातेला-तसे तिला मिळती ३
निर्झर बालक जे नगजनका-नत्र सोडुनी गेले,
त्यांचें सुंदर थोर सरोवर-एक तिथें झालें ४

( अपूर्ण )

---

१ सह्याद्रींतून निघणारी पाण्याची झरी [ नदी ] अथवा सह्याचलकन्या 'पांझरा' नदी

# सूचना.

कविता एकचतुर्थांश कागदाच्या एकाच बाजूवर स्पष्ट लिहिलेली असावी. आरंभीं कवितेचें कथानक थोडक्यांत दिलेलें असावें. शक्यतर अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ टीपा द्याव्या. संस्कृत मराठी शब्दांचे अग्राह्य समास, दीर्घास्तव न्हस्व व न्हस्वास्तव दीर्घ, यमकासाठीं शब्दांची ओढाताण, यतिभंग, दूरान्वय, समास नसतांना संधि, समास असतां असंधि, कठोर वर्णांचा भरणा, संस्कृत शब्दांची रेलचेल, अयुक्त विभक्ति प्रयोग श्लेषरहित शब्दांची आवृत्ति ह्या गोष्टी जितक्या टाळतां येतील तितक्या टाळाव्या. एकच विषय विविध वृत्तांत वर्णिला असतां साधारणतः गैरसोईचें होतें ह्मणून तशी योजना होतां होईल तों करूं नये. पद्याच्या चालीवरच्या कवितेचें प्रमाण कमी असावें. व मथळ्याखालीं चाल लिहावी. कवितेच्या कागदाबरोबर कवीनें पत्र लिहावें, निराळें लिहूं नये. संपूर्ण नांव व पत्ता आणि इष्ट तर टोपण नांव हीं स्पष्ट लिहून कळवावीं, मात्र जुन्या प्रसिद्ध टोपण नांवाचा नवीन कर्त्यांनीं उपयोग करूं नये. स्थलाच्या मानानें कविता वरीच येते ह्मणून प्रसिद्धि व अभिप्राय ह्यास विलंब होणें अपरिहार्य आहे. उत्तर हवें असल्यास पोष्टाचीं तिकिटें पाठवावीं. वर्गणीदारांची संख्या जशी वाढेल त्याप्रमाणें मासिकाचीं पानें वाढवून अधिक कविता प्रसिद्ध करितां येईल. ह्या सूचनांचा आमचे कविमित्र यथायोग्य विचार करितील ही पूर्ण आशा आहे.

संपादक, काव्यरत्नावली.

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

# बक्षीस

श्री. गणेश हरी सुपेकर, आफ्रिका याजकडून आमचेकडे बक्षिसार्थ रु. १० आले आहेत. ते त्यांच्या इच्छेनुरुप 'लोकमान्यांचें राजकारण' याविषयावर सरस कविता रचणारास दिले जातील. मुदत ज्यून १९२३ अखेरपर्यंत ठेविली आहे. त्या अवधींत कविता सुवाच्य बालबोधींत लिहून आमचेकडे पाठवावी

संपादक काव्यरत्नावली

जळगांव पू. खा.

---

श्री. हरी महादेव समर्थ कृत

# साहित्य-चंद्रिका.

हें काव्यविषय नवीन पुस्तक आम्ही छापत आहों. काव्यविषयांत प्रगति होण्यास आणि कविता रचूं इच्छिणारांस ज्या अनेक गोष्टींचें ज्ञान असावयास पाहिजे त्यापैकीं छंद, अलंकार, रस, गुण, इत्यादिकांचें या पुस्तकांतून सोप्या भाषेंत, पद्धतशीर आणि सोदाहरण विवेचन केलेलें आहे. जुन्या कवींच्या काव्यांतील उत्कृष्ट उतारेही दिले आहेत. यमक व श्लेष यांची परिशिष्टें जोडिलीं आहेत पुस्तक संग्राह्य झालें आहे असें विद्वानांचें मत आहे. मे १९२३ अखेरपर्यंत जे नांवें नोंदतील त्यांस प्रतीस फक्त बारा आणे किंमत पडेल.

संपादक

काव्यरत्नावली, जळगांव.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळींनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती ।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बावजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] मे सन १९२३ [ अंक ५ वा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

अनुक्रमणिका.

मुशाफर (मनोहर)..........................................९७
गलितेच्या आज्ञा (ह. म. समर्थ)..............................१०३
प्रणातिपचक (ह. म. समर्थ).......................................१०७
मनाम (अनंततनय).................................................१०८
कवीचा आशीर्वाद (ह. म. समर्थ)................................११०
महाप्रस्थान (भा. रा. तांबे).......................................१११
स्वदेशी व्रत (केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर)......................११३
वंचना (दु. आ. तिवारी)...........................................११४
वंचनेनंतर याचना संभवत नाहीं (दु. आ. तिवारी)..... ११६
जन्मरहस्य (वि. गो. साठे)......................................११७
वेडा (काव्यशेखर)..................................................११८
पिकान्योक्ति } काकान्योक्ति } (केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर).........१२०

# कवींस विनंती.

हल्लीं ज्या कविता प्रसिद्ध होतात किंवा प्रसिद्धी करितां येतात त्यांत विशेष हें दृष्टीस येतें कीं ऱ्हस्वाबद्दल दीर्घ आणि दीर्घाबद्दल ऱ्हस्व अक्षरांची योजना उदार अंतःकरणानें केलेली असते. कवीच्या निरंकुशत्वाची ही हकबजावणी कित्येक वेळां कंटाळवाणी झाल्याशिवाय राहत नाहीं. तरी कविवर्गास आमची सविनय विनंति आहे कीं त्यांनीं अधिक कष्ट पडले तरी सोसून शारदेची सेवा करितांना कांहीं अधिक स्वार्थ त्याग करावा आणि अशा प्रकारचें निरंकुशत्व सोडून देण्यास सिद्ध व्हावें; तेणेंकरून त्यांची कविता अधिक व्याकरणशुद्ध होईल

# काव्यरत्नावली

## अंक ५ वा.

### मुशाफर

ही एका शिवकालीन शिपायाची प्रेमकथा आहे. ह्या कथेची लांबी बनारसपासून सातार्‍यापर्यंत आहे.]

चालीवर

तारुण्याच्या मनांत दुसरें, रसिका, घोळे काय?
प्रेमदेवतेवांचुनि मंगल, विरह कुणाला गाय?
तरुण मनाचीं प्रेमळ गाणीं तरण्या हृदयीं स्फुरती!
रसिका तरुणा, प्रेम वाढवी तारुण्याची महती!
तारुण्याच्या फुलांत भरला प्रीतीचा नव वास!
तरुण सागरावरती लोळे, बघ, प्रीतीची रास!
तारुण्याच्या गगनीं शोभे गोड प्रीतिची कोर!
प्रीतीची लांडोर नाचवी प्रेमळ तरणा मोर!
तरण्या शौर्याला ती निजवी प्रीतीची शेज!
तरण्या मेघालागीं खुलवी नमीं प्रीतिची वीज!
मनास आधीं वेड प्रीतिचें पहिल्यापासुनि फार!
त्यांत नवा हा विरह उगवला आतां दावेदार!
हृदयाच्या बागेंत वाहती प्रीतीचे मृदु स्रोत!
रानफुलांनीं दरवळलें हें माझें वेडें गीत!

मनांत आला असा उमाळा गोड नव्या प्रीतीचा!
वदनीं फुलला प्रेमसुमांचा बहार रसवंतीचा!
मुशाफराच्या वाटसरीं त्रे आवडतें हें गाणें
अहंमन्य पढिकांस कदाचित् गमेल लाजिरवाणें.
हंसेल विद्वत्ता या वेड्या वाकड्या चार बोलां!
प्रेम घालिते बहिष्कार परि चंचल निंदास्तुतिला!
रुसलें तर तें रुसो छंद वा व्याकरणाचें शास्त्र,
तारुण्यानें कां न वधावी आनंदाची रात्र?
पढिकांनाही रंजविण्याचा विडा उचलिला नाहीं!
प्रेमळ रसिकां, देते तुह्मां कविता माझी ग्वाही!
सरळ मनांतुनि उठती वेड्या प्रीतीच्या या लहरी!
थिरकत्या उचळुनि समानधर्मी रसिकांच्या दारीं!
भावाची ही भेट, कीर्तिचा मोबदला ना येथें!
नाहीं घालायाची गळही लक्ष्मीच्या चरणातें!
माझी भोळी कविता नाहीं नांवाकरितां रुसली!
भेटायाला नको नाचरी, लक्ष्मी चंचल विजली!
प्रेमपूजनीं विद्वत्तेची कशास, रसिका, हाव?
शिशुपणाला यौवनलीला-दरबारीं मज्जाव!
जमासं दावायाचीं नुसतीं शिशुपणाचीं सोंगें!
विनोद अवखट, लीला खेळे पहिल्या प्रेमासंगें!
खरा जिवाचा सूर सोडुनी बेसुर कां लावावा?
काय ह्मणोनी ताल प्रीतिचा लोकास्तव सोडावा?
रानफुलांची ओंजळ, रसिका, भावभेट ही असली,
प्रेमाखातर असे वाहिली तुमच्या प्रेमाजवळीं!
पहिलें गाणें, नवीन प्रीती गातें एकांतांत!
ऐकायाला चलाच रसिका डोंगराळ रानांत.

नव्या मनाच्या करांत दिधला, जुन्या प्रीतिचा हात!
वात प्रीतिचा उरते, जाते सरुनी सगळी रात!
सह्याद्रीचे मोठेमोठे पहाड जिकडे तिकडे
कड्यावरुनिया उड्या घेत ही कृष्णा, पळती ओढे.
माळावरुनी पळतो वारा, जंगल माजे दाट,
रानगांवच्या वनराईनीं भरला कृष्णाकाठ.
कडेकपारीं फिरतां होइल, रसिका, तुह्मांस शीण
खणल्यावांचुनी सांपडते कां सोन्याची खाण?
प्रेमाच्या या विचित्र लीला दरीं कपारीं बघतां
दचकुनि जाऊं नकाच, रसिका, हा प्रीतीचा रस्ता!
साताऱ्याहुनि हां हां ह्मणतां हें कुंडलचें रान
पहा गांठलें, सकाळची ही वेळ गुलाबी छान.
दरीं कपारीं फिटलें होतें अझुनि पातळ काळें!
वनदेवीचें काळ्या अंधाराशीं हितगुज चाले!
हळूच अंबरमहाल उघडी पूर्वेचें मग दार!
वसुधाबाला लाज लाजुनी झाली बहु बेजार!
गगनतरूवर हंसरीं तारासुमनें फुललीं फार!
प्रभातवायु निष्ठुर त्यांना उडवी दारोदार!
लाख चांदणी चौक, हिंडुनी रात्रीं तारानाथ
लाजुनि फिक्कट, आला आतां अपरेच्या दारांत!
गगनश्रीच्या पदराखालीं चांद विलासी निजला!
रागानें हा लाल जाहला, परि देवाचा डोळा!
करडा भास्कर डोकवितां या गगनाच्या दारीं!
पळुनी गेल्या घरांत सासुरवासी तरण्या पोरी!
प्रभुरायाचें गूण गात हीं उठलीं पिकलीं पानें,
रसवंतीचे राघू प्रेमळ, उठले-ही नेमानें.

उठली दुनिया, उठली प्रीती विलास शय्येवरुनी!
उठल्या पुष्पामधुनी गेले मधुकर दूर पळोनी!
उठले पर्वत, उठले सागर, होता वाहत वारा,
चिमणे पक्षी उठले, झाला भुगोल जागा सारा!
भुगोल झाला जागा सारा, शाहिरा, ह्मणसी!
कोण आळशी अझुनी निजला कृष्णाकाठाशीं?
ढाल उशाला, हाताखालीं भाला पल्लेदार,
प्यार जिवाची जवळी निजली नंगी समशेर!
वस्त्रावरती पडले होते रक्ताचे बहु डाग
तोंड वासुनी पडला होता जंगलांतला वाघ.
किरण कोवळा हळूच तेथें आला काढित वाट!
सुंदर, दमल्या वीरश्रीला उठवी कीं जणुं भाट!
उठुनी बसतां पाहिली दृष्टी कोणावरती पडली?
बालरवी हा कुठली दुनिया प्रेमें न्याहाळी!
कृष्णाकाठीं हिंडत होती कोणी, सुंदर, पोर,
गात मनाशीं गाणें अपुल्या नादीं होती चूर.
हांसत जवळी आला, परि ती गुंग आपल्या नादीं
लागे अस्मानाची सुंदर दुनियेवरती तंद्री!
"कोण कुणाची भाग्यदेवता फिरे एकली रानीं?
रंगुनि गेली आनंदानें कोणासाठीं वाणी?
कल्पतरूचें पुष्प फुले कां चुकुनी या रानांत?
रान-समुद्रामधुनी किंवा लक्ष्मी वरती येत?
ऐन विलासीं गगनश्रीची तुटली मोहनमाळ!
त्यांतुनि एकादी कां मुक्ता पळते रानोमाळ?
आकाशाच्या सरोवरीं जीं हमेश कमलें फुललीं
त्यांतुनी एकादें कां पडलें चुकुनी रानीं खालीं?

कुणां कवीला सोडुन फिरते सुंदर प्रतिभा रानीं!
भाग्यवान ही कुणा जिवाची वनवासी राणी"
"कशास गरिबीला हें असलें मोलाचें परि लेणें!
झोपडीस कां शोभा येते सोन्याच्या कळसानें?
पोर अडाणी, रीतभात ही असेल कुठली ठावी?
सुमगुच्छाची शोभा कैशी रानफुलाला यावी?
शहरगांवच्या सरदारांना येइल कां परि राग
पुसतां? कोणी पावन केला डोंगराळ हा भाग?"
"रायगडावर अमिर माझा राहे दिलदार,
उमरावाचा बंदा मी, त्या कुंडलचा सरदार?
सज्जनगडचा फकीर सात्विक, संन्यासी वीर,
करितों प्रेमें नित्य धावत्या मनवारूला स्थीर!
कृष्णाकाठीं कुंडल आलें धावुन प्रेमाकरितां!
पहिल्या अल्लड प्रेमाला कां मिळेल येथें गीता?
वनराणी ही येइल कां त्या कुंडलच्या दरबारीं?
पहिली दृष्टी खिळली आतां या प्रीतीच्या दारीं!"
"आम्ही रानच्या पोरी भिरभिर फिरतों रानोमाळ
नदीकिनारीं भटकत फिरतां जातो सगळा वेळ
शहरगांवच्या सरदारांना आवडेल कां रान?
वणवण फिरुनी आम्हासंगें उगाच होइल शीण!"
"शहरगांवच्या मनांत वाही बेपर्वाई वारा!
अनोळखी नव प्रेमा रडवी लाख फुटाणी, तारा!
खोट्या प्रेमें सदैव फुललें श्रीमंतीचें झाड!
भोळी गरिबी आनंदानें करि प्रेमाचे लाड!
ताराराणी बघतां गगनीं चांद सारखा वाढे!
जीव भाळला सांगायाला कशास आढेवेढे?

निर्जन रानावनांत फुलतां प्रेमाचें मृदु फूल !
सुस्वर्गाचा सुवास तेथें दरवळुनी जाईल !"
"साधी भोळी पोर पाहुनी वेड जिवां लावावें !
रंगाचा बेरंग कराया, नांव टाकुनी द्यावें !
नित्याचा हा खेळ खेळतां होतो तुमचा खेळ !
डोळे भरुनी येती परि हे, उडतो मनिं कल्होळ !"
"कृष्णाकाठीं कुंडल बांधी ही जन्मांची गांठ !
सोडायाचा नाहीं आतां धरलेला हा हात !
जिवा जिवांची ओळख पटतां कशास आतां भीड ?
परिचित बेपर्वाई असली सोड, साजणी, तेढ"
"वनांतल्या या देवी बघती उघड्या निज नयनांनीं
मैनेचा कर करांत धरिला कुंडलच्या राजांनीं !
कृष्णामाई, गिरि, वनराई ही साक्षी ठेवोनी
देह वाहते ही मान्यांची मैना तुमच्या चरणीं !"
"मनांतल्या या नित्य जागत्यां देवां ठेउनि साक्ष
ठेविल राया कुंडलचा हा मैनेवरतीं लक्ष
ज्या जीवाच्या वाटेवरती खिळली होती दृष्टी !
आज लाभली तीच सुखाची, सौंदर्याची सृष्टी !"
"पदरीं घेउनि पवित्र केली या दासीची काया,
प्रेमाच्या या घरांत पहिलें पाउल ठेवा, राया !"
"मान वळवितें खालीं कां हें लाजाळूचें झाड ?
अधीर प्रीती धरिते अजुनी लज्जेची कां भीड !
वयांत आली नसेल अजुनी परि ही अल्लड पोर ?
झालें आहे उघडें कां या तारुण्याचें द्वार ?"
"असलें कसलें विचारणें हें ? येउनि गेला पदर !"
"तरीच छातीवरच्या पोरी पदरीं करिती कहर !

अधीर झाला जीव, साजणी, लज्जेच्या बुरख्यांत
चल, प्रेमाचें गीत सांगतां सौख्याच्या कानांत !
बोलत बसलों, पडलें जेव्हां पिवळें कोळें ऊन्ह
बघतां बघतां पहा, साजणी, झाली भर मध्यान्ह !"
" जिवाजिवांच्या पहिल्या भेटीमध्यें विसरे भान !
पळत्या वेळाकडे असे मग कोणाचें, वद, ध्यान?"

\+ + + + +

कृष्णाकाठीं कुंडल आलें धावुनि प्रेमासाठीं !
मनोहराचा जीव धावतो सात्विक प्रेमापाठीं !

( अपूर्ण )

## गीतेच्या आज्ञा

### प्रास्ताविक

आर्या

श्रीकृष्णें भगवंतें पार्थाचा मोह संहरायातें
उपदेशिली तयातें गीता हें विदित सर्व आर्यातें
विध्यर्थी आज्ञार्थी बहुही असती प्रयोग गीतेंत
अज्ञार्थी आढळले तितके निवडोनी गुंफिले येथ
गीताज्ञा प्राप्त नरा झाल्या नारायणाननें दिव्य
दिधल्या त्या सर्वजनां साधाया पाळुनी स्वयें भव्य

### आज्ञा

आर्या

तूं वीरवृत्ति क्षत्रिय तापद शत्रूंस षंढपण न वरीं
या क्षुद्र चित्तदैन्या सांडोनी ऊठ घे धनुष्य करीं ॥ २-३

---

टीपः—आर्यांच्या शेवटीं दिलेले अंक गीतेच्या मूळ अध्यायांचे आणि त्यांतील श्लोकांचे दर्शक होत.

शीतोष्ण सुखासुख हे इंद्रिययोगें विकार विषयाचे
कळतात ते सहावें जाणोनी क्षणिक रूप वा त्याचें ॥ २-१४
आत्मा शाश्वत देही देह अशाश्वत समस्त जीवांचे
हें तत्व आठवोनी युद्ध करीं त्यज मृदुत्व चित्ताचें ॥ २-१८
होतां जय राज्य रणीं पडतां सुरलोक तूं मिळवशील
युद्धार्थ ऊठ करुनी निश्चय तूं कुंतितनय सच्छील ॥ २-३७
लाभालाभ जयाजय तैसें सुखदुःख सारखें गणुन
युद्ध करीं निजधर्में पाप न लागेल सत्य हें मान ॥ २-३८
वेद त्रिगुणात्मक तूं होय गुणातीत आत्मरूप तसा
द्वंद्वें सुखदुःखाश्रित योगक्षेमादि सर्व सांड कसा ॥ २-४५
कर्माचा मात्र तुला आहे अधिकार तत्फलीं नाहीं
आस नसो कर्मफलीं वृत्ति अकर्मींहि हो न केव्हांही ॥ २-४७
स्थिर बुद्धि करीं कर्मीं आस फलाची नको धरूंचि नरा
सिद्धि मिळो न मिळो सम मानीं समबुद्धि तोचि योग खरा ॥
कर्में सकाम सारीं जाणे बापा धनंजया हीनें
समबुद्धि धरीं, कर गा कर्में निष्कामबुद्धि योगानें ॥ २-४९
जो बुद्धियुक्त लेखा तो न करी किमपि पुण्यपापाचा
योगें कर्म करी तूं कर्मीं कौशल्य योग तो साचा ॥ २-५०
विहितें करीं स्वकर्मे कर्माविण चालणें न देहाचें
क्षणही घडेल पार्था युद्ध असे विहित वीरवृत्तीचें ॥ ३-८
परमात्म्यास्तव केली कर्में तीं बांधितीं न जीवास
तत्प्रीत्यर्थ करावीं सारीं सांडून तत्फलाशेस ॥ ३-९
निःस्वार्थबुद्धियोगें केलेलें कर्म मुक्ति दे परम
म्हणुनी संतत तैसें आचरिजे कर्म जाणुनी वर्म ॥ ३-१९
आत्मस्वरूपचित्तें अर्पी कर्में समस्त तूं मजला
सांडून गर्व आशा ऊठ करीं प्राप्त धर्मयुद्धाला ॥ ३-३०

बहु सूक्ष्म इंद्रियें मन पैल तयाहून बुद्धि त्याहून
पैल तियेहूनहि तो देहीं हा घे स्वभाव जाणून ॥ ३-४२
मग बुद्धि आत्मरूपीं सुस्थिर कर कामशत्रुजेता हो
जिंकायास कठिण जो लोकीं लोकांस गा महाबाहो ॥ ३-४३
वांछा कर्मफलाची नाहीं मज नातळेचि कर्म कदा
जाणे हें तो मुक्तचि कर्मांच्या बंधनांमधून सदा ॥ ४-१४
पूर्वील मुमुक्षूनीं केलीं कर्में स्मरोनि हें स्वमनीं
तूंही तसेंच कर गा पार्था तत्कर्मयोग आठवुनी ॥ ४-१५
श्रद्धा न, मूढ ऐसा नासे संदेहवृत्तिला धरुनी
इहपर सौख्य हरवितो दुर्मति तो सत्य भारता मानी ॥ ४-४०
ह्मणुनी ह्मणतों सत्वर चित्तांतिल संशयास छेदावें
ज्ञानासिनें तुवां या योगें सद्धर्मयुद्ध जोडावें ॥ ४-४२
हो तापस हो ज्ञानी कर्मठ हो कीं भला तयाहूनी
मानियलासे योगी, होई योगी पृथासुता ह्मणुनी ॥ ६-४६
स्मरतां मातें सांडी देहातें मनुज अंत समयीं तो
निःसंशय पार्था तो मजलागीं नीट येउनी मिळतो ॥ ८-५
अथवा दृढतम धरुनी वांछा जी जाय जीव जीवाचा
त्याच गतीतें पावे निश्चित तो जीव, भाव हा साचा ॥ ८-६
यास्तव मातेंचि सदा स्मर, कर तूं युद्ध अर्जुना या हे
मनबुद्धि अर्पुनी, मग मिळशिल मातेंचि, मळ न संदेहें ॥ ८-७
जें जें करिसी, खासी, देशी, यज्ञांत अर्पिशी अनला
जें कीं तप आचरसी अर्पण कर सर्व तें मला प्रभुला ॥ ९-२७
भज मज नमनें सुमनें पूजीं मजलाचि आत्मभावानें
मद्रूप होउनी मग जाशिल या त्याचि तूं सुयोगानें ॥ ९-३४
मी काळरूप लोकक्षयकारी सिद्ध संहरायातें
आहें, तुझ्याविणहि या पार्था मरतील वीर हे येथें ॥ ११-३२

ह्मणुनी ऊठ रिपूंतें मारीं यश घे समृद्ध राज्य करीं
पूर्वींच मारिलें म्यां हे नर तूं हो निमित्त मात्र तरी ॥ ११-३३
भीष्म द्रोण जयद्रथ कर्णादिक वीर मारिले असती
आधींच म्यां यशस्वी होशिल बा ऊठ झुंज शुद्धमती ॥ ११-३४

माझ्याठायींच असो मन आणिक बुद्धि ती तुझी सखया
मग निःसंदेहें तूं त्वरित मला पावशील कौंतेया ॥ १२-८
स्थिर चित्त करायातें माझ्या ठायीं न शक्त जरि होसी
अभ्यासयोग आदर निश्चित मग योग्यता मिळे तुजसी ॥ १२-९

न घडे तो पार्था ! कर गा ! कर्में मदर्थ तूं सारीं
सिद्धि मिळेल तयानें तुजला या कर्मसृष्टिमाझारीं ॥ १२-१०
तेंही घडे न तुजला तरि मजला आठवून वर्तावें
न धरीं कर्मफलाशा मोहावें त्वां न कर्तृपणगर्वें ॥ १२-११

शास्त्रार्था लंघुनिया आचरतां कर्मसिद्धि लाभेना
सुखही मिळे न कांहीं सद्गति ती मुळिंच प्राप्त होईना ॥
कार्याकार्यविवेकीं यास्तव शास्त्रप्रमाण मानावें
शास्त्रविहित ठरविलया कर्मी त्वां स्वस्थचित्त वर्तावें ॥ १६-२४

मायाचक्रारूढा देहा देहस्थ ईश फिरवीतो
जीवांची अवध्या ही स्थिति पार्था ! सर्व जाणता ह्मणतो ॥
शरण रिघे एकाला त्याला तूं जीवभावसंयुक्त
होतील शांति परम स्थान सख्या अर्जुना तुला प्राप्त ॥ १८-६२
खोट्या धर्म समजुती सांडोनी ये अनन्य शरण मला
देईन मुक्ति तुजला हरुनी तुझिया समस्त पापाला ॥ १८-६६

## उपसंहार

देवा कृष्णा आह्मीं सेवावा मार्ग कोणता सांग
कर्माचा अथवा कीं सन्यासाचा वदे महाभाग

शिवदायक काय विभो ! प्रश्न जयें श्रीहरीस हा केला
देव ह्मणे मान सख्या वृत्त्यवसरकार्यकर्म-हा केला

श्लोक

स्वभावें स्वधर्मे प्रसंगें करोन-
घडे प्राप्त तें कर्म कीजे झटोन
फलाशा नसो, सांडिजे कर्तृ-भावा
असा योग पार्था तुवां आचरावा

आर्या

श्रीकृष्णा भगवंता देवा करुणानिधे करीं करुणा
दावीं परम समर्था दासा या दिव्य आपुल्या चरणा

———×——— ह. म. समर्थ

## प्रणतिपंचक

पृथ्वी

प्रभो! तव पदाश्रयें सकल राहती सज्जन
तुझ्याच गुणकीर्तनीं रमतसे शिवाचें मन
असाहि असती परी वश सदाहि दासा खरा
प्रणाम करितों तुला, मज नसे दुजा आसरा १

अधर्मपरिपूर्ण जें युग चतुर्थ दोषाकर
तदीय मल नाशिसी, अभय इष्ट देशी वर
जरा मरण आलिया खचित पावसी श्रीवरा!
प्रणाम करितों तुला, मज नसे दुजा आसरा २

बहुहि असती परी तुज असा न दाता जनीं
असंख्य-खल-दुर्मदा त्वरित टाकिसी वारुनी
असा बहु उदार तूं बहु समर्थ पद्मावरा!
प्रणाम करितों तुला, मज नसे दुजा आसरा ३

चतुर्भुज गुणाकरा ! दर-गदारि-पंकोद्भव-
तुझ्या विलसतीं करीं खलमदा दमायास्तव-
चतुर्विध सदायुधें, सगुणरूप ! जीवेश्वरा !
प्रणाम करितों तुला, मज नसे दुजा आसरा ४
' सदाश्रितपदा ' अशी कवि मयूर केका करी
करीं तदनुवाद कीं प्रियजनार्थ तत्किंकरीं-
प्रसाद करिसी; प्रभो ! बहु नको, नसें हावरा
प्रणाम करितों तुला, मज नसे दुजा आसरा ५

ह. म. समर्थ

## मनास

अभंग

नको नको मना । नको आतां ओढूं,
किती तुज काढूं । मोडोनीयां ! १
किती तरी येऊं । सांग काकुळती
काय ही फजिती । गोड वाटे ? २
साऱ्याच बाजूंनी । उबगलों पुरा,
आतां कोंडमारा । सोसेना हा ! ३
आजन्म हें नाक । धरोनी मुठींत
अर्ध्या वचनांत । वागलों मी. ४
जन्मा येवोनीयां । काय वा साधिलें ?
खोदें उपसलें । पराव्यांचे ! ५
सदा सर्वकाळ । तुझें ग्यां ऐकावें
तूं न परिसावें । माझें कधीं ! ६
कोठील हा न्याय । कोठील ही नीति,
पुरे वा संगति । झाली तुझी ७

दास तूं असोनी । स्वामीसा वागसी
मज वागवीसी । दासापरी ८
तुझ्या ओंजळीनें । पाणी पितां पितां
तृष्णा ही अनंता । वाढलीसे! ९
चुकूनही ज्याच्या । पहावें न तोंडा,
त्याच्यापुढें गोंडा । घोळलासी! १०
नाहीं नाहीं तेथें । केली पायपीटी
हातींची नरोटी । चुकेची ना! ११
नको त्याचे पाय । असवीं न्हाणोनी,
डोईच्या वस्त्रांनीं । घासिलेसी १२
अग्रेपण आलें । नाक हें घासोनी
तोंड वेंगाडोनी । झालें वक्र! १३

\+ + + +

मायभूमीसाठीं । होतासि पाथिक
अल्प आराणुक । होती माझी १४
मायभूमी पायीं । वाहतां मस्तक
जन्माचें सार्थक । होतें कांहीं १५
मायभूमीसाठीं । सांडितास प्राण
तरीही निर्वाण । साधोनीयां १६
थोडें फार माझें । अंतरींचें गूज
पुरोनियां चोज । होतें लोकीं १७
धड न देवाची । धड न देशाची
सेवा हातें साची । घडूं दिली! १८
स्वार्थ परमार्थ । एकाचीही तुज
प्राप्ति न निर्व्याज । झाली बापा! १९
आतां या पुढतीं । प्रेरीन मी जैसें

रहाटावें तैसें । तुवां लोकीं २०
पंक्ति बारगीर । होवोनि बसावें
सम्राट् पद द्यावें । माझें मज. २१

अनंततनय

## × कविचा आशिर्वाद.

( शार्दुलविक्रीडित )

लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरी, चंद्रमा
इंद्राचा गज, कामधेनु, ललना रंभादि रूपोत्तमा
सूर्याचा हय, शंख, दिव्य धनु तें, पीयूष, हालाहल,
हीं देवोत समुद्रजन्य चवदा रत्नें तुह्मां मंगल! ॥ १ ॥
लक्ष्मी ही हरि हा, उमाशिवाचि हीं, ही जानकी राम हा,
ऐशीं ऐकुनियां गुणज्ञ-वचनें आनंद होतो महा
होवो याचपरी पुढें प्रतिदिनीं तेणें भरावें कुल
मांगल्येश्वर भक्तनाथ भगवान् देवो तुह्मां मंगल! ॥ २ ॥
चिंतावा सगुणस्वरूप विभु तो विश्वेश विश्वंभर
पावे निश्चित नित्य जे जन तया देती निजाभ्यंतर
'मय्यावेश्य मनो' मला प्रिय वदे श्रीकृष्ण हें प्रांजल
श्रद्धा तद्वचनीं धरून अवघे साधा सदा मंगल! ॥ ३ ॥
कंठींच्या मणिचे समान समजे कांतास चिंतामणा
संसारांतरिंची सुखासुखसखी या सुंदरीतें गणा
प्रेमें यापरि नांदतां उभयतां हा विश्वमायाचल
रत्नें ओपुनिया करील तुमचें सारें सदा मंगल! ॥ ४ ॥

× श्रीमंत रा. रा. चिंतामण नारायण देशपांडे आणि सौभाग्यकांक्षिणी सुंदराबाई फडणीस यांच्या लग्नसमयीं वधूवरांस कवींनें दिलेले आशिर्वाद.

षट्कर्मी मन लावुनी स्वविहितें कर्मे करा सादर
यत्नें ज्ञानधनादिकां मिळविण्या व्हा सर्वदा तत्पर
धर्माधर्मविचारणा करुनियां टाकून द्या ओंगळ
देवा अर्पण कर्म सर्व करुनी साधा सदा मंगल ! ॥ ५ ॥
देवाचे गुरुचे तसेंच वडिलां-मित्रा-जना-सेवका-
ठायीं सुस्थिर बुद्धियुक्त विचरा, सत्यास सोडूं नका
मिथ्या भाषण संत्यजून, असणें साधेपणीं निश्चल
तेणें आत्मप्रसन्नतेस बळ ये, साधे सदा मंगल ! ॥ ६ ॥
या लोकीं धनिकांस मान बरवा त्याहूनही दातया
वित्तोपार्जन कार्य यास्तव, नसो सोडूनिया तें नया
भोगावें मन आवरोन धन तें द्यावें जनीं दुर्बल
जेणें वृद्धि तयास प्राप्त यशाही होतें सदा मंगल ! ॥ ७ ॥
आहे जोडियलें परस्पर तुह्मां धर्मार्थकामीं बरें
कर्तव्यास जपोनियां उभयतां सत्सौख्य साधा खरें
इच्छा हीच मनीं चरित्र तुमचें होवो सदा निर्मल
ब्रह्मा-विष्णु-महेश-रूप भगवन् यांचें करीं मंगल ! ॥ ८ ॥

जळगांव ता. ११।५।२३ ———×——— ह. म. समर्थ

## महाप्रस्थान

'तांबे मंडळ' अजमीर तर्फे

### कुसुम २ रें

[ चालः-नाचत ना गगनांत... ]

येइं येइं थांबवि शिंग !- दूता !
किति निकडीनें फुंकिसि वरिवरि
कळला मला प्रसंग !- दूता ! ॥ ध्रु० ॥

जरी सखेजन हाटां निघती,
आर्जवुनी मजला बोलाविती,
परोपरी येती काकुळती,
पहा सोडिला संग !- दूता !
येइ येइ थांबवि शिंग !- १
जरी नाटकगृह हें गजबजलें,
जरि नानाविध जन हे सजले,
मजविण त्यांचें कितीहि अडलें
पहा सोडिला रंग !- दूता !
येइं येइं थांबवि शिंग !- २
जरी खवळलें तुफान सागरिं
मार्ग व्यापिला जरि घनतिमिरिं
पहां टाकिली होडी मी तरि,
नमुनि तुला साष्टांग,- दूता !
येइं, येइं, थांबवि शिंग !- ३
अता पुकारो फेरीवाला,
गवळी नेवो गाइ वनाला,
कारकून जावो हपिसाला,
झालों मी निस्संग !- दूता !
येइं येइं थांबवि शिंग !- ४
विसर्जिलीं मीं स्वप्नें सारीं,
आशा लावियल्या माघारीं,
दुनियेच्या आतां संसारीं-
माझा न पडे संग !- दूता !
येइं येइं थांबवि शिंग !-दूता ! ५

भा. रा. तांबे

## स्वदेशी व्रत

[भुजंगप्रयात]

नसे अन्न पोटा, नसे वस्त्र ल्याया,
स्वताचें नसे गेह तेंही रहाया;
पुनः पूर्विचें सौख्य तें प्राप्त व्हावें
जरी इच्छितां, देवदेशा भजावें १

अहो दुःख दुर्दैन्य दुष्काळ रोग–
किती भोगिले! तो सरेनाचि भोग!
विपत्कालिं या सर्वथा एक व्हावें
स्वयें सर्वदा देवदेशा भजावें २

उपाशी कधीं, राहतो अर्धपोटीं
विदेशांत जाती परी, साठकोटी!
जरी इच्छितां हे स्वदेशीं रहावें,
तरी बंधुनो! देवदेशा भजावें ३

कसे जाहला अंध, डोळे असून,
कुठें लोपला तो स्वदेशाभिमान!
विदेशी नको वस्त्र, देशीच घ्यावें
सदा सर्वदा देवदेशा भजावें ४

"असोनीच तूं सिंह झालासि मेंढी
धरीं धैर्य तें, सर्व धाकासि सांडीं"
धन्यानें कधीं सेवकाला न भ्यावें
सदा सर्वदा देवदेशा भजावें ५

स्वदेशाभिमानी समर्थाभिमानी
असे जो तया वक्र पाही न कोणी
समर्था मनीं सर्वदा आठवावें
स्वयें सत्वरें देवदेशा भजावें ६

करूं काय कैसें? पुरे हाय हाय,
मुदें एकमेकां करावें सहाय्य
जरी इच्छितां भारतानें जगावें
तरी बंधुनों! देवदेशा भजावें ७
स्वदेशा सदा भक्तिभावें भजावें,
स्वदेशीव्रता सर्वथा आचरावें;
तनू झीजवावी स्वदेशार्थ आतां,
तुह्मां प्रार्थिलों, ठेवितों पायिं माथा ८

———×——— केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर

## × वंचना

[ दिंडी ]

काल प्रीतीचा बाग लाविलास
मधुप होऊनी मी करित कीं विलास
आज लावियला अग्नि तया हातें
दुःख होतें परि बोलतां न ये तें १
काल दरवळला केतकी सुवास
सुखी केलें मोहून या जिवास
आज सुटती हे तीव्र विषोच्छ्वास
मधुस्थानीं हा विषम गुणनिवास २
काल हसली संतोष चंद्रिका ती
हर्ष झाला उद्भूतभावनांतीं
आज पसरे नैराश्य रजनि हाय!
नेत्र झांकावे अन्य नच उपाय! ३

× या कवितेनंतर कविमित्र श्री. गो. गो. अधिकारी ( महाड ) यांनीं "वंचनेनंतर याचना" ही कविता लिहिली; "त्यास वंचनेनंतर याचना संभवत नाहीं" असें मला उत्तर लिहावें लागलें.

काल शकाला तुच्छ गणित होतों
पौर्णिमेच्या चंद्रास हसत होतों
आज सामान्यहि हसति मला लोक
प्रीतिभंग हा तीव्र तापशोक ४
काल गगनीं अवनींत सौख्य नांदे
परत गेलीं सव्रीड अमर-वृंदें
आज हस्तावरि हस्त ठेउनीया
स्वस्थ बसली निस्तेज तनु मदीया ५
काल 'प्रीती'-पुनरुक्तदोष झाला
तरी दोघांना तो न कळुन आला
आज उपमा त्या पिष्टपेषणाची
तुवां द्यावी ना निरस भावनेची? ६
काल रोमांचित देह होत होता
स्थिति स्पृहणीया खचित अननुभूता
नव्हति मातें परि कल्पना उद्यांची
तुझ्या हृदयाची यास साक्ष साची ७
घाव शस्त्राविण हृदयिं मारिलास!
अग्नि दहनाविण तनुस लाविलास!
जलावांचुन त्वां खचित बुडविलेंही!
देहधारी हा जाहला विदेही!! ८
सुरी नव्हती कां तीक्ष्ण तव करांत?
विष न लाधे कां शोधुनी जगांत?
सहज केला असतास अंत माझा
झोंप घ्याया सेवितों अंक तूझा! ९
नको आठवुं मज, मीच आठवीन
नको बोलूं, मी नांव तव जपेन

प्रीतिपाठावरि धूळ तूं फिरीव
लेख हृदयीं मम उमटला सजीव! १०

———×——— दु. आ. तिवारी

## × वंचनेनंतर याचना संभवत नाहीं

(दिंडी)

जेथ पुष्करिणी सलिल-रम्य हांसे
तेथ मरुभूमी रुक्ष आज भासे
अशा वंचनिं करुनीहि याचनेला
काय शांती लाधेल व्याकुलाला १

प्रीतिलतिका वाळून नष्ट झाली
तिला सलिलानें जरिहि सिंचियेली
काय पुष्पांचा तिजसि ये बहार?
विफल यत्नांचें दुःख होय फार! २

मधुर हास्याच्या मधुर रहस्याच्या
रुचिर मोदाच्या रुचिर विनोदाच्या
दग्ध झालेल्या भावना मनाच्या
कधीं याचनिं कां सफल व्हावयाच्या? ३

रुष्टतेला सत्प्रीति शांतवील
हृदय-बंधन दृढ अधिक तो करील
वंचनेची परि याचना कराया
मुखीं काढीना शब्द एक वाया ४

वसे वंचनिं जो सूक्ष्म अहंकार
स्निग्ध-याचनिं तो अधिक वाटणार

× वंचना या कवितेच्या खालची टीप पहा.

अहंकारांतुनि जन्म जिचा झाला
अशी प्रीती कां शांतवी कुणाला? ५
रसिक-हृदयाची विषमता बघूं दे!
अमृत-वल्लीला विषरस खवूं दे!
म्हणति दुःखांतहि सौख्य कांहिं आहे
तदनुभव हा हृदयास येत आहे ६

———×——— दु. आ. तिवारी

## जन्मरहस्य

*भगिनीच्या सुखप्रसूतीनें निश्चित झालेला बंधु आपल्या नव्या भाच्यास—स्वराज्याच्या या उषःकालीं अवतरणाऱ्या हिंदपुत्रास—आज "जन्मरहस्य" म्हणून यावेगळें काय सांगेल?*

*शिखरिणी*

उषेचा हा बाळा, किति शुभ तुझा जन्मसमय!
निवे अस्मच्चिंता सहज मन झालें सुखमय
प्रभूला आभारें नत कर जुळूं त्याच्च सदया
म्हणूं देवा, ठेवा, सुखित जननी बाळ उभया १
"तुझ्या मातेची तूं सहज सुटका केलिस" असें
वदे कोणी त्यानें कुतुक मज भारी गमतसें!
तुझ्या हातें बाळा, त्वरित जननी मुक्त घडली
तुझी ही भूमाता करशिल कधीं सांग तसली? २
तुझी माता एका तुजचि नवमासां वहतसे
सदाही भू वाही पण तुज तुझे पूर्वज तसें
पुढें ही त्वद्वंशीं उपजतिल जे त्याहि खचित
इच्या उद्धाराचा तर धर मनीं हेतु उचित! ३
उषःकालीं येतां अरुण उदया संहरि तम
निवारी निद्रेला सुचवि जगता योग्य उद्यम

स्वतेजें विश्वाला दिपवि यशलोकीं पसरवि
तुला सन्मार्गा त्वत्सहज-रवि कीं काय शिकवि ४

मंदाक्रांता

भूमाताही परवश असे फार भारावलेली
सत्पुत्रानीं त्वरित तिजला पाहिजे मुक्त केली
या स्फूर्तीचा प्रियकर उषःकाल हा जन्मकाल
देवें बाला, बघ तुज दिला; हेतुगर्भी विशाल, ५

———×——— वि. गो. साठे

## वेडा !

[ आनंदी आनंद गडे ! ]

वेडा मी दिसतो लोकां । गुण तरि माझे अवलोका
गृह सोडुनिया रानांत । भटकत असतों मौजेंत !
गुंगत गुंगत मी फिरतों । तल्लिन होउनिया जातों
नभोंगणांतिल दिव्यफुलें । माझें करिती चित्त खुळें !
हात उभारुनि । उड्या मारुनि
बहुपरि श्रांतुनि
पुष्पास्तव मी यत्न करीं । परि तीं येतीं नाच करीं ! १
बहु उंचावर जीं असतीं । मत्करिं कधिं कां येतिल तीं !
परि न निराशा मज ठावी । मग तीं वद कोठुनि यावीं ?
रमतों कधितरि कासारीं । त्यांतहि दिव्य फुलें सारीं !
झटतों हातीं घेण्याला । नीर येत परि हाताला !!
मारुत आला ! प्रमुदित झाला
गाउं लागला
पुष्पें हलतीं कासारीं । सजीव झालीं काय तरी ? २

नभीं चंद्र हा बघ आला । मत्संगें खेळायाला !
लावुनि चंद्रावरि दृष्टी । स्वैर धांवतों भू-पृष्ठीं
धांव धांवुनि मी दमतों । त्याला चुकवाया लपतों
मी इकडे तिकडेहि वळें । तो माझ्यामागून पळे !
ऐसें धांवुनि । पाउ शिणोनी
क्रीडत रमुनी
निसर्ग हा मम संसार । जग हें केवळ निःसार !
इंद्रधनुष्यहि हें भव्य । आकाशीं पडलें नव्य !
हातें उचलुनि घेण्याला । धांवें झरझर मी त्याला
दऱ्या दरद् ओलांडोनी । धांवें वेगें मी रानीं
उगाच पळतों कितीतरी । परी न ये तें कधीं करीं !
सरिता आली । तिथेंच सगळी
वृत्ती रमली
काय करूं मी सुख हो ! तें । सदैव वसतों मी तेथें
सरिता देवी शांतीनें । वाहत जाते मोदानें
तिचाहि होतों मी भाट । काय कथावा तो थाट ?
गाणीं गातों तिच्यावरी । तीच गमतसे मला बरी !
कोण असें मी मज न कळे । वृत्ती माझी मुळिं न चळे
संसाराचें । दुःखोदधिचें
मजला साचें
वारेंही ठाऊक नसे । सौख्यचि केवळ मनीं वसे
दुःख दुःख ह्मणुनी रडती । विपाक ते नच मजवरती
दुःखाग्नीमधि जीव किती । संसारीं करपुनि जाती
वेड नव्हे हें बरें कसें ? । जें मम चित्तीं पूर्ण वसे
मंत्र वृत्तिला वेड ह्मणा । दुःखी मनुजा सुखी गणा

परी मला हो । वेडचि लाहो
निशिदिनिं राहो
हीच असे हो मम आशा । गोष्टी घडतिल कां ऐशा?

\+ + + +

जग हीं वेड्याची पंक्ती । मलाच वेडा ठरवीती
वेडा मी वेडा होतों । जगासही वेडें करितों ! ६

———×——— काव्यशेखर

## पिकान्योक्ति

श्लोक

गेला वसंत निघुनी, ऋतुग्रीष्म येई
गाणें पिका ! तव विषासम वाटतेंही
पाहूनि गाइ रसिका ! ऋतुमान नित्य,
राहील मानच तयें, वच जाण सत्य. १

आला वसंत, रसिकाग्रणि सर्व आले
आतां पिका ! उघड तूं मुख याचि वेळे,
मौनव्रतासि धरितां पुढतीं तुला हे
काकासमान खल कीं गणतील पाहें २

## काकान्योक्ति

श्लोक

काका ! पिकासम जरी दिसशीं जगांत
मौनव्रतासि धरिसी, बससीहि शांतः
खाद्यावरून परि जात कळे तुझी रे,
खाई न कोकिल कधीं परपिंड तो रे ! ३

———×——— केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर

इतकेंच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या शुद्धलेखनास मदत केल्यासारखें होईल. निरुपायानें झालेली ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण क्षम्य आहे, परंतु बहुतेक प्रसंगीं ती टाळण्यासारखी असते. उदाहरणार्थ पुढील ओळी पहाः—

१ देवें सुंदर पृथिवी केली तरू जीवही सारे
२ विशाळ अंबर वरतें पसरिलें जेथें शशि रवि तारे
३ एकलाचि जो पोशि जगा तो आहे देव दयाळू
४ दुःख निवारुनि सुख जो देतो दीनांचा कनवाळू
५ भावें नमुं देवा । करुं या देवाची सेवा

ह्या ओळी बदलून खालीं दिल्याप्रमाणें लिहिल्या तर काय बिघडेल?

१ देवें सुंदर पृथ्वी केली तरू जीवही सारे
२ विशाळ वरतीं गगन पसरिलें जेथें रवि शशि तारे
३ एकलाचि तो जगा पोशिता आहे देव दयाळू
४ दुःख निवारी सुख तो देतो दीनांचा कनवाळू
५ भावें नमन तया । करुनी देवा सेवूं या

जोडाक्षर टाळण्याकरितां 'पृथ्वी' या शब्दाबद्दल 'पृथिवी' हा शब्द घातला असल तर 'जग हें' हे पद कां घ.लूं नये?

आणखी पुढील उदाहरणें पहाः—

६ घेशी लावुनि सुंदरी अति कडू सोडी तुझ्या उद्यमा
७ कधीं भेदाभेद त्यजुनि करि रूपा प्रगट हो
८ ग्रीष्मीं तपते, सहते हिम, फिरतें, फिरवि भवति वपु अपुलें
९ किंवा देउं नको अह्मांस दुबळी हो मानवाची कुडी
१० निघून कधि जाइल त्वरित दुष्ट कालावधी

अशीं कित्येक उदाहरणें देतां येतील असो. आमचे कविमित्र आमच्या विनंतीचा अवश्य विचार करोत.

संपादक, काव्यरत्नावली.

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

# बक्षीस

श्री. गणेश हरी रूपेकर, आफ्रिका याजकडून आमचेकडे बक्षिसार्थ रु. १० आले आहेत. ते त्यांच्या इच्छेनुरूप 'लोकमान्यांचे राजकारण' याविषयावर सरस कविता रचणारास दिले जातील. मुदत ज्यून १९२३ अखेरपर्यंत ठेविली आहे. त्या अवधींत कविता सुवाच्य बालबोधींत लिहून आमचेकडे पाठवावी

संपादक काव्यरत्नावली
जळगांव पू. खा.

---

# साहित्य-चंद्रिका.

हे काव्यविषय नवीन पुस्तक अम्हीं छापत आहों. काव्यविषयांत प्रगति होण्यास आणि कविता रचूं इच्छिणारांस ज्या अनेक गोष्टींचें ज्ञान असावयास पाहिजे त्यापैकीं छंद, अलंकार, रस, गुण, इत्यादिकांचें या पुस्तकांतून सोप्या भाषेत, पद्धतशीर आणि सोदाहरण विवेचन केलेलें आहे. जुन्या कवींच्या काव्यांतील उत्कृष्ट उतारेही दिले आहेत. यमकें व श्लेष यांची परिशिष्टें जोडिलीं आहेत. पुस्तक संग्राह्य झालें आहे असें विद्वानांचें मत आहे. जून १९२३ अखेरपर्यंत जे नांवें नोंदतील त्यांस प्रतीस फक्त बारा आणे किंमत पडेल.

संपादक

काव्यरत्नावली जळगांव.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळानें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे।
सत्काव्य तेणें नव वाटताहे॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बावजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] जून सन १९२३ [ अंक ६ वा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## अनुक्रमणिका.


सक्रांतीची भेट ( केशव नारायण वैद्य )...... ........१२१
सख्यभक्ति ( अनुवादक )..............................१२७
महाप्रस्थान ( भा. रा. तांबे )............................१३२
मुक्तकैदी ( ह. म. समर्थ )..............................१३३
धांवा ( विजय )..........................................१३५
आशिर्वाद ( भवानीशंकर )..............................१३६
मानखंडन ( गोप )...... ............................१३७
श्रीमत्तिलकाष्टक ( टिळकाभिमानी )............... .... १३७
रमणी-प्रेम ( नाथविठ्ठल )......................... ......१३८
प्रवाशाचें गाणें ( गुणवंत हनुमंतराव देशपांडे ).........१३९
सृष्टि-प्रेम ( दिनकर )..................................१४१
मधुमीलन ( शे. के मोटे )............. ............१४१
अभंगरत्नमाला ( दु. आ. तिवारी )........... .... १४३



मुलांमुलीकरितां अत्यंत उपयुक्त असें सचित्र मासिक

# हिंद-कुमारी

[ वा. व. ट. हं. सह २८८ व्हो. पी. ने २८७ ]

संपादिका:-डॉ. सौ, इंदुमतीबाई नाईक एल्. सी. पी. एस्.
प्रकाशक:-का. रा. पालवणकर 'हिंदकुमारी कार्यालय'
गिरगांव-मुंबई

व. म. आ. नें पाठवून त्वरित नांवें नोंदवून राष्ट्राचे आधारस्तंभ जीं मुलें त्यांची सर्वांगीं सुधारणा करून घ्या.

जून सन १९२३ वर्ष ३१ वें

# काव्यरत्नावली

## अंक ६ वा.

## × संक्रांतीची भेट.

महायुद्ध चालू असतां, आणि तें बंद झाल्यावर ही, या देशांतील जनतेवर जे अनेक सुखदुःखाचे प्रसंग गुजरले; त्यांतील एका हृदयद्रावक प्रसंगाचें वर्णन पुढील कवितेंत दिलें आहे

प्रारंभींच दिलेल्या वर्णनावरून या कवितेच्या स्थलकालाचा बोध होण्याजोगा आहे. हें स्थल आणि कवितेंत दिलेल्या व्यक्ति या जरी काल्पित आहेत, तरी त्यांतील प्रसंग हे अगदीं बरोबर घडलेले आहेत. आपल्या सरकारास प्राप्त झालेल्या जयाबद्दल जिकडे तिकडे आनंदोत्सव सुरू होते, आणि चोहोंकडे स्वस्थता व सुबत्ता झाल्यामुळें पुढें आलेला संक्रांतीचा सणही सर्वांस ( विशेषकरून सौभाग्यवती स्त्रियांस ) आनंद देत होता, अशा वेळीं ही गोष्ट घडल्याचें कल्पिलें आहे.

गोष्टीचें पर्यवसान आनंदांत व आनंदाच्या संक्रांतीच्या दिवसांत केलें आहे. या कथेंतील प्रमुख पात्रांची ( परस्परांची ) भेट संक्रांतीच्या दिवशींच झाल्यामुळें या कवितेलाही ' **संक्रांतीची भेट** ' हें नांव दिलें आहे.

---

× गेल्या एप्रीलच्या अंकांत अगदीं शेवटच्या पृष्ठावर या काव्याच्या ४ कविता कंपाझीटरच्या चुकीमुळें छापल्या गेल्या त्या रद्द समजाव्यात.

( चालीवर )

सुंदर विमलांबरीं विलसतीं-गिरिशिखरें कोठें
भव्य मनोहर दुर्ग त्यांवरी-मधुनि मोठमोठे १
तयाभोंवती थोर पसरलें-वन दिसतें जें हें
सह्यसुताऽपांझरी[1] सुंदरी-तयामधुनि वाहे २

नगावरुनिया निर्झर दडदड-धांवत ते येती,
प्रेमल वत्सें जणु मातेला-तसे तिला मिळती ३
निर्झर बालक जे नगजनका-नच सोडुनि गेले
त्यांचें सुंदर थोर सरोवर-एक तिथें झालें ४

सान परी रमणीय पुरी या-नदीतटीं होती
पूर्वीं, 'सुरपुर' नामें जीची-जगतीं प्रख्याती ५
स्थित्यंतर, करि परि कालांतर[2],-रूपांतर वयही
तेजोबलश्री विभवाचें या-शाश्वत बा! नाहीं ६

त्या 'सुरपुरचें' तें पूर्वींचें-गुणवैभव नेलें
निर्दय कालें लया पुराचें-खेटक कीं झालें ७
यौवन, धन, बल, चंचल जरि; तरि-तदभिमान कांहीं-
न सुटे; 'दोरी जळतांहि तिचा-पीळ जळत नाहीं' ८

शूर, धीर, नर, वीरश्रीवर-अद्यापिहि तेथें
होते, परिसुनि रणवार्ता ही-स्फुरण चढे त्यांतें ९
रायें गौरविले ते सजले सुवीर सरसरले!
रणीं कुणी ते युद्धधुरंधर-नर चालुन गेले १०

---

१ सह्याद्रींतून निघणारी पाण्याची झरी [नदी] अथवा सह्याचलकन्या 'पांझरा' नदी. २ परंतु काल हा नेहमीं स्थित्यंतर करीत असतो.

धुंदी मस्ती पुरी जिरविली,-दुर्जय[1] ही रिपुची
भली मोडली खोड चढविली-कमान विजयाची ११
सरले गमले दुर्दिन, ही तें-दैन्य आर्यभूचें,
येतिल पुढतीं स्वातंत्र्याचे-दिन आनंदाचे १२

सस्य तरुलता, धन्यसुमफलीं-स्वर्णभूमि भरली,
ग्राम, पट्टनें, वनें, उपवनें,- मोदें गजबजलीं. १३
किती नटति, या लता कुसुमिता-सुरुचिर पुष्पभरें,
वृक्ष डवरले फुलले लवले-रसाल फलभारें, १४

मधुकर त्यांवर बसून मंजुळ-गुंजारव करिती
शुक, पिक, मैना, श्रवण मनोहर-मधुर गीत गाती १५

× × × × ×

गगनीं येतो पूर्ण चंद्रमा-जेव्हां उदयाला,
शांतिसुखाचा आनंदाचा-लाभ घडे सकलां १६

उचंबळोनी प्रेमें जलधी-गर्जे आनंदें,
चकोर शशिकरसुधापानें[2] त्या- दंग होति मोदें. १७
तरुवेलीसम, युवयुवती ही-उत्कंठित होती,
प्रणयानंदें निजप्रियांला परिरंभा देती, १८

उत्सुक सुस्मित वसुंधरा हो सुधाकरा बघुनी,
हालेना परि शील आपुले 'सुचला' सोडोनी; १९
कुलवधुला, स्थिर गुरुजनलज्जामर्यादा करिते,
स्वधर्मसीलोल्लंघनभय[3] दृढ-बंधन त्या होतें. २०

---

१ जिंकण्यास कठीण अशा शत्रूचें २ चंद्रकिरण सुधाप्राशनाच्या मोदानें ३ आपला धर्म आणि शील यांचें उल्लंघन करणें हें पाप आहे असें भय वाटणें हेंच दृढ-बंधन (कुलवधूला) आहे.

अंग्लप्रभुचा विजयेंदूदय[1], जना तसा होई-
आल्हादक सुखदायक, सकलां शांति तुष्टि देई २१
चालू झाले जिकडे तिकडे-विजयोत्सव तेथें,
पुरजन रंगी दंग गुंग त्या आनंदीं होते २२
मिष्टान्नाचें भोजन, सज्जन सधन कुणी देती-
गरीब दुबळ्या, अनाथ उघड्या वस्त्रें लेववितो २३
कुणी नृपाचे, परमेशाचे सद्‌गुण यश गाती,
जयजयकारें कुणी गर्जती हिंदवीर महती २४
मकरसंक्रमण दिवसहि होता पुढें जवळ आला
दे उल्हासा पुरनारींच्या अभिरुचि चित्ताला २५
राका सुखि त्या अशाहि, नलिनी परि दुःखित दिसती
प्रियजनविरही जना सुखें ही दुणें दुःख देती २६
तशी एकटी बसुनी सदनीं, ही कोणी तरुणी-
बघे काय हो! किती वेळ तरि काय पुढें धरुनी २७
झालें मुख कां? म्लान, खिन्न मन, उदास जड दृष्टी
हिची, कशानें होय बापुडी ही दुःखी कष्टी २८
प्रेमल, कोमल, निर्मल, नाजुक, सुमन[2] सुमन[3] कोणी
हिचें दुखाविलें; घालुनि त्यावर अध्रगाचें पाणी २९
आठवूनि मनिं कोणा चिंतुनि, खेद हिला गमला
बघुनि काय ही टाकुनि दुःखें उष्ण श्वासाला- ३०
ह्मणे अनंता! कमलाकांता! नको बघूं आतां!
या अबलेचा अंत दयाळा! धांव! जगन्नाथा! ३१
एकएक मी दिवस लोटितें वर्षासम, राती
युगाबारखी, भार टाकुनी देवा! तुजवरती ३२

१ विजय ह्याच चंद्र त्याचा उदय २ चांगलें (प्रसन्न) मन ३ हेंच पुष्प

झोंप कशाची! दुःख काळजी दिनरजनी भाजी!
पाण्याविण मासळी तळमळे, तशि ही देवाजी! ३३
तसेंचि शयनीं अंग टाकितां दुःस्वप्नें पडतीं,
घोर भयंकर दुःखाग्नीचे लोळ त्यांत उठती ३४

कर्कश रण वाद्यांचे येती ध्वनि भेसुर कानीं,
क्रव्यादांचे शब्द अमंगळ भीतें ऐकोनी ३५
आवाजहि तोफांचे केव्हां, केव्हां विव्हलणे
+ रणपतितांचे शब्द दीन ते अति केविलवाणे ३६
तेणें कांदे गगन, धुळीनें भरति दिशा दाही,
गर्दांधारीं डोळे असुनिहि दिसे न मज कांहीं ३७
भ्यालें घाबरलें मी, मारी हांका या! नाथा!
धांवा! पडली घोर संकटीं तुमची ही कांता ३८

'जा! मर! तिकडे' वीर मराठा जो समरा आला;
विजयश्रीनें वरल्याविण त्या नच मागें फिरला ३९
निर्वाणीचे, शब्द पतीचे हे कानीं पडले
नेत्र उघडले तेणें माझें काळिज धडधडलें! ४०
निराश दुःखी होउनि पडलें, तोंच दूर दिसले,
रिपुवर अपुले शूर बहादर पति धांवुनि गेले ४१
रणभूमि न हें घर मरणाचें स्वप्नहि हें देवा?
या अबलेवर असा घोर कां प्रसंग तो यावा? ४२

भ्याली, झाली स्वप्न बघुनि जशि दीन वनीं हरिणी-
व्याघ्रदर्शनें, येति अश्रुनीं नयन तिचे भरुनी; ४३
ह्मणे, दयाळा! वा घननीळा किती अंत आतां?

---

+ युद्धांत पडलेल्या घायाळांचे

बघतां ताता ? अंबे ? धावा ? शिवा ? उमानाथा ? ४४
तों सासूच्या येति तोंडचे शद्ब तिच्या कानीं–
की 'गे ? नलिनी ? तुझ्याकडे या आल्या तव गडिणी' ४५

उठली चमकुनि पुसुनी डोळे, ती खालीं आली;
प्रेमें हांसत करीं धरुनिया त्या[1] 'या! या!' वदली ४६
गोड बोलशी, आदर आग्रह करिशी जरि नलिनी!
तव मुद्रा परि सांगे, दुःखित तूं आहेस मनीं? ४७

किती झुरावें? किती करावें दुःख शोक चित्तीं–
दुःखकल्पनाचिंतन[2], चिंता दुःखा वाढविती ४८
विजयाऽनंदीं स्वाऽनंदीं या नरनारी रमती,
स्वदेशनृपजयसुखीं, स्वदुःखें बुधजन नाठविती! ४९

घडिभर सोडुनि खेद काळजी, आपणही सखये!
गाऊं प्रभुगुण, सुखदुःखाच्या गोष्टी करूं, बस ये ५०
ऐकुनि नलिनी ह्मणे, 'सुखाचे दिन सारे सरले–
" अभागिनीचे या, भगिनींनो! दुःखाचे उरले ५१

" ग्रीष्माच्या खरतापें भाजुनि आर्यभूमि गेली,
" दयाघनें जलदानें परि तिस शांत तुष्ट केली ५२
" झाली जर्जर संतत जलधरजलधाराबाणीं[3]
" गेले दिन ते, भरली सजली सुमफलधानांनीं[4] ५३

वर्षाऋतुचें तुफान, दुर्दिन, वादळही गेलें;
" देवा! कैसें नष्टचर्य परि मम नाहीं सरलें! ५४

१ त्या मैत्रिणींना २ दुःखाचें चिंतन आणि त्यांबद्दलच्या कल्पना यांनींच काळजी आणि दुःख अधिक वाढतें ३ मेघोदकाच्या धारा हेच बाण त्यांनीं ४ फुलें, फळें, आणि धान्यें यांनीं

" होती चित्तीं आशा मोठी माझ्या शरदाची,
" निर्फळ झाली, अशी करंटी ही मी दैवाची " ५५
झाली कष्टी नलिनी, पाहुनि तिला सख्यागडिणी
समजावीती सासूही तिस मधुर बोधवचनीं ५६
संक्रांतीचा सुवासिनींचा सण आनंदाचा
न करिं अनादर विरस तयाचा गे ! या गडिणींचा ! ५७
करून हलवा, दे आनंदें वाण सुवासिनिला,
तुळशीला, श्रीजगदंबेला वंदुनि देवाला- ५८
माग मागणें हेंच मुली ! कीं-' कांत घरा यावा,
' आनंदें सुखरूप प्रियकर लवकर भेटावा ' ५९
दीनदयाघन, दे दीनाच्या मान विनंतीला,
वारुनि संकट सुखी करिल तो देवराय सकलां ६०

( अपूर्ण )

## सख्य भक्ति

(अंक ४ थ्या वरून)

श्लोक

सापेक्ष सर्व तव थोर-पणा प्रभो ! कीं
तेजा महत्व तिमिराविण काय लोकीं
आह्मी असूं ' पतित ' ; ' पावन ' तूं तरीच
वाहूं नकोस अभिमान मनीं वृथाच २६
गंगेस संगम घडे बहु ओहळांचा[1]
आव्हेर ती परि कदापि करी न त्यांचा

---

१ नाल्यांचा ओढ्यांचा

तेणें विशुद्धपण लेश उणें न झालें
द्यायास भेट तरि संकट काय आलें २७
कार्पास-संचय[1] कितीहि असो तयाचें
अग्नीपुढें कवण होय महत्त्व साचें
तैसें असे अघ मदीय तुझ्या कृपेस
होता प्रकाश तम राहिल काय शेष? २८
ज्याला नको नखहि, खड्ग तया कशाला
पाही पुरें मजकडे उघडोन डोळा.
सायास मी अधिक पाडुं न देत तूंतें
नासेल पाप, तव केवल दृष्टि-पातें २९
ताकास[2] जो कृपण, घालिल जेवुं काय?
जाणूं शके शिशुहि हें न विचारणीय
द्यायास दर्शनहि केवल होत नाहीं
त्या मागुनी अधिक लभ्य नसेच कांहीं ३०
येई दिसून सकलासचि कीर्ति-लोभ
नाहीं परी सुलभ अल्पहि कीर्ति-लाभ
'देवत्व' मात्र रुचतें अखिला जगाचें
आघात होत जड कां सहण्यास त्याचे ३१
घेशी स्वतास ह्मणुनी 'त्रिजगैक साक्षी'
ऐसें असुन परि मीच कसा न + लक्ष्यीं
केली तुवा मजवरी न दयार्द्र दृष्टी
सर्वत्रही करिन विश्रुत[3] गुह्य गोष्टी ३२

---

१ कापसाचा ढीग २ ज्याला ताकाचें पाणी देववत नाहीं तो जेवुं काय घालणार हें उघडच आहे. ३ जगजाहीर + तुझ्या पाहण्यांत. तूं सर्वसाक्षी नाहींस हा भाव.

न्यायी कसा तुज ह्मणूं, बहु पक्षपाती–
राज्यांत अल्प सुखिया; न दिसेच नीति
नांदे सुखें कुमति, साधुजना विपत्ती
ही कां भली खचित होय सुराज्यरीति ३३
तत्काल शासन घडे नच याच लोकीं
अन्याय्य हाच हित-मार्ग तयें गमे कीं
बेबंदशाहि जगिं होइ पहा अशानें
हें बोलतों अनुभवेंच न आकसानें[1] ३४
माझें कठोर वच हें न रुचेल तूंतें
उद्गारतों परि खरें मज वाटतें तें
'सर्वज्ञ' तूं, तुजसि चोरुनि काय ठेवूं
कां व्यर्थ मी अनृत-भाषण-दोष घेऊं ३५
होतां असें श्रुत खलां जरि एकदां कां
कीं 'तू अनाथजन त्या नच पाठिराखा'
ते मत्त होतिल, घडेल जगीं अनर्थ
या कारणें तरि कृपा करिं, ना *मदर्थ ३६
निःशस्त्र कां त्यजुन चक्र-गदादिकांस
तूं कासया कर कटीवर ठेविलेस
वृत्तीस[2] हें परि तुझ्या न मुळींच साजे
मत्तुल्यदीनजनरक्षण[3] कोणि कीजे ३७
देवा अहा धवलकीर्ति ह्मणून लोकीं
वागा न अल्प अयथोचित केधवांही
नांवावरी मलिन कृत्य न त्या खपेल
क्षीराब्धिला[4], लवणबिंदुहि नासवील ३८

---

१ द्वेषभावानें २ धंद्यास 'परित्राणाय साधूनाम् विनाशायच दुष्कृताम्' यास अनुलक्षून. ३ माझ्यासारख्या दीनजनांचें रक्षण ४ दुधाचा समुद्र.

* माझ्याचकरितां नको हा भाव.

हे 'कोटिभानुसदृशप्रभ[1]' 'पांडुरंग'
कैसें परी नच कळे तव अंतरंग
सूर्य-प्रकाश वरि शुभ्र दिसे परंतु
त्याच्यांत सप्तविध रंग तसाच कां तूं? ३९

कोणी असून करुणास्पद दुःस्थितींत
त्याच्याविशीं द्रव न यो तुमच्या मनांत
तत्रापि निष्ठुर तुह्मी न कदा ठराल
थोरास कोण चुकलात असें ह्मणेल ४०

कंटाळुनी कटकटीप्रत याचकांच्या
तीराकडे वससि दूर पयोर्णवाच्या
शय्या बळें करुनि औरग[2] भीतिदायी
झालास काय न कळे प्रभु शेष-शायी ४१

माझा न ये कळवळा, तुज दोष याचा-
द्यावा कसा? असशि तूं 'सुखरूप' साचा
आपद्व्यथा[3] कशि कळेल सुख-स्थितींना[4]
या कारणें अदय भाससि तें खरें ना? ४२

गाणार गायन-पटू असला कितीही
गानें प्रसन्न बधिरा न करील कांहीं
शब्दां-अतीत असशी विसरून तूं हें
वाणी वृथा शिणवुनी तुज बाहुं पाहे ४३

देवा! अहांत 'अज' 'शाश्वत' आणि 'नित्य'
आह्मी जरा-मरण-किंकर जीव मर्त्य
'स्थाणू' तुह्मी भ्रमण संसृतिनें अह्माला
सांगून दुःख अमुचें न कळे तुह्माला ४४

१ कोटि सूर्याप्रमाणें तेज ज्याचें असा. २ स[illegible]ाची ३ दारिद्र्याची पीडा ४ श्रीमंत लोकांना.

देवा ! जरी ह्मणत तूं असशील चित्तीं
' वादांत हा विफल वेंचितसे स्वशक्ति '
श्रद्धा परी ' न चुकतेंच ' पहा कशी ती
होईल हींहि तव एक विरोधि-भक्ति ४५
भक्ती विरोधि तरि सद्गति-दाच झाली
याला प्रमाण दिसतें बहु पूर्व-कालीं
कंसादि दुष्ट जन उद्धरिला कशानें
केली अशी कवण सत्कृति अन्य तेणें ४६
मर्यादशीलपण सांडुन लोक-रीति
बोलावयास सजलों न अनर्गलोक्ति[1]
संपन्न लक्षण तुझें सकला गुणांहीं
साजेच तें खचित, जें तुज बोलुं कांहीं ४७
केव्हां मला स्तविशि, निंदिसि अन्यवेळ
नाहींच कीं तव वचांमाधें एकमेळ
देवा ह्मणा कुमति, चंचल या जनातें
कीं सत्सरूप तुमचें न कळे मनातें ४८
थोराचिया प्रथम भेटिस जावयाचें
गेल्यास तत्परिचितासह योग्य साचें
हीं रूढि लौकिक विलंघुनि भेटण्याला
एकाकि ये ह्मणुनि कां उपमर्द झाला ! ४९
ज्याची तुझी खचित ओळख पूर्ण झाली
ऐसे परी विरल पूरुष पुण्य-शाली
संख्या जगांत भरली बहु दांभिकांची
कैसी करूं निवड सज्जन दुर्जनांची ५०

( अपूर्ण )

---

1 मनास येईल तसें भाषण

## महाप्रस्थान

'तांबे मंडळ' अजमीर तर्फे

कुसुम ३ रें

( राग—दरबारी कानडा )

घाबरूं नको ! बावरूं नको !
भीतीनें क्षण गांगरूं नको !
जरि शत्रुंचा अजस्र मारा,
उलथुनि पाडी जणुं डोलारा,
अभेद्य भक्कम किल्ला सारा
तरि वीरा हूं चूं करूं नको !
घाबरूं नको ! बावरूं नको ! १

जरी दिशांचे तट ढांसळती
नभसौधांचे स्तंभ कडाडती
हंड्या झुंबर, तडतड पडती,
तरि हे वीरा, डगमगूं नको !
घाबरूं नको, बावरूं नको ! २

धूलिकणांनीं डोळे मिटती
धूम्रमेघ कंठीं घरघरती,
सैरावैरा सैनिक पळती
तरि रणांगणांतुनि फिरूं नको !
घाबरूं नको ! बावरूं नको ! ३

निर्वाणीचें काढ सुदर्शन,
ठेवियेलें जें तळीं लपवुन,
मार नेम रे अचूक रोखुन,

विजयश्री अंतरूं नको !
घावरूं नको ! बावरूं नको !
भीतीनें क्षण गांगरूं नको !

भा. रा. तांबे

---

## मुक्तकैदी.

( प्रसिद्ध आंग्लकवि बायरन् ह्यांच्या प्रिझनर ऑफ चियाँग या काव्याच्या आधारें ही कविता रचिली आहे. बायरन् यांच्या काव्यांत तुरुंगांतील कष्टदशेचें हृदयविदारक वर्णन आहे. )

[ अभंग ]

पालटला रंग माझिया केसांचा
नासला तयांचा। काळेपणा १
काळेपणा गेला पांडुरता आली
स्थिति ही जाहली। हीन ऐशी २
ऐशी येते कळा वार्धक्यें सकळां
माझिया कपाळा। तयावीण ३
तयावीण होय दुजेंही कारण
भय तें दारुण। आकस्मिक ४
आकस्मिक भयें एकाही रात्रींत
रुपेरी होतात। केस काळे ५
काळे केस माझे पांढरे जाहले
परी भीतीमुळें। नाहीं हो ! हे ६
हे जसे जाहले इंद्रियें तशींच
सारीं हीन साच। जाहलीं हीं ७
हीं जरी विकल होवोनी लवलीं
नाहीं आंखुडलीं। केल्या कष्टें ८

कष्टेंवीण बेडीसंगें राहाटाव्रें
अंधारीं असावें। हाय! हाय! ९
हाय! नाहीं हवा नाहीं भू फिराया
अन्न नाहीं खाया। बरें हाय! १०
हाय! स्थिति ऐशी बहुकाळवरी
बोलवी अंतरीं। हाय! मज ११
मज हें बंधन कासयानें झालें
ऐका तें वहिलें। सांगईन १२
न सोडीं स्वधर्म कुळींच्या भावना
ह्मणोनि यातना। मजला या १३
याचसाठीं पूर्वीं प्राण वडिलांचे
घेतले मोलाचे। दुष्ट जनीं १४
जनीं त्या तयांला अग्नींत होमून
आमच्यापासून। दूर केलें १५
केलें त्याच्यामागें सुतां आह्मां साहा
छलाच्या प्रवाहा। आधीनच १६
नच परी भ्यालों मुळींच शिक्षेला
तुरुंगीं शृंखळा। वागवील्या १७
वागवील्या आह्मी सहाही जणांनीं
दिलें न सोडोनी। धर्ममत १८
मतासाठीं एक अग्नींत निमाला
दोघांनीं सांडिला। रणीं प्राण १९
प्राण दिले दोघाजणीं तुरुंगांत
परी धर्ममत। सांठवीलें २०
सांठवीलें यश पितयासमान
जीवाचेंही दान। दिलें भलें २१

भले साहा धर्मनिष्ठ गेले काय
सातवा हा हाय ! । वांचलासे २२
वांचलासे दुःख भोगून अपार
राहून अंधार । कोठडींत २३
कोठडींत तया आयुष्य मोलाचें
गेलें या जिवाचें । हाय ! हाय ! २४
हाय ! काय आतां मुक्तता करावी
समर्थ बरवी । कोठडी ती २५

——×—— हरी महादेव समर्थ

## धांवा

[ चाल भीमक बाळेची ]

भक्तवत्सला ! करुणागारा ! ये रे ! गोपाळा !
किती आठवूं ? असेंचि कंठी प्राण हिचा आला
आनंदाच्या मधुर सुखाचा गोड घांस गिळतां
पापिणिच्या या मुखीं न बा तूं आला भगवंता !
अपमानाची ठेंच लागली मम जीवा बाई
कटु शब्दाचें विष तेथें बा ! शिंपियलें पाहीं
तुझी कन्यका पहा तुडविली मांगांनीं पायीं
तडफडतो हा जीव तिचा रे ! रडे धायिधायी
मनःस्वामिनी प्रिया रुक्मिणी आड असे कां आली ?
दीन दयाळा ! तुझ्यावांचुनी कोण अम्हां वाली ?
माय रुक्मिणी ! पायां पडतें सोड जगन्नाथा
नको आठवूं, दीन उद्धरूं दे रे ! भगवंता
मनांत भरला काळा काळा भयाण अंधार
कांतकांतिचा कधीं तयाला उजळा देणार !

पतित पातकी, मी अबला ही शरण कुणां जाऊं?
ये ये लवकर दयासागरा! अंत नको पाहूं
पडेन खालीं-तोल सांवरी भान नसें उरलें
दीनदयाळा! ये कन्येचे पुसण्याला डोळे

विजय

———×———

## आशिर्वाद

('तांबे मंडळ' अजमीर तर्फे)

वृत्त (शा. वि.) स्वनितक

होते पोहत स्वैर झिंगुनि उडू आकाशगंगेवरी
चक्रीं खात गटंगळ्या गरगरा खालीवरी तो विधू
वायूशीं उडती लकेर निसटे मध्येंच कोठें मधू
होते शांत निवांत शुक्र नगरीं ओसाड भूमीपरी!
फेंकी ओझरते विधू कवडसे कोन्यांत वातायनीं-
तेथें कोणि विचारमग्न पडली बाला दिसे सुंदर!
रूपें सुंदर ती परी गमतसे चित्तास चिंतातुर!!
मोदें लोळत ती पुरींत अथवा शोकें झुरे काननीं?
वाद्यांचा कटु, गोड, कर्कश ध्वनी जो भेदि दिङ्मंडला
कर्णी आदळला; वरात बघण्या झाली पुढें सत्वर
तासे, ढोल, तुरंग, आतिष पुढें-मागें जनांचा पुर!
त्यामागून लवाजम्यासह करी युग्मासवें चालला
अंबारीं बघतां त्वरें निसटली नेत्रांतली चांदणी!
पाणीदार तिच्यें झुलेस जडले आशिर्वचाचे मणी!!

१ मे १९२३ ———×——— भवानीशंकर

## मानखंडन

['तांबे मंडळ' अजमीर तर्फे]

वृत्त (शा. वि.) स्वनितक

"मानी मानस! स्वार्थमानससरी, माना! मना फेंकुनी-
मानाची धरिशी मनांत मनिषा, दे मान शत्रू-पदीं
नाहीं लाज! स्वतंत्रता त्यजुनिया, धिक्कार! भोगी मदीं
गेला सोडुनि जन्मभू जननिला, दुःखी वनीं निर्जनीं १
दुःखें मोकलि धाय माय; रडते, म्लेंछांकरीं ग्रासिलीं
हांका मारि मृदुस्वनें स्वतनुजा, "या सोडवा, या त्वरें"
पाजोनी स्तनजन्य दुग्ध, मधुरा, अन्ना मुखीं दे करें
कर्तव्या स्मरुनी, गनीम रडवा, दुःखें वृकें ग्रासिलीं २
नाहीं कां तुजला मृदू-हृदय रे! नाहींच माया दया!
आह्मी दीन, मलीन, हीन पदराखालीं सुखानें बसूं-
मातेच्या प्रिय जन्मभू जननिच्या-मागे न येऊं तसू
रक्ता वाहु पदां, शत्रांस रिचवूं, लाहूं यशश्री जया
आहे काय शहा? पुतांस उघड्या, मेवाड भू फांकड्या
नाहीं मान! खुशाल आण जलदी, ज्याच्या जिवी त्वत्‌उड्या"

२४।६।१९२३ गोप

---

## श्रीमत्तिलकाष्टक

(कविवर्य अनंततनय यांचे शारदा मासिकाच्या एप्रिलच्या अंकांत प्रसिद्ध झालेलें श्रीमत्तिलकाष्टक लोकमान्यांच्या श्रवणीं पडतें तर ते न्यायप्रिय कर्मयोगी काय ह्मणते तें ऐका.)

[आर्या]

भगवंत कृष्ण कोठें कोठें मी मनुज बाळ टिळकांचा
कांजावली न देतां उपमा त्याची मला तुझी वाचा! १

योगेश्वर देव कुठें कोठें मी कर्मयोगवीर नवा
वानावें लोहातें परिसापरि काव्यकार! काय तुवां? २
गोवर्धन गोकुळिंचें कार्य कुठें विश्वमान्य तें हरिचें
हरिचें वैभव हरिणा पूजन देईल काय गणपतिचें? ३
गोकुळगोधनरक्षण केलें मर्दोन दैत्य तें कोठें
कोठें मत्कृति साध्वी मेरुपदा कैंवि मोहरी गांठे? ४
कोठें भीमार्जुन ते भट शिवरामाच्युताख्य कोठें हे
हें साम्य तुला कविला रुचलें आश्चर्य खचित मोठें हें ५
रामावतार कोठें कोठें शिवराय मानवी राजा
ज्याचा प्रताप अद्‌भुत कोठें तो दास वंद्य गुरु माझा ६
रामासम वचनाचा निश्चल जन एक मीच काय कवे?
वेडावें मन शिव! शिव! श्रीदच्युति राघवी न आयकवें ७
एकासमान दुसरा नाहीं जगतांत जीव या न्यायें
येतें समर्थपण वा! मजला भळतें नकोचि अन्यायें ८

टिळकाभिमानी

## रमणी–प्रेम

(चाल–प्रिये प्रेरणें थांब)

पूर्वदुर्गद्वारांतून निघे, भानुराज केसरी
स्मरुनि कर्तव्य प्रेम अंतरीं ॥ धृ ॥
सुतेज कांती वदन प्रफुल्लित वस्त्र गुलाबापरी
रुचिर कितितरी हास्य माधुरी
प्रसन्न हृदयें द्वारासन्निध उभी उषा सुंदरी
घेउनी शुक्र–सुमन निजकरी
अर्पुनी कुसुम तें नाथा प्रेमळ मनें

मंजुवचें वदली प्रिया एक मागणें
कार्य साधुनी तुह्मि झणी करा परतणें
सजल-नयन जाहले पाहि परि दिनमणी जातां दुरी
परत ती जाई दुर्गांतरीं १

कुसुमकरांनीं उठवी सकला संजीवन देउनी
ध्वांत पटलास दूर सारुनी
विभवगिरीवर बसुनी झळका झणि स्वातंत्र्यासनीं
करी कर्तव्या जागृती जनीं
हें कार्य सारुनी तो निजगृहपथ धरी
तो पश्चिमद्वारीं उभि संध्या सुंदरी
नेसुनी गुलाबी पातळ नव भरजरी
सुहास्यवचनें सप्रेमें प्रियपतिचें स्वागत करी
आलिंगुनि नेइ दिव्यमंदिरीं २

नाथविठ्ठल

## प्रवाशाचें गाणें.

(चाल--सहज कशि खेळविते)

प्रभुविण कोण मला आधार। कोण करिल उद्धार
प्रभुविण ॥ ध्रु० ॥
बहु दिवसांचा असें प्रवासी
जाणें मजला दूर विदेशीं
कोण करिल उपकार। प्रभुविण कोण मला आधार १
विदेश माझा स्वदेश होता
तेथें कसली नव्हती चिंता
तेथिल मी सरदार। प्रभुविण कोण मला आधार २

पत्नी माझी कृत्या दुसरी
तिच्या प्रभावें प्रवास हा करिं
फिरवी वणवण नार । प्रभुविण कोण मला आधार ३

स्वस्थानाहुनि दूर सारिलें
चिन्मयतेला अंतरवीलें
नार करी बेजार । प्रभुविण कोण मला आधार ४

परवशतेच्या अशा स्थितींतुनि
काढुनिया स्वातंत्र्य दे झणि
ऐसा कोण उदार । प्रभुविण कोण मला आधार ५

कोणि न ऐसा या बाजारीं
सगळे संसृतिच्या अंतःपुरिं
विसरुनि निज घरदार । प्रभुविण कोण मला आधार ६

परवा नव्हती मज कोणाची
शक्ती होती करावयाची-
तमो-द्विरद संहार; । प्रभुविण कोण मला आधार ७

परि परवशता आली ज्याला
जाते त्याची शक्ति लयाला
विफल होति व्यापार । प्रभुविण कोण मला आधार ८

उद्धारास्तव विनवूं कोणां ?
स्तवुनी फलकां द्रव्यविहीना
प्रभुचि एक देणार । प्रभुविण कोण मला आधार ९

तोची माझा जिवलग साचा
सर्वशक्ति तो सिंधु दयेचा
तोचि करिल उद्धार । प्रभुविण कोण मला आधार १०

——×—— गुणवंत हनुमंतराव देशपांडे

## सृष्टिप्रेम

( मंदारमाला )

आला शरत्काल न्हाई धरा आजि गाई मधू गान ती कोकिला
केली तरूंनीं अहा त्या लतांनीं पहा त्या तटांनींहि स्नानें चला
लागे गिरींची नभीं नीलराजी जयीं चर्चिलें भस्म दंडीं शिरीं
पावित्र्य देहीं तुझ्या सृष्टिदेवी कसें निर्मले सांग वानूं तरी ? १
आला शरत्काल पाहूं चला खेळ लावूं जरा चित्त त्या खेळनीं
तूझे झरे लाडके पूर्ण ओढे अहा धावती स्वैर गे भामिनी
उद्दाम वाताचिया वाहण्यानें तुझें गालिचें वस्त्र हाले वरी
पावित्र्य देहीं तुझ्या सृष्टिदेवी कसें निर्मले सांग वानूं तरी ? २
कोठें गळे मेघ, कोठें पडे ऊन, कोठें पहा पीत क्षेत्रें, रवी
पाहे कुठें मेघवर्तूल साधून खालील रानें तुझीं हीरवीं
शोभा अशी पाहुनी धन्य देवी झणीं धावलों तूझिया पूजनीं
पावित्र्य देहीं तुझ्या सृष्टिदेवी कसें निर्मले सांग वानूं झणीं ? ३
या ओहळांतील हीं भातशेतें जलानें तुडुंबूनि गेलीं अती
शोभे तयांच्यावरी सूर्यकांती मना तत्क्षणीं मौज वाटे किती !
केला शरत्सुंदरी स्वर्गसोपान त्यां दर्पणांची जणूं पायरी
पावित्र्य देहीं तुझ्या सृष्टिदेवी कसें निर्मले सांग वानूं तरी ? ४

७ आक्टोबर १९२२ ——×—— दिनकर

## मधुमीलन.

(चालः–अंजनी गीत)

मंगल कालीं मंगल मुरली
गोपालानें स्वकरीं धरिली

फुंक मारिली मोहित केलीं
गोपींचीं हृदयें १

छिद्र सप्तकीं कर मिरवीतो
मधुर रवें कीं, व्रजवन भरितो
आनंदानें फिरतो, हरितो
गोपींचीं हृदयें २

व्रजललना घर दार सोडुनी
वेणूच्या मधुरालापांनीं
सूचित केला पथ हुडकोनी
येती त्वरित वनीं ३

दुरून बघती कुंज-विहारी
धावत जाती गोप सुंदरी
आनंदानें भरल्या भारी
येता सन्मुखतो ४

पुन्हां पुन्हां मुख त्याचें बघती
हासत नाचत गाणीं गाती
नव सुममाला बहुत अर्पिती
कंठीं श्रीहरिच्या ५

जाईच्या मृदु हारामधुनी
नील पुष्प तें चमके खुलुनी
घनश्याम तो गोप कामिनी
मधुन तसा झळके ६

गोरा गोपा हार फुलांचा
कृष्ण सांवळा तुराच साचा

इंद्रनील सन्मणि मालेचा
वाटे नटला कीं ७
वाळवंट ते कीं गगनांगण
धवल कामिनी जणुं तारांगण
त्या समुदायीं तो मधुरानन
चंद्र जणूं विलसे ८
मंद सुशीलतल अनिलहि वाहे
पुष्प-सुवासें मोहें जग हें
शुभ्र यामिनी बहु उत्साहें
पाहे तत्क्रीडा ९
प्रत्येकीला वाटे जवळीं
मूर्ति असावी रम्य सावळी
भक्तांची त्या पुरवी आळी
रूपें घे तितुकीं १०
अनंत रूपें हरिचीं बघुनी
स्मित बहु झळके गोपी वदनीं
रमल्या वदणें ना तें वदनीं
"मधुमीलन" त्यांचें ११

शं. के. मोटे

## अभंगरत्नमाला.

सोनियाचा देव-होता देव्हाऱ्यांत-गेला अकस्मात-दिसेना तो
'इथें होता, कोठें-गेला रंगनाथ'-भक्ताच्या नेत्रांत-पूर येतो
सुचेना कांहींही-चित्त घाबरून-जीव गांगरून-तेणें जातो
सोन्यासाठीं सारा-चालला आकांत-जाणे भगवंत-सर्वज्ञ तो १

सोनियाची मूर्ती-सोनारानें केली-भक्तालाच झाली-वरदाई
मातीचा गणेश-कुंभारानें केला-इष्ट भजकाला-फल देई
पाषाणाचा देव-पाथरवटें केला-पावे भाविकाला-झडकरी
भक्तीच्या भावना-ज्यांच्या अंतरांत-त्यांच्या कल्याणार्थ-उभा हरी

"गुरु महाराज-गुरु महाराज"-मुखें शिष्यराज-बोलतसे
तत्वासाठीं प्राण-देणाऱ्यांची मान-ढोंगी धर्महीन-कापीतसे
गादीचा तो गुरु-साधा भोळा प्राणी-शिष्याची करणी-नेणतसे
गुरु आणि शिष्य-किति नांदतात-खोट्या लौकिकांत-लोकीं ऐसें

पाप करि पापी-शिक्षा ना तयाला-"देव झोंपी गेला?"-बोलूं नये
भक्त करी भक्ती-फळ ना तयाला-"देव झोंपी गेला!"-बोलूं नये
बीज लावियेलें-आलें तें फळाला-"देव जागा झाला!"-बोलूं नये
आचरोनी कर्मे-भोगावें कर्माला-उणें दैवताला-बोलूं नये ४

अमृतासमान-जलास वर्षती-मेघ ना याचिती-नमस्कार
नित्य मलिनांचा-मळ क्षाळिताती-नद्या ना वांछीती-नमस्कार
वृक्ष फल-पुष्पें-छाया अर्पिताती-कुणा ना मागती-नमस्कार
नाहीं भूतदया-नाहीं उपकृति-उन्मत्त वांछीती-नमस्कार ५

एका उद्यानांत-एक पुष्करिणी-एकच सुवर्णी-पद्म तेथें
नित्य विकसावें-सौंदर्य हांसावें-वायूनें डोलावें-त्यानें तेथें
तीरावर कोळी-नाना उपायांत-झाला बहु त्रस्त-लाधे ना तें
शेवटीं मूर्खानें-पाषाण फेकीले-छिन्न भिन्न केलें-पद्म हो! तें ६

कीटकांचा जेथ-समूह मातला-भ्रमर पुष्पाला-सोडती त्या
मंडुकांचा जेथ-गोंधळ चालला-हंस पल्वलाला-सोडती त्या
वायसांचा जेथ-कल्लोळ माजला-पिक ते आम्राला-सोडती त्या
मूढवृंद जेथ-लाडका जाहला-कवि भूपालाला-सोडती त्या ७

———×——— दु. आ. तिवारी

# आर्य स्त्री प्रबोधमाला

यांत आर्य स्त्री रत्नांचीं सोप्या व सरळ भाषेंत चरित्रें येतात. तसेंच मधून मधून नीतीपर व उपदेशपर वेंचे, गोष्टी, कथानकें वगैरे दिलीं जातात. स्त्रियांना सद्यःस्थितीला कार्यक्षम करण्याच्या हेतूनें ही माला निघाली आहे मालेची वार्षिक वर्गणी ट. हं. १ रुपया आहे. 'हळद कुंकू' 'पतिसंजीवन' अबलाभक्तिप्रभाव हीं मालेचीं बाहेर पडलेलीं पुष्पें वहारीचीं आहेत.

सौ. सरस्वतीबाई गाडगीळ.

संपादिका:-आर्य स्त्री प्रबोधमाला

पो.-सांगली

---

## सूचना.

पूर्वीचे कवि आपल्या काव्यास विषयबोधक नांवें देत. त्यामुळें त्यांच्या काव्यसारितेच्या ओघाबरोबर विहरणें अवघड होत नसे. अलीकडे कवितांस चटकदार नांवें देण्याचा प्रघात पडूं लागला असल्यामुळें ह्या आधुनिक कवींबरोबर हिंडणें रसिकांस अवघड होणें साहजिक आहे. ह्मणून कविवर्गास आमची विनंती आहे कीं इतउत्तर त्यांनीं आपल्या कवितेच्या नांवामागून, विषयसूचक आणि आपली कल्पनासरणी स्पष्ट होईल अशी अर्थबोधक टीप अवश्य देत जावी. कथानकपर कविता असली कीं कथानकाची टीप देतात तशी कल्पनेचें संविधानक स्पष्ट होईल अशी टीप असावी. 'मनास' जीवनास' 'वीणा' 'हे सुंदरी' 'पुढच्या जन्मीं' 'प्रेमाचा हलवा' या नांवावरून इष्ट तसा बोध होतो कीं काय? याचा कवींनीं विचार करावा असो.

२ अलीकडे कविता पाठविणारांकडून पाठविलेली कविता केव्हां प्रसिद्ध करणार, अजून कां प्रसिद्ध झाली नाहीं, पसंत

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

आहे कीं नाहीं, इत्यादि प्रश्न पत्रद्वारें वारंवार विचारण्यांत येऊं लागले आहेत हा पत्रव्यवहार हल्लीं इतका वाढला आहे कीं या कामाकरितां एक लहानसें खातें उघडावें लागलें. तसें करणें इष्ट वाटत असलें तरी शक्य नाहीं. म्हणून व्यक्तिशः उत्तर न मिळाल्यास आमच्या कविमित्रांनीं विषाद मानूं नये नापसंत कविता टपालमार्फत परत होतील. पसंत झालेल्या सवडीप्रमाणें प्रसिद्ध करण्यांत येतील. पसंत असून छापतां येत नसल्यास त्याप्रमाणें रत्नावलींतून कळविलें जाईल. ही योजना रत्नावलीच्या हितचिंतकांस पसंत होईल अशी आह्मांस आशा आहे.

३ ह्या व अन्य मासिकांतून येणाऱ्या कवितांचें परीक्षण एक दोन मासिकांतून होऊं लागलें आहे. हें जितकें इष्ट आहे तितकेंच ह्या परीक्षकांच्या कवितेचें विवरण होणें इष्ट असल्यावरून तें यथावकाश करण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे.

संपादक

काव्यरत्नावली, जळगांव.

---


दुसरें वर्ष माघापासून सुरू झालें!

पहिल्या वर्षांत प्रचंड लोक–जागृति करणारें

संपादकः— निफाडकर व दु. आ. तिवारी

**लोकमान्य**

वार्षिक वर्गणी रु. ३।≈ एक पुस्तक बक्षीस.

मासिक यापुढें स्वातंत्र्याचा बाहुटा साऱ्या मराठे मंडळांत नेणार. दोन कादंबऱ्या, अनेक गोष्टी, खरमरित लेख, प्रासंगिक कविता, प्रासंगिक हृदयस्पर्शी चित्रें अशा सुंदर स्वरूपांत व लो. टिळकांचा मंत्र, व म. गांधीची भरारी हें मासिकांत येणार वर्गणी भरा व जाहिराती द्या.

व्यवस्थापक लोकमान्य, धुळें.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरुनि येती ।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बावजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] जुलै सन १९२३ [ अंक ७ वा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

## अनुक्रमणिका.


संक्रांतीची भेट ( केशव नारायण वैद्य )..............१४१

सख्यभक्ति ( अनुवादक )..........................१५३

मराठी वाङ्मय ( पां. रा. नंदुरबारकर )..............१५७

कलिकेस ( त्र्यंबक अनंत देशपांडे )................१५९

कै० श्रीएकनाथास ( काव्यशेखर )....................१६१

मुग्धाबाला ( मनोहर )..............................१६२

असें कां ? ( ह. म. समर्थ ).........................१६३

संकोच कां ? ( ह. म. समर्थ )........................१६४

गाऊं नये त्यापुढें ( दु. आ. तिवारी )................१६६

भामिनी ( दु आ. तिवारी )..........................१६६

पर्जन्यांतील मूक कोकिळेस ( पां. वा. दिघे )............१६७



मुलांमुलीकरितां अत्यंत उपयुक्त असें सचित्र मासिक

# हिंद-कुमारी

[ वा. व. ट. हं. सह २८४ व्हो. पी. नें २८७ ]

संपादिका:-डॉ. सौ. इंदुमतीबाई नाईक एल्. सी. पी. एस्.

प्रकाशक:-का. रा. पालवणकर 'हिंदकुमारी कार्यालय' गिरगांव-मुंबई

व. म. आ. नें पाठवून त्वरित नांवें नोंदवून राष्ट्राचे आधारस्तंभ जीं मुलें त्यांची सर्वांगीं सुधारणा करून घ्या.

जुलई सन १९२३ वर्ष ३१ वें

# काव्यरत्नावली

## अंक ७ वा.

## संक्रांतीची भेट.

( अंक ६ व्या वरून )

श्लोक

संक्रांतीचा दिवस उगवला, पर्वकाळ आला,
वस्त्राभरणीं सजुनी नलिनी वायन[1] द्यायाला- ६१
गेली, देउनि वायन, दर्शन घेउन देवाचें-
आली; परि मन होउनि चंचल हुरहुरलें तीचें ६२
भावी सुखदुःखें[2] मन कथितें ज्याचें त्या काय?
पत्र कुणाचें येउनि पडलें येथें हें हाय! ६३
बघूं नको, या आहे नलिनी! अनर्थ पत्रांत,
केला पुरता दुर्दैवें हा बाळे! तव घात! ६४
काय लिही, हा मित्र कुणाचा, तारापति कोण?
निज मित्राच्या विरहव्यसनें व्याकुल होऊन- ६५
महासागरा उतरुनि आलों परवां मुंबइला
दिवस आजचा, हा सोन्याचा, देवें दाविला ६६

---

१ वाण २ मनुष्याचें मन त्याला त्याची पुढें प्राप्त होणारीं सुखदुःखें आपल्या प्रसन्न किंवा खिन्न वृत्तीनें जणू सांगतच असतें काय!

त्या आनंदें, वदत विनोदें मित्रासह फिरलों;
जनकृतभोजनपानें[1] मानें तुष्ट मनीं झालों ६७
प्रियजनविलास रंगीं पुरजन दंग सुखी दिसले
स्वजनदर्शनातुर मित्राचें मन उत्सुक झालें ६८
*लिहुन दिलें मज पत्र, ह्मणे ही वार्ता स्वजनाला-
कळीव, तुमच्या जवळ भेटिचा सुखद काळ आला ६९
वज्रापरिसहि कठोर होतें रणांत जातांना
मन, नवनीता रुक्ष कठिणही ह्मणे अतां सुमना ७०
सुमन लक्षण हेंच, भूमिका त्यानें जी घ्यावी
तन्मय होउनि लय तीताचि तद्वृत्ती पावावी ७१
दिसति मनोहर, मोहक चित्रें माया ममतेचीं
शांति सुखाचीं, किति मौजेचीं, प्रेम प्रणयाचीं ७२
करुणाप्रेमें रंगविली जणु जननी जनकाची
सुरम्य मुदित स्मित सुरुचिर ती मूर्ती दयितेची ७३
येतां ध्यानीं, भान हरपलें, चंचल मन झालें
विवेक, धृति, बल त्या शूराही सोडुनिया गेलें ७४
विकल जाहला दुःखें आणी पाणी नयनाला

---

१ मुंबईतील थोर गृहस्थांनीं अत्यादरानें केलेल्या भोजनपानादिकांनीं.

* भानुकांतानें सुरपुरला पाठविण्यासाठीं कार्ड लिहून, तूंही घरीं पत्र लिही असें ह्मणून आपला मित्र तारापति याजपाशीं त्यावर पत्ता लिहून टपालांत टाक ह्मणून दिलें. तारापतीनें वरील ६६ साव्या पद्यापासून तों ७७ व्या पद्यापर्यंत मजकूर लिहून तें व भानुकांतानें सुरपुरचा पत्ता लिहून आपल्या घरीं टाकण्याकरितां दिलेलें कार्ड या दोहोंवरही आपल्या हातानें पत्ते लिहून तीं कार्डें रवाना केलीं. धांदलीमुळें तारापतीनें आपल्या गांवच्या मित्रास व घरीं लिहिलेल्या कार्डावरच सुरपुरचा पत्ता लिहिला गेला त्यामुळें असा घोंटाळा झाला.

'भानुकांत' मज सखा त्यजुनि तो निजधामा गेला ७५
मृत्युपरिसही दुःखद दुःसह वियोग मित्राचा
हाय! सोशितों येथ करंटा फुटक्या दैवाचा ७६
झालों दुःखें उदास वेडा, येतों भेटाया
परी भानुविण सर्व गमे मज तमोमयी दुनिया ७७
घरांत शिरतां, पत्रावर त्या दृष्टि तिची गेली,
शोभन-वायन-घट हातांतिल ठेवियले खालीं ७८
अक्षर न दिसे पतिच्या करिचें, ह्मणुनी घाबरली
वाचुनि बघतां, फोडुनि किंकाळी मूर्च्छित पडली ७९
आली ऐकुनि धांवुनि सासू, घरांतून आला
वृद्ध सासरा, पत्र पहातां शोकाकुल झाला ८०
आक्रंदोनी बोले सासू अहो! काय झालें?
सांगा हो! मज पत्र कुणाचें? काय? कुठुनि आलें? ८१
भानुकांत मम लाल! बाल! तो खुशाल आहेना?
कां उडती हे दुष्ट कल्पना तरंग मनिं नाना ८२
तोच तोच गे! आह्मा टाकुनि राजहंस गेला!
दुर्दैवानें सुतकुलदीपक अपुला मालविला! ८३
ऐकुनि हें, हंबरडा फोडुनि, ह्मातारी पडली;
सुतशोकानें व्याकुळ झाली, शुद्ध तिची गेली ८४
पाहुनि हळहळती जन, ह्मणती गति ही कर्माची
'जवळ येउनि भेट न झाली आईबापांची' ८५
ही नागवली, झाली अबला अनाथ जन्माची
पतिविण शोभा नाहीं स्त्रीच्या सद्गुणरूपाची ८६
ऐकुनि हुंदुक दाटुनि भरला भ्रम ह्मातान्याला,
बोले, विष द्या, किंवा लोटा खोलजलीं मजला ८७

*"सोडुनि दक्षिणदिशा परतला भानु उत्तरेला
" हरिख वाटला त्याच्या जिवलग नलिनी नारीला ८८
"दिवस सणाचा असा आजचा असुनि उगिच कां गे
"पडशी ऐशी बाले! भरशी कोणावर रागें?" ८९

"होती पुढच्या सौख्यचिंतनीं आनंदीं नलिनी,
"हाय! टाकिली मत्तगजें या काळें उपटोनी ९०
"तेजरूपरसहीन अशी कां अचल येथ पडली?
"काय पुत्र मम भानु, सून ही सोडुनि मज गेली ९१
"सुकलीं पानें, सुमनें, जीचीं फळें गळुन गेलीं
"शुष्क तनुलतेसम मम जाया ही इकडे पडली ९२
"विमानयानीं बसुनी कोणी जातां मज दिसती
"देवदूतचि ते मम बाळा घेवोनी जाती ९३

"सोडुन, निजजन, माया, ममता, प्रीति, दया, भीति
"जाती वीर रणीं, करुनि ते दगडाची छाती ९४
"नसे काळजी जीवाची कीं परवा मरणाची
"परी अहंता वीरश्री बहु निज नृप विजयाची ९५

"विजय जोडतां, मरणहि जन्माहुनि आनंदाचें
"वाटे शूरा, स्वधर्म, तेंची सार्थक जन्माचें ९६
"विडा उचलुनी, बालवीर रणिं विजयाचा गेला,
"विजयश्रीसह आर्यजननिला वंदाया आला ९७
" नलिनी! बाले! चल गे! उठ गे! तूंही नको मागें
' राहूं, जाऊं, अवघे मिळुनी त्या वीरासंगें! ९८
"कोण कुणाचा तात, बंधु, सुत, जननी जाया ही

---

* अवतरणांत दिलेलं भानुकांताच्या वडिलांचे भाषण दुःखामुळें झालेल्या भ्रमांतील आहे.

"निर्वाणीचा मित्र एकची धर्म दुजा नाहीं ९९
"हाय मोकला संसाराला धनसंपत्तीला
"जाळा! लावा आग चेतवा, या घरदाराला! १००

"रे! दुर्दैवा! दैना दीनांची बघुनी हंसशी
"ईशकृपा परि त्यावरि होतां पडशिल तोंडघशी" १०१
ऐसें बोलुनि पडतां, तेथिल जनही ते रडती
ह्मणति, न यावा प्रसंग ऐसा वैऱ्याही वरती १०२

\+ + + +

उदयाद्रीच्या समीप येतां सविता तज्जननी
प्राची तोषे, हर्षे त्याची प्रिया उषा रमणी १०३
प्रमुदित उत्सुक होती, दिसती प्रसन्न सर्व दिशा
करी निराशा उदास, जीवा लोभवितें आशा १०४

शीतपवन वनीं लता तरूंना उठती हलवोनी
सुखवी, तत्सुम सौरभ साऱ्या भुवनीं पसरोनी १०५
कळ्या उमलती, खुलती, फुलती वृक्षलता सुमनीं;
द्विजगण त्यांवर बसून गाती आनंदें गाणीं १०६

युवतिहि उठती झाला अरुणोदय हे जाणोनी
परि आहे ही दुश्चित अजुनी दुःखजलीं नलिनी १०७
सासू तीची दुःखें मूर्च्छित जी पडली होती
तीतें शेजारिणी बळेंची धरुनी ऊठविती १०८

उठतां आला तिच्या, पतीचा शोकस्वर कानीं,
दुःखाऽवेगें सन्निध त्याच्या बसली जावोनी १०९
स्वांकीं पतिशिर धरुनि ह्मणे ती, दैव कसें फिरलें
हाय! केवढें तरी कपाळा टेंगुळ हें आलें! ११०
टेंका डोकें, धीर धरा हो! असें काय करितां?

कांपतसा कां? थरथर! गरगर! डोळे फिरवीतां? १११
अहा! लागतें गार असें कां हें यांचें अंग?
पांखडिशी कां दुर्दैवा! ही गरिबांवर आग! ११२

झोंप लागली तुला काय गे! हाय! सूनबाई!
करि दीनावरि दया धांव गे! ये! अंबाबाई ११३
करा, कुणि तरी सावध माझ्या बाळे नलिनीला,
कशी घालिशी सुरी काळजीं, काळा! चांडाळा! ११४
मध्यान्हाला हा अस्ताला भानु कसा गेला!
लोटुनि दुःखतमीं निज कांता जननी जनकाला ११५
फुटलें दुःखें हृदय, परि कसा जीव न हा जाई!
धरणी माते! तूं तरि मातें, उदरिं ठाव देई! ११६

असें वदूनी, केविलवाणी पाही चौंहिकडे,
वत्सवियोगें धेनु तशी ती फोडुनि हंबरडे; ११७
ह्मणे, बाहतें दुःखाकुल ही तुला तुझी माता
सत्वर येउनि भेटे बाळा तिला भानुकांता! ११८

येतचि होता राजपथें तो[1] वीर रथीं बसुनी,
शोकस्वर मातेचा पडला तों त्याच्या कानीं ११९
आला वेगें, भेटे दुःखोत्कंठित जननीला
तीही प्रेमें त्या, चिर विरही विजयी पुत्राला[1] १२०

जीव कुडीला, कीं चुकलेलें पाडस हरिणीला,
जणू भेटलें दुजी न उपमा त्या आनंदाला १२१
संक्रांतीचा दिवस सणाचा भानुकांत आला
पाहुनि झाला हर्ष जनाला, त्याच्या जनकाला— १२२

---

1 भानुकांत

भान विसरला वृद्ध लागला तो नाचायाला,
सांगे, ज्याला त्याला कीं मम सूनु भानु आला! १२३
यशोधनाचाधनिक[1], बहादर, विजयश्रीमंत[2],
बलसागर[3], मम[6] तेजोनिधि[4] रणधीर[5] भानुकांत १२४
माय ह्मणे कीं, प्रेमल, कोमल, सुंदर, सुकुमार,
रूप मनोहर, जिवलग माझा लाल बालवीर १२५
नको वदूं गे! सुरूपशीले! नलिनी! लज्जेनें!
तुज विनयानें पुरा गांजिले वियोगदुःखानें १२६
नदी मिळाली, ही प्रीतीची, स्नेह सागराशीं
किंवा पडली सत्कृतिची या ग्रंथी रसिकाशीं १२७
बंधारा, प्रेमाच्या[7] पूरा, न टिके लज्जेचा
भीड भीतिचा, मर्यादेचाहि न जननिंदेचा १२८
लज्जा लज्जित झाली, सुटली मर्यादा, गेली
भीड, भीति ही औत्सुक्यानें दिगंतास नेली १२९
वाट लाविली प्रणयस्नेहें हळूंच सर्वांची
प्रेमानंदीं समरस झालीं मनें उभयतांची १३०
ह्मणे, प्रार्थुनी घ्यावा हलवा गोड करुनि नाथा
तुह्मा अर्पिते विशुद्ध चित्तें ही नलिनी कांता १३१
गौरवर्ण[8] हा नयन मनोहर, या पुलकित तनुचा
रंग रंजवी, तसाच भुलवी, सुंदर हलव्याचा १३२
असकृत् कोमलकरकमलानें कुरवाळुनि याला

---

१ यश हेंच आहे धन ज्याचें तो २ विजय हीच लक्ष्मी तिनें युक्त ३।४।५ हीं भानुकांताचीं विशेषणें ६ असा तो माझा (बाल) आहे ७ उचंबळुन येणाऱ्या प्रेमाच्या पुराला (लोंढ्याला) लज्जा मर्यादा भीड भीति यांचा बंधारा (बांध) ठिकत नाहीं. ८ हें भानुकांताचें भाषण आहे.

किती नटविलें जेवी नटवी माता निज बाळा १३३
शुद्धसितारससिद्धौषधिची[1] घुटी तया दिधली
करुनी[2] लालन, चालन देउनि[3], तत्तनु वाढविली १३४
अंतःस्नेहें[4], रसमाधुर्यें, तनुच्या सौंदर्यें,
मधुर प्रिय मज गमे सम तुझ्या हा हलवा भार्ये! १३५
अशा सुमधुर प्रणय भाषणीं गौरविली नलिनी
पतिनें, प्रेमें वदे सती त्या मुदित स्मित वचनीं १३६
*असेंच राहो प्रेम विमल हें, प्रिया! प्राणनाथा!
'सदा वदावें गोड' विनंती ही करिते कांता १३७
तुष्ट जाहला नाथ वधूच्या बघून हलव्याला;
ह्मणे, तूंहि घे, हा मम दे जा! प्रिय रत्नावलिला १३८
'संक्रांतीची भेट' ह्मणूनी रत्नावलिबाला
वीणावाणी[5] निज सत्कवनीं तुष्ट करो सकलां १३९

——४—— केशव नारायण वैद्य

---

१ स्वच्छ आणि पवित्र अशा शर्करारसानें सिद्ध केलेल्या औषधीची बाल घुटी देऊन, २ लालन करून ३ वरचेवर हालवून चालवून ४ स्वभावतःच तिळांत असलेल्या तेलानें. पक्षीं अंतःकरणांतील स्नेहानें '(प्रेमानें) मधुरतेनें आणि लावण्यानें ५ वीणेसारखी मधुर आहे वाणी जीची ती रत्नावलि (काव्यरत्नावलि) कित्येक अर्वाचीन रसिक व मर्मज्ञ विद्वान पंडितांनीं आणि कवींनीं या छंदास 'वीणावृत्त' असें ह्मटलें आहे ह्मणून (अशा वीणावृत्तांत केलेल्या आपल्या कवनांनीं) असाही अर्थ करतां येईल असें वाटतें. (त्या वृत्ताची चाल 'चंद्रसेन राजाची कन्या इ.' या पदाच्या चालीप्रमाणें आहे. या वीणावृत्ताच्या दुसऱ्या व चवथ्या चरणांत दोन दोन मात्रा जास्त घातल्या ह्मणजे तोच 'साकी छंद' होतो.

* हें नलिनीचें भाषण.

## सख्यभक्ति

(अंक ६ व्या वरून)

श्लोक

नाहींच ओळख नवी तव आज होणें
आहोंत कीं उभय एकचि रूप जाणें
त्वद्विस्मृतीच पडली बहु जन्म मातें
ही द्वैतवृत्ति ह्मणुनीच मनांत येते ५१

नाहींत सांडत भलेजन ओळखीशी
हा मी तुझा असुनि कां नच भेट देशी
थोरास काय ह्मणणें, मम दैव खोटें
त्यावांचुनी न विपरीत घडेल कोठें ५२

तूं एकदां समज कीं मज आपलासा
हो हाच मी प्रिय तुला, न दुजी अपेक्षा
वाटे ह्मणीच निज बाळ असोहि हूड
प्रेमा[1] दिसे न कधि तद्विषयांत[2] खोड ५३

माझें तुझें किमपिही नच दूर नातें
संकोच यास्तव नको धरणेंच मातें
विश्वंभरा जनक तूं जननीहि तूंच
कोणी त्वदन्य मम आप्त असा न साच ५४

तूं श्रीपती असशि आणिक मी भिकारी
कामादिकीं सकल नागविलोंच[3] चोरीं[4]
हा आणिला न मनिं भेद चुके नितांत[5]
त्याला पुसे कवण निर्धन जो जगांत ५५

---

१ प्रीतिला २ प्रेम विषयांत ३ लुबाडलों गेलों ४ चोराकडुन ५ अत्यंत

देतां तरी सकल वागति गोड लोक
'दे घे' जगांत दिसुनी मज ये विलोक
भावें कधीं तुज न पत्रहि अर्पियेलें
वाटे म्हणूनच मनीं कृपणत्व आलें ५६

तूं कल्पवृक्षसम देशिल इच्छिजे तें
इच्छाबळें प्रबल, लब्ध न काय होतें?
मी चिंतिलें न तुज आजवरी कदाही
चिंतामणे! तरिच तूं द्रवसी न कांहीं ५७

सर्वस्व हें तव दिसे, जरि सत्य पाहूं
माझें[1] नसेंचि किमपी, मग काय देऊं?
दानास जी उचित होति ममत्व बुद्धि
केली कधींच तुज अर्पुन चित्तशुद्धि ५८

आहे सुभाषित असें अनुताप-मग्न-
झाल्यास हो सकलही अघराशि[2] भग्न
केल्या स्वनीच कृतिचें मज दुःख वाटे
अंगीं अतां तरि उरे मलिनत्व कोठें? ५९
मी पातकी अवगुणी अघराशि मोठा
सत्य-स्वरूप तुजला करूं केविं खोटा
आपन्नदींत[3] बुडतां जन नीच आह्मीं
देवास निंदु नच दोष बघूं स्वकर्मी ६०
जन्मून भूमिभरसा, शिणवून माय
गेलों वृथा, मळविलें स्वकुलास हाय!
ना साधिलें इहपरत्र हितास कांहीं
कां झांकु दोष कदुली स्वमुखेंच देई ६१

१ माझ्या मालकीची वस्तु २ पापांचा संचय ३ संकटाच्या प्रवाहांत

ध्यानीं जरी प्रथम तत्परिणाम येतां
जातों न इंद्रियसुखात्मक आड-वाटां
त्वद्भक्तिचा पथ हित-प्रद आज जाणें
खातां न ठेच जगिं कोणि न हो शहाणे ६२
जोडून मानव-तनू बहु दुर्लभा ही
केला तिचा सदुपयोग असा न कांहीं
गंगा जशी निकट येउन आळशाला
वायाच होय, मणि लाधुन मर्कटाला ६३
दीपावरी शलभ[1] घालुन अंग घेतो
किंवा गळा[2] भुलुनि मत्स्य जिवा मुके तो
मी घेतला करुनि त्यापरि आत्मघात
वेळींच सावध न हो भुललों नितांत ६४
नाशील कोण बुध तो धन मद्य-पानीं
माझी विलक्षण कथा परि घेइं कानीं
मी बुद्धि-वैभव कदा नच सत्कृतींत-
-वेंचीयलें विषय-भोग-सुरा-सुखांत[3] ६५
छायेपरी सतत पाठिस काळ लागे
आयुष्यरूप मम वित्त हिरावुनी घे
आहे शताद्बमिति[4] तें परि फोल सारें!
झाला न तत्सदुपयोग परोपकारें ६६
माशी मधांत भवमोहमधूंत[5] तैसा
मी गुंतलों सुदृढ, हा न सुटेच फांसा
यांतून सोडवण तूं करिं शीघ्र माझी
मी शक्तिहीन, न दुजा तुजवीण गाजी ६७

---

१ पतंग २ आमिषाला ३ विषयभोग हाच दारु, त्या दारूच्या सेवनांत
४ शंभर वर्षे ५ संसार मोहाच्या मधांत

कांता तसें कनक आणिक एक कीर्ति
हे तीन पर्वत मधें बहु आड येती
नाहीं तरी तव न दुर्लभ भेट कांहीं
उल्लंघण्यास मज ते प्रभु शक्ति देई ६८
मी जातसें अमित काळ अधःपथानें
तें टाळुनी पतन, सद्गतिला मला ने
जो सत्पथास, चुकला-जन लावतो कीं
त्याच्या परोपकृतिला तुलना न लोकीं ६९
भावी न जाणुन मनीं परिणाम मोहें
ही वंचना[1] विषय सौख्य-द भावुनी हे
मूढा दिसे मधु, परी न दिसे प्रपात[2]
झाली गती मम अशीच मृषा[3] न यांत ७०
सोडून त्या तुजसि जो 'सुखमूळ' साचा
सौख्यार्थ यत्न करणें पथ हा चुकीचा
केल्यास सिंचन मुळासचि, ये फळाला
शाखास ते विफल, हें वदणें कशाला! ७१
अंगीं असे निज-समुद्धर-कार्य-शक्ति[4]
चालू न दे परि अनावर चित्त-वृत्ति
मी होय या वश सुदुर्धर इंद्रियांच्या
वायाच विक्रम-कथा परतंत्र त्याच्या ७२
माझें परीक्षण विभो करितोस बुद्ध्या[5]
ठावें तुला, प्रियचि होति मला 'अविद्या'
नाहीं पहा उतरणार गुणास पूर्ण
घेई परी करुन पात्र कृपेस तूर्ण ७३

१ फसवणूक २ कडा ३ खोटें ४ स्वतःचा उद्धार करून घेण्याचें सामर्थ्य
५ समजून उमजून

स्वत्प्राप्तिचे असति मार्ग जनीं प्रभूत[1]
सारे परी कठिण आचरणीं यथोक्त
आला तसा सुलभसा जप-यज्ञ केला
ये अन्य काय करितां मज दुर्बळाला ७४
एका मनेंच करणें उपचार सर्व
अर्पावया उचित एकचि जीवभाव
सर्वांत मानसिक पूजन हो वरिष्ठ
येतें तयाहि करूं मत्सम जे कनिष्ठ ७५

(अपूर्ण)

## मराठी वाङ्मय

(श्लोक)

भाषा संस्कृत भारतीं प्रगटली सेवा तिची साधना
केली शुद्ध मनें वनीं मुनिजनीं ती पृथ्विला पावना
तीचें वर्णन आर्य केवळ करी ऐसें नसे आजला
मोठें वाङ्मय निर्मिती मुनि, तयें पाश्चात्य तो मोहिला १
वेदांची परमोच्चता, विशदता व्याप्ति स्मृतींची मता
शास्त्रांची वरसूक्ष्मता, विमलता श्रेष्ठा पुराणाश्रिता
काव्यांची अभियुक्तता, कुशलता, सद्बुद्धि तेजस्विता
सारेंही जग वर्णितें अनुदिनीं वाटे तया धन्यता २
हीच्या सर्वहि कन्यका कितितरी देशांतरीं वाढल्या
चाऱ्ही खंडहि बोलती न कळतां भिन्ना मनीं वाटल्या
शोधें अध्ययनें प्रकाश पडला, आतां कळों लागलें
माता संस्कृत आमुची, असुनियां कैसें न पूर्वी कळे ३
वंगाभारति गुर्जरी प्रसवली तीची महाराष्ट्रिया
धर्माचें परमोच्च तत्व म्हणती वेदांत लोकीं जया

तो सालंकृत वर्णुनी अनुभवें केला मराठी भला
नाना ग्रंथमिषें मुनी सजविती साऱ्याहि भूमीतला ४

धर्मांचा जलधी मथी हरिवरी गीतामणी साजिरा
त्याचें रूप कथावया विनटली ज्ञानेश्वराची गिरा
लावी वामन दीपिका, पसरितो दासाख्य गीतार्णव
नामातेंचि तुका कथीत, करिती गीताकराचा स्तव ५

कोणी भारत निर्मिले, सुरस जें आर्यांसि दे स्फूर्तिला
सीतारामचरित्र कोणि रचिलें जें पाववी भूतिला
कोणी भागवतार्थ सूक्ष्म कथिला, काव्यांतरीं रंगलें
लोकीं वर्षुनि ती सुधा स्वकृतिनें राष्ट्रा तयें तारिलें ६

जेव्हां ईशघनप्रसाद वळला लोकांत ये चेतना
भाषा वाङ्मय वाढलीं, प्रगति ती झाली जना पावना
पाया थोर तयावरी उभविलें लोकोन्नती मंदिर
झेंडा श्रीशिवराय रोंवि भगवा त्याच्यावरी सुंदर ७

नानाग्रंथ कितीतरी प्रगटले झाले मराठी जसे
सांगे शोधक राहिले पडुनिया सांदींत कांहीं तसे
आंग्लांच्या स्पर्शीमुळें सरकली त्यांचीहि विद्या पुढें
तीनें पाडियलें मराठिस बळें लोटोनि एकीकडे ८

लज्जा वाटतसे मराठिन लिहीं पत्रें न बोले कुणी
ऐसा दुर्दिन पातला अवतरे विष्णु[१] स्वयें त्याक्षणीं
त्यानें मारुनि कोरडे वरिवरी केली जनीं जागृती
भाषेचा अभिमान चेतवित तो, ज्यानें घडे उन्नती ९

आंग्लग्रंथ पढोनियां कुणि करी भाषांतरें संप्रती
स्वातंत्र्यें इतिहास शास्त्र गणितें काव्यें कथा निर्मिती

---

१ विष्णुशास्त्री चिपळूणकर.

ग्रंथांच्या जलधींसि या मिळति कीं नाना नद्या येउनी
वंगा गुर्जरि भारती झरझरा पूर्णा स्वयें होउनी ११

ऐसें वाङ्मय वाढलें हिमगिरी झाला तयाचा क्रमें
झालें कार्य महाजगीं प्रगट हें कीं पंडितांच्याश्रमें
द्रव्याचा निधि पाहिजे तरि घडे त्याची प्रसिद्धी अतां
त्याची ना अनुकूलता ह्मणुनियां लोकांतरीं मंदता ११

ऐसें पाहुनि साह्यता करिति ते राजे महात्मे जनीं
त्यांचेही उपकार थोर गणिती विद्यार्थसंवर्धिनी
लोकांच्या हृदयीं वसो अभिरुची काव्यांचिया संग्रहीं
होते वृद्धि कवित्वशक्तिस जगीं प्रोत्साहनें सर्वही १२

वाढो वाङ्मय आपुलें प्रतिदिनीं भाषाभिवृद्धी घडो
पूर्वीचा इतिहास पूर्ण उमजो मालिन्य त्यानें झडो
वाढो चंद्र जसा तसा वरिवरी भद्रग्रंथरत्नाकर
टाका कात जुनी धरा तनु नवी साह्यार्थ ये श्रीधर १३

भाषागौरव मानुषी, प्रगतिचें भाषा खरें लक्षण
आहे वाङ्मय शक्ति थोर करिती सेवा तिची सज्जन
भाषा कामदुधा पथावरि तिच्या जे पुष्टिला पावले
त्यांनीं धन्य ह्मणोनियां वरपदा लोकीं असे साधिले १४

———×——— पां. रा. नंदुरबारकर

## कालिकेस

( ज्या गोष्टी निसर्ग नियमानें घडून येतात, त्या मानवी प्राण्याच्या स्वार्थी इच्छेनुरूप कशा घडून येणार ? )

( वृत्तः—शार्दूलविक्रीडित )

उद्यानीं लतिकेवरी सुकलिका होती कुणी डोलत
शुद्धप्रेमभरें स्वभावभगिनीसंगें सुखें क्रीडत;
वाटे तोष तिची बघूनि नयनीं निर्व्याजवृत्तीं मनीं,
गेलों हो ! जडबंधनांतुनि अहा ! निर्मुक्त मी होउनी १
गेलों सन्निध मी तिच्या हळुहळू टाकूनिया पावलें,
तों वातें मुख तें तिचें नवलतापत्रांतरीं लोपलें;
बोलें मी विनयें तिला, "सु-कलिके ! कां तूं अशी लाजशी
मी तों बंधु तुझा, मदीय भगिनी तूं" हें न कां जाणशी ? २
नेते कां मकरंद काढुनि तुझा ती सांग, भृंगावली !
कीं पाहून मलाच बालविनयें आहेस तूं लाजली
कीं ह्या मत्त प्रभंजनें तनुलता जाईल कोमेजुनी,
भीतीनें बसलीस या झडकरी पत्रांतरीं लोपुनी ? ३
सांगे काय ह्मणून तूं निज मुखा दावावया लाजसी
भ्याली तूं असशी उगाच कवण्या निंदापवादा अशी;
किंवा सुंदर विश्व सर्व तुजला निःसार हें भासतें,
या लोकीं ह्मणुनी निमीलन बळें चित्तीं तुला वाटतें ४
आतां तूं करिं एक वेळ तरि गे ! तें रम्य मंदस्मित
जेणें आतुर हें मदीय मन गे ! होईल उल्हासित;
तूं माझी करशील पूर्ण भगिनी आशा अशी निर्मल
वाटे मानववासना तुज खरी स्वार्थी तशी दुर्बल" ५
आतां मी तुजपासुनी निज मनीं ही बांधिली कल्पना
जे लोकीं घडतें निसर्गनियमें, तेथें वृथा याचना;
वाटे मी तुजला वृथा शिणविलें, मद्रंजनाकारणें,
आतां प्रेमदयार्द्र-पूर्ण-हृदयें मन्मंतु हा साहणें ६

——×—— त्र्यंबक अनंत देशपांडे

## *कै० श्रीएकनाथास

(दिंडी)

करुनि जीवनकलहास दिवस सारा
कागदांचा धारुनियां पसारा
त्रस्त हृदयें परतलों गृहालागीं
"मनुज परवश जो खचित तो अभागी" १

पथीं होतां स्मृति मनीं सुंदरीची
किती हृदयीं दाटल्या हर्षवीची?
"स्मरण मातेचें आणि कामिनीचें
जनां सर्वां लाविते वेड साचें!" २

रंजवाया दुःखिता मना गेहीं
सखीसंगें रंगेन भाषणांहीं
असें पंथीं स्मरतांच मन्मनाला
हर्ष झाला बहु, शीण लया गेला! ३

गृहीं आलों बोलिलों बालकास
"कुठें गेली रे!" "देवदर्शनास"
असें ह्मणुनी बिलगलें बाळ मातें
"शिशुस्नेहें मन किती अहा! धातें!" ४

बाळ क्षणभर घेऊन खेळवीलें
बाल-भाषेनें त्यास रंजवीलें
बघुनि वात्सल्यें हृदयिं सांठवीलें
जगत्प्रभुचे उपकार आठवीले! ५

सखी नाहीं परि घरीं चित्त होय
वाट बघुनी बहु शीण वदूं काय

---

* कै० एकनाथपंत रेंदाळकर.

घालवायातें वेळ वाचण्याला
करीं घेई मंदारमंजरीला ! ६

खरी प्रतिभा ती मधुर शब्दशैली
वाचतां मन रंगलें सौख्यशैलीं
बहुत केलें मग काव्यसुधापान
दृश्य जगताचें नुरे लवहि भान ! ७

गोड जीवन तुजमुळें प्राप्त झालें
रूक्ष-मानस तूं पुष्पयुक्त केलें
स्फूर्ति दिधली मज तुवां एकनाथें
म्हणुनि धरिलें मी करीं लेखणीतें ! ८

काव्यशेखर

---

## मुग्धाबाला

(श्लोक)

कर्तव्याच्या निबिड विपिनीं हिंडतो कांत दूर,
मुग्धाबाला भुवनिं झुरते, येत दुःखास पूर,
दांपत्याच्या प्रणवकुसुमां हांसवी पुष्पमास !
शोकार्ता या विरहव्यथितां देत उल्हास आस ! १

शय्यास्थानीं नयन मिटतां आठवे तो सुदीन
जेव्हां भेटे रमण रमणि प्रीतियोगें नवीन
संसाराचें सुमन फुलतें सेविलें ज्या क्षणाला !
सत्यस्वर्गी अमित लुटिलें कल्पनेच्या सुखाला ! २

शृंगाराच्या विविध लहरी, गोड तैसा विनोद,
चित्तीं येतां, क्षणभर रमे चित्त होई प्रमोद,
प्रत्यक्षाची परि बघुनियां मोकळी हाय ! शेज,
डोळे येती भरुनि, कढतो जीव, हो शांत नीज ! ३

शय्यास्थानीं तळमळ करी देह उन्निद्र, फार,
संसाराच्या भयद विपिनीं गेहिनी एक सार!
कर्तव्याचा पथ विकट हा आणि अज्ञात भावी
तारुण्याच्या सुखद भुवनां हाय! तो आग लावी! ४

कर्तव्याची भयद तरणी नीट कैशी तरेल?
दांपत्याची विरहरजनी पूर्ण केव्हां सरेल?
अज्ञाताचा तुटुनि पडदा चित्र भावी सुखाचें!
हातीं केव्हां तरि विभुवरा, सांग तें यावयाचें? ५

———×———

मनोहर

## * असें कां?

( श्लोक–भुजंगप्रयात )

हरिश्चंद्र जीवापरी जीस मानी
सती थोर तारा स्वकांताभिमानी
अशांतें मुनीनें छिथा हिंडवावें
अहाहा! असें कां जगीं या घडावें? १
असे एक राया नळाची जिवाची–
प्रिया जी भजे मूर्ति एका नळाची
अशांतें कलीनें छिथा नाचवावें
अहाहा! असें कां जगीं या घडावें? २
त्रिकालज्ञ जो गौतम श्रेष्ठ लोकीं
अहिल्या प्रिया स्त्री तयाची विवेकी

* "असें कां" व "संकोच कां" ह्या दोन भक्तिप्रधान कविता भक्तिरसाच्या भोक्तयांकरितां प्रसिद्ध केल्या आहेत. ऱ्हस्वाबद्दल दीर्घ आणि दीर्घाबद्दल ऱ्हस्व अक्षरें योजण्याचा हक्क निरंकुशत्वानें कवींस पूर्वापार मिळालेला असूनही त्याचा आश्रय व्यर्थ केलेला नाहीं.

अशांच्या वियोगा सुरें त्या रचावें
अहाहा ! असें कां जगीं या घडावें ? ३
प्रिय श्रीहरीचें तया पांडवांची
प्रिया द्रौपदी पांडवीं भक्ति जोची
विराटीं वियोगें तयां दुःख व्हावें
अहाहा ! असें कां जगीं या घडावें ? ४
जगज्जीवरामप्रियप्राण कांता
अनन्य स्मरे रामचंद्रास सीता
अशा दंपतींतें वियोगें छळावें
अहाहा ! असें कां जगीं या घडावें ? ५
सुदैवें घडे योग, तैसा वियोग-
कुदैवें घडे, हा असा दैवयोग-
सुटेना सुरां मानवां अंतवंता
सहावा हृदस्था स्मरोनी अनंता. ६
हरी सर्वकर्ता हरीचीच सत्ता
असे जीव आधार केला निमित्ता
हरी जोडितो तोडिलें जें कुदैवें
समर्था स्मरावें तया भक्तिभावें ७

———×———

ह. म. समर्थ

## * संकोच कां ?

[श्लोक–वसंततिलका]

आधीं स्तनांत विषसंचय पूर्ण केला
मारावया मग उरीं धरिलें तुम्हांला
त्या पूतनेसहि दिली गति लोकराया
संकोच कां मजवरी करुणा कराया ? १

---

* " असें कां " ह्या काव्यावरील टीप पहा.

नाना प्रयत्न तुझिया निधनार्थ केले
दुष्टें स्वदुष्टपण भूवर गाजवीलें
कंसा तयाहि दिधली गति देवराया
संकोच कां मजवरी करुणा कराया? २

ज्यानें अनेक अपमान सभेंत केले
दुष्टोत्तरें विविधही तुज निंदियेलें
त्या मुक्ति सत्वर दिली शिशुपालराया
संकोच कां मजवरी करुणा कराया? ३

कोपोनिया तुजवरी भृगु लाथ हाणी
वेगें उरीं तव दयानिधि चक्रपाणी
तूं लाजसी न पद तें हृदयीं धराया
संकोच कां मजवरी करुणा कराया? ४

डोहीं तुझें हनन दुष्ट मनांत आणी
फूत्कारुनी करितसे विषपूर्ण पाणी
त्या कालियाप्रति दिली गति गोपराया
संकोच कां मजवरी करुणा कराया? ५

आजन्म पातक अजामिळ आचरोन
अंतीं मुखें जरि वदे तनया स्मरोन
'नारायणा' स्मरण तेंहि वदा न वाया
संकोच कां मजवरी करुणा कराया? ६

राघूस नाम गणिका बहु आवडीनें
ठेवी तुझें वदतसे वदवी मुखानें—
त्याच्या, ह्मणोनि तिज मोक्ष दिलास राया
संकोच कां मजवरी करुणा कराया? ७

नानापरी श्रमविले सुर, रावणानें
सीतेसही पळविले छळिलें मदानें

त्याला समर्थ ! दिधली गति रामराया
संकोच कां मजवरी करुणा कराया ? ८

———×——— ह. म. समर्थ

## गाऊं नये त्यापुढें

(शा० वि०)

वाहे निर्झरिणी जलौघ विजनीं पाषाणसंघांतुनी
काव्यें निर्मळ ऐकुनी तटिनिची जे जाहले निर्मळ
त्यांच्यासन्निध बैसुनी सुकविता गावी मनापासुनी
लोकीं जे भरले मलीनहृदयी गाऊं नये त्यापुढें १
वृक्षांचे समुदाय वायुलहरीसंगें मुदें डोलती
पुष्पांचा मधुगंधरूप अपुला उल्हास जे टाकिती
तच्छायेंत बसून उत्कटमनें काव्यें ह्मणावीं सुखें
श्रेष्ठत्वास उगीच जे मिरविती गाऊं नये त्यापुढें २
एकाचा कल-शद्ब ऐकुन दुजा गानास आरंभितो
ऐसा मत्सरहीन पक्षिनिकर स्नेहाळ तो वाटतो
त्यांच्या आवडिच्या लतातरुतळीं गावें मुदें त्यासवें
यच्चित्तीं अपुलाच गर्व भरला गाऊं नये त्यापुढें ३

———×——— दु. आ. तिवारी

## भामिनी

(दिंडी)

तुझ्या प्रीतीच्या रुचिर हिरवळीला
व्यर्थ सजलों मी पायिं तुडविण्याला
असा स्मरतो कां समय भामिनी गे !
तुझ्या वदनें मद्दोष आयकूं दे १

तुझ्या इच्छेच्या ललित लता वेली
कधीं खुडिल्या वा ओढियल्या खालीं
असा आठवतो सांग कां प्रसंग ?
मनोभंगें तव, ममहि मनोभंग १
मनःकांक्षिच्या बकुलमंजरीला
रसिक बकुले ! पद दलित करायाला
कधीं स्मरलों मी स्मरण होत नाहीं
तुझ्या स्मृतिदुःखीं स्थान मला देई ३
कुमुद धवलांगे ! धवल भावनेच्या
मनोहारिणि ! अभिरम्य मनोवांच्छा
विरस केला कधि बोल एकदां गे !
खिन्नतेच्या पथि जीव फार भागे ४
मंगलाशेचे हार गुंफियेले
एक तरि मी तत्पुष्प विखरियेलें
तुझ्या स्मृति-फलकीं एक तरी ओळ
सत्यवादिनि ! असलीहि तरी बोल ५
स्वर्गसौख्याचे दिवस जीविताचे
तुझ्या सहवासीं सकल जावयाचे
आज त्यांतिल दिन एक हा गळाला
सांग तुझिया कां मानला मनाला ६

—————×————— दु. आ. तिवारी

## पर्जन्यांतील मूक कोकिळेस

( मंदाक्रांता–वृत्त )

गेले कोठें त्यजुनि तुजला कोकिळे ! मंजु गान ?
वीनावाणी फिरसि विपनीं घेउनी पूर्ण मौन ?

आलापानें मधु निज तुवां रंजवीलें जनातें;
आतां केवीं मुकलिस सुधातुल्य मंजु स्वनातें? १
सौभाग्याचा सकल जनिता त्यागुनी कीं वसंत
जातां तूतें पडसि झुरणीं मानसीं घेसिं खंत?
* तत्सौख्यीं त्वां क्षिति न धरिली संतती-पोषणाची
झाली आतां स्मृति तुजसि कां आपुल्या बालकांची? २
पर्जन्याचें उदक पिउनी शैत्य बाधूनि तूतें
घेई किंवा तव मृदुल ना कंठ आलापनातें?
मेघांची ही भयकर नभीं गर्जना आयकून
भीतीनें कां हळवट जिवा! जाय वाणी खिळून? ३
कंठीं नाचे मृदु रव तुझ्या येउनी माधवांत
जाई किंवा सकल गुणसा त्यासवें गात गात
आनंदाचे दिन सुरभिचे सर्व गेले निघून;
दुःखार्ता तूं रमविसि कसें लोकिं गाऊन गान? ४
संतोषोनी सकल अवनी मंगलाशीर्वचातें
देती झाली परिसुनि तुझ्या रम्यशा गायनातें
आतां कोणी पुसति न तुला आदरें ना विलोकीं;
होतां वित्तच्युत जन पवे धिःकृती पूर्ण लोकीं! ५
ठावा नाहीं स्वपर अथवा उच्चनीचांत भेद;
त्वद्गानानें सकल जनता जाहली तुष्टचित्त!
साहीं धैर्यें अकरुण दशा; चक्रनेमिक्रमानें-
सौख्यात्रे बा! सुदिन तुजला येतिल श्रीकृपेनें! ६

———×——— पां बा. शिंदे

* वसंतऋतूंत कोकिला अंडीं घालतात आणि तीं कावळ्यांच्या कोट्यांत त्यांच्या अंड्यांत नेऊन ठेवितात.

दुसरें वर्ष माघापासून सुरू झालें !

पहिल्या वर्षांत प्रचंड लोक-जागृति करणारें

संपादकः— निफाडकर व दु. आ. तिवारी

# लोकमान्य

वार्षिक वर्गणी रु. ३।≈ एक पुस्तक बक्षीस.

मासिक यापुढें स्वातंत्र्याचा वाहुटा साऱ्या मराठे मंडळांत नेणार. दोन कादंबऱ्या, अनेक गोष्टी, खरमरित लेख, प्रासंगिक कविता, प्रासंगिक हृदयस्पर्शी चित्रें अशा सुंदर स्वरूपांत व लो. टिळकांचा मंत्र, व म. गांधींची भरारी हें मासिकांत येणार. वर्गणी भरा व जाहिराती द्या.

व्यवस्थापक लोकमान्य, धुळें.

---

# आर्य स्त्री प्रबोधमाला

यांत आर्य स्त्री रत्नांचीं सोप्या व सरळ भाषेंत चरित्रें येतात. तसेंच मधून मधून नीतीपर व उपदेशपर वेंचे, गोष्टी, कथानकें वगैरे दिलीं जातात. स्त्रियांना सद्यःस्थितीला कार्यक्षम करण्याच्या हेतूनें ही माला निघाली आहे मालेची वार्षिक वर्गणी ट. हं. १ रुपया आहे. 'हळद कुंकू' 'पतिसंजीवन' अवलाभक्ति-प्रभाव हीं मालेचीं बाहेर पडलेलीं पुष्पें बहारीचीं आहेत.

सौ. सरस्वतीबाई गाडगीळ.

संपादिकाः—आर्य स्त्री प्रबोधमाला

पो.—सांगली

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

## काव्यरत्नावली मासिक पुस्तक.

हें मासिक आज ३६ वर्षे चालूं आहे. यांत हल्लींच्या नामांकित कवींच्या कविता व काव्यें येतात. दर वर्षी तीन हजार कविता छापून निघते. वर्षारंभ जानेवारी. काव्याचा प्रसार व्हावा ह्मणूनः—एका प्रतीस ट. व्ही. पी. रजिष्टर सह १॥ रु.

दोन प्रतीस ( एकाच नांवावर ) " " १॥। रु.

तीन प्रतीस ( एकाच नांवावर ) " " २ रु.

चार प्रतीस ( एकाच नांवावर ) " " २। रु.

मागील किरकोळ सालचीं आयतीं बारा अंकांची बांधलेलीं पंधरा पुस्तकें शिल्लक आहेत. रसिक काव्य रसिकांच्या सोईसाठीं कमी किंमत केली आहे. प्रत्येक पुस्तकास बारा आणे किंमत. शिवाय टपाल व्हीपी रजिष्टर खर्च निराळा. सर्व पुस्तकें एकदम खरेदी करण्यास सवड नसेल तर दरमहा दोन दोन पुस्तकें पाठवूं. पंधरा पुस्तकांची एकदम मागणी केल्यास ७ रुपयांत देऊं. पाठविण्याचा खर्च निराळा.

नारायण नरसिंह फडणीस

जळगांव पू. खानदेश.

---

# अवश्य वाचा.

## चुकूं नका.

वर्गणीदारांनीं पत्रव्यवहार करितांना पत्रावर अंकाच्या प्रती व रजिष्टर नंबर प्रत्येकवेळीं अवश्य लिहित जावा. अंकाच्या छापील पत्त्यावर रजिष्टर नंबर छापलेला असतो. नंबर असला ह्मणजे पत्राचें उत्तर तावडतोब देतां येतें.

संपादक, काव्यरत्नावली जळगांव.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळांनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती ।
त्या त्याच अर्थांप्रति दावितातीं ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बावजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ]    आगष्ट सन १९२३    [ अंक ८ वा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## अनुक्रमणिका.


शिव महिम्न [ ह. म. समर्थ ]......................१६९

मुशाफर [ मनोहर ]......................१७५

महाराष्ट्रास आवाहन [ ग. मो देव ]......................१७९

सख्यभक्ति [ अनुवादक ]......................१८२

तीन काळ [ आनंदीरमण, दापोली ]......................१८५

ही [ दु. आ तिवारी ]......................१८७

बाई निद्रे ! [ श्रीनिवास पंढरीनाथ नांदेडकर ]........१८९

आकस्मिक [ प्र० ना० श्रौती ]......................१९१



मुलांमुलीकरितां अत्यंत उपयुक्त असें सचित्र मासिक

# हिंद-कुमारी

[ वा. व. ट. हं. सह २८४ व्हो. पी. नें २८७ ]

**संपादिकाः—डॉ. सौ, इंदुमतीबाई नाईक एल्. सी. पी. एस्.**

**प्रकाशकः—का. रा. पालवणकर 'हिंदकुमारी कार्यालय'**

**गिरगांव—मुंबई**

**व. म. आ. नें पाठवून त्वरित नांवें नोंदवून राष्ट्राचे आधारस्तंभ जीं मुलें त्यांची सर्वांगीं सुधारणा करून घ्या.**

# काव्यरत्नावली

## अंक ८ वा.

## शिव महिम्न.

( श्लोक-पृथ्वी )

महेश महिमा तुझा मज अगम्य ठावा नसे
स्तवार्थ ह्मणुनी नसे उचित मी जरी, ते तसे[1]
कृतार्थ विधिदेवही स्तव करून झाले कसे
यथामति करी तुझें स्तवन तो न दोषी दिसे १
अगाध महिमा तुझा गुण अनंतही माउली[2]
स्वरूप तव वर्णितां श्रुतिहि 'नेति' संवादली;
यथार्थ कवणा घडे स्तवन वा तुझें चिंतन
तथापि चरणीं सुधी कवण तो न दे वाङ्मन? २
महामृतमया गिरा सहजही निघे जेथुनी
अशा तुज करील कां चकित वाग्विधीची मनीं?
कुठें मम अशुद्ध ही विमल हो असे चिंतुनी
नियुक्त करितां गिरा तव गुणांचिया वर्णनीं ३
तव श्रुतिमनोहरा त्रिगुणयुक्त ऐश्वर्य जें
चराचर रची, धरी सहज, संहरी, तें खुजे[3]

---

१ अनभिज्ञ २ वेदमाता ३ अज्ञ, लहान

अभद्रमति कैक हो! वरद! वर्णिती गर्जुनी
वरूनि मधु आंतुनी कुटिलशा वृथाभाषणीं ४
कितीक हतधी तुझें विभव निंदिती, काढिती
कुतर्क बहु, मोहिती जन विमूढ, ते बोलती
कसें जग रची, कशी तनु धरी, करी कोण तो
उपाय तरि आसरा कवण द्रव्यही योजितो? ५

अनीश असतील कां अवयवस्थिता वस्तु या
न जन्मचि कसा, नसे मृति कशी समस्ता तयां?
वृथाचि वदणें नसे अतिविचित्र हें[3] निर्मिता;
विमूढ जनसंशयें बुडतसे स्वयें तत्वता ६

त्रयींत, इतरत्रही कपिल सांख्य इत्यादिनीं
स्वरूप तव वर्णिलें 'शिवद हेंच' संपादुनी
यथारुचि अधीर ते परि तुलाचि पावावया
जशा जलनिधीस त्या सरळ-वक्रगामी नद्या ७

मनुष्य-शिर-मालिका, परशु, चर्म, खट्वांग तें
चिताजनित भस्म तें, फणि, महोक्ष, मायापते!
तुला प्रिय, न मोहिती विषय आत्मरूपीं-रता
स्वशक्ति नयनें तुझ्या सुरहि होय संपादिता ८
ध्रुवाध्रुव-विचारणा करुनिया वदे एक हें
असे ध्रुव, वदे दुजा ध्रुव न विश्व मिथ्याच हें,
ध्रुवाध्रुवहि बोलतो जन कुणी, नसे एकता
स्तवीं मज न लाज ही खचित धीट वाचालता ९
तपोनिधि! हरी वरीं[1] विधिहि तो करी खालतीं[2]
प्रयत्न बहु त्यां कळे महति वैभवाची न ती,

१ स्वर्गीं २ पाताळीं ३ जग

तुझी सगुण-भक्ति ते करुनिया तुला पावती;
मिळे न तव सेवनीं कवण भाग्य भक्तां क्षितीं ? १०

अगा ! त्रिपुरमर्दना ! त्रिभुवनीं बळें आगळा
नसे दशशिरा, जयें सकळ लोक लाथाळिला,
प्रचंड बळ तें तसें तवचि पूजनें पावला,
समर्पण करी शिरें कमलशीं न कांचावला ११

अचाट बल पावला तुज भजोन, केली मही
अनाथ, उलथावया तव निधान कैलासही
सजे अधम, दापुनी गिरि तदा पदाग्रें दिलें
अधःपतन रावणा, कुजन भाग्य येतां चळे १२

यथाक्रम समस्तही महिपती बळें जिंकुनी
न इंद्रपद दिव्य तें बहुत बाण मानी मनीं,
विचित्र ह्मणवे न तें तव पदींच तो लोळतो,
धरी पद तुझें पदा जन न कोणत्या पावतो ? १३

असह्य विष उद्भवे, प्रळय-भीति देवासुरीं
तईं प्रगटलीं, महा-विष पिऊन तें सत्वरीं
अनर्थ चुकवा हरा ! जरिहि कंठ झाला निळा
जगद्भयनिवारणा अशुभही न देतें मळा १४

अनंग विजयी वृथा शर न होय त्याचा कधीं
सुरासुरनरीं, तुझेवर शरा नियोजी जधीं
तुला इतर देवतासम गणून तें शीणला
खरोखर जितेंद्रियीं कवण मंतु होतो भला ? १५

महेश जगरक्षणास्तव जरी तुझें नृत्य तें
मही थरथरे पदें, गगन तारकायुक्त तें

चळे भुजजवें, जखानिहत होय स्वर्लोक तो
महाविकल, भीषण प्रभुपणा खरा वाटतो १६
वियत् भरुनिया खुले अधिक तेथ तारांनिशीं
समुद्रवलयांकिता परि धरा करी द्वीपशी
प्रवाह असला दिसे अणुचि मस्तकीं आपुल्या
करी प्रगट हें तुझी महति निश्चयें स्वामिया १७
रवींदु वसुधारथीं उभय चक्रसे योजिले,
करा विधिहि सारथी धनु करा गिरीचें भलें,
हरीच शर मानिला त्रिपुर-मर्दनीं, काय तो
तृणीं श्रम! अचिंत्यही प्रभु करी स्वलीलार्थ तो १८
हरा हरि करी तुझ्या चरण-पूजनातें जई
सहस्र कमलीं कमी कमल एक झालें तई
स्वनेत्र कमलें करी स्वपण-पूर्ति, तेणें मिळे
सुदर्शन सदा धरावन घडे जयाच्या बळें १९
ऋतू विलय पावती, फल पुढें जनां देतसां
यथार्थ समयीं, तुझी सकल कर्मसाक्षी असां,
श्रुतींवर तुह्मांवरी भरंवसा पुरा ठेउनी
करी विविध कर्म तें जन मनीं फलें इच्छुनी २०
क्रिया-कुशल दक्ष तो ऋषि सुरादि यज्ञास्तव
अनेक मिळवी, करी मख, न मान ठेवी तव
क्षणांत मख भंगिला, त्वरित नाश देते क्रिया
खरोखर जनीं नसे रचियली जरी श्रद्धया २१
प्रजापति सुतेस्थळीं सुरतिभाव ठेवी, धरी
मृगाकृति, पळे मृगी, मृगहि मागुनी अंबरीं
तयावर तुह्मी तदा प्रखर बाण सोडा, पळे
त्रिधीहि, अजुनी परी न शरवेध देवा! टळे २२

स्वरूप निज मानुनी वहु, धरी करीं चाप तें
तृणासम करा स्मरा त्वरित भस्म, हें पाहते
उमा तवचि अंगना जरि तुला ह्मणे स्त्रैण ती
पतीस युवती तरी सकलही अशा वानिती २३
श्मशान रतिभूमि ती, संवगडी भुतां ऑगळा
चिता भसित लेपना, मनुजमुंडमाळा गळां
हरा! अशुभ यापरी असुनिया दिसाया जनां
सदोदितहि ओपिशी शुभचि केलिया कीर्तना २४
मनास्थिर करोनिया हृदय-गर्भदेशीं यती
समाधिसुखसागरीं बुचकळ्या जधीं मारिती
प्रसन्न-नयनीं गळे जळ, उठोनि रोमांच ते
तनूवर, करी असें परम वस्तु तूह्मीच ते २५
त्वदर्चन करी स्मरे सुजन अंतरीं रंगला
रवींदुपवनाग्निभूजल तनुस्थ-रूपें तुला,
अशी न मिति-दर्शकें सुखवितात नामें मला,
दिसे न तुजवांचुनी स्थल न वस्तुही मंगला २६
त्रयी, त्रिभुवनें, हरा! त्रिविध देव, वृत्तित्रय
असा बहुत गूढही तव तुरीय रूपाशय
करी प्रगट ओम् जयीं अउम तीन मात्राक्षरें
सुसूक्ष्म रव सूचवी शरणदा तुझें रूप रे! २७
भवादि तव वर्णिते श्रुतिहि अष्ट नामें असा
अतिप्रिय सुरासुरां सकल मानवी मानसां
महेश! असशी खरा भुवन-जीव-चैतन्य गा!
प्रणाम तुजला करूं सतत आत्मया सर्वगा! २८
नमो वननिवास, जो जवळ जाणत्या, नेणत्या
सुदूर तुज त्या नमो मदनमारका! क्षुद्र त्या

नमो तुज, लहान तूं अति-वयस्क तूं त्या नमो !
परोक्ष अपरोक्ष तूं तुज परात्परातें नमो ! २९
रजोगुणबळी भवा तुज नमो जगत्संभवा !
नमो तुज हरा ! तमोगुण-जगद्विनाशोद्भवा !
नमो मृड जगत्स्थिति-प्रभव सत्वमूलाकृते !
नमो शिव परात्परा त्रिगुणशून्य सर्वात्मते ! ३०

कृपानिधि न शुद्ध मन्मति अविद्यही मी खरा,
अनंतगुण वर्णवे विभव केविं या पामरा,
असा विकल चिंतनें बहु परी करीं घेउनी
पदीं कुसुमहार हा रचवुनीहि घ्या अर्पुनी ३१

मदाक्रांता

एका ठायीं जलनिधिजला सर्वही सांठवोन
विद्यादेवी असितगिरिसमा कज्जलें तें भरोन
पृथ्वीपृष्ठीं सुरतरुचिया लेखणीनें लिहील
देवा ! रात्रंदिन गुण तुझे नातरी संपतील ३२

## अंतिम प्रार्थना

मालिनी

सकल भुवनकर्त्या, मंगला, दुःखहर्त्या
अखिलहि शुभदेत्या निर्जरां आणि दैत्यां
भवजलधितरी तूं पुष्पदंताभिमानी
त्वरित मज समर्था उद्धरीं शूलपाणी १

———×———

ह म. समर्थ

ह्या भाषांतरावर श्री भवानीशंकराचें अंकुशत्व कल्पिलें आहे, तस्मात् येथें कविनिरंकुशत्व सहसा सांपडणें नाहीं; चुकून कोठें शिरलें असेल तर त्याबद्दल कवींनी किंकरास क्षमा करावी.

# मुशाफर

[अंक ५ व्या वरून]

## सफर दुसरी

चालीवर

स्वार मराठी लुटुनी आले सुरत फिरंग्याची!
समर्थचरणीं रास घातली सोन्या मोत्यांची!
मूर्तिमंत त्यागास कशाची परि पर्वा लक्ष्मीची?
तुडुंब भरली, चिद्रत्नांनीं झोळी नित दासांची!
स्वराज्यसेवक करडे, नमिती राजगुरूंना प्रेमें,
सद्भावानें माथां धरिती मग आशीर्वच-कुसुमें
"सुकलें कां परि आज हांसरें कुंडलचें हें फूल?
मलूल दिसतो कां हा राया? लागे कसलें खुळ?
घोड्यावरची दौड मारुनी, वद, दमसी कां बाळा?
साताऱ्याहुनि कुंडल वाटे खेळ तुला वेल्हाळा!"
तोंडामधुनी शब्द फुटेना, आला भरुनी ऊर!
मनांत प्रेमा, वदनीं लज्जा उठवी परि काहूर!
लपवूं तुमच्यापासुनिया मी काय, समर्था, देवा?
विषयीं रुतला सन्मार्गावरि, स्वामी, बालक ग्यावा
क्षमा करावी, चित्त नावरे मज हें बहु ओढाळ!
नाद घराचा, मनास करितो, प्रभुराया, बेताल!
सांगायाला लाज वाटतें, समर्थचरणाजवळीं,
विवाह शेजेवरती झाली वैराग्याची होळी!
विषयांचा झंझात घालितो मनांत या थैमान!
गुरुचरणावर चित्त बसेना अजुनी हें नादान!
कामाचा पर्जन्य झोंपवी मनःप्रवासी दीन!

विषयांच्या मृगजळांत रमतो मनोरथांचा मीन"
क्षणभर कौतुक मात्रें दासांची ती मूर्ती
अश्रू ढाळी, चरणावरती, पश्चातापी भक्ती!
"वैराग्याचा दीप मालवी, क्षणांत कामुक वात!
अगाध विद्वत्ताही जोडी विषयापुढती हात!
घरास जाऊं द्या, राया, हा कुंडलचा सरदार
निसर्ग नाहीं उल्लंघाया कोणाला येणार?"
समर्थचरणां, छत्रपतींना, वंदन करुनी वीर
टाच मारुनी घोड्याला मग धावे जेविं समीर!

* * * *

"कधीं येतील आमचे, कुंडलचे सरदार?
एकलीच मी पुजूं कैशी नवी मंगला गौर?
स्वारीचा हा मनास, बाई, किती तरी परि नाद?
मोहिम होतां परतायाची कोठुनिया मग याद?
कर्तव्याच्या पायीं बाई प्रीतीचा वध केला!
परतुनि केव्हां घरास येइल, जीवाचा अलबेला?
शिवरायांच्या तैनातीला नसती दुसरे स्वार
म्हणुनी नेला कां हा माझा प्राण-जिवाचा प्यार?
या, रणवीरा, घरास आतां थकला रडुनी जीव!
वाट बघावी किती? जिवलगा येई ना कां कींव?
जगांत खोटें हंसुनी, जावें एकांतांत रडाया!
स्मरुनी स्वारी स्वारीवरची अबला जीवचि वाया!
आला घोडा दौडत हा! गे! कोणाचा जासूद?
कशास जागी करितो, आतां निजली रायी गर्द!
दरवाजाशीं टाप कुणाच्या घोड्याची ही वाजे?
आले कां ते खरेंच सदनीं प्रिय प्राण माझे?"

शेजेवरुनी उठे जों, तों कोणी उघडी द्वार,
क्षणांत घाली मिठी गळ्याला, प्रीतीचें सार!

* * * *

"सांग, कशी तुज गेली पहिल्या भेटीची रजनी"
"आयुष्याच्या सौख्याची जी वदती जन जननी

या रात्रीची स्मृति द्यायाला, एकच मिटला डोळा
भरल्या संसारांत खुणावी, हृदयाच्या राणीला!
अधीर अगदीं पुरुषांची हो, सखये, विषयीं प्रीती
उतावळ्यांना धीर निघेना परि मग, सुटतां गांठी

चार युगांचा स्वर्ग सुखाचा, या पहिल्या रात्रीला
लुटावयाला खुशाल जावें, सातहि पाताळाला!
मिटल्या ओठीं गोष्ट कशाची होते वारंवार?
सुरम्य समरीं धीर न धरवे, जेव्हां नाचे स्वार

भरुनी आल्या छातीवरती, दमलें शिर ठेवोनी
रणवीराची गुर्मी जोडी अबलेपुढती पाणी!
या रात्रीची महती सांगूं, गडे, कशी मी तुजला?
धर कांताचा हात आणि जा प्रेमाच्या गांवाला?

कळेल तुजला, लोटुनि देतां महालांत एकांतीं!
या रात्रीची महती सखये, तुच्छ वाटती त्या मुक्ती!"

* * * *

"पोर पाहुनी अशी एकली भयाण या रानांत!
काळें वेरें मनांत आलें तुझ्या, मुसंड्या येथ?

शिवरायाचा सह्याद्री हा नाहीं अझुनी निजला!
तुझी फिरंग्या, तोडायाला दाढी वेळ न त्याला!
काय पाहसी ऐसा! रेड्या, वटारुनिया डोळे,
धनी घराचे, जों न पातले जा जा कर मुख काळें!

हास, अधिंधा निलाजऱ्या, पण शेवटचें हें हंसणें,
ऐक जाहलें स्वारीचें हें घरालागुनी येणें
काय? कुणी कां नाहीं आलें? -मनास पडली भूल!
ये तर थोडा पुढें घेतली उडी दरी जरि खोल,

तुरी देउनी हातावरती तुझ्या, मराठी पोर-
पहा, चालली कड्यावरोनी, आवर आपलें ढेर!"
"पळशील कुठें आतां? असली नाजुक नवती नार
मिळवायाचा मोका येतो, असतां परि तकदीर!

दख्खनची ही मंजुळ मैना नेतों हिंदुस्थानीं
लुटावयाला, खूपसूरत ही प्यारी उमदी ज्वानी!"
"चूप मराठी कट्यार ही बघ घुसली घ्याया प्राण"
"बोथट झाली कट्यार! वाटे चिलखत अंगीं संपूर्ण"

"धांवा, धांवा, राखा कोणी, या गाईची लाज,"
"भयाण रानीं तुला चढवितों, सौख्याचा बघ साज!
फुलांत फुलत्या तारुण्याच्या, रस हा नव नवतीचा!
लुटावयाला मधुकर आला, बघ, तव सौभाग्याचा!"

नयनें भिडतां, ओळख पटली छपलेल्या सोंगाची,
फिदा जाहली स्वारावरती राणी मग हृदयाची!
"काय सोंग हें, बाई, असलें? क्षमा करा दासीला,
वदूं नये ते वदलें सखया भिउनी या सोंगाला"

हांसत हांसत नव बालेच्या स्वार गळां मग पडला
नाजुक गालीं बहार आला क्षणीं गुलावाला!
हात घालुनी गळ्यांत वदला, "रानीं सुंदर पोर,
बघुनी नाहीं भुलावयाचा कुठला अट्टल चोर?
तुरी देउनी कां न जात ही हातीं जातां पोर?"
"चोरानें मज धरिली रानीं, आतां या शिरजोर!"

"गगनाच्या रानांत सांपडे ही चवथीची कोर!"
"कां न करीना नाच प्रीतिचा? आतां नाजुक मोर?"
कृष्णाकांठीं कुंडल आलें धावुनि प्रेमासाठीं!
मनोहराचा जीव धांवतो सात्विक प्रेमापाठीं

———×——— मनोहर

# महाराष्ट्रास आवाहन

श्लोक

सृष्टीचा लडिवाड बालक महाराष्ट्रास पाचारितों,
साराही कविवर्ग कीर्ति अतुला ज्याची सदा वानितो,
जागा हो चल ऊठ सत्वरचि हो ठोकून छातीपुढें
शत्रूंना समरांत जर्जर करी, चारी तयाला खडे १
वीराचे परि या स्वराज्य-समरीं दंडास ठोकून ये
आवेशें तुझिया रिपू थरथरा कांपोत सारे भयें,
राखीं पूर्वज-कीर्ति जी विलसली व्यापून दिङ्मंडला
कीर्तीचा ध्वज आपुलाहि फडकूं दे घे यशा निर्मला २
सोनेरी इतिहास-पत्र चमके त्वच्छौर्य-संकीर्तनीं
तें तें पूर्वज तेज रे चमकवी तूं आज त्वद्वर्तनीं;
षंढाचे परि तोंड तूं लपवुनी ना पूर्वजा लाजवी,
स्वातंत्र्यास्तव शौर्य-वीर अवघे विश्वास या दाखवीं ३
स्वातंत्र्यास्तव संगरीं पहुडले विश्रांतितें पावले
आनंदे हिरवे प्रवीर धरणी-माते पदीं वाहिले-
तेजस्वी सुमनें अनर्घ्य, सुभगा! ते आठवी कोवळे
आतां बाळ सुधीर वीर सगळे, तेजोगुणें आगळे ४
नाहीं का वद तूंच जन्म दिधला मागें सहस्रावधी
वीरां त्यां खलु पारतंत्र्य चिरडीतां ज्या न कालावधी

तेव्हां रानवटांस केवळ करीं घेई शिवाजी प्रभू
संस्थापोन स्वराज्य जेथ विलसे ती ही महाराष्ट्र-भू ५
तानाजी नरवीर सिंहगडिंची कीर्ति-ध्वजा येउनी
गेला स्वर्भुवनीं विमानिं बसुनी तें दृश्य आणी मनीं
सूर्याजी समशेर नाचवित ये स्वातंत्र्यसंरक्षणीं
तेव्हां सिंहगडीं गडी सुभट ते येती कसे धांवुनी? ६
देहाची करि ढाल खिंड लढवी रक्षी शिवाजी नृपा
तो बाजी समरीं कबंधच लढे, त्याची असूं दे कृपा
शत्रूला चिरुनी रणांगणिं उभा, चिंध्या तयाच्या करीं
त्याच्या सद्यशगायनीं रसवती नाचो सदा वैखरी ७
ध्यानीं आण मुरार-बाजि दुसरा विश्रांत-मूर्ती जणूं,
काळा कांपवि तो जणूं चळचळा, धिप्पाड ज्याची तनू
शत्रू लोळविला पुरंदर गडीं, रक्तें धरा न्हाणिली
ओढोनी मग आणिली विजयश्री स्वामी-पदीं वाहिली ८
संभाजी महराष्ट्र-केसरि खरा छावा गजेंद्रारिचा,
जंजीऱ्यावर बावटा फडकवी स्वातंत्र्य-संकेतिचा
शत्रूंचीं शिर कंदुकें उडविलीं नाकीं तयानें किती,
रक्ताचे सरिताप्रवाह प्रजवें तेथें किती धांवती ९
शार्दूलासह युद्ध जो नर करी, टांगा चिरोनी तया,
दे धाडून खुशाल काळनगरीं झुंझार तो लीलया
होते वीर असे खुशाल समरीं काळासवें झुंझती,
ते सत्पुत्र तुझे कुठें न दिसती नेत्रांप्रती संप्रती १०
संताजी नरवीर नांव यवना स्वप्नांतही भीववी
जाणों घोर पिशाच्च मानगुटितें दावून आक्रंदवी
घे घोटां पिचकोनिया नरडिला म्लेंच्छा रणीं लोळवी
क्रोधाग्नी भडके जई नयन तद्दावाग्निचे लोळवी ११

संताजीसम ज्या गनीम सगळे धाकेजती भूतळीं
तो गाजी रणशूर वीर गरजे ऐसा ' धनाजी ' बली
आपीं भूमितलीं भरून उरली ज्योती जयाची पहा,
पाणी अश्व न पी ' गनीम ' दिसतो पाण्यांत का रे ! अहा १२
ऐसे त्यास विचारिती खल रिपू, हा धाक ज्याचा असे
तें त्याचें रणशौर्य भूवरि अतां बीजासही ना दिसे
ज्यांची पाहुन सावली दचकती ऐसे रिपू ते किती
जे स्वातंत्र्य विडा मुदें उचलती, स्वातंत्र्य संपादिती १३
जे हातीं शिर घेउनी झगडती मृत्यूस आलिंगिती
आनंदें समरीं, स्वराज्यप्रिय ते ! आतां कुठें नांदती !
गेले काळ-मुखीं स्वराज्य सगळें जातां शिवाजी दिवीं
होते वीर प्रवीर, स्थापिति पुन्हां त्याच्या स्वराज्याभुवीं १४
बाजीची अजि राख ' बाजि ' ह्मणुं दे कोणा न ' पाजी ' तुला
' गाजी ' गाजति जे झटी रणभुवीं त्यांशीं कराया तुला
पाही बाजि, शिवाजि, आजि वरती अश्रू किती गाळिती
होसी क्लीब कसा महाजनपदा ! हा ! हाय ! ! आक्रंदती १५
आप्पा तो वसई गडावर चढे, स्वातंत्र्य झेंडा मुदें
रोवोनी हंसवी शिवाजिस दिवीं; सर्वांस आनंद दे
लोळे तें तव लाडकी तवहृदीं स्वातंत्र्य-देवी अहा !
आहे कां स्मृति ती तुला? नच मढ्यावाणी जगीं या रहा १६
बंगाला सगळा करून सर ये तो भोसल्यांचा रघू,
चिमणाजी रणकेसरी गरजतो कीर्ती न ज्याची लघू,
घेतां नाम मुखें थरारुनि उठे कांटा शरीरावरी-
शत्रूच्या, रडती मुलें निजुनिया जाती तदा सत्वरीं १७
झेंडा ये अटकेस रोवुनि तसा राघो भरारी पहा
"पादाक्रांत करीन देश सगळा" ऐशी जयाला स्पृहा

स्वातंत्र्यीं चमके असी जणुं नभीं तेजस्वि सौदामिनी
नाशायास गुलामि, काळ-निबिडा ती दुःसहा यामिनी १८
दिल्लीचे उधळीत तक्त मग ये भाऊ पहा त्याकडे,
धावे फोडित ती स्वराज्य सरिता सह्याचलाचे कडे,
भासे हे जणुं दृश्य पाहुनि तया, भाऊ तसा ये पुढें
बाहू-वज्र करून दास्य-तुकडे हे पूरवो सांकडे १९
हा निस्सत्व कसा? कुठें न दिसती ते पूर्विचे मावळे!
गेला आज लयास विक्रम महाराष्ट्रा! तुझा, मावळे-
तेजस्वी यशसूर्य, दास्यपटला फाडोन चिंध्या करी-
तो स्वातंत्र्यरवी सुदिव्य किरणीं येवो वरी सत्वरी २०
झाली हा! समशेर लेखणि तसे घोडे पहा कागदी,
झाला धैर्यगिरी विचूर्ण, सुकली ही! वैभवाची नदी
नाहीं वीर कुणी तुझ्यांत उरला नाहीं तशी स्त्री सती
हा! धिःकार असो! कसे जगिं महाराष्ट्रा! तुला हांसती २१
ओढी दाढि धरोन पाडि वरुनी लत्ताप्रहारा करी
अब्रूसाठिं गनीम तो चरचरां सत्पुत्र तूझा चिरी,
ध्यानीं आण प्रसंग आज सगळा सोडून दे क्लीबता
स्थापायास स्वराज्य संगरिं उभा राही अतां तत्वतां २२

ग. मो. देव

---

## सख्यभक्ति

(अंक ७ व्या वरून)

श्लोक

केल्याविना विनवणी बहु केधवांही
तूं पावलास कवणा, घडलेंच नाहीं
कर्तव्य जें नियत तेंच करावयाला
कां आर्जवें करुन घेशि वृथा दयाला? ७६

मी बोललों वचन नम्र कठोर कांहीं
होई न युक्त परि हर्ष-विषाद[1] यांहीं
निंदा स्तुती समचि, जो 'समदृष्टि' त्यातें
तूं काय नाहिस तसा? समजूं कसें तें ७७

मी जो करीं तुजसवें बहु युक्तिवाद
ही अंगची मति न सद्वचनानुवाद[2]
वर्ते जसा पुरुष थोर जगीं विचारी
सामान्य लोक करि वर्तन त्या प्रकारीं ७८

नाहीं करीत तुझिया अधिक स्तवाशीं
जात्या[3] खरोखरचि मी बहु अल्पभाषी
आणी न तूं स्वमनिं याविषयीं विकल्प
ध्यातों तुला करुनिया मन निर्विकल्प ७९

माझें कसून मन पाहि खुशाल आतां
केलें असे स्थिर तुझ्या चरणीं स्वचित्ता
येवो प्रसंग कसला क्षिति ना तयाची
कुठे तुझ्याविण गती इतरत्र साची ८०

माझ्या करी विनतिची न करी उपेक्षा
होई प्रसन्न, मज घाल अभीष्ट भिक्षा
आह्मी कसे तुजसि याचक हें न ठावें
जाऊं न विन्मुख पहा करुं भाग द्यावें ८१

सेवा श्ववृत्ति ह्मणती, गणतात निंद्य
माते परी पुरवली बहु तीच वंद्य
लांगूलचालन तुझ्या चरणांसभोंती
राहीन मी करित सोडुन लाज भीति ८२

---

१ हर्षविषादानें २ साधु पुरुषांच्या भाषणाचा अनुवाद ३ स्वभावतः

श्वाना समर्थ गृहिंच्या जगिं देति मान
तत्गौरवा लघुपणास बघे न कोण
आहे सुसंग-महिमाच असा विचित्र
साजे शिरीं सुमन-संगतिनेंच[1] सूत्र ८२
तें पत्र काय न करी ? जरि राज-मुद्रा[2]
त्या येरवीं जगतिं कोण पुसे अभद्रा[3]
दृष्टांत देउन किती तुजशी कथावें
ये त्यांत सर्वहि कृपांकित तूं करावें ८३
चालेल सेवक जनांवरि काल-सत्ता
तें होय लांछन तरी तुझिया प्रभुत्वा
विद्या न ती धन न तें बलही न तें कीं
कामास ये न समयाप्रति जें विलोकीं ८५
अद्यापि मी तव गृहाप्रत येरझारा
घालूं किती अमित संसृतिच्या असारा
देई मदीय मज ' नित्य सुखैक ' ठेवा
आतां नको परतवूं शिणवूंहि देवा ८६
येतों तसा निकट तूं नच दूर होई
मी मोकळा तुज न देइन जाउं कांहीं
टाकीन बद्ध करुनी हृदयांतरांत[4]
चालेल नंतर पहा तव काय मात[5] ८७
पाहीं प्रभो ! मजकडेस भरून दृष्टी
होईल शांत तरि, ही तनु फार कष्टी
संसारतापहर औषधि एक साच
देवा ! असे तव कृपेक्षण-कौमुदीच[6] ८८

१ फुलांच्या योगानें २ राजाचा शिक्कामोर्तब ३ हलक्याला ४ हृदयामध्यें ५ तोड, उपाय ६ तुझें कृपादृष्टिरूप चांदणें.

संसार-दुःख-जलधींतुन नेई पार
पाहून तूं मद्घ-राशि गणी न भार
कूर्मावतार धरुनी महि उद्धरीली
त्याच्यापुढें तुजसि ही कृति होय केली[1] ८९
उद्धार हो नच किमर्थ अजून माझा
कोडें पडे कवण तें वद याच काजा
लीलावशें अमित उद्धरिले दयाळा!
आतांच दास तुज हा जड काय झाला? ९०

(अपूर्ण)

## तीन काळ

[शार्दूलविक्रीडित-वृत्त]

काळाची सरणी तशीच करणी कोणा न ये लक्षितां
तो उत्पन्न करी स्थितीस वितरी होई स्वयें भक्षिता
ब्रह्मा विष्णु महेश यांस मिळतें जें आत्मकार्यीं यश
तें कां शक्य तरी न मित्र असतां हा काळरूपी वश? १
होतां पूर्वि अतां असे अजुनि हा होईल त्याच्यापुढें
भाषा भेद असे वरी बघुनियां काळस्वरूपाकडे
होता भूत भविष्य होइल तया संज्ञा जगीं या मिळे
डोळ्यांदेखत वर्तमान घडुनी अत्यंत वेगें पळे २
गेली जी घडि ती पुन्हा न परते येईल ती ना दिसे
जी प्रत्यक्ष पुढें असे उठविते चित्तावरी ती ठसे
तीही जाय झरोन नीर झिरपे जैसें घटापासुन
ओढी नूतन जीवनास मग ती होणार त्याच्यांतुन ३

1 लीला

झाला होइल तो असंख्य असुनी अव्यक्तता त्या जडे
जो प्रत्यक्ष पुढें पडे क्षणिकता त्याच्या जिवाला घडे
तो सामुद्रधुनीसमान गमतो संयोगभूमीच वा
जोडी भूत भविष्य दोन तटिनीतीरांस सेतू नवा ४

होणाऱ्यांतुनि वर्तमान उडि घे भूतांत खालीं पडे
पाणी धांवुनियां कडा उतरुनी खोऱ्यांत जैसें दडे
घो घो झोतचि वर्तमान भरि तो दिक्कूहरें स्वस्वनें
तेजस्वी प्रतिभोग ज्यापरि भरी सन्मार्गिकांचीं मनें ५

चाती कापुस घेउनी कुणि वसे कीं सूत काढावया
काळाच्या कृतिशीं स्वकीय कृतिचें साधर्म्य जोडावया
गुंडी सूत निघे तयास वरती ओढीत ताणे नवे
गुंडी भूत भविष्य कापुस तसे ताणे भवत्[1] कां नव्हे ६

काळोखापुढतीं प्रकाश पसरे काळोख होई पुन्हा
सृष्टीचा क्रम हा असाच नच हो! येथें कुणाचा गुन्हा
भूतानंतर वर्तमान पसरे जाई भविष्या भिडे
मध्य स्पष्ट, न आदि, अंतहि नसे, तामिस्र त्यां आवडे ७

भूताच्या थडग्यावरी मरतसे फेनाक्ष पक्ष्यापरी
मृत्यूंतून उठे परंतु झणि तो त्याचीच त्याला सरी
भावी काळ समर्पि आयु नच त्या मृत्यू विहंगा जसा
त्यायोगें नच वर्तमान मरतो विश्वीं वसे पक्षिसा ८

काळानें भुवनीं विचित्र रचिलें जें हें महानाटक
मुख्यांकांमधि वर्तमान वसला होवोनि निष्कंभक
किंवा भूतकरीं भविष्यकर ज्या आंदोलनातें करी
त्या पर्यायचि वर्तमान मजला वाटे ह्मणावें तरी ९

---

१ वर्तमान

भूतीं भक्कम पाय रोवुनि उभा ओढी भविष्यास जो
चालू काळ तया समृद्ध करण्या वीरास कां ना सजो
कल्याणें अवघी सुकीर्तिरमणी तैशाच त्या संपदा
जोडोनी स्वकरांस याचिति सदा सेवावया तत्पदा १०
भूतीं प्रेरित नेत्र ती स्मृति तशी आशा भविष्याकडे
चालू जो क्षण तेथ नित्य कृतिला खेळावया आवडे
स्मृत्याशाकृतिचें असें त्रय जिथें प्रेमें सदा नांदलें
तेथें काय उणीव काळ सगळे पावोन आनंदले ११

———×——— आनंदीरमण दापोली

## ही !

[ चंद्रकांत राजाची कन्या ह्या चालीवर ]

सरस्वतीच्या उद्यानींची कलिका कवितेची !
लक्ष्मीच्या उपवनांमधिल ही लहरी भाग्याची ! १
पुण्याचरणी शांतिच कीं ही सज्जन हृदयाची !
रविवंशीं सच्छील नृपांच्या दीप्तिच मुकुटाची ! २
साधुजनांचा साधुमार्ग, ही त्यांतिल पुष्करिणी !
ब्रह्मर्षींच्या हातामधली कीं पूज्य-स्मरणी ! ३
भागीरथिच्या तीरावरची निसर्ग सुंदरता !
यमुनेच्या जललहरीवरची चंचल मोहकता ! ४
कुंजविहारी कर्णविहारी वाजवितां मुरली !
गोपींची तन्मयता ती ही मूर्तरूप ल्याली ! ५
स्वातंत्र्याच्या समरींची ही स्फूर्तिच शौर्याची !
स्वतंत्रतेच्या रणभक्तांच्या पूर्तिच आशेची ! ६
नैय्यायिक जे तद्वादींची प्रमाणपटुता कीं ?
वैय्याकरणी तद्वचनींची सुंदर घटना कीं ! ७
सत्यव्रत जो भीष्म तयाची वृत्तिच अचला कीं !

प्रयत्नवादी भगीरथाची कार्यासक्तिच कीं? ८
स्वर्गद्वारांतील शलाका तेजाची काय?
भूमि विदारुनि शेषमणीची प्रभा फुटे काय? ९

गगनाच्या चौकांत चांदण्या खेळत असतांना!
तेजोधामांतून निघाली ही तेजोवदना? १०
ज्योतिष्मतिच्या किरिटावरची झळझळती कोर?
सृष्टि सतीच्या सौभाग्याची मनोज्ञता थोर ११

प्रणयि जनांची विरहामधली पहिली उत्सुकता!
कीं भक्तांची भक्तिरसाशीं प्रेमल समरसता १२
जगत्पतीच्या नेत्रींची कीं अमोघ ही माया!
शुक्राची चांदणी तिची ही भूवरची छाया! १३

शकुंतलेचा तात, तयाच्या हृदयाची भरती!
शकुंतलेची हरिणकिशोरावरची कीं प्रीति! १४
युद्धकलापटु भीष्म तयाची प्रगल्भ शरविद्या!
भारतीय नरवीर पार्थ तद्वेध्यकला वंद्या! १५

मेरूची ही सुवर्णता कीं हिमगिरिशीतलता
दुग्धोदधिची फेनराजि, ही काय तिची शुचिता? १६
विंध्याचलवाहिनी तिची कीं प्रपात-मोहकता?
हिरव्या हिरव्या नवांकुरांची कीं ही कोमलता? १७

समरधुरंधर जयवंतांची ही विजयी ढाल
जयलक्ष्मीच्या द्वारावरची कीं तोरणमाळ १८
राष्ट्रविभूषण रणसिंहांच्या खड्गाची धारा
छत्रपतींची वत्सलता कीं ही दीनोद्धारा १९
शकुंतलेची प्रणयपत्रिका त्यावरची "श्री" ही
सखीविनोदीं प्रियंवदेची कीं स्मितलहरी ही २०

कल्पतरूची सौरभमिश्रित कीं ही सुमवृष्टी
मनोल्हादिनी स्वर्गंगेची तटाकवनसृष्टी २१
अलकावतिच्या भालावरची ही कुंकुमरेखा
पारिजातक त्रिदशतरूची लवली कीं शाखा २२
श्रुतिस्मृतींची वाणी कीं वेदार्थांची सरणी?
व्यासाच्या कवितारत्नांची ही उज्ज्वल कीं खाणी २३
कविकुलगुरुची गगनविहारी विशाल कल्पकता
देवसभेतिल देवगुरूची अगाध पंडितता २४
दिव्यपताका अमरावतिच्या कीं द्वारावरची
रुसून आली धरेवरी इंद्राची काय शची? २५
गजार्तहारी हाकेसरसा धांवत जो आला
वैजयंति तुटली कंठाची आली भूमितळा? २६
वैकुंठाहुन पाताळाची सफर करायाला
नारद सजले, मधेच तुटली वीणेची माला? २७

———×——— दु. आ. तिवारी

## बाई निद्रे!

(पद)

ये ये निद्रे। भेट गे भेट मज भद्रे॥ ध्रु०॥
नितांत झाली रात्र घोर ती
सर्व जीव हे स्वस्थ घोरती
तूंच जाहलिस काय चोरटी
ये ये निद्रे। भेट गे भेट मज भद्रे
नक्षत्रांचे दीप लागले
आकाशींचे मण्डप फुलले
वातावरण सुगंधित झालें
ये ये निद्रे। भेट गे भेट मज भद्रे

शांत अशा या निशीथसमयीं
चंद्राची पाजळते समयी
शुभ्रवस्त्रयुत रजनी देवी
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे
कुणी खुनाचे विचार करिती
कुणी सुखद शान्ततेस वरिती
जगदुद्धारक स्वकार्य करिती
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे
मेघांचा नाभिं नाच चालला
स्वैर केलिचा चाले चाळा
चपला मेघा घाली माला
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे
कोठें असली श्रेष्ठ मंडळी
कोठें आह्मी तमोमंडळीं
असली कुठली जोडी जमली
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे
तुला सारखे सर्व जीव हे
नीच उच्च मग भेद न राहे
हा वध दास तुला बघताहे
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे
उच्च उच्च जे वेत करावे
ढांसळुनी ते सारे जावे
वाटे सारें सोडुन द्यावें
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे
नैराश्यीं जों विलीन होतों
तुझा धीररव मज आठवतो

दमला जीव पुन्हां सांवरतो
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे

आशेंतुन नैराश्य निपजतें
नैराश्यांतुन आशा निघते
या दोघांचें चक्र न मिटतें
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे

दुःखामागुन सौख्य धांवतें
सौख्यामागुन दुःखहि पळतें
असें आपुलें जगीं चालतें
ये ये निद्रे ! भेट गे भेट मज भद्रे

त्याविषयीं उपदेश कराया
श्रांत मानसा शांती द्याया
त्यास जगाचा विसर पडाया
ये ये निद्रे । भेट गे भेट मज भद्रे

——×—— श्रीनिवास पंढरीनाथ नांदेडकर

## आंकस्मिक

[ चाल–नवी नवलाई । कोकिला बोलली बाई ]

'असें कां झालें?'–'होणार होउनी गेलें!'
उषःकाल जो हांसत आला,
दीप्ति फांकली जैं गगनाला,
राहूनें तैं रवि तो गिळिला;
'असें कां झालें?'–'होणार होउनी गेलें!'
मंद मंद मधु वारा आला,
मोदभरें सुमपुंज डोलला,

कुणी येउनी अवचित खुडिला
'असें कां झालें?'-भ्रमर तो येउनी बोले!

पूर्ण चंद्र तो नभीं उदेला,
चंद्रकांतही स्त्रवूं लागला
हाय! ढगानें चंद्र झांकिला
'असें कां झालें?'-तो चकोर दुःखें बोले!

रसाळ पक्काचें फळ जें दिसलें,
तें घ्याया कर पुढें पसरिले,
अवचित कोणी तें लांबविलें;
'असें कां झालें?'-रमणीय बाळ हें बोले!

सृष्टि सुंदरी सुखें विनटली,
खेळ मनोहर करूं लागली,
नयनीं सुदृढ झांपड चढली;
'असें कां झालें?'-विरहिणी आपणा बोले!

प्रेमाश्रूंची नदी वाहिली,
पृथ्वी सारी त्यांत बुडाली,
दुर्जय हृदयें शुष्क जाहलीं;
'असें कां झालें?'-तें गूढ मतीला न कळे!

*     *     *     *

स्मशानगीता हृदयीं उमजा,
गमजा न तुह्मी या तरि उमजा,
जा जा लवकर लागा काजा;
'असें कां झालें?'-'होणार होउनी गेलें?'

प्र. मा. जोशी

## रत्नावलीचें दप्तर

एक हितचिंतक लिहितातः—हल्लीं 'उद्धवा शांतवन कर जा' ही चाल वऱ्याच रसिकांस प्रिय झाल्याचें दिसतें ह्या पद्यांत प्रथम सयमक तीन मोठ्या ओळी पुढें तीन सयमक लहान ओळी आणि शेवटीं सयमक एक लहान व एक मोठी ओळ असा क्रम असून प्रत्येक मोठ्या ओळींत ६ अधिक ८ व ६ अधिक ८ मिळून २८ मात्रा आणि प्रत्येक लहान ओळींत ६ अधिक ८ मिळून १४ मात्रा असतात. ही चाल करुणरसास अनुकूल ह्मणून तज्ज्ञांनीं योजिली आहे. कै० अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या संगीत शाकुंतलांत या चालीवर शकुंतला "मर्यादा सोडुनि वदणें योग्य न हें मजला ठावें" हें पद ह्मणते आणि रसिक श्रोत्यांच्या हृदयाला द्रव आणिते करुण रसाचा आणि वीररसाचा विरोध नैसर्गिक असल्यामुळें ही चाल वीर-रसपर कवितेस अनुकूल नाहीं. मोह, विषाद, ग्लानि इत्यादि भाव ज्या सुरांत निघतात त्याच सुरांत धैर्य उत्साह इत्यादि भाव कसे निघतील? सतार कितीही हुकमी नोकर झाली तरी 'मर्यादा सोडुनि वदणें योग्य न हें' तिला ठाउक आहे ह्मणून साच्या पडद्यावर हात आला असतां ती रीचा सूर काढणार नाहीं. कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् मुरलीधर श्रीकृष्ण जी चाल करुण-रसपर समजतो ती वीररसास अनुकूल ह्मणून कोणी आधुनिक गानेवाला—गवई स्वकृत गाण्यास योजील आणि रसोत्पत्ति करून दाखवील तर तो भगवंतावर ताण करील आणि सवाई मुरलीधर पदवीस चढेल, पण असें होणें कलियुगांत काय पण सत्य युगांतही शक्य नाहीं. मिठाच्या भांड्यांत दूध घालून कधीं क्षीर झाली आहे काय? त्या दुधाचें फार तर दही होईल, तेंही कसेंसेंच. नव्हे काय? तरी माझी कविवर्गास विनयपूर्वक विनंती आहे कीं त्यानें चाली देतांना किंवा चालीवरच्या कविता 'मर्यादा सोडुनि वदणें योग्य न हें' कविला ठावें असेंच वर्तावें.

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

दुसरें वर्ष माघापासून सुरू झालें!

पहिल्या वर्षांत प्रचंड लोक–जागृति करणारें

संपादकः— निफाडकर व दु. आ. तिवारी

# लोकमान्य

वार्षिक वर्गणी रु. ३।= एक पुस्तक बक्षीस.

मासिक यापुढें स्वातंत्र्याचा वाहुटा साऱ्या मराठे मंडळांत नेणार! दोन कादंबऱ्या, अनेक गोष्टी, खरमरित लेख, प्रासंगिक कविता, प्रासंगिक हृदयस्पर्शी चित्रें अशा सुंदर स्वरूपांत व लो. टिळकांचा मंत्र, व म. गांधींची भरारी हें मासिकांत येणार वर्गणी भरा व जाहिराती द्या.

व्यवस्थापक लोकमान्य, धुळें.

---

# आर्य स्त्री प्रबोधमाला

यांत आर्य स्त्री रत्नांचीं सोप्या व सरळ भाषेंत चरित्रें येतात. तसेंच मधून मधून नीतीपर व उपदेशपर वेंचे, गोष्टी, कथानकें वगैरे दिलीं जातात. स्त्रियांना सद्यःस्थितीला कार्यक्षम करण्याच्या हेतूनें ही माला निघाली आहे मालेची वार्षिक वर्गणी ट. हं. १ रुपया आहे. 'हळद कुंकू' 'पतिसंजीवन' अबलाभक्ति प्रभाव हीं मालेचीं बाहेर पडलेलीं पुष्पें बहारीचीं आहेत.

सौ. सरस्वतीबाई गाडगीळ.

संपादिकाः–आर्य स्त्री प्रबोधमाला

पो.–सांगली

---

# सूचना.

आमचेकडे ता ५–७–२२ रोजीं श्री० महादेव जनार्दन गोखले यांजकडून वर्गणीची मनी ऑर्डर आली; परंतु त्यांचा पत्ता (गांव) कळला नाहीं. तरी आमच्या वाचकांपैकीं कोणास माहित असल्यास कळवावा.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळानें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती ।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बाबजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] सप्टेंबर सन १९२३ [ अंक ९ वा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया

अनुक्रमणिका.

सत्यभक्ति [ अनुवादक ]........................१९३
प्रतिभेग [ माधवसुत ]........................१९६
तमोजाल [ विजनविहार ]........................१९७
तूं आणि मी [ वसंतविहार ]........................१९९
नश्वरतेचा आभास [ विश्व-विहंग बी. ए. ]........................२००
श्रीहरिहराभेदस्तोत्र [ विष्णु बाळकृष्ण जोशी ]........................२०२
प्रीतियोग [ ह. म. समर्थ ]........................२०३
अभंगसुधा [ ह. म. समर्थ ]........................२०४
कवि आणि राष्ट्र [ वासुदेवसुत ]........................२०५
महाप्रस्थान [ ( कुसुम ४ थें ) भा० रा० तांबे ]........................२०९
महाप्रस्थान [ ( कुसुम ५ वें ) भा० रा० तांबे ]........................२१०
ताराराणी [ अनंतकुमार ]........................२११
पंडितप्रशस्ति [ पां० रा० तेंडुलकर ]........................२१३
कशाला देवाची [ कमलाकर ]........................२१४
प्रेमाची हाक [ त्र्यंबक अनंत देशपांडे ]........................२१५
कांक्षित [ मनोहर ]........................२१६

## रत्नावलीचें दप्तर

महाराष्ट्र साहित्यः-ज्यूलैचा खास अंक पोंचला. अंक सर्वांग सुंदर असून पृष्ठेंही बरींच आहेत श्री चिरकुडांचा अग्र लेख चिंतनीय आहे. कविता बऱ्यापैकीं आहेत. मासिकांचा उत्कर्ष होवो असें आम्ही इच्छितों.

लोकमान्य मासिक धुळें:-ज्येष्ठ महिन्याचा अंक पोंचला. विषय आणि लेख नेहमींप्रमाणें बरे आहेत. तिमाही काव्य परीक्षणांत एक ढोबळ चूक झाली आहे ती ही कीं बुद्धिचातुर्य या कवितेसंबंधीं लिहितांना परीक्षकांनीं विपर्यास करून कर्त्यावर रत्नावलीच्या अंतर्व्यवस्थेसंबंधी निराधार आक्षेप केला आहे.

# काव्यरत्नावली

अंक ९ वा.


## सख्यभक्ति

(अंक ८ व्या वरून)

श्लोक

धांवा गजेंद्र करितां झणि धांवलास
तैसा सती द्रुपदजेसहि पावलास
ऐशा अनंत तव पूर्व-कथा असून
आतांच ये अकरुणत्व तुला कुठून ९१
वाहे तुला बहुविधीं करुणा-वचांनीं
ऐकून शांतचि कसा मम आर्त-वाणी
आतां दया करुन धांवुनि शीघ्र येई
दासास उद्धरुन या स्वपदास नेई ९२
सत्कार्य शीघ्र करणें जधिंचें तधींच
नाहीं तया अशुभ वेळ अशी कधींच
लागे विलंब तरि काय मनांत येई ?
हे दीन-तारण अमंगल कार्य नाहीं ९३
ठावा नसे तुजसि काय गृहस्थ-धर्म
त्याचें असे अतिथि-पूजन मुख्य कर्म

विश्व-प्रपंच-भर[१] संतत वाहतोस
अभ्यागतास मज पाहुन कां सरोष[२] ९४
मागें तुवां स्वजन कोण उपेक्षिला हो
नाहीं असे श्रवणि संप्रति तें कसें हो
माझें अधीर मन पोकळ तर्क काढी
तूं कासया मजविशीं धरशील आढी ९५
सक्रोधसें[३] दिसतसां मजला परंतु
पोटीं द्याच्च असणार न कोप-हेतु[४]
विक्राळ रूप धरिलें कितिही ह्मणून
दे मेघराज अमृताविण काय आन ९६
नाहीं बरोबर तुझ्यावर मी रुसावें
निर्दोष-दर्पणसमानचि[५] तूं स्वभावें
रूपें जसें असु तसें प्रतिबिंब दावी
द्यावा निजावगुण-दोष तुजास कैंवी ९७
मातेविशीं[६] जरि सुनिष्ठुर बाळ होय
प्रेमा तरी करिच त्यावरि पूर्ण माय
मोहामुळें विसरलों तुज मी परंतु
देशील अंतर कसा मजला प्रभो तूं ९८
हे विश्व-चालक तुझ्या करिं सर्व-सूत्र
आह्मी अहों अखिल जीव निमित्त मात्र
कर्तृत्व-शक्ति असतां निज अंगिं सारी
कां लोटिसी मजकडेस जबाबदारी ९९
प्राणाहुनी प्रिय बहू तुजला स्वभक्त
दासानुदाससम राबसि तद्गृहांत

१ विश्वाच्या संसाराचा भार २ रागावलेला ३ रागावल्यासारखें
४ रागाचें कारण ५ स्वच्छ आरशाप्रमाणें ६ आईच्याविषयीं

वेडा पिसा बनसि सोडुनि सर्व लाज
मागें पुढें न बघतां करितोस काज १००

मेघोदकाविण दुजें जल चातकाला
तें काय होय असुनी बहु सेवनाला
तैशी निरर्थक कृपा इतरे जनांची
व्हावी कृपा मजसि एक तुझीच साची १०१

गर्भांत मी जननिच्या नव-मास होतों
पोषी तदा मजसि, पोषक कोण हो ! तो
सांभाळ होय करिता अनपेक्षितांही[1]
माझा कसा उबग[2] त्यास अतांच येई १०२

केल्यावरी तुह्मि कृपा न घडेल काय
प्यायास तें गरलही न करी अपाय
जाळूं शकेल नच वन्हि कदा तनूला
प्रऱ्हाद-जीवन-चरित्रच साक्ष याला १०३

झाल्यास तूं जरि उदार सहस्र-पाणि
घेणार घेइन तरी किति दों करांनीं
गंगा उणी जल पितां तृषितें न होय
याहून मी तुजसि याचित[3] फार काय १०४

हा भीतसे विफल कां भव-सागराला
कोणीच ना मृग-जलांत बुडोन मेला
या कारणें रहित तूं न करी स्वयेंणे
होई न काय वद, ' केवळ भावनेनें ' १०५

यानां कसें अजुन हो किति आळवीलें
कार्यीं दुजा निरत, कां अथवा निजेले

---

१ अपेक्षा केली नसतां २ कंटाळा ३ मागतों

कीं क्षीर-सागर-निवासाचि सोडवेना
मी कल्पना करुन काय असूं कळेना १०६
दीना उपेक्षिशिल ही न घडेल मात[1]
नेणो सकारण विलंब असेल होत
माते परंतु धरवे नच धीर आतां
होई तनू विकल फारचि ही भवार्ता[2] १०७
माझ्यासमीपच्च विभो ! असशील वाटे
ऐकावयास गुण-कीर्तन मी करीं तें
गातात भक्तजन राहसि नित्य तेथें
कां गुप्त तूं मग, दिसें प्रकटून मातें १०८

उपसंहार

गुंफोन एकशत आणिक अष्ट पुष्पें
अर्पी वसंततिलकात्मक पद्यरूपें
घे गोड हीं करुन वाङ्मययज्ञ-सेवा.
इच्छा 'जनार्दन-सुता' मज नान्य देवा

श्रीकृष्णार्पणमस्तु

मिरज माघ व॥ ११ —x— अनुवादक
शाके १८४४

## प्रतिभेस

( शार्दूलविक्रीडित )

देसी दर्शन लाडके ! प्रणयिनी ! या किंकराला जभीं,
नेत्रांना तधिं विश्वगोल दिसतो चेतोरम स्पष्ट हा !
कांहीं जादु तयांत खास भरुनी तूं दाखवीसी महा;
काव्या अंकुर हे फुटून सहसा होते मही भूषित ! १

१ गोष्ट २ संसारपीडित.

सारें प्रेमच गोड लोचनिं दिसे! आनंद आनंद तो!
होते काव्यमया खचीत अवनी! काव्यँच काव्यें अहा!
हीं पुष्पें, तृण हें, लता, चपल हे ओढे, तसे निर्झर-
सारे गायनलुब्ध काव्य रचिती! ऐकूनि मी गुंगतों! २
हा निष्कांचन, मूढ, दीन ह्मणुनी लोटूनि लावूं नको;
आहें मी असलाच अंतरिं असें मानूं नको तूं बरें!
माझ्या प्रीति गडे! मनीं वसतसे ती श्रेष्ठ शुद्धा असे;
या प्रीतीस दरिद्र कोण वदती? श्रीमान् कुलोत्पन्न ती! ३
राहीं सन्निध देवि! ये प्रियतमे! जाऊं नको टाकुन!
तूं नाहींस तरी कशास जगणें या घोर विश्वीं मग?
नाहीं साधन रंजना तुजविणें मातें तव ध्यास गे!-
हा रात्रंदिन लागला!- करुं कसें?- देहास जाळी सदा! ४
आतां या जगतीं खरेंच उरलें कांहीं दुजें प्रेमळ!
ध्यानीं मग्न तुझ्या सदैव असणें वा टाकणें गात्र हें!
सत्प्रीती सुमनार्पणास करुनी शीर्षा पदीं स्थापितों,-
होऊनी अनुकंपनीय; ललिते! दे आशि या सेवका ६

१५ नोव्हेंबर १९१४ ——×—— माधवसुत

## तमोजाल!

(शार्दूलविक्रीडित)

रात्रीचा निबिडान्धकार सगळ्या व्यापी बळें भूतला
नेत्रां गोचर वस्तु एकहि नसे, अंधत्व ये त्यांजला!
मेघांचा घनदाट कृष्णपटही झांकीत तारालया;
चेतोहारि कुठें समस्त जगिंचा तेजोंऽश पावे लया! १
कोठें मानुष शब्द वा न कसली चाहूल कानीं पडे
सारा लोकहि गाढ घोरत घरीं निश्चिंत चित्तें पडे;

शान्त स्थावरजंगमादि अवघें सर्वत्र निस्तब्धता!
शान्ती रात्रिसखीसवें स्थित जगद्राज्यासनीं हो! अतां २

नांदे शान्ति नितांत विश्वि जरि या व्यापोनि चोहींकडे,
चिंतापावकिं मी कसा तडफडें! तेणें अहा! ये रडें!
वर्षे शांतिघनावली, नच विझे, पेटेच चिन्तानल!
जाई मुग्ध मदीय हृत्सुमन हें कोमेजुनी कोमल! ३

राहे का विषबिंदु ठाव धरुनी केव्हां सुधासागरीं?
नीरीं सैंधव का कदा स्वघनता राखील अंगीं तरी?
कैसा शुष्क, जलप्रपातिं परि, मी पाषाणसा अंतरीं?
वांचे कोठुनि मीन दुग्धह्रदिं, जो संतृप्त तोयाकरीं? ४

जेवी लीन मृदुप्रसूननिचयीं तो तीव्रसा कंटक,
दुःखोच्छ्वास लपे सुहास्यपवनीं कीं उष्ण संतापक;
राहे वा वडवाग्नि वारिधिचिया जेवीं अगाधोदरीं,
तेंवी दीन अशान्त शांतिभुवनीं मी एकला हो तरी ५

जीवाचा समशील एकचि सखा आकाश विश्वीं गमे,
ज्यातें 'आंतर कोऽपि हेतु' कथितां हृद्वृत्ति माझी रमे
तेजोहीरक लुप्त तद्हृदयिंचे नैराश्यजालीं जसे,
भास्वत्तारक झांकले मम नभीं कृष्णाभ्रसंघीं तसे! ६

देखोनी मम दुःस्थितीस नभ तें दुःखाश्रुतें ढाळितें!
तेजोहीरक जे तदीय हृदयीं कीं या शिरीं गाळितें?
मीही तारक माझिया गगनींचे जीमूतधारामिसें-
नेत्रीं भूप्रति ओपितों? घनतमीं ते नष्ट होती कसे! ७

कोठें तारक हाय! ते हरपले? ना एकही सांपडे!
मी तों चांचपडें तमीं, मम परी येतीच हातीं खडे!

व्योमींचे सुखवायु मेघ हरुनी देईल का तारका?
आशेची उगवेल त्यांत विमला तैशी कदा चंद्रिका? ८

विजनविहार

---

## तूं आणि मी

( स्रग्विणी )

मीच माझा वडेजाव सांगीतसें
दर्प दृष्टींतला फेंकि दाही दिशे
तेज तूझें तयीं दावि रंगच्छटा
हीच माया तुझी विश्वशाला! नटा! १
तूं स्वतापासुनी घेसि रूपें किती
भेदभावा स्वतां देसि नावें किती
या स्वताच्या तुझ्या रूपभेदावरी
देह माझा नटे अंश कीं अंतरीं २
व्योम सारें भरें आर्तगीतस्वरें
नाद नादांतुनी त्या घुमोनी फिरे
नैकरंगीं पहा अश्रु ठेले उभे
हर्ष मारीच्छटा, उद्भवें तेंवि भें ३
संभवे तेंवि आशा कदा मानसीं
अंबरा चुंबिण्या घेति लाटा उशी
पावताती लया, स्वप्नमाला तशी
भंग मद्रूपि तूं आपुला पाहसी ४
चित्र काढावया पीठ तूं मांडिलें
दोन हातीं दिवा रात्र हे कुंचले
काढिलीं त्वां असंख्यात चित्रें पटीं
कुंचल्यांची कला ती विराजे नटी ५

पार्श्वभागीं पटाच्या न तूं काढिल्या
पूर्ण रेषा ऋजू निष्फला वाढल्या
वक्ररेषांतरीं तें तुझें आसन
पूर्ण गूढाकृती गुंफिलें भूषण ६
द्वंद्व " तूं आणि मी " रम्य लीला करी
व्योम गेलें भरोनीहि ऐशापरी
नाद " तूं आणि मी " हाच वायु वदे
चालला हा लपंडाव गेलीं युगें ७

———×——— वसन्तविहार, दादर

## नश्वरतेचा आभास

( श्लोक )

आहे विश्व समस्त नश्वर तसें संसार निःसार हा,
मायाजालिं खुळ्या कशास फसशी? वेडी किती ही स्पृहा !
सोडीं सर्वहि आसरे झडकरी जा दूर कोठें तरी
एकांतीं जगदीश-चिंतन करीं, संन्यस्त हो सत्वरी
ऐसे पंडित या अजाण मनुजा उच्च स्वरें बोधिती
तत्वज्ञान विदग्ध संतत असें कोलाहलें गर्जती
थोरांनीं कथिला सुमार्ग नमुनी घ्यावा जगीं बोलती,
देवा काय करूं विभिन्न गमतें, मातें खुळी मन्मति २
माझा हा अविचार हे सुजन हो, तूह्मां रुचेना जरी
देऊं दोष नका मला-विविधता या सर्व विश्वांतरीं
सर्वांचें जरि ऐकमत्य असतें जाती खरी माधुरी
होती ही वसुधा गतानुगतिका, शून्या पुरी वैखरी ३
आहे नश्वर काय या क्षितितलीं? चांचल्य आहे कुठें
हा संसार असार? ही निशिदिनीं शंका मला जाळिते

माझ्या अल्प मतीस कांहिं तुमगे प्रश्नांस याकारणें
कोडें टाकितसें, तया उलगडा, हें एवढें मागणें ४
नीलाकाशिं शशांक सूर्य चपला ताराहि चेतोहर
तेजानें अपुल्या कशा तळपती दिव्याकृती सुंदर
ही सारी प्रभुसंपदा कधि तरी कां हो लया पावते
आह्मां मूढ जनास ईश-रचना-स्थायित्वची दाविते ५
जाऊं द्या विभवा नभांतिल, जरा या रम्य पृथ्वीवरी
टाका दृष्टि तुह्मी क्षणैक, दिसुनी येईल सर्वांतरीं
ईशें निर्मियली जगांत अवघ्या आहे चिरंजीविता,
नाहीं नश्वर कांहिही, गमतसे आभास हा तत्वता ६
उद्यानीं फुलतीं फुलें क्षण, परी कोमेजतीं सत्वर
होतीं ईशपदीं विलीन ह्मणुनी नाहींत तीं नश्वर
त्यांचें सौरभ आणितें किति तरी उन्माद माझ्या मना
तें हो नष्ट तरी अखंड स्मृति ती चित्तांत राहीच ना? ७
खेळे ही जलदेवता गिरितटीं सोन्माद स्वेच्छाभरें
येतां भास्कर पूर्व अद्रिवरती प्रेमा तिला नावरे
वेगें तत्करिं बद्ध होउनि जरी धांवे नभीं मीलना
पावे नाश न, वृष्टिरूप वरुनी देते जगीं जीवना ८
नाहीं केवल सूत्र बाधक गमे या मूक सृष्टीप्रती
आहे या नियमेंच पूर्ण नियता ईशक्रिया बोलती
त्या सृष्टीमधि सर्व नश्वर दिसे, नाहीं परी सत्य तें
कोती मानव बुद्धि बाह्य जगता देखोनि संदेह ते ९
आहा! ते हरिणाक्ष, कृष्ण कच ते, तें रम्य चंद्रानन
तें आरक्त कपोल, पुष्ट कटि ती, तैसेंच पीन स्तन
तेजःपुंज सुवर्णकेतकिनिभा देहप्रभा सुंदर
सारें वैभव हाय! हाय!! जगतीं आहे खरें नश्वर १०

नाहीं प्रेम तुझें खरोखर परी या वस्तुमात्रावरी
बाह्यांगा बघुनी तुझ्या उपजते का लालसा अन्तरीं
सारें चित्त तुझें सतृष्ण सखया त्या अन्तरंगावरी
जें आहे अविनाशि, नश्वर नसे जें या जगाभीतरी ११

वस्त्रें नवीं मानव जेविं घेई
जीर्णांशुकें त्यागुनिया स्वदेहीं
आत्मा तसा तो नव रूप घेई
चांचल्यता ती जगतास दावी १२

——×—— विंध्य-विहंग, बी. ए.

## श्रीहरिहराभेदस्तोत्र[1]

(आर्या)

श्रीहरिहरचरणाब्जीं नति मम हे सर्वदा विलीन मनें
पद-नत निजभक्तांप्रति पावनता सर्व दाविली नमनें! १
श्रीमद्धरिहर शाश्वत निखिल निरालंब सुप्रसन्नवर
लीला अगम्य तुमची केवळ अद्वैत एकरूप-धर २
सितघनजलकृतवासा! मंदाकिनिभूषिता! स्मशानरता!
शुक्लांगराग! नव पद्लंविनिमंदर वनाब्जमालधृता! ३
प्रियतम कुमार! खरतर विषवन्हिप्रकाशका! महोदारा!
सत्यासहित! विनायकहितकर! गोवाहना! द्विजाधारा! ४
अभिनवयोषालंपट! दिव्यांबर! जलजशंख! योगिपति!
नगवरधारक! पन्नगभूषणमंतासि सिद्ध नित जपती ५
प्रथमगणावृत सेवित! सतत, महेश्वर सुराधिनाथ विभो!
भवभयवारक शंकर! सुरनरवरकिन्नरादिवंदित! भो! ६

१ विशेषणें हरीकडे तशींच हराकडे लावतां येतील अशीं योजिलीं आहेत. आर्या ३, ४, ५, व ६ यांवरील द्वयर्थी श्लेषात्मक शिव व विष्णुपर आहेत.

करुणाकर जय! भगवन्! इहपरगति-सौख्य-दायका! देवा!
भेद स्वपर निवारुनि दे समदृष्टीसि घे सदा सेवा! ७

——×—— विष्णु बाळकृष्ण जोशी,

## प्रीतियोग.

(आर्या)

शृंगारिक काव्य किती विरहांतहि निर्मितात कविराय!
स्त्रीविरहें पतिविरहें हळहळती मूढ जीव हा! हाय! १
स्त्रीच्या इच्छा वांछा आशा कांक्षा फुलापरी वाहे
तो धन्य कांत जगतीं कांता ती धन्य त्याहुनी पाहें २
ती भामिनी ह्मणावी कीं द्यावी मोहिनी तिला संज्ञा
स्वामी तो कीं ती हें उकलावें गूढ तत्वतः सुज्ञा १
ही कल्पना कवींची साक्ष पुसावी तयां विशुद्धांस
कविही छळी स्त्रियेला विदित अशी रीति सर्व लोकांस ४
सप्त स्वरांत गातो स्त्रीवश कवि आपणा करील कसा
कवनीं रमो जन असे हेतु पहा लाउनी प्रचीति-कसा ५
खोटें खरें निवडती घेती सज्जन प्रचीत पाहून
इतर खुळे ते जाती वरल्या सोंगेंच दूर वाहून ६
जीच्या इच्छा वांछा आशा कांक्षा सदैव पति पुरवी
ती भू त्यजी न सूर्या संतत त्याचे सभोंवती मिरवी ७
कोण अशी सत्वाची भाग्याची भामिनी मिळे जगतीं
कोण असा तेजाचा कांत जया भोंवती फिरे स्त्री ती ८
हें प्रीति-चित्र मायाब्रह्म तसें रम्य वर्णनीं दिसतें
साक्ष न चरित्र-ग्रंथीं भागवतीं भारतींहि सांपडतें ९
चुकणें स्वभाव-धर्मचि मनुजाचा स्पष्ट विबुध हें ह्मणती
चुकलों कधीं न वदती दांभिक कीं देव ते खरे जगतीं १०
पतिपालि एक होतां स्थिर चित्तीं प्रीतिनाम योगानें

त्यातें विरह नसे नच लाभे कविकल्पनाश्रिता गानें ११
दे प्रीति सात्विकी तो दे न कधीं कामवासना-मूल
ऐसें, वर्म पहावें विरहींही होतसे दिशाभूल १२
कामाश्रित नश्वर तें प्रेम मनीं उपजवी सुखासुख तें
नित्य प्रेम कदाही सुखदुःखें अल्पही न आतुडतें १३
दावी दया क्षमाही करितें धरितेंहि शांति चित्तांत
तें प्रेम नित्य जीवां देतें ब्रह्मत्व याचि देहांत १४

———×——— ह. म. समर्थ

## अभंगसुधा

मृत्तिकेचा देव पोरानें फोडिला, तेणें दुखावला भक्त एक
पाषाणाचा देव तुटोनी पडला, व्याकुळ जाहला भक्त एक
सोनियाचा देव चोरें लांबवीला, जीवीं घावरला भक्त एक
नित्य तोचि देव अन्य ते उपाव, जाणे आत्मभाव भक्त एक
ज्ञानासाठीं अज्ञा अज्ञ भेटे जरी, वाया भेट तरी, कामा नये
करंट्याचें झालें करंट्या दर्शन, व्यर्थ तें घडून, कामा नये
आरोग्याकारणें रोगी रोग्याघरीं, जाय व्यर्थ फेरी, कामा नये
दुर्बळ दुर्बळा बिळगे संकटीं, वृथाचि ते गोष्टी, कामा नये
भिक्षुकाचे पाशीं भिक्षेचिया लोभें, गेल्या काय लाभे, सांग बापा
उन्मत्तासी जरी उन्मत्त भेटला, लाभ कोण त्याला सांग बापा
पिशाच्च धांवलें पिशाच्चाच मागें, दोष केवि भंगे, सांग बापा
एकापाशीं गेला दुसरा अबुद्ध, होय कां सुबुद्ध, सांग बापा
कावाड वडवीलें अनेका प्रकारें, खातां नये खरें, अर्थ काय
वारंवार यत्नें तक्र घुसाळिलें, नाहीं पालटलें, अर्थ काय
चोखून चोखिल्या चोइट्या मुखानें, नये रस तेणें, अर्थ काय
चावून चावून नरोट्या फोडिल्या, भक्ष्य नाहीं ब्याल्या अर्थ काय

———×——— ह. म. समर्थ

# कवि आणि राघू

[ एकदां एक कवि सहज सहल करीत चालला असतां त्याला पुढून येत असलेली एक कलावंतिण–नायकीण–दिसली. तिच्या हाताखांद्यावर एक राघू मोठ्या मौजेंत क्रीडा करीत होता. त्या कविला ‘ अहर्निश तथापि तो शुक मनांत दुःखें झुरे ’ ही सदुक्ति ऐकून माहित होती व तिचा त्याला आजपर्यंत अनुभवही आला होता. पण, आज येथें हें असलें भलतेंच अननुभूत व अदृश्यपूर्व दृश्य पाहून त्याच्या मनाला मोठा आचंबा वाटला ! पण, यांत त्यानें आचंबा तरी कसला करायचा ? ह्या असल्या ‘ कलावंतिणी ’ आणि हे असले ‘ राघू ’ या अफाट जगांत–इतकें कशाला, या आपल्या एवढ्याशा भारतवर्षांतसुद्धां–आपल्याला थोडे कां आढळतात ? ]

[ दिंडी ]

सहज फिरतां एकदां कविस एका
कलावंतिण दिसलिसे पुढुनि येतां
एक राघू बसुनिया तिच्या स्कंधीं
झुले, खेळे, डोलेहि निजानंदीं ! १
पाहुनीया तें दृश्य तसें डोळां
बहुत विस्मय वाटलासे कवीला
धार्ष्ट्य करुनी कवि तदा वदे त्यातें
“ अशा वाटे स्थितिमधें सुख कसें तें ? ” २
“ काय झालें ? कां ? तुह्मांस या स्थितींत
काय दिसतें ” तो वदे, “ दुःखयुक्त ”
“ काय दिसतें ? आं ! ” कवी वदे त्यातें
“ काय परवशतेमधीं दुःख ना तें ? ३
खरी परवशता असे डांकिणी ही
सर्व दुःखां त्रासांस मूळ पाहीं

हिच्यासरसी नच घोर अन्य साच
एक जगतीं बघ मूर्त घोर हीच ! ४
तूं न कां रे मग याच स्थितित येथें ?
रुचे मग ही अवदसा कशी तूंतें ?
तुझे बंधू , सोइरे, बघ कसे ते
अंतरिक्षीं विहरती स्वस्थ-चित्तें ! ५
अशी उन्नत सोडुनी गती खाशी
अधोगति ही स्वीकारितोस कैशी ?
काय तुजला तरि यांत असे लभ्य
वरी स्थिति ही कोणता वदे सभ्य ? ” ६
“ कां बरें ? रे ! वाईट काय यांत ?
काय कमती मज वदे इथें सत्य ?
सर्व सौख्यें आहेत सिद्ध पाहीं
जीं न मिळतीं शोधितां त्रिभुवनींही ! ७
नित्य मिळतें सुग्रास खावयाला
खाद्य शोधाया नको जावयाला !
घरीं बसल्या बसल्याच सिद्ध सारें
काय खायाचें वनीं शुद्ध वारें ? ८
ऊन, वारा, पाऊस पुन्हां तेथें
परी त्याचें नांवही नसे येथें
कुट्टकाळ्या ढोलींत तरूंच्याही
वसुनि तेथें कंठणें जिणें पाहीं ! ९
इथें बसण्या पिंजरा सुवर्णाचा
वाण येथें कोणती ? वदे वाचा !
श्रेष्ठ मनुजांसह वास मिळे तैसा !
मिळे रानीं कां सौख्यलाभ ऐसा १०

मनुज-सहवासें श्रेष्ठ मनुजताही
प्राप्त होते; वनिं परी लवहि नाहीं
चार शब्दहि मिळतात शिकायातें
मानवांही मनुजता जगीं येतें ! ११
असें शिक्षण कां कुठें मिळे रानीं ?
उगिच वणवण मोकाट मुक्त रानीं !
तसें स्वातंत्र्यहि काय पडे कामा ?
उगिच मग हा वाद कां वद रिकामा ?" १२
"अहह ! हतभाग्या ! काय वदसि ऐसें
तुला स्वातंत्र्य न सौख्य गमे कैसें ?
कुळीं तव येतां जन्म जरी मातें
झुगारुनिही देतोंच मनुजतेतें ! १३
जन्म मनुजांचा श्रेष्ठ ह्मणति सारे
याच जन्मीं निजपद प्राप्त ना रे !
परी असलाही जन्म नको मातें
जरी परवशताच ती पदरिं येते !" १४
"मनुजतेचा ज्या वाहसी तूं गर्व
लाल हरिचे तुजसमचि काय सर्व ?
अन्य नयनांतिल कुसळ दिसे मोठें
स्वकिय नयनींचें मुसळ गप्प कोठें ? १५
तसें दास्यीं खितपण्या त्यां न लाज
दोष मजसिच देण्यांत काय चीज ?
असुनि बुद्धी, देणगी परेशाची
तिचा उपयोग न योग्य करायाची १६
अक्कलहि ज्यां मिरविती तरी थोर
असें मी तर कालचें एक पोर

त्यांतुनीही तितुकी न बुद्धि मातें
जन्म माझा हालक्या कुळीं ना तो! १७
कोंडमारा अगदींच नसे तैसा
कधीं बागडण्यासही वाव ऐसा
मला अपुलें हें सौख्य बरें वाटे
त्यांत बोले तव जात काय मोठें?" १८
" असें ह्मटल्यावरि काय वदायाचें?
कळे ना ज्या स्वातंत्र्य काय साचें?
अशा मूर्खासह वाद जरी होय
तिथें सुज्ञांला मौन योग्य होय! १९
सर्व सौख्यां स्वातंत्र्य मूळ पाहीं
परी माझ्या नशिबांत तेंच नाहीं
ह्मणुनि मातें अनुदिनीं दुःख मोठें
परी तुजला कांहीं न यांत वाटे! २०
तुला देतां स्वातंत्र्य नको आहे
मागतांही मज मिळत न तें पाहे!
आवडीचा हा प्रश्न असे साचा
काय आणिक वद खुंटलीच वाचा!" २१
असा झाला संवाद उभयतांचा
लोक वदती ही नसे खरी वाचा
कवी-राघू-संवाद कसा होई?
अशक्यच त्या शक्यता कशी येई २२
लोक परि ते विसरती हें जनांत
अशक्यासच शक्यता आणण्यांत
खरी कर्तवता जगीं कीं असेच
कवीसच ती साधते एक साच! २३

निर्जिवांही कवि मुखें बोलवीती
सजिव वदति न कल्पना किती कोती!
नवल कसलें मग यांत काय सांगूं
सजिव असुनिहि बोलका त्यांत राघू! २४

——×—— वासुदेवसुत, कोल्हापुर

## महाप्रस्थान

'तांबे मंडळ' अजमीर तर्फे
कुसुम ४ रें
(राग–कालिंगडा)

जन पळभर ह्मणतिल 'हाय हाय'!
मी जातां राहिल कार्य काय?
सूर्य उगवतिल, चंद्र झळकतिल,
तारे अपुला क्रम आचरतिल,
असेच वारे पुढें वाहतिल!
होइल कांहिं कां अंतराय?
जन पळभर ह्मणतिल 'हाय हाय'! १
मेघ वर्षतिल, शेतें पिकतिल,
गर्वानें या नद्या वाहतिल,
कुणा काळजी कीं न उमटतिल–
पुन्हां तयांवर हेच पाय!
जन पळभर ह्मणतिल 'हाय हाय'! २
सखे सोयरे डोळे पुसतिल
पुन्हां आपुल्या कामिं लागतिल
उठतिल, बसतिल, हंसुनि खिदळतिल

मी जातां त्यांचें काय जाय ?
जन पळभर ह्मणतिल ‘ हाय हाय ’ ! ३
राम कृष्णही आले गेले,
त्यांविण जग कां ओसचि पडलें ?
कुणी सदोदित सूतक धरिलें
मग काय अटकलें मजशिवाय ?
जन पळभर ह्मणतिल ‘ हाय हाय ’ ! ४
अशा जगास्तव काय कुढावें ?
मोहिं कुणाच्या कां गुंतावें ?
हरि-दूता विन्मुख कां व्हावें ?
कां शांतित जिरवूं नये काय ?
जन पळभर ह्मणतिल ‘ हाय हाय ’ ! ५

——×—— भास्कर रामचंद्र तांबे

## महाप्रस्थान

‘ तांबे मंडळ ’ अजमीर तर्फे

कुसुम ५ वें

( अभंग-राग भूप )

जगाच्या बागेंत-फुललें मी फूल-लागली चाहूल-प्रेमीं लोकां
जन जिव्हाळ्याचे-भोंवती मिळाले-मज सांभाळिलें-नानापरी
अये मायभूमी !-किती लाडकें मी !-अंकीं घेसि प्रेमीं-मज दीना
अहा रे वरुणा !-वर्षुनी करुणा-पाजिलें जीवना-दिसंदीस
जगाच्या लोचना-अगा नारायणा-पृथ्वीचा पाळणा-डोलवीला
तोच तूं दयाळा !-अगा तेजोराशी !-उभा मजपाशीं-दीनबंधू !
करें जागवूनि-न्हाणोनी किरणीं-इंद्रचाप वर्णीं शृंगारीलें

अगा वायुराया !-कोवळ्या अंगुलीं-लावोनियां गालीं-हांसवीशी
हळू झुलवीसी-गोड गोड गासी-खेळले तुझ्याशीं-नानारीति
जातें मज आतां-मंगलाचें धाम-मूर्तिमंत प्रेम-बोलावीतें
घरासिहि जाता-हुरहुर वाटे-अश्रु पूर दाटे-लोचनांत !
असे हीन दीन-साऱ्यांचा मी ऋणी-उपेक्षीलें कुणीं-नाहीं दीना
नानापरी झाले-अपराध कोटी-घालोनिया पोटीं-क्षमा कीजे
अतां शेवटिल-परिसा विनंती-पाईं डोइ अंतीं-ठेवीतसे
लोभ असो द्यावा-अतां पूर्वीपरी-जरी जाय दूरी-काळा आड
सारे प्रेमिजन-करा बोळवण-पुढें आठवण-राहूं द्यावी !

———×——— भास्कर रामचंद्र तांबे

## ताराराणी

( चाल-चंद्रकांत राजाची कन्या )

या हो ! या हो ! रसिकवृंद या ऐकाया गाणीं
नभःपटावर नाच मांडिला सुंदर तारांनीं
विविध मंडलें रचुनि खेळण्या खेळ दिव्य, नाना,
वाट कुणाची बघती साऱ्या वळवुनिया माना ?
नव वधुच्यासम उच्छृंखल या स्तब्ध न बसणाऱ्या
तें फिरणें, तें गिरक्या घेणें कधि न सोडणाऱ्या
सुरम्य, स्वर्गींच्या कुसुमांनो ! सांगा आह्मांतें
कोण जिवाचा जिवलग तुमचा लक्षितसां ज्यातें ?
नित्यानंदीं स्वभाव तुमचा आज कुठें गेला ?
देवाजीच्या प्रेमामधल्या अल्लड तुह्मि बाला
सुकला कैसा रुचिर पुष्पसम वदनचंद्र तुमचा ?
स्वच्छंदानें विहार करणें नाद तुह्मां साचा
ऐका ! ऐका ! कुठुनि येइ ही शब्द सुधाधारा ?
यन्नादानें भरला माझा हृदयभाग सारा

गंधर्वांच्या राणीचा हा असेल सुस्वर कां ?
श्रवणीं येतां मोहवूनियां टाकी जो इतुका
नैराश्यें निःश्वास भरुनि हा कोठुनियां येई ?
सरस मानसा उचंबळुनियां आणिल हा पाहीं

कुण्या रमणिनें स्वनाथ विरहें आक्रंदन वरिलें
चला ! चला हो ! शांतवावया तिजलागुनि वहिलें
सखीभोंवती गुरफटलेली चंद्राची जाया
अमृतगर्वहारिणी रोहिणी लक्षि सोमराया

सुमसंभारांतरीं झळकतें गुलाब एक जसें
नभोमंदिरीं ताराराणी सौंदर्यें विलसे
हृदयविहारा ! जीवनराजा ! कुठें गुंतलासी ?
विरहानल बघ कसा जाळितो, करुणा नच कैसी ?

चित्तचातका ! मन्मन भृंगा ! ये रे लवलाही
तुजविण मातें गमती अवघ्या शून्य दिशा दाही
तारागण हा अवघा जमला, उणिव एक तुमची
कलाहीन वावरे मजा त्या तुजवांचुन कैंची ?

निसर्ग सुंदर स्वरूप तुमचें दुजी नयेच सरी
भुवनसुंदरा ! खुलवीं विश्वा स्वतेज कासारीं
व्याकुळ झाले प्राण अतां बघ न कंठवे काळ
ओढुनि धरिसी बहु कळत तुज नाहिं काळ वेळ

असह्य झाला दुःखभार तिज असुं आले नेत्रीं
धायी धायी रडूं लागली विकल बनुनि गात्रीं
हळुच वदन बाहेर काढुनी पाही रोहिणिपती
जवळ ढगामधिं लपुनि सर्वही ऐकत जो निश्चितीं

विनोदचतुरें अंबरराजें जें येणें केलें
दिव्य सुखाची सीमा ! भवतीं नंदनवन बनलें !

———×——— अनंतकुमार

## पंडितप्रशस्ति

वडोदें येथें मराठी साहित्य संमेलन झालें त्यावेळीं सुचलेले विचार

श्लोक

मोठे पंडित थोर थोर असती देशान्तरीं आपुले
शास्त्री, वैद्य, कवी, पुराणिक, तसे शिष्टाग्रणी थोरले
पत्रें चालविती कुणी, असति ते सन्मासिकांचे धनी
कोणी नाटककार, कोणि खपती कादंबरीसाधनीं १
कोणी कल्पकता जनीं पसरिती, नव्या कथा वर्णिती
मोठाले इतिहास कोणि रचिती प्राचीन संशोधिती
कोणी संस्कृतिच्चीं पुराणकुसुमें वेंचोनि देती जना
गीतेचें कथिती रहस्य कुणि जें सामर्थ्य देतें मना २
भाषा स्वीय पढोनिया कितिक ते पाश्चात्यही साधिती
वंगा गुर्जरि भारती इतरही पौर्वात्य अभ्यासिती
त्या त्या उत्तम वाङ्मयें सजविती कोणी मराठीस ते
औदार्यें सकला जना वितरिती, जें आपणां येत तें ३
ऐसे हे अधिकारि थोर असती सन्मान्य लोकागळे
रत्नें हीं असतींच आर्यजननीपोटीं सदा निर्मळें
भाग्यानें सजलीं समस्त नगरी शोभायमाना दिसे
मोठें पर्व गमे, अशा सुसमयीं, भूपालही[1] येतसे ४
भाषेचा अभिमान मूर्त कवि हे, यांचें कसें गौरव-
कोणाला करवेल, वर्णन खरें, जाणे न हा पौरव

1 श्री सयाजीराव महाराज गायकवाड.

येथें सत्र महा दिनत्रय असे ज्ञानार्जना उत्तम
यांचे वादविवाद ऐकुनि गमे सारेंहि नासे तम ५
पूर्वीपासुनि ही बडोदरपुरी दे पंडितां सावली
तैंवी आजहि देतसे निजबळें प्रोत्साहना मावली
होवो वाङ्मयवृद्धि थोर अपुली या पंडितांच्या गणीं
आत्मज्ञान जनीं समस्त पसरो, अज्ञान नाशो क्षणीं ६
झाला संगम, पूर्व पश्चिम नद्या एकत्र झाल्या इथें
स्वांगें स्नान करावया भय मनीं कांहीं न ठेवा तिथें
घ्या जें उत्तम तेंचि साधुनि परी वाईट सारा दुरी
ऐसें पंडित सांगती शिणवुनी हो आपुली वैखरी ७

—×— पां. रा. नंदुरबारकर

## कशाला ठेवावी.

(शिखरिणी वृत्त)

रहाया स्वच्छंदें प्रतिदिनीं मिळो स्वास्थ्य ह्मणुनी
खपे ना कोणीही वडिल अगदीं जीस सदनीं
उणें काढी भांडे उलट बसते नित्य रुसुनी
कशाला ठेवावी कुमति सदनीं ती पतिजनीं १
हिताचा दावाया पथ जर कुणी जाय निजला
स्वतांच्या मानाला खचित तरि तो होय मुकला !
ह्मणे खोटें आहे जन सकल मी एकचि खरी
कशाला ठेवावी कुमति सदनीं ती क्षणभरीं ! २
सदा ही कंटाळा करि उरकण्या कार्य घरचें
वदावें तें सारें उलटचि जगाच्याहुनि हिचें
उठाठेवी नाना करित फिरते जी प्रति घरीं
कशाला ठेवावी कुमति सदनीं ती क्षणभरीं ३

किती आहे आद्य नियत पतिचा हें न बघुनी
स्वसौख्यासाठीं जो बहुत धन टाकी उधळुनी
सदा श्रीमंताशीं गरिब असुनी मत्सर धरी
कशाला ठेवावी कुमति सदनीं ती क्षणभरी ! ४
धनी सांगे त्याच्या उलट करिते जी हरघडीं
हिताचें ऐके ना, हुजत करुनी वेळ दवडी
जरी बोले कांहीं तडक बहुही दुर्वच करी
कशाला ठेवावी कुमति सदनीं ती क्षणभरी ! ५

कमलाकर

## प्रेमाची हाक

" God surely must so start and quickly turn whenever the cry of ' Father ' strikes his ears "

*W. Canton.*

[ वृत्तः—शार्दूलविक्रीडित ]

पुत्राच्या विरहें हताशहृदयी प्राणी अभागी कुणी,
त्यातें आठवुनी झुरे निशिदिनीं तो आपल्या मन्मनीं;
दुःखाचा लवही तरी विसर तो होईल या हेतुंनीं
त्यांतें घेवुनि देवदर्शन निघे घेण्यास एके दिनीं १
जातां मार्गिं तशांत त्यास दिसलीं कांहीं मुलें खेळतां,
"बाबा[1]" स्नेहभरें, दयार्द्रहृदयें कोणी[2] असें बाहतां;
थांबे तत्क्षणिं तो मुदें नर तदा, मागें वळोनी बघे,
झाला चित्तिं निराश, टाकित पुढें निःश्वास दुःखें निघे ! २
आहे चीज अमोल एक कळले, ही " पुत्रवात्सल्यता "
लाभेना उपमा तया त्रिभुवनीं जातां कुठें शोधितां !

१ आपल्या पित्यास २ त्या खेळणाऱ्यापैकीं कोणी एका मुलानें

"देवा" भक्तिभरें, मुदें प्रभुवरा हांका अ[illegible] मारतां,
तो मागें वळुनी बघेल अपुल्या भक्ताकडे तत्त्वतां[1] ! ३

———×——— त्र्यंबक अनंत देशपांडे

## कां[illegible]

( मंदाक्रांता )

कर्तव्याच्या निबिड विपि[illegible] हिंडतो कांत दूर,
मुग्धा बाला भुवनिं झुरते. येइ दुःखास पूर,
दांपत्याचीं प्रणयकुसुमें हासवी पु[illegible]
कंठाश्लेषी विरहहृदयीं लाविती तीव्र [illegible]ास १
शय्यास्थानीं नयन मिटतां आठवे तो सुदीन
जेव्हां भेटे रमण रमणी, प्रीति होती नवीन
संसाराचें सुमन फुलतें[2] सेविलें ज्या क्षणाला
दोघांनींही अमित लुटिलें भूवरी स्वसुखाला २
[illegible]गाराच्या विविध लहरी गोड तैसा विनोद
चित्तीं येतां, क्षणभर फुले चित्त, होई प्रमोद
प्रत्यक्षाची परि बघुनिया मोकळी हाय शेज,
डोळे येती भरुन, कढतो जीव, येई न नीज ! ३
शय्यास्थानीं तळमळ करी देह उन्निद्र फार
संसाराच्या भयद विपिनीं गेहिनी [illegible]क सार
कर्तव्याचा पथ विकट हा [illegible]वि अज्ञात भावी
तारुण्याच्या सुखद भुवना हाय! तो [illegible]ग लावी ४
कर्तव्याची भयद तरणी नीट कैशी तरेल ?
दांपत्याची विरहरजनी पूर्ण केव्हां सरेल ?
अज्ञाताचा तुटुन पडदा चित्र भावी सुखाचें
हातीं केव्हां तरि विभुवरा ! सांग तें यावयाचें ? ५

———×——— मनोह[illegible]

---

१ खरोखरच २ फुलणारें

जाहीर विनंती:-रत्नावलीच्या जुन्या कविमित्रांस आणि नवीन अपरिचित कवींस प्रत्येकानें आपल्या एक दोन सुरस कविता नेमानें पाठवीत जाव्या अशी आग्रहाची विनंती करावी अशी कित्येक हितचिंतकांची सूचना आल्यावरून आह्मी त्यास तसें करण्याविषयीं आग्रहपूर्वक विनंती करितों. कविता पाठवितेवेळीं कविवर्गास केलेल्या सूचनाकडे आमचे मित्र लक्ष पोंचवतील अशी फार उमेद आहे.

## काव्यरत्नावळी मासिक पुस्तक.

मराठी कविता विषयास वाहिलेलें हें एकच मासिक आज ३६ वर्षे चालू आहे. यांत प्रस्तुतच्या नामांकित कवींच्या कविता आणि काव्यें प्रति महिन्यास येतात. वर्षास तीन हजार कविता छापून निघते. वर्षारंभ जानेवारीस होतो. नवीन वर्गणीदारांस वर्षाचे मागले अंक देण्यांत येतात. मासिकाची वर्गणी सोईची व्हावी ह्मणून अवघी १॥ रुपया ठेविली आहे. व्ही पी. रजिष्टर खर्च निराळा पडत नाहीं. मागील सालचीं आयतीं बांधिलेलीं थोडीं पुस्तकें शिल्लक आहेत. रसिकांस तीं प्रति वर्षाच्या पुस्तकास बारा आणे किंमतीस मिळतात. एकाच वेळीं पंधरा पुस्तकें मागविल्यास फारच स्वस्त ह्मणजे अवघीं ७ रुपयांत मिळतात. मराठी कवितेच्या रसिकांनीं व हितचिंतकांनीं सततचा आश्रय द्यावा. किंवा नवीन वर्गणीदार मिळवून द्यावे, अथवा सुरस कविता पाठवाव्या, अगर जुनीं पुस्तकें खरीद करावीं, कांहीं तरी रत्नावलीच्या उत्कर्षार्थ यत्न करावा ही त्यास सविनय विनंती आहे.

नारायण नरसिंह फडणीस
संपादक:—काव्यरत्नावली
जळगांव पू. खा.

रजिस्टर्ड नंबर बी. ५३७

जास्त प्रतींच्या वर्गणीदारांनीं

# जरूर वाचावें.

सन १९२४ सालापासून जास्त प्रती एकाच नांवावर पाठविण्याचें बंद केलें आहे. पोष्टांतून जास्त प्रतींचीं बंडलें एकादे ...दीं ... ...ीं न ... गहाळ होतात, यामुळें ते अंक ... राहत नाहींत, ह्मणून ही पद्धत ... पुढें त्यानी एक एकच प्रत माग... ...ाह

...क, काव्यरत्नावली जळगांव.

---

...र्षि र...द्रनाथ टागोर यांच्या उद्बोधक ...ाङ्मयाचा मराठींत प्रसार करणारी

# शा...तिनिकेतन-माला

सुरू झाली. ज्याच्या अधिकारयुक्त लेखणीनें वेदांतासारखें पार... ...क, व अध्यात्मिक अशा गूढ विषयांचे सुलभ प्रतिपादन के... ...न काव्य आणि वेदांत या दोन परस्पर विरोधी दिसणाऱ्या विषयांचें योग्य मीलन ज्याप्रमाणें उपनिषदें भगवत् गीता, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांत हा मिलाफ केलेले दृष्टीस पडतें. त्याप्रमाणें रविंद्राच्या ग्रंथांत हा मिलाफ दिसून येतो. मराठी वाचकांस या ग्रंथाचें फार महत्व आहे. दोन भाग प्रसिद्ध झाले. प्रत्येक भागाची किंमत १ रु. प्रवेश फी १ रु. भरणारास प्रत्येक भाग ८१२ ट. ह. शिवाय

प्रो०-शांतिनिकेतन, पुणें-सिटी

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळानें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

**श्लोक.**

तीं तीं पदें नित्य फिरूनि येती ।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या बावजी प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष २१ वें ]   ऑक्टोबर सन १९२३   [ अंक १० वा

वार्षिक वर्गणी ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

अनुक्रमणिका.

मर्दानी झांशीवाली ( दु. आ. तिवारी ) ............... २१७
भामा-द्रौपदी-संवाद ( ह. म. समर्थ ) ............ २२३
"श्री शिवाजी महाराजांची" तसवीर ( कृष्णाग्रज, पुणे ) २२६
आत्म्याचे बोल ( नाथ-पाठक ) .................. २२९
याचना ( गिरीश ) ............................... २३३
तया विश्वेशा नमूं नित्य याहो ! ( सुंदर भास्कर वैद्य ) ... २३३
अंधता ( वामन जनार्दन कुंटे ) ..................... २३५
वीणेच्या मृदुल स्वनी ( सीताराम बाळकृष्ण जोशी ) ... २३५
सारें फोल असें ( सीताराम बाळकृष्ण जोशी ) ......... २३६
कवीचें स्वप्न ( ह. म. समर्थ ) ..................... २३७
भेटशील ( "वसन्तविहार" ) ....................... २३७
दुरून वंदन ( अनंत कृष्णाजी टेकाडे ) ............... २३९
अभंगमाला ( दु. आ. तिवारी ) ..................... २४०

---

## जास्त प्रतींच्या वर्गणीदारांनीं

# जरूर वाचावें.

सन १९२४ सालापासून जास्त प्रति एकाच नांवावर पाठविण्याचें बंद केलें आहे पोष्टांतून जास्त प्रतींचीं बंडलें एखादे वेळीं वर्गणीदारास तीं न मिळतां गहाळ होतात, यामुळें ते अंक पुन्हां पाठविण्यास प्रति शिल्लक राहात नाहींत, म्हणून ही पद्धत बंद करण्यांत आली आहे यापुढें त्यांनीं एक एकच प्रत मागवावी अशी विनंती आहे

संपादक, काव्यरत्नावली जळगांव.

# काव्यरत्नावलीचें दप्तर.

दहावा अंक आज वाचकांकडे जात आहे. पुष्कळ दिवसांपासून रत्नावलीवर अनियमितपणाचा आरोप होता. आणि तो खरा होता. त्यांतून आह्मी आज मोकळे होत आहोंत. गेल्या मार्च महिन्यांत आह्मी इन्फ्लुएंझानें एकदम भयंकर आजारी झालों. ईश्वरकृपेनें त्यांतून आह्मीं बरें झालों. आणखी कांहीं दिवस रत्नावलीची सेवा आमच्या हांतून होण्याचा योग असल्यास ती ईश्वराची कृपाच समजावी. या वर्षी रत्नावलीस थोडे आश्रयदाते मिळाले. पण तेवढ्यानें भागत नाहीं. कवितांप्रिय वाचक मिळविण्यास फार खर्च येतो. एकंदर सर्व हिशेब करितां पांच वर्गणीदारांमागें १० रुपये खर्च येतो. यावरून खर्चाची कल्पना होईल. वर्तमान पत्रांतून जाहिरात प्रसिद्ध केल्यानेंही इतकाच खर्च किंबहुना जास्त खर्च होतो. दर महिन्यास आठशे अंक आह्मीं छापतों. वर्ष अखेरीस १००० रुपये खर्च येईल. त्याचा तपशील असा कीं १५० रुपये कागद. १२५ रुपये मजुरी. ५०० रुपये कंपाझिटर चार्ज व प्रिंटिंग चार्ज. १२५ रुपये तिकीटें. शिवाय वर्गणीदार मिळविण्याचा खर्च १०० रुपये. ह्या हजार रुपयांच्या ऐवजीं आह्मांस ६०० रुपये वर्गणी मिळाली. यावरून वाचकांस आमच्या धंद्याची कल्पना होईल. वर्गणीदारांकडे ६०० प्रति जातात २०० प्रति शिल्लक रहातात. ह्या प्रतींतून भोयदला प्रति ५० जातात. चालू सालांत ५० वाचकांकडून व्हीपीचे अंक परत आले हें नुकसान निराळेंच.

सन १९२४ सालापासून वर्गणीदारांस जास्त प्रति पाठविण्याचें आम्ही बंद केलें आहे. ह्या प्रति केव्हां केव्हां पोष्टांतून गहाळ होतात. तेव्हां वर्गणीदारांकडून तितक्याच प्रतींची पुनः मागणी येते. त्यांस तितके अंक आम्ही पुनः पाठवावे कसें? एखादा अंक कोणी मागितला तर तो पाठवितां येतो. ह्मणून ही सवड आम्ही मुद्दाम काढून टाकली आहे.

रत्नावलीस कांहीं मदत व्हावी या हेतूनें आमचे कवि-मित्र रा. रा. ह. म. समर्थ यांनीं साहित्यचंद्रिका नांवाचें एक पुस्तक लिहून दिलें आहे. प्रत्येक वर्गणीदारानें त्याची एक एक प्रत घेऊन आह्मास मदत करावी अशी आह्मी अपेक्षा करितों. त्याची किंमतही मुद्दाम आह्मी कमी ठेवली आहे. जानेवारीच्या अंकाबरोबर हें पुस्तक आह्मी व्हीपीनें पाठविणार आहोंत. ह्मणजे निराळा खर्च नको. आमची ही विनंती ज्यास मान्य नसेल त्यांनीं अगोदर आह्मास कळवावें ह्मणजे त्यांजकडे ही साहित्यचंद्रिका जाणार नाहीं या पुस्तकांत छंद, अलंकार, रस, गुण इत्यादिकांचें सोदाहरण विवेचन केलेलें आहे. शिवाय कांहीं मित्रांच्या सूचनेवरून गोविंदाग्रज, विनायक, टिळक, केशवसुत, दत्तकवि, टेकाडे, अनंततनय, तांबे, मुजुमदार, बालकवि, तिवारी, लेले वगैरे अधुनिक कवींच्या काव्यांतील रसालंकारांचें वेचेंही परिशिष्टांत जोडले आहेत. अशा प्रकारचा हा अगदीं सुबोध ग्रंथ पहिलाच होईल. किंमत १ रुपयाच ठेवली आहे. ही किंमत ग्रंथाच्या मानानें फारच कमी आहे.

## साभार स्वीकार

दत्तांची कविताः— कै. दत्त कवींची प्रसिद्धि यापूर्वीच त्यांच्या कवितेनें झालेली आहे. त्यांच्या वेळीं जें विशिष्ट कवि मंडळ होतें, त्यांत त्यांची योग्यता त्यांच्या बरोबरीची होती.

हा अल्पवयी कवि केवळ २४ वर्षांचा सरासरी होता. याचे विद्याभ्यासाचे दिवस वजा जातां इतक्या अल्प काळांत त्यानें बरीच कविता लिहिली आहे. ह्या कवीच्या मृत्यूनें अमिच्या मराठीवाङ्मयाची बरीच हानी झाली आहे. पुष्कळ वर्षांपूर्वी रत्नावलींत याचें त्रोटक चरित्र दिलेलें आहे. पण तें फारच अपुरें आहे. या कवीच्या चरित्राची व काव्यसंग्रहाची आज पर्यंत मोठी उणीव होती. ही उणीव त्यांचे चिरंजीव रा० सा. विठ्ठल दत्तात्रय घाटे एम ए. रत्नागिरी यांनीं नाहींशी केली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. रा सा. विठ्ठलराव हे स्वतः कवि आहेत त्यांच्या कांहीं कविता आमच्या अवलोकनांत आहेत. बापाची कविता मुलानें प्रसिद्ध केल्याचा हा मराठी वाङ्मय दृष्टीनें मोठा अपूर्व योग आहे. हा त्यांचा प्रयत्न पितृऋण फेडण्यास चांगला साधनीभूत झाला आहे. कै. दत्तकवींचे परम स्नेही रा. रा. प्रसिद्ध चंद्रशेखर कवि यानीं ह्या कवीविषयीं हृद्गत हा एक लेख लिहिलेला आहे त्यावरून ह्या कवीची किती थोर योग्यता होती याची अटकळ बांधतां येईल. या कवीच्या काव्याचे उतारे देऊन आह्मी आमच्या शिफारसीचा प्रत्यय आणून दिला असता, परंतु तसें करण्यास स्थलाभाव हें कारण आहे. रसिक वाचकांनीं ह्या काव्याची एक प्रत आपल्या संग्रहांत ठेवल्याशिवाय राहूं नये. रा. सा. घाटे यांनीं लिहिलेलें चरित्र चांगलें वाखाणण्यासारखें झालेलें आहे त्यांनीं मोठ्या प्रयासानें माहिती मिळविलेली आहे. इतकी चांगली माहिती दुसऱ्या कोणास देतां आली नसती अशी आमची खात्री आहे. दत्तकवीच्या दर्जाविषयीं रा सा. घाटे यानीं जे प्रस्तावनेंत थोडक्यांत विचार प्रदर्शित केले आहेत ते चांगले मननीय आहेत. व आमचे

मतही त्यांच्या सारखेंच आहे. दत्त कवि हा कोणाचा चेला नव्हता. अशा स्वतंत्र कवीस कोणी चेला ह्मटल्यास ते त्याचें ह्मणणें अवास्तव होईल ह्या गोष्टींत या कवीची कविता आजही साक्ष देईल, इतकें सांगून रा. सा. घाटे यांची आह्मी रजा घेतों.

गीतोपायन— प्रसिद्ध नाटककार व कवि व ग्रंथकार रा. रा. श्रीपाद्राव कोल्हटकर यानीं आजपर्यंत जी कविता लिहिली आहे. ती मुंबईच्या गोविंदाग्रज मंडळानें छापून प्रसिद्ध केली आहे. निरनिराळ्या कवींच्या निरनिराळ्या मासिकांतून जी कविता प्रसिद्ध झाली आहे ती एके ठिकाणीं प्रसंगवशात् मिळत नाहीं ही उणीव सदर मंडळानें दूर करून आज हें गीतोपायन वाचकांपुढें त्यानें ठेविलें आहे, अशा तऱ्हेचा दुसऱ्या चांगल्या कवीच्या कविता छापण्याचा प्रयत्न झाल्यास तें एक चांगलें साधन होईल. यांत एकंदर १६ प्रकरणें असून सहा आणे किंमतही फार नाहीं. एकंदर कविता शुद्ध अशा आहेत. यांतील बहुतेक प्रकरणें चांगलीं आहेत. काव्य रसिकांनीं आपल्या संग्रहांत याची एक प्रत अवश्य ठेवावी.

बकुळींची फुलें— वरील प्रमाणेंच एकत्र केलेल्या कवितांचें हें एक सुंदर पुस्तक आहे. रा. रा. केशवराव टेंभुर्णीकर संगमनेर यानीं हें पुस्तक छापविलें आहे त्याची किंमत सहा आणे फार नाहीं. यांतील गोड कविता वाचकांचें खास मनोरंजन करील असें आह्मी आश्वासन देतों. हे आमच्या काव्यरत्नावलीचे चांगल्यापैकीं कवि आहेत. तेव्हां यांच्या काव्य कृतीविषयीं निराळी शिफारस नको. यांत एकंदर २५ प्रकरणें असून तीं बहुतेक वाचनीय आहेत. यांच्या या काव्याविषयीं उमरावतीचे प्रसिद्ध व रसिक कवि रा. रा. बळवंतराव खापर्डे व पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतील मराठी भाषेचे प्रसिद्ध प्रोफेसर

रा. रा. श्रीकृष्णपंत चापेकर यांनीं अनुकूल अभिप्राय दिले आहेत ते अक्षरीं यथार्थ आहेत. यांतील चांगले उतारे व गोड कल्पना वाचकांस दाखविण्याचें आमच्या मनांत होतें परंतु स्थलाभावामुळें मोह आवरून धरावा लागतो शिवाय थोड्या पैशांत वाचकांस आपली हौस पुरी करून घेतां येईल.

पुष्पराग— भास्करराव चंदूरकर इचलकरंजी यांनीं हें पुस्तक रचिलें आहे. एकत्र कविता यांत आहेत. हे गृहस्थ आमच्या रत्नावलीचे कवि आहेत. यांची कविता साधी व स्पष्ट असते. दूरान्वय व वेडीं वांकडीं रूपें यांच्या कवितेंत आढळत नाहींत. कै. रेंदाळकरानें यांच्या कवितेस बरें झटलें आहे. हें त्यांचें सर्टिफिकेट त्यांच्या कवितेला साजणारें आहे. व आमचेंही मत त्यांच्या कवितेविषयीं अनुकूल आहे. यांत त्यांची २५ प्रकरणें आहेत. व त्यांचे स्नेही रा. रा बाबूराव पडळकर बी. ए. यांचींही ५ प्रकरणें यांत आलेली आहेत. हीं प्रकरणें चांगलीं गोड आहेत. पांच आणे देऊन हा पुष्पराग संग्रहीं ठेवावा अशी याची योग्यता आहे.

वीणाझंकार— हें एक छोटेसें कवितेचें पुस्तक यशवंत आणि गिरीश ह्या दोन कवींनें लिहिलेलें आहे. दोन कवींच्या सौजन्याची ही एक नवी टुम निघाली आहे. ही कांहीं वाईट नाहीं. भांडण मिटण्यास हें एक चांगलें साधन आहे. कवींचे तंटे आपण जागोजागीं पहातों. छपाईचें काम चांगलें झालें आहे. आकार ही मनोहर आहे. यशवंत कवीच्या १० आणि गिरीश कवीच्या ८ अशा यांत कविता आहेत. हें पुस्तक वाचतांना आह्मी कांहीं खुणा केलेल्या आहेत. पहिली खूण शारदेच्या वीणा कवितेंत दिसली. वृत्ति आणि स्फूर्ति निरनिराळी कल्पिली आहे. तें कां तें कळत नाहीं पण कोणी ह्मणतात कवीला दोष लावतां येत नाहीं! त्यांतच आह्मास मराठी शद्बाची हेळसांड दिसली. तशीच मराठी शद्बाची सौंदर्यहानि झाली

आहे. लहरींला उकळी फुटल्याचें आजच आह्मी यशवंत-रावांच्या तोंडून ऐकतों. उकळी उन पाण्याला फुटतें. अस्तप्राय महाराष्ट्रास प्रणाम ह्या कवितेंत " स्वराज्य लक्ष्मी रुष्ट जाहली आणि पाठमोरी " यांत आणि शब्द घातल्यानें कवीची भाषा पद्धति कळतें. कवितेंत आणि शब्दाचा कोणी कधींच उपयोग करित नाहीं. व करित असल्यास तो गौण सांप्रदाय आहे. या ऐवजीं त्या ठिकाणीं अशा दुरुस्ती कवीनें केली तर काय वाईट दिसेल? " स्वराज्य लक्ष्मी रुष्ट होउनी झाली पाठमोरी " यांतच दुसऱ्या कवितेंत समुळ हा शब्द आहे. तेथें समूळ शब्द पाहिजे. ह्या त्यांच्या समुळ शब्दाच्या ऐवजीं सकळ शब्द काय वाईट? तिसऱ्या कवितेंत " जलचर हाती " याचा बोध होत नाहीं घरमेद्यांनीं " घात मांडिला " घात कसा काय मांडतात. डाव मांडतात, असें तरी ह्मणावयाचें होतें. पडद्यापल्याड बजावतों वगैरे शब्द काव्यांत शोभत नाहींत आणखी कांहीं दोष स्थळें आहेत तीं दाखविण्यास जागा नाहीं. संस्कृतांतील ऱ्हस्वाचे दीर्घ, दीर्घाचे ऱ्हस्व असें यांत बरेच शब्द आहेत. ही चूक फार मोठी आहे आर्स्थाचा सवाल, आई वगैरे प्रकरणें चांगलीं आहेत. गिरीश यांच्या झुकलेली नौका या कवितेंत खालीं जल, वर आकाश असें असतें तर बरें होतें. तसेंच पाय घसरला तर या कवितेंत खोली ही किती ह्या ऐवजीं खालीही खोली असें असतें तर बरें होतें. स्थानभ्रष्ट फुलास यांत गोड तंद्रीमध्यें या ऐवजीं गाढ तंद्रीमध्यें असें असतें तर बरें होतें. तसेंच " संपूर्ण बालार्कसा " यांत संपूर्ण या शब्दाचें स्वारस्य काय? सूर्य नित्य पूर्णच असतो. चंद्रासारखा तो लहान मोठा होत नाहीं. बाकी गिरीश यांची कविता यशवंतरावांपेक्षां पुष्कळ शुद्ध आहे. विद्रूप रूपें यांच्यात सांपडत नाहींत विध-वेचीं फुलें ही करुणास्पद कविता चांगली आहे. अस्तोदय, पाय घसरतांना वगैरे प्रकरणें चांगलीं आहेत. हा घीणाझंकार

५६७ बुधवार पेठ पुणें कानेटकर बी. ए. यांजकडे मिळतो. किंमत ८ आणे

काव्यतुषार— हेंही एक लहानसें पुस्तक वरील प्रमाणे तिवारी व कमलाकर ह्या दोघांनीं छापलें आहे. कमलाकर कवि ह्मणजे गो. गो. अधिकारी. अलीकडे तिवारीचें नांव सर्वतोमुखीं झालेलें आहे. तिवारी कवीचे पोहे व अधिकाऱ्यांचा कोंडा असा हा अपूर्व संगम झाला आहे. या पुस्तकांत तिवारीला महाराष्ट्र शाहीर ह्मटलें आहे. आणि अधिकाऱ्याला राष्ट्रीय कविताकर ह्मटलें आहे. दोघांच्या मिळून १५ कविता आहेत. ह्या १५ कविता प्रसिद्ध होण्यापूर्वीं दोघा कवींच्या नांवाचा मुंबई ठाण्यास खूपच गाजावाजा झाला. व पुढें तोच हा मराठी भाषेंत अगदी अपूर्व ग्रंथ बाहेर पडला. निर्वाणीची वाणी— गझलनें गाईली आहे. गझल हे उर्दूंतील वृत्त आहे तें अझून आमच्या कानास चांगलेसें गोड लागत नाहीं. या पेक्षां निव्वळ सारें गद्यच लिहिलें असतें तर काय वाईट होतें? " जिथें ठासून रहाल–कतल मी तेथ होईन " या चरणाच्या आह्मास अर्थ पाहिजे आहे. कृपेनें कळवावा नाहीं तर तिवारी आहेतच. त्यांना अर्थ विचारूं व त्याकरिता दुसरा अपूर्व ग्रंथ लिहूं. सदर चरणही किती गोड आहे! आणखी एक यांतील गोड चरण पहा " निद्रानीं लेईजे प्राण–निद्रानीं देईजे प्राण " वा! रे! वा! फारच गोड कविता! आणखी एक गझलची मजा पाहा " पहातो गोल बांधून–लढे या भाउच्या प्राण " करा या चरणाचा अर्थ. प्राण लढतो हें आजच आह्मी तिवारीच्या तोंडून ऐकतों. वेदांति लोक प्राणाच्या अनुद्ययांची उगीच मारामारी करितात आणि आमचे तिवारीबोवा त्याच प्राणास लढावयास लावतात प्रत्येक काळांत शाहीर उत्पन्न झालेच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं कांहीं काळ तसाच शाहीरावाचून निघून गेला तर काय वाईट? कमलाकर कवींच्या ७ कविता आहेत. यांतील प्रकरणें कांहीं बरीं आहेत. महाराष्ट्र

गीतांतील कांहीं चरण पूर्व कवींच्या काव्यांतील अर्थानुरोधानें आहेत. संस्कृतांतील विकृत शद्ब अनंद, भुमी, गूण वगैरे शद्बानें कवीचें शद्बज्ञान बाहेर पडतें. तसेंच डरनेवाला, कलिजा, दिलासाठीं, मैदान वगैरे परकीय भाषेच्या शद्बानें कविता अगदीं विद्रूप झाली आहे. नव्या युगाचें नवें जन ह्या कवितेंत ही " विधवा रडते इकडे " असें दुःखोद्गार काढावयाचे आणि तिचे खडे बोल ह्मणावयाचे हें कसें ? खडे बोल याच्या अर्थ अधिकारी काय करितात हे आह्मास माहित नाहीं. या अपूर्व ग्रंथाबद्दल आह्मास जें लिहावयाचें तें आह्मी लिहिलें आहे. हें लिहिणें प्रेमाचें समजून आपलें काव्य निर्दोष लिहिण्याचा दोन्ही शाहीर प्रयत्न करितील अशी आह्मी आशा करितों. मराठी भाषा आज चांगल्याच वळणावर येत आहे. तेव्हां काव्य निर्दोष होण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

मातांचा जयजयकार— हें लहानसें पुस्तक रा. रा. दत्तात्रयपंत काळे मुंबई यांजकडून आलेलें पोचलें. यांत आई, गोमाता, मातृभाषा, मातृभूमी व जगज्जननी अशा पांच प्रकारच्या मातांचें वर्णन आहे. यांतील सांगितलेलीं विधानें व पांच मातृभक्ति याचें विवेचन चांगलें आहे. श्रावण व॥ ३० च्या दिवस हा मातृदिन फार महत्वाचा आहे. या पवित्र दिवसाचा उल्लेख शाकुंतल नाटकांत कालिदासानें मोठ्या कुशलतेनें घातला आहे. दुष्यंत कण्वाश्रमांत राहिल्यानें त्यास एकदम ह्या मातृदिनाची आठवण झाली. व या दिवशीं मुलानें आईकडून वायन घ्यावयाचें असतें ह्मणून तो फारच तळमळला शेवटीं या पवित्र दिवसाची हानी होऊं नये ह्मणून त्यानें आपल्या मित्रास आईचें वायन घेण्यास पाठविलें. या गोष्टीचा उल्लेख या जयजकारांत रा. रा. काळ्यांनीं करावयास पाहिजे होता असो एकंदर पुस्तक वाचण्यासारखें आहे. वाचकांनीं अवश्य वाचावें. किंमत २ आणे. पत्ता केशवजी नायकाची चाळ कांदेवाडी मुंबई

# काव्यरत्नावली

## अंक १० वा.

## मर्दानी झांशीवाली.

झांशी खालसा झाल्यानंतर १८५७ साली स्वातंत्र्य लक्ष्मीनें संचारित झालेल्या झांशीच्या लक्ष्मीनें-सरह्यूरोजसारख्या रणकलादक्षाशीं १२ दिवस सारखें युद्ध केलें. इंग्रजांच्या कुलपी गोळ्यांचा भडिमार, किल्ल्यांतील दारूचा भडका, साह्याला आलेल्या तात्या टोप्यांच्या २० हजार फौजेचा पराजय आणि शेवटीं तटाचा मुख्य दरवाजा फुटून शहरांत व तटावर गोऱ्या फौजेचा झालेला प्रवेश या संकटपरंपरेनें धैर्यवंतांचेंसुद्धां धैर्य ढासळावयाचें! पण त्याच वेळीं ही धैर्यमेरूवरील अविचल तारा कमरेची नंगी तरवार उपसून तटावर छातीचा कोट करून लढली. तेथून बेफामपणानें शत्रूंच्या पाठोपाठ शहरांत घुसली व तेथें त्यांची गर्दनबाजी केली. तिच्या समशेरीला भिऊन पळालेले इंग्रज जेव्हां दुरून लपून छपून गोळ्या घालूं लागले तेव्हां तिनें आपल्या ढाला किल्ल्यांत फिरवल्या. शौर्यानंदित झालेल्या सरह्यूरोजानें "मर्दानी झांशीवाली" असा तिचा गौरव केला!

[चालः--उद्धवा शांतवन कर जा]

झांशीच्या कुहरामध्यें-सिंहीण निजे घायाळ
गर्जना उठे भंवताली-स्वातंत्र्येच्छूंचा काळ
लाभाया भाग्य कसाला-तेजस्विनि करि कल्लोळ

बुरुजा बुरुजावर मोर्चे-
-बांधोनीया तोफांचे
सजविलें सैन्य शूरांचें
आपणही वेषें सजली-मर्दानी झांशीवाली १
यत्करपरिचित झालेले-खड्गाच्या भव्य मुठीस
यत्कर्ण सदा उत्साही-ऐकाया रणघोषास
यन्नेत्र नित्य अनुरागी-आरक्त रणस्थानास
ह्यूरोज आंग्ल नरवीर
झांशीच्या तटावर शीर
आपटून झाला जेर
हिंदींत बोलला बोली-मर्दानी झांशीवाली २
गर्नाळी कुलपी गोळे-खदिरांगारासम सुटले
पसरली लाल चादर कीं-अंधाऱ्या रात्रीं गमलें
धुम् धडडड धडडड नादें-आकाश भरोनी गेलें
"घनगर्ज[1]" तोफ् जें गर्जे
मोर्चावर, गोरे जे जे
त्यांच्यांत पलायन माजे
विजयिनी जयें फुरफुरली-मर्दानी झांशीवाली ३
फितुरानें केली मात-कलिजास पोंचला हात
दारूच्या कोठारांत-जेजालांची बरसात
किल्ल्यांत आणि नगरांत-मृत्यूचा प्रळयाकांत
शहराला जागोजागीं
लागल्या भयंकर आगी
पाहिली प्रजा हतभागी
वात्सल्यें हृदयीं द्रवली-मर्दानी झांशीवाली ४

---

१ ही लक्ष्मीबाईची नामांकित तोफ होती.

"बोलवा गोषखानाला[1]-बोलवा खुदावक्साला
गरगंजाच्या बुरुजाला-आणवा कड्क 'बिजली[2]'ला
भूतोनभविष्यति ऐशी-उडवा दक्षिण बाजूला"
जों तिसरा सुटला बार
तों कर्नल झाला ठार
नंतर चमके तरवार
तरवारीवर ही लढली-मर्दानी झांशीवाली ५
पडघम बिगुलांच्या नादीं-शिंगे कर्णांचे नाद
खालीं वरतीं भरलेला-संग्रामाचा उन्माद
चढत्या ईर्ष्येच्या शद्वीं-चढत्या विजयाचे शद्व
जातीची अबला होती
युद्धकला ठाउक नव्हती
प्रबलांची केली माती
इतिहासीं गाजुन गेली-मर्दानी झांशीवाली ६
उत्तरेस धुरळा दिसतो-आशेनें राणी पाहे
तात्या टोपे आले कां?-उत्कंठा लागुन राहे
तों 'तात्या आले! आले'-आनंद गडांत न मावे
टोप्यांनीं टोपीवाले
समशेरीवरतीं धरिले
एकदांच चालुन गेले
इकडे चपला चकमकली-मर्दानी झांशीवाली ७
युक्ती युक्तीचें युद्ध-शक्तीला गिळुनी बसलें
पहिलीच फळी जों आली-फोडुन रिसाले गेले
दे माय धरणि गे! ठाव-ऐसें सकलांना झालें

---

१ हे लक्ष्मीबाईचे गोलंदाज होते. २ लक्ष्मीबाईची दुसरी नामांकित तोफ.

स्वारांचा पायदळांचा
हल्ला चढला जोराचा
दळभार पळे तात्यांचा
थरकेना हिंमतवाली–मर्दानी झांशीवाली ८

द्वादश दिवसापर्यंत–एकटीच झुंजत होती
साह्याला 'टोपे' आले–त्यांची गति ही उफराटी
सरह्यूरोजाच्या कुमकीं–दररोज पलटणी येती
अंगाची होउन लाही
कर्तृत्व शक्तिला वाही
भवितव्यतेस ना पाही
भीतीही तिजला भ्याली–मर्दानी झांशीवाली ९

धैर्याच्या मेरूवरची–तेजस्वी अविचल तारा
शौर्याच्या जलनिधिवरची–भीषण सिंधूची धारा
जमवोनी संगर शूरां–बोले ती धीरोदारा
"व्यर्थ ती परांची आस
आपुल्या बळाची कास
घालून जपा झांशीस"
उठली आवेशें भरली–मर्दानी झांशीवाली १०

पायजमा पायीं शुभ्र–गहिरा अंगरखा अंगीं
कमरेस दुपेटा भारी–समशेर लटकली जंगी
शोभली शिरीं चंदेरी–सुंदर वत्ती नारंगी
झांशीच्या सौभाग्याची
मूर्तिमंत लक्ष्मी साची
देवता रणस्थानाची
किल्ल्यांतुन बाहिर आली–मर्दानी झांशीवाली ११

इंग्रजी रिसाले पुढतीं-क्यांटिजंट फौजा मागें !
दारावर दौडत आले-लेफ्टनंट कर्नल वेगें!!
इकडे ही हुल्लड, तिकडे-बावटा तटाला लागे!!!
अरबांची बुंदेल्यांची
कर्नल कॅप्टन गोऱ्यांची
पाहून झुंज निकराची
उफळोनी नागिण आली-मर्दानी झांशीवाली १२
पहिल्या झेंपेनें घेई-'मिकलीजाना"ची जान
दुसऱ्या उसळीनें घेई-"बोनस-फाक्सां" चे प्राण
"डीका" ला केला शीक-मुरडून हात मारून
"स्टूअर्ट, लोथ" दोघांनीं
गर्दीत शिड्या लावोनी
चढविलें सैन्य, पाहोनी
चवताळुन वाघिण गेली-मर्दानी झांशीवाली १३
गिरिवरची जैशी सरिता-तट भिजवित पुढतीं जाते
झंझावाताची लहरी-उच्छेदित वृक्षां जाते
घनमंडलिं जैशी विजली-जेथें तेथें लखलखते
कीं भूकंपाची लहरी
अचलांसहि कांपविणारी
सर्वत्र फिरे अनिवारी
संवेगिनि तैशी गमली-मर्दानी झांशीवाली १४
आरक्त उषा ती गमली-आरक्त चंडिका दिसली
संतप्त भासली संध्या-संतप्त वाटली काली
संक्षुब्ध तिच्या नेत्रांत-क्रोधाची चढली लाली
लखलखाट मार्तंडाचा
चकचकाट पूर्णेंदूचा

दाविला खेळ तेजाचा
रक्तानें शरिरीं न्हाली-मर्दानी झांशीवाली १५
पुढचा दरवाजा फुटला-बाणीचा तटही गेला
सुंदरिचे हात न पुरले-अष्टदिशा सांवरण्याला
कावरी बावरी झाली-शहरांत घोळका घुसला
शत्रूंच्या पाठोपाठ
अरबी लढवय्यांसहित
घातली उडी शहरांत
करि कत्तल हिय्येवाली-मर्दानी झांशीवाली १६
छातीस लागतां छाती-संगीन सरकली मागें
तरवारीवर तरवार-खणखणाट होऊं लागे
अरबांनीं बेहोषानें-शिरकटाइ केली वेगें
सळमिसळ होउनी राणी
गर्दनबाजींत शिरोनी
गेली होती रंगोनी
शिरशिरीं भरोनी लढली-मर्दानी झांशीवाली १७
झाडांच्या मागें कोणी-झुडपांच्या मागें कोणी
पडवीच्या मागें कोणी-वळचणिच्या मागें कोणी
भीतीनें लपुनी छपुनी-सोडिती बंदुका दुरुनी
चहुंकडून आल्या टोळ्या
त्यांच्याही सुटती गोळ्या
किल्ल्यांत फिरविल्या ढाला
मर्दांना मर्दुन गेली-मर्दानी झांशीवाली १८
रणकलाकुशल वीरांनीं-कौशल्य गाइलें जीचें
गुणवंत ग्रंथकारांनीं-वर्णिले समरगुण जीचे
पोवाडे गावे वाटे-स्वातंत्र्याच्या हिरकणिचे

स्फूर्तीचे वळसे दिधले
मृत पौरुष जागृत केलें
हतबल बलवंतहि केले
भारतास भूषण झाली-मर्दानी झांशीवाली १९

———×——— दु. आ. तिवारी

## भामा-द्रौपदी-संवाद.

आपला प्रिय पति भगवान् श्रीकृष्ण गोपींच्या नादीं लागला असल्याचें गाऱ्हाणें द्रौपदीस सांगून सत्यभामा त्या साध्वीजवळ पतिवशिकरणाचे मणि-मंत्र मागता झाली तेव्हां निष्काम "प्रीतिपासुनी प्रीति वाढते" असा सद्बोध द्रौपदीनें भामेला केला. ती कथा या पद्यांत दिली आहे. संवादावर भगवद्भगिनी सती द्रौपदीचें अंकुशत्व आहे, तेच या पद्यावरही असावें म्हणून कविकिंकरानें आपलें निरंकुशत्व तिच्या चरणीं अर्पण केलें आहे.

[पदः—चाल नृप ममता रामावरती.]

निज मानस तुज सांगावें, कोंडिलें हृदय उघडावें ॥ द्रौपदी ॥
निज दुःख तुला कळवावें, पोळतें हृदय शमवावें ॥ द्रौपदी ॥
पतिवशीकरण ऐकावें, मणिमंत्र तुला मागावे ॥ द्रौपदी ॥
सन्मते, सकळ सांगतें, ऐक विनवितें
असुख पळवावें, असुख पळवावें, मणिमंत्र देउनी बरवे ॥ द्रौ०
हरि करी दूर मज रागें[1], मानिनी हृदय मम भंगे
मधु वेणु वाजवी रागें[2], भुलवितो तरुण गोपी गे!
घरदार सोडुनी वेगें, लागती तयाच्या मागें ॥ द्रौपदी ॥
नाचती, बहुत उभ्रळती, सकळ खिदळती,
अमित अनुराग, अमित अनुरागें, मज केंवि साहवे सांगें ॥ द्रौ०
लुटियलें प्रेमसुख त्यांनीं, तळमळे जीव मम मानी

---

१ रागानें २ आवडीनें

मज अशी त्यांत ना कोणी, गुणरूपमण्याची खाणी
नच दिसे एकही नयनीं, मज परी धाटली रत्नीं ॥ द्रौपदी ॥
नेणती, रतिक्रिया कृती, लाज सांडती,
रंगुनी भजानें, रंगुनी भजानें, टाकिती हृदय भेदूनी ॥ द्रौ०
हरिहि तो मज विसरुनी गे, त्यांचिया सहचि बहु रंगे
अंगासि लावुनी अंगें, रमतात परस्पर-संगें
हीं किती पतींचीं ढोंगें, निज मुखें तुला सांगूं गे ॥ द्रौपदी ॥
तळमळे, जीव हळहळे, धृतिहि ढासळे,
साहवे ना गे, साहवे ना गे, हरिविरहयोग हा सुभगे ॥ द्रौ०
पति असे एक जीवाला, परि झुलवी घडिघडि मजला
तुज पती पांच विमलेला, वश सगळेही एकीला
चमकशी जशी कीं चपला, घनसंगम अक्षय जीला ॥ द्रौ०
भोगिसी, पांच रमविसी, भजनीं लाविसी,
वश कसे तुजला, वश कसे तुजला, मणिमंत्र कोणता जपला
वदुनिया असें भामेनें, नमविली[1] मान लज्जेनें
परिसुनी प्रीति गाऱ्हाणें, गालांत हसे हर्षानें
जवळ घे, हनुहि हातानें, वर करी तिची प्रेमानें ॥ द्रौ०
बोलली, खचित तूं भली, फुलाची कळी,
प्रणय रागानें, प्रणय रागानें, सांगसी भ्रमर गाऱ्हाणें ॥ प्रियकरी
हृदयांत धीर धर कांहीं, अभिमान सोड लवलाही
प्रेम पतीचें गे बाई, प्रेमाविण मिळणें नाहीं
निष्काम पाहिजे तेंही, साधिलें जसें गोपींहीं ॥ प्रियकरी ॥
त्यापरी, शुद्ध अंतरीं, विगतमत्सरी,
होय गे तूंही, होय गे तूंही, मग हरी सोडिना क्षणही ॥ प्रि०

---

१ खालीं घातली.

पतिवशीकरण शास्त्राचें, तरि गूढ हेंचि गे! साचें.
मणि मंत्र सर्व पद त्यांचें, जाहले मला पांचांचें
पति जीव देव नारींचे, निर्मत्सर सेवायाचे ॥ प्रियकरी ॥
रूपिणी, कुशल कामिनी, विकल मानिनी,
जिवलगे हरिचे, जिवलगे हरिचे, धर शिरीं पद समर्थाचे * ॥

——×——

ह. म. समर्थ

---

* टीपः—शेवटच्या ओळींत श्लेष आहे. द्रौपदी सत्यभामेस ह्मणते, तूं खरोखर हरीची जिवलग अशी आहेस, फार प्रीतींतली आहेस, परंतु अभिमानी आहेस ह्मणून विकल आहेस; त्या समर्थाचे श्रीहरीचें पद शिरीं धर, त्याला अभिमान सोडून शरण जा ह्मणजे सहज सुखी होशील; अथवा 'समर्थ' नामक कवीचें हें पद हें कवन आहे, यांतील बोधार्थ शिरसावंद्य मान, ह्मणजे सुखी होशीलः—किंवा द्रौपदी ह्मणते जिवलगे भामे हा 'समर्थ' कविकिंकर हरीच्या पदाची फार अपेक्षा करून राहिला आहे, ते त्याला मिळत नाहींत कारण तूं ते आपल्या मांडीवर घेऊन नित्य चुरीत असतेस. तुझ्या हांतून ते सुटणार नाहींत आणि ते सोड असें तुला ह्मणणेंही योग्य नव्हे; तथापि ते पद आपल्या मांडिवरून काढून ह्या 'समर्था' चे शिरावर ठेवून चुरत राहशील तर तुझ्या मांडीवरचा भार हलका होऊन, तुझें कांहीं एक उणें न होतां त्या गरीब दासाचें मोठें कार्य होईल, आणि तुला परोपकाराचें पुण्य लाभेल. तेंही तुला रुचत नसेल तर येवढें तरी कर; तूं हरीची जिवलग आहेस, त्या श्रीकृष्ण भगवंताची महाभक्त आहेस, तरी रागानें कां होईना, तुझें हरिप्रिय पद त्या गरीब विचाऱ्या 'समर्था' च्या मस्तकीं ठेव ह्मणजे हा भगवद्दासानुदास कविकिंकर या भवसागरीं कृतार्थ होईल.

## " श्री शिवाजी महाराजांची " तसबीर

### ( तसबिरीस पाहून )

[ शिखरिणी-वृत्त ]

सर्वे ताना, येसू, फसलकर बाजी धरुनियां
कशासाठीं ऐसा फिरसि शिवबा ! सांग सखया !
तुझ्याऐसा नेता तव, न नयनां आज दिसतो
महाराष्ट्राला कां ? ह्मणुनि न उगा जीव बसतो १
मराठ्यांची वाणी " हरहर महादेव " वदतां
क्षणामध्यें येई सकलहि लढायास जनता
असें त्या वेळेचें खचित दिसतें तेज लपलें
महाराष्ट्रांचें कां अजुनिहि न दुर्दैव सरलें ? २
तई हिंदूमध्यें कधिंहि परका भाव न वसे
शरीराचे एका अवयव असावे जणुं दिसे
दुज्या धर्मीयांचें कटु वचन त्यांना न खपलें
अतां त्यांच्यापैकीं वद खचित रे ! काय उरलें ? ३
कृतीनें दावावें प्रथम करुनी कार्य अपुलें
तया वाचा द्यावी मग तरि जनीं बोलति भले
अशी जी त्या वेळीं दिधलिस जनां बाळगुटिका
तियेचे गेले ना श्रम सकल आतां तरि फुका ? ४
स्वलोकांच्यासाठीं धन, सदन, वेळीं तनु जरी
तुला द्यावी लागे मन न कचरो दे क्षणभरीं
अशा स्वार्थत्यागाविण न कधिं इच्छीत मिळतें
जगीं या तत्वानें किति झगडती बा ! नरपते ? ५
अह्मी ज्या भूमीचे ह्मणुनि सगळे लोक वदती
तिचा पैसा सारा खचित परके नित्य लुटती

तया आळा घाला प्रथमचि, धडा जो शिकविला
किती लोकांनीं तो अजवरि नृपाला! गिरविला? ६
स्वधर्माच्या मार्गीं कितिहि जरि विघ्नें उगवतीं
क्षणामध्यें जातीं सकल विलया कांहिं नुरतीं
अशी नीती अंगें श्रम करुनि लोकां पढविली
तयाची बा! बाकी वद तरि असे काय उरली? ७
परस्त्री मातेच्यासम गणुनि जो राहिल नर,
तया संसाराचा पथ खचित होतो सुखकर.
जहालीं नीतीचीं अमित शकलें आजमितिस
कसें बा! लाधावें स्थितित असल्या सौख्य तनुस? ८
भवानी त्वत्संगें हरिघडि तईं भाषण करी
विडा घेई नाभ्याकडुनिच विठोबा निज करीं
समर्थांपाशीं जें हितगुज सदा राम करिती
अनीतीच्या योगें ह्मणुनिच अतां मूर्ति रुसती ९
कृती अन्यायाची बिलकुल अह्मांपाशिं नव्हती
महाभूतें सारीं त्यजुनि कपटें स्नेह धरिती
स्वतःच्या पुत्राचा परि अजि शिरे संशय मनीं
जसें द्यावें तैसें परत मिळतें न्यायाचि जनीं १०
जरी धारातीर्थीं जड तनु सुखानें पहुडली
अविश्वासाची ती क्षणभरहि वृत्ती न शिवली
अशी स्वामीनिष्ठा उचित तव भृत्यीं वसतसे
विरंची सध्यां ते प्रभुस फसवावें तरि कसें? ११
जयांच्या आधारें खचित तईं राष्ट्र उभविलें
कुठें ते निष्कामी, अनलसचि झुंजार असले
तुझे किल्ले सारे दिसतिल तुला शून्य सगळे,
तयांचे लोकांनां स्मरण न मुळीं आज उरलें. १२

जरी कोणी आला हरण करण्या वित्त अपुलें
लढाया तत्संगें शिशुगण क्षणार्धांतचि जुळे
किती हल्ले तेव्हां सहज अबलांनीं फिरविले
अहा! नांवाचे बा! पुरुष सगळे आज उरले १३
थरारे भीतीनें श्रवणिं चपलाशद्व पडतां
परी सांगे स्त्रीशीं बहुविध स्वतःच्या धृतिकथा
जगाचा तो मिंधा गृहधनिणिचा काळ बनला
असा या वेळेला खचित सगळा काळ फिरला १४
पहायाला आतां तुजसि न मिळे तीरकमठा
तशी बोंथाटी वा करिं न विलसे गोफण, पटा
अतां वाटे सारें परम सुख दास्यींच भरलें
कुणी केली जादू ह्मणुनि दिसतें शीर फिरलें १५
अतां बंडी गेली खमिस सखया त्या स्थलिं दिसे
शिरींच्या पागोट्या ढकलुनि तिथें टोपि विलसे
तसें ओझें होतें त्यजिति ह्मणुनि बा! उपरणें
अशा वेषांमध्यें कठिण तव लोकां उमगणें १६
तनू व्हावी तेव्हां बळकट ह्मणोनी जन खपे
अतां कैशी होते मृदुल ह्मणुनी तो बहु जपे
ह्मणावें लोकांनीं तनुस जणुं ही नाजुक कळी
स्त्रियांहूनी झाले पुरुष सगळे आज नकली १७
स्वतःच्या भाषेच्या विरहित दुजे शद्व वदनीं
न यावे ही इच्छा तव मनिं वसे बा! निशिदिनीं
अतां लोकां वाटे कुतुक वदणें धेडगुजरी
तुला शंका येणें उचित बघुनी या क्षणभरीं १८
तुवां जें जें लोकां तइं शिकविलें तें न उरलें
ह्मणोनी क्रोधानें तव मन असे काय भरलें?

करीं घेशी खड्गा नयनहि वटारूनि बघसी
जसा कां मोऱ्यांना यमसदन देण्यास निघसी १९
अशी बापा! आतां स्थिति बदलली आज घडिस
नको देऊं व्यर्थ श्रम अधिक तूं कांहि तनुस
दुज्याच्या बुद्धीची कुठवर शिदोरी पुरवते
कळों दे बा! यांना निजहित कुठें सत्य वसतें २०

कृष्णाग्रज, पुणें

## आत्म्याचे बोल.

( आर्या-गीति )

[ जीवाशिवाचीं प्रश्नोत्तरें त्याच आयुष्यांतील अचूक ओळखी ]

ग्रहण कराया आहे काय जगीं योग्य? सद्गुरूवचन
त्याज्य कशास ह्मणावें? अकार्य, त्याचें कदा वदा वच न! १
सद्गुरु कोण? जयानें केली प्राप्ती सदा सुतत्वांचीं,
जो जीवन्मात्राच्या झटे हितास्तव न जाण स्वत्वाची! २
ज्ञानालंकृत मनुजा! सत्वर मोक्षार्थ काय कृति बरवी?
भवविस्तारविनाशें, इंद्रियदमनें, सुरेंद्र घावरवी! ३
मोक्षाच्या वृक्षाचें बीज कुठें? जें सुकर्म सुज्ञान
हितपर पथ्य असें जगिं काय? दुजें धर्मवीण सुज्ञां न! ४
कोण शुचिर्भूत? असे यन्मन गंगा नदी असे दुसरी
पंडित कोण? जयाची झरते नित सद्विवेकसिंधुसरी! ५
कठिण कवण? गुरु जाणा, केली ज्याची बळें कृपावक्षा
संसारीं सार सुधें गूढविचारें कुठें कळे प्रश्नां? ६
स्वार्थपरार्थहितास्तव झटणें हें साध्य सार संसारीं!
मद्यासम मोह कुठें उद्भवतो? स्नेहवृत्तिकासारीं! ७
चोर खरे कोण? सुखें विषयाचीं, हरति जे स्मृतीशक्ति!

संसारांतिल वेली कोण असे? हांव ही सदा भुकी ८
मनुजाचा अरि? आळस, नाश करी हा तसा निरुद्योग
भय कसलें? मरणाचें स्मरण जयाचें उगाच हृद्रोग ९

अंध कवण? जो ज्ञानी बघुनि अकार्यी असे सदैव रत!
बधिर? सुहितोपदेशा परिसुनि कधि दुष्कृतीं न आवरत १०
अंधाहुनि अंध जगीं कोण असे? नीतिशून्य कामान्ध
वीर कवण? जो कांताकटाक्षबाणें न होतसे विद्ध ११

मुग्ध कसा? जो कालां अनुसरुनी योग्य ना वदे वाणी
मृत्यु कवण? मूर्खपणा, ताप जनां देत आपदेवाणी! १२
कर्णाला अमृतासम काय असे सर्वदा? सदुपदेश
उपदिष्टा कोण? वनीं ज्ञानबलें वसवि जो सदुप-देश? १३
थोरत्व ये कशानें? विनितवचें कधि न कांहिं याचावें
वृत्ती नीच कुणाची? स्वार्थार्थ जयें श्वतुल्य नाचावें! १४
काय गहन? देवा जें दुर्गम झालें जगीं वधूचरित
कोण चतुर? न चळे स्त्रीचरितें अनुसरोनि सद्रीत! १५

जाड्य कशास म्हणावें? चातुर्याचा पुरा अनभ्यास
जागृत कोण? विचारें वागे जो ठेवुनी निजध्यास १६
निर्घृण निद्रा कुठली? मनुजाची मूढता, जगन्मान्य-
असुनी जिवंत मेला, जगतीं व्यवहार ठाउका नान्य १७

चंद्रकिरणसंघाचें करिती अनुकरण कवण? सज्जन ते
घोर नरक? परवशता, छळित सदा तीव्र घाण सज्जनतें १८
सौख्याचें सार कुठें? लाभतसें सर्वसंगसंपूर्णी
सत्याचा उगम कुठें उद्भवतो? प्राणिमात्रहितपूर्णी! १९
कोण जगज्जेता? जो करित तितिक्षा सदैव सत्याची
देवहि वंदी कवणा? वृत्ति असे मुख्य कीं दया ज्याची! २०

प्राणी वश कोणाला? सत्यप्रियवचसुवृत्तसुजनाला
दृष्टादृष्ट पडाया स्थळ कोठें? सेवि योग्य मार्गाला! २१
वाग्पुष्प? सत्य वाणी, सुगंध ज्याचा सदा स्मृती देतो!
विफल अनर्थक कैसें? सज्जनसंगास तुच्छ जो गणितो २२

काय सुखावह? मैत्री. दक्ष कवण दुरित सर्व नाशाया?
सत्य त्याग असे हा तोडी माया, विमोहपाशां या! २३
स्नेही कोण? करी जो पापकृतीपासुनी परावृत्त
भूषण मनुजांस खरें काय? असे शील हें अनावृत्त! २५

पूज्य कवण? कीं, ज्याचें पवित्र वर्तन असें जनां वंद्य
निर्धन केविं? जयाचें वर्तन चंचल दिसें सदा निंद्य! २४
पंकजपर्णावरल्या चंचल जलबिंदुसम दुजें काय?
आयुर्धन, युववस्था, क्षण न स्थिर ठेविती न जें काय! २६

दारिद्र्य वसे कोठें? ज्याच्या ठायीं सदा असंतोष.
जीवित सार्थ कुणाचें? अनिंद्य ज्याचें जनांस दे तोष! २७
प्राण्यांनां प्रिय काय? प्राण असे, ज्या नसे मिती जगतीं!
दानाचें सार्थक? जें प्रत्युपकारीं कधीं धजे न गती! २८

मोल कशाला नाहीं. दिधलें जें योग्य वेळ जाणोनी
हृदयीं शल्य कशाचें? गुह्यकुकर्मे, छळीतसे स्मरणीं २९
यत्न कशास्तव? उत्तम औषध विद्यार्जनार्थ, दानार्थ
करणें योग्य, जयिं सदा साध्य असे धर्ममोक्षकामार्थ! ३०

सद्बुद्धिवान् नरानें तुच्छ जनीं नित्य काय लेखावें?
क्षणभंगुर भव सौख्यां, अमृत समजोनि विष बळें खावें ३१
काय तिरस्कृत जगतीं? परपत्नी वा परावि संपत्ति
दुर्जन तिसरा तेवीं—यत्संगें नित्य होय आपत्ति ३२
शोक कशास्तव करणें? वैभव असतां सदा कृपणतेचा

आनंदमग्न असतां-विवेक करि मागल्या विषणतेचा ३३
काय सदा चिंतावें-संसाराची असारता विभवीं
चिंता विषयसुखाची, दुःखह साची, कदा न दावि भवीं !
प्रियतम काय असावें? करुणा, दाक्षिण्य, सुस्वभाव, तसा
सत्संग जनीं खासा- प्रियकर प्राणांसमान भावतसां ! ३५
अंतसमय जरि आला निकटीं तरि कधि न अर्पि जीवाला
कवणाला? मूर्खाला, दुःखी, गर्विष्ठ तेंवि दुष्टाला ! ३६
काय चपळ विद्युत्सम? दुर्जनसंग, प्रमत्त युवयुवती
संसाराभास तसे-सुख दुःख जिथें क्षणांत अनुभवती ! ३७
कोण स्थिर हिमनगसम? थोर पुरुष ज्यां भिती नसे लव ती
सुखदुःखीं निश्चल जे-पुण्यबळें कलियुगींहि उद्भवती ! ३८
काय प्रशस्य? सदा जो अल्पधनीं दावि नित्य औदार्य,
कीं सत्ताधाऱ्याची सहिष्णुता, मानि हें शिरोधार्य ! ३९
चिंतामणिसम दुर्लभ जगिं काय दुजें? असें चतुर्भद्र
प्रज्ञजनें संज्ञा ही कशास देती यथार्थ सौभद्र? ४०
दानप्रियवाणीयुत, ज्ञान वसे गर्वरहित तें भद्र,
त्यागसहित वित्त, दिसे शांतीयुत शौर्य हें चतुर्भद्र ! ४१
हें दिव्य चतुर्भद्र प्राप्य असो सर्व लोकवृंदाला !
इच्छितसें हेंचि, विभो ! स्मरुनि तुझ्या पुण्यपादकमलाला
सर्वस्वाचें येथें सार असें, परि न गम्य चित्ताला,
संमोह सारुनि दुरी, यशकीर्तीभूति, मिळवि वित्ताला ! ४३
वाचेस दृष्टि नाहीं, दृष्टीला नच शिवे कदा वाणी,
परि भाव रम्य हृदिंचे कवनीं गातों तुझी कृपाकरणी ! ४४
तो देइ खरा जीवा आत्मानंद-स्मरोनि तच्चरणा,
प्रश्नोत्तर स्वरूपें आत्म्याचे बोल अर्पितों सुजनां ! ४५

———×———

नाथ-पाठक

## याचना.

(भगिनीच्या आजारीपणांत केलेली प्रार्थना)

[ अभंग ]

देवा! ऐका माझें दीनाचें गाऱ्हाणें, सांगा कुठें जावें तुह्मांवीण?
घालूं कुणापायीं जीवाचें सांकडें, मन झालें वेडें एकभावें;
आजवरी केली काय जी कमाई, वाहतों पुण्याई तुह्मापायीं
आमुच्या कपाळीं घाला वनवास, परी आज आस पूरवावी;
काय देऊं, बोला, मागणीचें मोल, अंतरींचा बोल दिला तुह्मां
मूर्तीच्या अंतरीं साठवीलें रूप, तुमचें निष्पाप, पहातसें;
भाव जडे येथें; जीव विसावला; सागर शांतला इथें माझा;
रूपें कल्पांतरीं घेतलेलीं सारीं, दिसतात हरी! जिवा येथ
जीव मिळविला; त्यांत मिळविला, मूर्तीचा वेगळा होय कैसा
ठेवा माझें ध्यान-ठेवा माझी मूर्ति, कामनेची पूर्ती करा हीच
अनाथाच्या, देवा! राहतां अंतरीं; भाव 'तीजवरी' तरी ठेवी
उठा कनवाळा! ऐकोनी गाऱ्हाणें, पुरवा मागणें अंतरींचें

२३-१-१९२३ गिरीश

———×———

## तया विश्वेशा नमूं नित्य या हो!

[ दिंडी-वृत्त ]

कुठें पाहूं मी करुण विश्वनाथा!
तूज बोलति कीं सकल विश्वभर्ता
विश्व भरुनी राहसी कोठकोठें!
परी नाहीं तें दिसे रूप मोठें १
कुणी ह्मणती तूं पूर्ण भरोनीयां
सर्व ठायीं परि नससि कुणा ठायां
जाणुं कैसें मी असें नवें कोडें
बुद्धि नाहीं देखण्या रूप मोठें २

सूर्यनारायण जरी रोज येई
तरी आह्मांतें ज्ञान होत नाहीं
झोंप घेतांना अह्मी बंधनांना
घट्ट करुनीयां पांघरितों त्यांना ३
अशीं बांधोनी बंधनें नित्य नित्य
ज्ञानचक्षू तो अंधसा होय सत्य
जरी उघडावी दृष्टि आपुली ती
सदा प्रार्थू या सतत लाभण्या ती ४
सूर्य सांगे कीं उठुनि जागण्याला
शिथिल करुनी बंधनें पाहण्याला
नष्ट करुनीयां घट्ट बंधनांना
करा उघडे ते दिव्य नेत्र त्यांना ५
दिव्य नेत्रांनीं बघूं दीननाथा
तया बघण्याला होउं पात्र आतां
पुरा पाहोनी तया विश्वनाथा
करूं देवाला नमन त्याच माथां ६
स्मरुनि देवाला नित्य मनीं ठेवूं
तया स्मरण्याला नित्य मना लावूं
पदीं त्याच्या हें नमन नित्य राहो
तया विश्वेशा नमूं नित्य या हो ! ७

———×——— सुंदर भास्कर वैद्य.

## अंधता[1]

[ शिखरिणी–वृत्त ]

प्रभातीं उद्यानीं कुसुमित जहाल्या तरुलता,
निजामोदें मोदा रसिक-हृदयातें वितरिती,

---

[1] डॉ० रवींद्रनाथ टागोर यांच्या ' गार्डनर ' वरून.

अहा ! वाहे मंदानिल हृदय उत्फुल्ल करि जो,
फिरे मी त्या स्थानीं गुणगुणत कांहीं तरि मनीं. १
समोरूनी आली अवचित कुणी रम्य रमणी !
अहा ! विद्युल्लेखेपरिस वदनीं तेज खुललें
अरे रे ! दैवाची अघटित परी काय घटना !
अशी रम्या रामा वनिवलि तयें अंध कशि ती ? २
तिनें केली माला मधुर सुमनांची निजकरीं
'कुणी घेतां कां ही विकत' वदली मंजुल रवें
त्वरेनें तन्मूल्या वितरुनि गळां घातालि मुदें,
तदा हा ! मन्नेत्रांतुनि न कळतां अश्रु गळले ! ३
वदे मी, 'पुष्पांना निज नच कळे जेविं सुषमा
तसें त्वन्नेत्रांना तवहि नच माधुर्य दिसतें
त्यजीसी जी माला अजि रजतखंडास्तव सये !
तिच्या माधुर्याचें तुजसि न खरें मोल कळतें !' ४

———×——— वामन जनार्दन कुंटे

## वीणेच्या मृदुल स्वनी

सुनीत [ सॉनेट ]

[ श्लोक ]

माझें काव्य असेचि उत्तम असें लोकांस रात्रंदिन
सांगोनी वद काय रे ! मिळतसें ? मातें मुळीं ना कळे
वाटे कां तुज सर्वही रसिक ते आहेत बा ! रे ! खुळे
कीं सारी जगतांतली रसिकता गेली दुरी येथुन ? १
श्रेष्ठत्वा मिरवावयास झटसी ? कां शीणसी तूं वृथा
आहे काळ समर्थ, उच्च अथवा कीं नीच तें दाविल
दोहोंतील जनांस भेद सकळां तो स्पष्ट होईल रे !
तारा कीं शशि हें कळेल समयीं सर्वांप्रती तत्वतां २

किंवा भेद नसेचि सत्य लवही वाग्देविच्या मंदिरीं
येथें सर्वहि सान थोर जमती, अन्योन्य संमानिती
सृष्टीला सगळीं फुलें सम, असो उद्यानिचीं रानटीं
प्रेमस्वी मधुरा सुधासम तशी ही वर्षि सर्वांवरी ३
'भ्रांती सोड कवे! सुरम्य कविता-मंजूषिका गाउनी
वीणेच्या मृदुल स्वनींच रमवूं श्रीशारदेतें क्षणीं!

——×—— सीताराम बाळकृष्ण जोशी

## सारें फोल असें

सुनीत ( सॉनेट )

[ श्लोक ]

आला माधव कर्णिकार फुलला तो सारखा हांसत
वाटे त्या दुसरा कुणी उपवनीं नाहींच माझ्यापरी
बाजूला फुलले गुलाब वदती जाई न कांहीं परी
आला भृंग तिथें, कळे न कुठुनी, कांहीं तरी गुंगत १
जाईचीं बघुनी फुलें विकसलीं जाई तिथें धावुनी
आनंदे तव कर्णिकार वदला गर्वोक्तिनें त्याप्रती
" पुष्पीं क्षुद्र अशास चित्त रमतें कां भ्रष्ट होई मती
नाहीं रूप तयास, आकृति नसे, आश्चर्य वाटे मनीं!" २
हांसे भृंग जरा, वदे, परिसुनी गर्वोद्धता भाषणा
"'मी मोठा' वदती मुखें न जन त्या माने न कोणी पुसे
आह्मी भृंग, कळे मला, रस कुठें सौंदर्य कोठें वसे
सारें फोल असे असंशय तिथें मोठी जिथें वल्गना ३
यानीं गंधवळें मला भुलविलें, दावीं तसा तूं गुण
नाहीं तो तुजशीं, उगाच शिणसी? जा जा कसा येथुन!"

——×—— सीताराम बाळकृष्ण जोशी

## कवीचें स्वप्न

'Mother, my sun had set, come child, you said'

*sir R. Tagore.*

[ दिंडी ]

गमे मावळला भाग्यसूर्य मातें
'असा कां? ये ये बाळ' वदसि मातें
बळें ओढोनी उरीं आकळीलें
शिरीं चुंबोनी दिव्यदृष्टि केलें १
गळां माळा कंटकाश्रिता होती
काव्यकुसुमांची तीव्र दुःख दे ती
हृदयशल्यें तीं कंटकें दूर केलीं
करें मालेंतिल धूलि संहरीली २
अशी माला उज्ज्वलित ती करोनी
गळां माझ्या घातली त्वां फिरोनी
उरीं धरुनी वदलीस 'हो चिरायू'
मला झाला क्षण एक हर्षवायू ३
तसा उठलों नयनाश्रु आंवरीले
नेत्र उघडोनी नीट पाहियेलें
पाहियेलें तें मनीं चिंतियेलें
गोड अवघें तें स्वप्न कळों आलें ४

—×—

ह. म. समर्थ

## भेटशील

(स्वागता)

जाउं देसि पुढतीं सकळांसी । कां तमांत लपुनी बसलासी?
ते तुला प्रियकरा! ढकलोनी । बाजुला निघुनि जाति पुढोनी
धूलिनें भरुनिया पथ जाई । ते तुला न मुळिं पाहति कांहीं

तूं तयास तृणसा नच मोल । कां उभा प्रियकरा ! मशिं बोल
द्रव्यभार तव पूजनकाजा । अर्पिण्या तुजसि चित्तसरोजा !
आणुनी बघत वाट तुझी रे ! । जाहल्या किति घडी थकली रे !
ये पथांत फिरती जन कोणी । एक एक सुम घे उचलोनी
मत्करंडक असाच रिकामा । जाहला हृदयहर्म्यललामा ! ४
ती सकाळ सरलीहि दुपार । हा दिनास्त तम तोंहि अपार
राहिली नयन भारुनि निद्रा । तन्मदालसयुता मम मुद्रा ५
लोक जे परतती सदनाला । हांसती बघुनि मद्वदनाला
होय आर्द्र मन लज्जित माझें । त्या जगीं न उपमा लव साजे
ओढुनी पदर झांकिं मुखाला । मी वसें जशि भिकारिण बाला
ते मला पुसति काय हवें तें । तेधवां नयन पाहति भूतें ७
तें मदीक्षण सदुत्तर त्यांस । येइनाच वदण्या वदनास
मी तयांस कशि सांगुं शकें हें । कीं त्वदर्थ अजि तिष्ठत राहें ८
तें तुझें वचन आगमनाचें । पद्मिनीस रविच्या चरणाचें
ही मदीय विपदा मम हुंडा । हें कसें वचन येइल तुंडा ? ९
वाटते सहज लाज मनाला । सांगुं मी उघड काय जनाला ?
मन्मनांत अभिमान तयाचा । गुप्तवित्तसम आदर साचा १०
मी मदासन करोनि तृणाला । लावुनी नयन लक्षिं नभाला
राज्यवैभवमनोज जरी ही । होय त्यांत अति गर्क परी ही ११
थाटमाट तव आगमनाचा । चंद्रमा उतरला गगनाचा
दीप तेज हिणवी भगणाला । त्वद्रथा बघुनि भानु पळाला १२
त्या ध्वजा फडकती जरतारी । येशि मन्निकट वैभवशाली
मी भिकारिण गरीब कुचैली । नोकझोंक मशिं ना गुणशैली १३
साभिमान अति लज्जित होई । कीं वसंतपवनें लतिका ही
कांपते थरथरा तशि मीही । हें पथांत जमुनी जन पाही १४
तूं धुळींत उतरून रथींचा । हे सख्या ! धरुनि हात सखीचा

प्रेमला! चढविसी स्वरथांत । आपुल्याजवळ घेसि पथांत १५
पाहुनी चकित हो जन सारे । हो क्षणैक परि शांतचि वारे
काल जाय! पथ पाहि कुणाचा । चक्रनाद परि नाहि रथाचा!
थाटमाट किति त्या छविन्याचा । घोष त्यांत अति होय यशाचा
तूं उभाच तसि राहसि मागें । सेवुनी अधिक मौन विरागें १७

हा! परंतु हृदयांत झुरावें!। अश्रुतोयिं नयनांस धुवावें!
मी तुझी बघत वाट बसावें। 'भेटशील' वच हेंचि जपावें १८

———×——— "वसन्तविहार"

## दुरून वंदन

दिंडी

हवा सुंदर, मोकळी चंद्रकांति
मध्य रजनी, भोंवतीं मधुर शांति
अशा कालीं सौधावरी विलासी
दिसे कविता खेळतां कल्पनेशीं

खेळ कसले ते मुळिं न कळुनि येती
नयन माझे त्रासुनी मिटति अंतीं
नीज सरली तों काय देखियेलें
उग्र भीषणसा नाच तिथें चाले

रूप छाया भेसूर रम्यतेला
हीच कविता कल्पना काय लीला
असो माझें तरि दुरुनि नमन त्यातें
पुन्हां कधिंही येवो न दृष्टिला ते

———×——— आनंदराव कृष्णाजी टेकाडे

## अभंगमाला

तुझ्या संकल्पांत-विकल्प सोडीला-निंदूं दे लोकांला-लोकनाथा
तुझ्या हेतुमाजी-निर्हेतुक झालों-कुणि कांहिं बोलो-भगवंता!
तुझ्या यदृच्छेत-निरिच्छ मी दास-आप्त देवो दोष-लक्ष्मीवंता!
तुझी माया मातें-समाधान देते-हंसूं दे जगातें-जगन्नाथा! १
मी तों आहे तुझ्या-मुखाची बासरी-कंठाची माधुरी-नाहीं माझी
मी तों नट आहे-नाट्य सृष्टिवरी-करीतों चाकरी-राया तुझी
मी तों चित्र आहे-सृष्टीपटावरी-तुझ्या हातिं दोरी-मद्देहाची
वरती चढीव-खालतीं वा ओढ-अंतीं देइं जोड-त्वपादांची २
दूर क्षेत्रवासी-ऐकीलें कीर्तीशीं-पाहुं त्वन्मूर्तीशीं-इच्छा ऐशी
मार्गि तव ध्यान-करितां त्वद्गान-श्रम भासती न-शरीराशीं
उत्कंठा योगांत-प्रीतीच्या साह्यानें-भक्त ये भक्तीनें-द्वारापाशीं
निष्कांचनयोगें-बडव्यांनीं कांहीं-येउं दिलें नाहीं-पायापाशीं ३
मज त्रासवील-दुःख हा देईल-भीतीनें गोपाल-भजूं नको
मानियेलें ज्याला-सोडूं नये त्याला-व्यर्थ संशयाला-सेवूं नको
तुझ्या हृदयांत-उमटतो नाद-त्याच्याशीं विवाद-घालूं नको
तोच आहे देव-तोच आहे धर्म-अंतरींचें मर्म-सोडूं नको ४
बोलूं नये कटु-सत्य तें बोललों-मग धैर्य काय-सोडावें तें
दिव्य भावनेंत-दिव्य आचरीलें-मग भय काय-मानावें तें
वर्तमान काळ-स्वार्थ संबंधाचा-भावि काळ सेवी-सत्यत्वानें
सत्य धर्म जरी-सेवायाचा तरी-जगताचें सारी-दूर नातें ५
बरवा तो सूर्य-दूर गगनांत-ज्यायोगें सरोज-प्रफुल्लती
बरवा तो चंद्र-दूर आकाशांत-ज्यायोगें चकोर-संतोषती
बरवा तो मेघ-दूर अंबरांत-ज्यायोगें चातक-आनंदती
जोंवरी सद्गुणी-अलिप्त रहाती-तोंवरी महती-पावताती ६

—————×————— दु. आ. तिवारी

जाहीर विनंतीः– रत्नावलीच्या जुन्या कविमित्रांस आणि नवीन अपरिचित कवींस प्रत्येकानें आपल्या एक दोन सुरस कविता नेमानें पाठवित जाव्या अशी आग्रहाची विनंती करावी अशी कित्येक हितचिंतकांची सूचना आल्यावरून आह्मी त्यास तसें करण्याविषयीं आग्रहपूर्वक विनंती करितों. कविता पाठवितेवेळीं कविवर्गास केलेल्या सूचनाकडे आमचे मित्र लक्ष पोंचवतील अशी फार उमेद आहे.

## काव्यरत्नावली मासिक पुस्तक.

मराठी कविता विषयास वाहिलेलें हें एकच मासिक आज ३६ वर्षें चाललें आहे. यांत प्रस्तुतच्या नामांकित कवींच्या कविता आणि काव्यें प्रति महिन्यास येतात. वर्षास तीन हजार कविता छापून निघते वर्षारंभ जानेवारीस होतो नवीन वर्गणीदारांस वर्षाचे मागले अंक देण्यांत येतात. मासिकाची वर्गणी सोईची व्हावी ह्मणून अवघा १॥ रुपया ठेविली आहे. व्ही. पी. रजिष्टर खर्च निराळा पडत नाहीं मागील सालची आयतीं बांधिलेलीं थोडीं पुस्तकें शिल्लक आहेत रसिकांस त्या प्रति वर्षाच्या पुस्तकास बारा आणे किमतीस मिळतात एकाच वेळीं पंधरा पुस्तकें मागविल्यास फारच स्वस्त ह्मणजे अवघीं ७ रुपयांत मिळतात मराठी कवितेच्या रसिकांनीं व हितचिंतकांनीं सततचा आश्रय द्यावा किंवा नवीन वर्गणीदार मिळवून द्यावे, अथवा सुरस कविता पाठवाव्या, अगर जुनीं पुस्तकें खरीद करावीं, कांहीतरी रत्नावलीच्या उत्कर्षार्थ यत्न करावा ही त्यास सविनय विनंती आहे.

नारायण नरसिंह फडणीस

संपादकः–काव्यरत्नावली

जळगांव पू. खा.

रजिष्टर्ड नं. बी ५३७

ह० आ० निवारीकृत

# मराठ्यांचीं संग्रामगीतें.

इब्राहिमखान, जनकोजी, भाऊसाहेब, मल्हारराव, महादजी यांच्या घनघोर संग्रामाचीं अतुल वर्णनें यांत आहेत फक्त ५० प्रति शिल्लक आहेत. किंमत ८ आणे.

टी. एम् सोनाळकर.

जळगांव पूर्व खानदेश.

# सुभाषितमराठी.

संस्कृतांतून सुंदर सुंदर श्लोक निवडून त्याचें हें मराठींत पद्यमय भाषांतर केलें आहे. शिवाय प्रत्येक श्लोकाखालीं श्लोकांतील अपरिचित शब्दांचा अर्थ दिला आहे. श्लोकांची रचना फारच सरळ व शुद्ध अशी आहे शिवाय कवितेंतील सर्व अर्थाचें विवरण केलेलें आहे, त्या योगानें अर्थाचा संबंध, ऐतिहासिक व पौराणिक माहिती वगैरेचा खुलासा कळाल्यानें सर्व वर्गाच्या वाचकांस हें पुस्तक प्रिय होईल अशी अटकळ आहे. विवरणानंतर प्रत्येक श्लोकांत कोणता अलंकार आहे, त्यांचे लक्षणही दिलेलें आहे ह्यायोगानें सर्व अलंकारांचें ज्ञान सहाजिक होण्यासारखें आहे. एकंदर ही सुभाषित मराठी काव्यप्रिय वाचकांस प्रिय होईल, अशी तिची रचना आहे. वाचकांनीं आज आपलीं नांवें नोंदून ठेवावीं. ग्रंथ छापण्याचें काम चालू आहे. चारशें श्लोकांचा हा ग्रंथ आहे.

संपादक, काव्यरत्नावली

जळगांव पू. खानदेश.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळीनें चालविलेलें

**कवितेचें मासिक पुस्तक**

## श्लोक.

तीं तीं पदें नित्य फिरून येतीं ।
त्या त्याच अर्थाप्रति दाविताती ॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे ।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥

**नारायण नरसिंह फडणीस**
यांनीं आपल्या खाजगी प्रिंटिंग प्रेसामध्यें छापून
जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] नोव्हेंबर सन १९२३ [ अंक ११ वा

वार्षिक वर्गणी ट. ह. पो. सह १।। रुपया

अनुक्रमणिका.

सीता-संभ्रम ( ह. मा. समर्थ ) ........................ २४१
माझ्या बाळपणाची आठवण ( अपूर्ण ) ........................ २४६
मार्जार-स्वामी ( अनंततनय ) ........................ २५०
स्वराज्य-गीत ( पद्माकर ) ........................ २५२
श्रीमती लिंग नवकाई ( आरवासिसानी शाहीर ) ..... २५२
भाऊ-बीज ( वा. ना. फडणीस ) ........................ २५३
' मनोजवं मारुततुल्यवेगं ' ( ह. मा. समर्थ ) .......... २५४
उषास्वागत ( सौ. रमातनया ) ........................ २५५
सूर्याचे मंगलगीत ( सौ. रमातनया ) ........................ २५६
सुवर्ण पंचक ( यशवंत गंगाधर कीर्तने ) ........................ २५७
वसन्ताचें गाणें ( साधुदास ) ........................ २५८
देवपूजा ( रा. अ. क्षीरसागर ) ........................ २५८
नर्मदापात्रावरील-संध्याकाळ ( ग. त्र्यं. साधले ) .......... २५९
विजयादशमी ( ह. मा. समर्थ ) ........................ २६०
श्रीमद्भगवद्गीतारामदासी समश्लोकी ( स्वतंत्र पृष्ठें ) ............ १ते४

---

## काव्यरत्नावलीचें दफ्तर.

नोव्हेंबरचा अंक प्रसिद्ध होण्यास थोडा उशीर झाला आहे. डिसेंबरचा अंकही योग्य वेळीं प्रसिद्ध होईल. साहित्यचंद्रिका जानेवारीच्या अंकाबरोबर रहावीनें आश्रयदात्याकडे जाईल. ज्यास ही नको आहे त्यांनी नांवें आम्हां लिहून कळविली आहेत. ज्यांच्या कडून लिहून आलें नाहीं, अर्थात् ती त्यांजकडे जानेवारीच्या अंकाबरोबर जाईल. ज्यास सन १९२४ सालीं वर्गणीदार रहावयाचें नसेल त्यांनी आजच कळवावें, म्हणजे त्यांजकडे व्ही.पीचा अंक जाणार नाहीं. याबद्दल वर्गणीदारांनी खबरदारी घ्यावी. व्हीपी परत आल्यानें विनाकारण आमचें नुकसान होतें. तसें होऊं नये.

२ या अंकापासून गीता-रामदासाची ४ पृष्ठें स्वतंत्र आकडे घालून प्रसिद्ध केली आहेत. त्या योगानें स्वतंत्र बुक बांधतां येईल. दर अंकांत ४ पृष्ठें प्रसिद्ध होतील.

# काव्यरत्नावली

## अंक ११ वा.

### सीता-संभ्रम

सीताहरण-प्रकरणीं रावणाचा सखा मारीच यानें सुवर्ण-हरिणाचें रूप धरून सीतेचें चित्त आकर्षलें. तिनें चोळीसाठीं त्या मृगाचें अजिन मला द्या. असा रामचंद्रापाशीं हट्ट धरिला. राम मृगामागें गेले. घोर वनांत त्यानें त्या मृगाचा बाणानें नाश केला. तो मायावी राक्षस मरते वेळीं बंधो ! धाव असें ओरडला. वास्तविक ती आरोळी रावणास इशारा देण्याकरितां असतां सीतेनें ती रामचंद्राची हाक आहे असें मानून लक्ष्मणास रामाच्या साह्यार्थ जा, निघा ह्मणून सांगितलें. लक्ष्मण तिची समजूत करूं लागला तेव्हां तिनें त्यावर भलताच आरोप केला. परिणामीं रावणानें तिचें हरण केलें.

( श्लोक-शिखरिणी )

जगन्माता सीता जनकदुहिता रामवनिता[१]
तिच्या ये[२] दृक्पंथा[३] कनकमृग[४] चित्ता भ्रमविता
सती बोले कांता[५] निजभजकचिंता नुरविता
मदिच्छा[६] हो[७] नाथा ! असुरवरहंता[८] पुरविता १

१ रामस्त्री २ आला, येता झाला ३ दृष्टीसमोर ४ सुवर्ण-हरिण ५ पतीला ६ माझी इच्छा ७ होई ८ मोठे राक्षस मारणारा.

असावें कांतीचें मज अजिन[१] त्याचें प्रियकरा !
कसाया कांचोळी[२], कठिण नख आळी[३], प्रियकरा !
उठा जा जा हाणा शर अजिन आणा प्रिय[४] करा
त्यजी केव्हांही न प्रचुर[५] यश दानप्रिय[६] करा[७] २
क्षणीं स्वीया[८] दृष्टी कनकमृगपृष्ठीं[९] हरि[१०] करी
क्षणीं मागें लागे, हरिण वनमार्गें झडकरी
पळे, पाहे मागें, हरिहि मृगमार्गें लवकरी
वनीं धांवे रागें[११] प्रणयमति[१२] मागे न निकरीं[१३] ३
किती ओढे, नाले, त्वरितगति[१४] आले[१५] उलटिले[१६]
किती आले गेले नग[१७] पळत काळें न गणिले
किती येतां वेगें वनचरहि[१८] मागें पिटाविले,
किती कांटे शृंगें तृणनिचय[१९] अंगें ढकलिले ४
असा जातां जातां अतिनिबिडकांतारजठरीं[२०]
शिरे जो माथावी हरिण नृपछावीं[२१] तंव शरीं
हराया तत्प्राणा शरधितुनि[२२] बाणा उपटिलें
क्षणीं सोडोनीया कनकमृगकाया निपटिलें ५
खलांचा तो राजा असुर करुणारोदन[२३] करी
अगा बंधो धावे गति विकट, यावें लवकरी
हरी पाहे जों तों दशमुखसखा[२४] तो खळ, कळे
खळा हाका मारी वरिवरिहि[२५] मारी फळकळे ६

१ चर्म २ मागच्या बाजूस गांठ आहे अशी चोळी ३ हट्ट ४ इष्ट ५ पुष्कळ ६ दान आहे प्रिय ज्याला ७ हाता ८ आपली ९ सुवर्ण हरिणाच्या पाठीकडे १० राम ११ आवडीनें १२ प्रेमळ १३ ओझ्याखालीं १४ सटकन् १५ लागले ( रस्त्यांत ) १६ ओलांडले १७ डोंगर १८ पशु १९ गवताचे भारे २० घोर अरण्यांत २१ राजपुत्रानें २२ भात्यांतून २३ आक्रोश २४ रावणाचा मित्र २५ वरवर, पुनःपुन्हां.

करी सीता चिंता प्रिय पति न येई अजुनि कां
क्षणीं मारी चित्ते[1] मृगवध हरीतें[2] कठिण कां ?
पहाया द्वारीं ती घडिघडि सती जाय उठुनी
दिसेना दूरींही विकल[3] हृदयीं होय ह्मणुनी ७
क्षुधार्थी[4] जो अन्नाविण अतितृषार्ती[5] जलाविना
चकोरीतें[6] चंद्राविण कमलिनीतें[7] रविविना[8]
रसज्ञाभावीं[9] कीं सुकविकवितेलागुनि जनीं
स्थिती ती श्रीरामाविण जनकजे[10] प्राप्त सदनीं ८
किती हो मी वेडी कुमतिवश[11] धाडी पति वना
खुळी चोळीसाठीं अहह! भुललें काय अजिना[12]
अगाई! कां माझा अमित उजवा नेत्र लवतो
अरिष्टातें कोण्या खळ निकट येण्या सुचवितो ? ९
तुह्मां भावोजी[13] कां दिसति तरि? कां हो अवधि हा ?
उभे कां? जा द्वारीं त्वरित अति दूरीं तरि पहा,
'दिसेना[14] मन्नेत्रीं, स्थिर मन करीं, येइल घरीं
जरी झाली वेळा नच अवकळा[15]–ये प्रभुवरीं' १०
'अगा! बंधो! धावें गति बिकट यावें' रुदन तें
क्षणीं आलें कानीं असुरवच मानी न परि ते,
अतिप्रेमें भ्रांता[16] व्यसनभयभीता[17] जनकजा[18]
मनीं भावी[19] वाहे[20] व्यथितपति[21] ये धाव अनुजा[22]

---

१ व्याघ्र विशेष २ सिंव्हाला, रामाला ३ दुःखित ४ भुकेलेल्यास ५ तृषितास ६ चकोरीस ( पक्षी विशेष ) ७ कमलास ८ सूर्यावाचून ९ रस जाणणाऱ्या.वांचून १० सीतेस ११ वाईट बुद्धीच्या स्वाधीन १२ चर्मास १३ लक्ष्मणा १४ लक्ष्मणाची उक्ति १५ दुःस्थिति १६ प्रेमातिशयानें भ्रम पावलेली १७ पति संकटांत आहे ह्मणून भ्यालेली १८ सीता १९ विचार करिते, मानिते २० बोलावतो २१ पीडित आहे असा पति २२ बंधो

बसे एकाकी ते चळचळ सुटे स्वेद शरिरीं
तिचे येना तोंडीं वचनहि, धडाडी भर उरीं
तनू कांपे भारी थरथर, शिरीं भोंवळ करी
महीमातेचा घे अतिसदय ते आश्रय करीं[1] १२
सुमित्रा[2]-पुत्रातें अचळ[3] बघते काय वदते?
न का ऐकूं आलें उभय फुटले का श्रवण[4] ते
चला जा जा धावा विमलकुलभावा[5] स्मरुनिया
हरा बाधा, धांवा त्वरित, निज भावासहित या १३

न तीं रामाचीं गे! असुरवचनें तीं मज कळे
वृथा वाटे मातें तव हृदय कोतें[6] कळकळे,
मरे मायावी[7] तो रडुनि वदतो सोदर[8] निघे
वनीं येतो रामानुजहि[9] निज कामा करुनि घे १४

किती दैत्यां रामें सुरहृदभिरामें[10] वधियले
किती ठायीं ठायीं असुरवर पायीं रगडिले,
करीचें[11] केव्हांही भय लवहि नाहींच हरिला[12]
कधीं खद्योतें[13] का दिनमणि[14] निका[15] 'होय हरिला'[16]

प्रभूची कां चिंता अति अनुचिता कारणविना
भिशी कां गे राहा स्थिर किति अहा अश्रु नयना
पुसे देहीं आलें जल, विखुरले केश जमवी
वृथा ऐशी होशी विकल न मशीं व्यर्थ श्रमवी १६
वनीं जातां बोले प्रभु मज न हालेंच इथुनी
कसें त्याचें मोडूं वचन तुज सोडूं समजुनी

---

१ हातांनीं २ लक्ष्मणातें ३ स्तब्ध ४ कान ५ क्षत्रियांच्या निर्मल कुल भावा ६ संकोचित ७ कपटी ८ बंधो ९ लक्ष्मण १० देवांना प्रिय ११ हत्तीचें १२ सिंहाला १३ काजव्यानें १४ सूर्य १५ खरोखर १६ हरण केला.

नको घेऊं हट्टा अशुभमय तोटा बहु पुढें
विनाशाचा येतां समय विपरीता मति घडे १७

पुरे पांडित्याची लहर तुमची दुःखद पुरे
पुरे विश्वासाची गरज मज त्याची नच पुरे
अधोवक्त्री[1] ऐसे कपटपटु[2] खासे कळुनिया
निघा जा जा बंधूनिकट पुरूषार्थी करुनि या १८

उभा कां जासी ना अझुनि विपिना[3] हेतु कळाला
मरो रानीं भ्राता मग वरिन कांता तद्तुला[4]
परी प्राणांतीं हे पतिनिरत[5] नोहे वश तुला
उगा डागा देशी रडुनि मजपाशीं खळखळां १९

जशी कैकेयीची विकृत[6] मति हीची गमतसे
मती माझी रामा भवभयविरामा[7] भ्रमतसे
करूं कैसें हा ! हा ! मज कठिण हा पेंच पडला
कृपा रामें केली सुमति सुचली, शेष[8] वदला २०

प्रिये माते ! सीते ! जनकदुहिते ! बंधुवनिते !
स्नुषे कैकेयीचे भरतजननीचे ! कविमते[9] !
वनीं जाया आज्ञा करिसि न अवज्ञा करवते
स्वयें मर्यादा ही उलट न कदाही सुचरिते[10] २१

नमे, काढी रेषा, त्वरित जगदीशास्तव निघे
सती द्वारीं राहे पतिचरणलोभें भय न घे
दिसेनासा झाला विपिनिं शिरला लक्ष्मण सुधी[11]
जटाधारी लंकापति मग तिथें ये कपटधी २२

---

१ खालीं तोंड केलेला २ महाकपटी ३ रानास ४ त्याची अनुपम ५ पतिव्रता ६ विकार पावलेली ७ संसारभयापासून सोडविणारा ८ लक्ष्मण ९ कुशसंमत १० पतिव्रते ११ चांगली बुद्धि ज्याची

खळें मायावेषें[1] निजतनु अशेषें लपविली,
सतीची सद्बुद्धी विविध वचनाहीं भ्रमविली,
पुढें मर्यादेचें स्मरणहि तियेचें विघडिलें,
तिचें आवेशानें वपु[2] दशमुखानें[3] उचलिलें २३

( शार्दूलविक्रीडित )

होतां शुद्धमतीस संभ्रम गती होते महा दुःखदा
'सीता संभ्रम' दाखवी शिखरिणी-वृत्तीं, सदा सर्वदा
ओत्यासंभ्रम हो न दुःख न घडो सीताधवा! राघवा!
देवा! या कविकिंकरा सुविनता दासा पदें दाखवा २४

———×——— ह. मा. समर्थ

## माझ्या बाळपणाची आठवण

( साकी-वृत्त )

गेली! कोठें बाळपणांतिल आनंदित मम दृष्टि
सृष्टीसौंदर्याला बघतां जिला होय बहु तुष्टि १
घन वृक्षांच्या श्रेणी पाहुनि बहुत जिनें हर्षावें
मोहुनि मन्मन मातें तेथें दुडदुड पळवित न्यावें २
अनुपम शोभा पहात त्यांची बैसें मी अनुरागें
दृष्टीलागीं आड पातल्या सारितसे कच मागें ३
मध्यान्हीचा प्रखर उन्हाचा जो का निर्वैराचा
श्रांत जनांच्या विश्रांतीचा गमे समय तो साचा ४
दिव्य फुलांचा गुच्छ पाहतां मोद मनाला व्हावा
तो वनवासी रावा मातें जिवलग मित्र गमावा ५
पूर्ण शशीची विमल चंद्रिका व्यापी अखिल जगातें
धवल वसन परिधान करी तें गमे धरा ही मातें ६
मज्जननीच्या अंकीं बैसुनि वदन तिचें निरखावें

१ कपटरूपानें २ देह ३ रावणानें.

माया-जोत्स्ना अधिक ह्मणूनी स्तनपानास करावें ७
तटिनी-तीरीं मृदुल पुलीनावरतीं मी बैसून
तृणधान्यांचीं हिरवीं क्षेत्रें घालों पूर्ण बघून ८
शुद्ध स्फटिकासम सरितेचा जलप्रवाह विशाळ
आपटतां खडकातें उडती नीर-बिंदु ते विमल ९
जवळ पातले ते जलवासी थवे सान मीनांचे
जळीं पोहणें पाहुनि त्यांचें आनंदें मी नाचें १०
माळावरलें मंद वायुनें जें तृण डोलूं लागे
तरंगमाला उठति गमे तें एका मागोमागें ११
बाळपणीं मी गेलों होतों एक्या रम्य तटाकीं
त्यांतिल विकसित पद्मांचें मी स्मरण कदां नच टाकीं १२
त्याच्या उत्तरतीरीं असती नागवेलिचे बाग
पश्चिमतीरीं नागनाथ तो रम्य किती! भूभाग १३
दिशा दक्षिणा व्यापी तो नग अर्ध चंद्रमाकार
पूर्व दिशेला सन्निध आहे माझें नरदें[1] रुचिर १४
असो अतां तें खगगण उडतां तयासवें धावावें
मातें तत्सम उडतां येइल काय मनांत ह्मणावें १५
आला वर्षाकाल जगातें जाती हें कळवाया
समीरतुरगारूढ ढगांला लागे मी निरखाया १६
शामवर्ण आकाशमंडपीं ईशें इच्छामात्रें
गमे जडविलीं दिव्य सुरत्नें बघतां हीं नक्षत्रें १७
नाना वर्णाकृति पक्ष्यांची तशीच त्याहि मृगांची
पाहुनि मन्मन पुनरपि दर्शन व्हाया त्यांचें वांच्छी १८
सूर्यास्तोदय कालीं असतीं जे त्यानिकट ढगांहीं
नाना मोहक रंगां धरितां आश्चर्यें मी पाहीं १९

१ नरदे नांवाचें माझें गांव.

विकसित कुसुमावलीयुक्त ज्या कोमल वेलि तरूंनीं
रंजविलें, त्यांकडे न आतां पाहें मी ढुंकूनी २०
गेलें बघणें समान भासति आतां काक मयूर
घोर लागला या जीवाला नको नको संसार २१

× × × ×

उपवनशोभा निरखायास्तव कधींतरी म्यां जावें
वातें झुलती सान तरू जे त्यासंगें डोलावें २२
निबिड लतांनीं वेष्टित गुंफा आच्छादित कुसुमांनीं
तिथें रहावें येतां मंजुळ पक्षांचा रव कानीं २३
भ्रमर सकल ते सेवायास्तव धांवे मकरंदातें
तद्गुंजारव पडतां कानीं चित्त वरी मोदातें २४
आम्रतरूंच्या शिरीं कुसुमितीं बैसुनि कोयाळांनीं
तो कंठावा मधुमासाचा काल सुमंजुल गानीं २५
इतर खगांनीं बहु आदरें गायन तें परिसावें
कटु हाकांनी परि काकांनीं तेथें बहु गर्जावें २६
मूढ जनांचें मनोरंजन न मधुर भाषणें होतें
यास्तव त्याशीं मुग्ध असावें योग्य हेंच सुजनातें २७
वातें वाहुनि कुसुमसुगंधा आणावें मजपाशीं
मदिंद्रियें हीं मोहुनि व्हावें अधिकचि म्यां वनवासी २८
वनवासांतिल मुग्धपणाचा शांतपणाचा काल
तो अत्यादर, भावा प्रकटवि नच होतां वाचाल २९
नेत्रेंद्रिय वा श्रोतेंद्रिय वा घ्राणेंद्रिय वा तीन्हीं
आदर नसतां तरी लीन तीं होतीं काय ह्मणूनी ३०

× × × ×

अन्य ग्रामालागीं जातां मार्गी वृंद मृगांचे
दृष्टी पडतां, हृदयीं येई भरतें आनंदाचें ३१

हरित तृणांच्या रानीं त्यांनीं स्वच्छंदें विचरावें
कोमल चारा चरुनि तेथलें निर्झरजल तें प्यावें ३२
वृक्षच्छायेखालीं बसुनी तेथें आनंदानें
चर्वित चर्वण करित पाडसां निरखावें प्रेमानें ३३
जवळ पाडसें स्तनपानातें येतां शीघ्र उठून
तृप्त कराया चाटित त्यांना ममतेनें पाजून ३३
हिंसक पशु या मानवसन्निध ये हें होतां ठावें
ताडताड उड्डाण तयांनीं घेतच पळत सुटावें ३५
कठिण भूवरी कंदुक जैसा नेटें आपटतांच
उशी घेउनी उसळे, वाटे तो मृगसंघ तसाच ३६
निर्झरपात्रांतील कन्हेरी झांकति ताम्र फुलांनीं
टिटिभ पांखरें करिती घरटीं पात्रासन्निध रानीं ३७
माळावरल्या गुरां मेंढरां पाणी पाजायातें
येतां कोणी, दृष्टीं घरटीं न पडावीं तीं त्यांतें ३८
धरुनि मनीं या भावा युक्ती योजावी ती साधी
टीं टीं शब्दें आधीं त्यातें लावावें निज नादीं ३९
पंख मोडल्यावरी पडावें स्वल्प उडावें दूर
होय धराया त्यास करावें आपणास आतूर ४०
चाळवीत यापरी तयाला दूर तेथुनी न्यावें
घरटीं दृष्टीआड तयाच्या करुनि शीघ्र परतावें ४१
दुष्ट जनांच्या वक्र दृष्टिनें हानी होय अपार
यास्तव त्यांशीं दूर असावें हाच खरा सुविचार ४२

× × × ×

तप्तकांचनासम रंगाच्या तेजोमय [illegible]
युक्त अशा बाळाकीं देखें आश्चर्यें मी नयनीं ४३
[illegible] अधिक पडावें सुंदर त्यांचें तेज
[illegible] ४४

सजल-नील-नव-मेघ तयाच्या जे का असति समीप
रौप्य-कनकमय नानाभरणीं नटले गमति अमूप ४५
निर्झर जल तें प्रवाहरूपें नगावरुनि ये खालीं
तत्कंठांतिल केवळ गमला स्फटिक हार त्या कालीं ४६
रत्नजडित जणुं काय पिसारा असे असे ते मोर
निजशिर्षी तो पसरुनि करिती नर्तन भानुसमोर ४७
जसा जसा तो भानू लागे उच्च स्थान चढाया
तसें तसें तें तेज तयाचें लागे प्रखरच व्हाया ४८
उच्चस्थानारूढ होउनी पुनरपि नीच स्थानीं
येतां मग तो जगा शांतवी सौम्य अशा किरणांनीं ४९
सर्वां ठायीं एकसारखी निज सत्ता चालाया
धारण करणें योग्य असे त्या प्रखरपणा रविराया ५०
ज्याच्या सत्ताबळें चालतो सृष्टिक्रम हा नीट
सुज्ञें त्याच्या प्रखरपणाचा कां मानावा वीट ५१
बाष्पाच्या रूपें नभिं ने स्वकरें सागर-वारी
कांहीं लोटे काळ तोंवरी वायू त्यांतें तारी ५२
वर्षाकालीं मेघरूप हें प्राप्त होउनी त्याला
सकल जिवांचें जीवन वारी लागे वर्षायाला ५३
होतां सारी जलमय सृष्टी आनंदति हे जीव
सुकलेलीं तीं झाडें वेली पुनरपि होति सजीव ५४
ओढे नाले भरुनि वाहती जाउनि मिळति नद्यांतें
सरितारासह त्याहि लागल्या प्रजवें वाहायातें ५५

( अपूर्ण )

## मार्जार-स्वामी

आर्या ( गीति )

कोणी परस्थ बोका उद्धट रानट कषाय वर्णाचा,
शिरतां प्रभाति दिसला मत्सदनीं 'साधुराम' नांवाचा १

माजघरीं अंधारीं बैसे तो आसनस्थ होवोनी,
डोळे मिटोन दोन्ही नासाग्रीं सूक्ष्म दृष्टि लावोनी २
झरझर इकडुनि तिकडे तिकडुनि इकडे उगाच पळतांना,
मृदुमांसकवलमूषक दिसला त्या स्वामि 'साधुरामां' ना ३
गुरुगुरु करुनी स्वामी वदले होतां समाधिचा भंग
थोपवुनी त्या मूषा 'होसि असा कैंचि सांग निःसंग'? ४
'उभयहि आतां आपण जाऊं या न्यायमंदिरामाजी
दावा दाखल करणें प्राप्त घडे मज तुझ्यावरी आजी! ५
'नाहीं होय हाणोनी काकुळती बहु करोनि अथवा कीं,
चालायातें नाहीं दावा झालाचि पाहिजे बाकी! ६
'कारण पाहीं आतां नुरलें कांहींच काम काज मला
श्रांता विरंगुळ्याला धंदा सन्मान्य एक हा असला!' ७
मूषक वदे 'महाशय ज्यूरी जज्जांशिवाय इन्साफ,
देणें स्वयेंचि ह्मणजे तोंडाची व्यर्थ दवडिणें वाफ!' ७
मार्जार स्वामी तें वदती त्या मूषकासि हांसून,
'हां हां नको गडबडूं चित्तीं ऐसा हताश होऊन! ९
'चिंता न करीं वेड्या माझी दृष्टी सदैव अवधानीं
होतों वकील तव मी मति माझी पटु अनेक अवधानीं १०
'धीर न टाकीं सखया! चल मी तव सर्व काळजी वाहें
रिपुवरहीं परिसावें हितद जरी, योग्य सर्व जीवां हें! ११
'होतों अमीन चल मी किंवा मी न्यायमूर्तिही होतों,
निःस्पृहतेची ग्वाही भगवा वेषचि मदीय हा देतो! १२
'ज्यूरिच जरी हवी तुज कार्य तिचेंही करीन मी सारें
सत्ता एकमुखी कीं खचित बरी दशमुखीहुनी बा रे! १३
'चल तूं मात्र कचेरींत तुजसाठीं पुढिल सर्व मी करितों
दावा चालवितों बध, शिक्षाही फाशिची तुला देतों!' १४

रंगपंचमी १८४४ ——×—— अनंततनय

## स्वराज्य-गीत

(चाल–सबसे राम भजन इ.)

जनहो! स्वराज्य अपुलें मिळवा,
त्याविण जगणें व्यर्थ गणा ॥ ध्रु० ॥
भारतमाता त्रस्त जाहली तत्नेत्रीं जल घळघळतें
अश्रुपूर्ण नयनांतुनि वघते दुःख तिचें जाणा १
मातृदास्यमोचनीं न धजती पुत्र असुनि सुख काय तिला
पुरे पुरे तें स्वस्थ राहणें उठा दावुं या सजिवपणा २
स्वराज्यसंघा स्थापुनि गेले लोकमान्य तो मार्ग धरा
त्या अनुसरुनी स्वराज्य मिळवूं निज कर्तव्या जाणा ३
"स्वराज्य अपुला जन्मसिद्ध हा हक्कचि" ऐसा मंत्र जपा
अशनीं शयनीं नच्च विसरा हा हेंच सांगणें सुजना ४
पक्षभेद तो विसरुनि साग, संघशक्तिला द्या थारा
पारतंत्र्यदावानल जाळी, अजुनि न कां ये ध्याना ५
कारागृहिं चिरवास घडो वा प्राणहि जावो या काळा
स्वराज्यप्राप्तिस्तव मी स्वात्मार्पण स्वस्त करा या माना ६
श्रीश आपणा नित सहकारी मग ध्यावें कां त्या मरणा?
चरणा शरण रिघुनियां मागूं स्वराज्य लक्ष्मीरमणा ७

पद्माकर

---

## × श्रीमती निघे नवलाई!!

(चाल–उद्धवा शांतवन कर)

व्याकरण काय कामाचें, अलंकार का खायाचे,
माहात्म्य काय शब्दांचें, कासया भेद अर्थांचे,

---

× आधुनिक कविता कशी असते याचा मासला ह्मणा किंवा नूतन मासिककार आपल्या प्रिय शाहीराचे बोल पीयूष ह्मणून कसे ठेवितात याचें उदाहरण ह्मणा, किंवा आधुनिक 'प्रतिभा' कशी असते हें एथें सांगितलें आहे.

संगमन का विचारांचें, सौरस्य काय चालीचें,
शंखनाद जे करितील,
कर्णांत घूं घुं घुमतील,
येथ तेथ जे उडतील,
ते बोल घेउनी बाई, श्रीमती निघे नवलाई!! १
कुरवाळुनि वात्सल्यांत, तोलून धरी सुतयष्टी,
समशेरीवाले पृष्ठीं, रागांत नवल करि कष्टी,;
रणशील राणि मर्दानी, त्यावरी ठेउनी दृष्टी,
हे शब्द तुरग त्वेषाचे
वेगीं चढत्या छातीचे,
अस्मान फेंक जातीचे,
वरि मांड भिडवुनी बाई, श्रीमती निघे नवलाई!! २
भाषेच्या कल्याणार्थे, हालवी मही दिग्गोल,
शब्दांचा अर्थांचाही, माजवी एक कल्लोळ,
दास्याच्या पायांतूनी, घेउनी पाठिला बाळ,
शाहीर नाम ठासोनी,
रसिकांच्या नयनीं कानीं,
निःशंक होउनी स्वमनीं,
'पीयूष' घ्या ह्मणत बाई, श्रीमती निघे नवलाई!! ३

——×—— शारदाभिमानी शाहीर

## भाऊ-बीज.

पृथ्वी-वृत्त.

अतीव भवताप जे शिरिं धरूनि भारावले
समृद्ध धनधान्य ते पिकविण्यास जे रावले
तयास सकला जनां सुखविण्या जणूं पातली
नटूनि थटुनी अहा! हंसत रम्य दीपावली १

सतेज नव कांतिनें दिसत ही धरित्री नवी
समीरण हळुहळू बहरलीं पिकें डोलवी
तशांत रवि त्यावरी किरण कोवळे फेंकुनी
समस्त कनकावृता करित ही गमे मेदिनी २
बघूनि नव वैभवा जन समस्त आनंदती
क्षणैक भवताप ते विसरुनी सुखीं रंगती
तदा सहज वाञ्छिती प्रियजनांस भेटावया
जगीं विमल सौख्य दे प्रियजनाविणें कोण या ? ३
नसे प्रमुख दूसरा सुदिन भाउबीजेसम
करी प्रणय बंधुचें भगिनि प्रेम सर्वोत्तम
स्वसा निज सहोदरा सुदिन मंगला वाञ्छिती
सुबंधु सुखवूनि त्या निजयशोध्वजा लाविती ४
अनाथ अबला स्वसा जगतिं या परंतु किती
सहाय्य करणें तया उचित हें असे सांप्रतीं
अहर्निश असा जनीं कळवळा जरी ठेविती
क्षणांत मग राष्ट्र हें करिल आपली उन्नती ५

वा. ना. फडणीस.

———×———

## ' मनोजवं मारुततुल्यवेगं '

' मनोजवं ' या पदाचा रूढार्थ मनाच्या वेगाप्रमाणें वेग आहे ज्याचा असा आहे, तेव्हां आधीं हें पद योजून नंतर मारुततुल्यवेगं हें विशेषण योजिलें आहे तें साभिप्राय कसें होतें अशी शंका निघते हें लक्षांत आणून पुढील श्लोकांत उभय पदांतील भेद दर्शविण्याचा यत्न आहे.

श्लोक.

करावें तसें होय मोठें लहान
गणीना स्थला सौम्य किंवा भयाण

स्थिरेना वळे नाचवी इंद्रियांस
महाराज संज्ञा ह्मणोनी मनास १
क्षणीं चांगलें जें क्षणीं होय दुष्ट
क्षणीं येथ तेथें क्षणीं शांत रुष्ट
घडे हेतु बंधास मोक्षास खास
महाराज संज्ञा ह्मणोनी मनास २
नसे भूतलीं अन्य याचे समान
नसे गम्य यातें असें कांहिंही न
करी कल्पना वायु घे ना जयास
महाराज संज्ञा ह्मणोनी मनास ३
जवार्थी असे भाव ऐशा गतीचा
जरी वेग रूढार्थ आहे 'जवाचा'
मनामागुनी योजुनीया जवाला
खुणावी गतीच्या प्रकारांतराला ४

——×—— ह. मा. समर्थ

## उषास्वागत

( चाल— चंद्रकांत राजाची )

उषा निघाली रम्य धवलिका हंसत हंसत येई
रम्य हास्य तें भूवर सगळ्या पसरुनि या देई
सृष्टि सुंदरी मोदें भरली आनंदें फुलली
रूप द्रव्य तें दावि जगाला मंदस्मित झाली
मोहक हिरव्यागार देवि त्या शालूनें सजली
दागदागिने लतिका पुष्पें अंगावरि ल्याली
लता बाई ग ! जाळी केली सुंदर मोत्यांची
कौशल्यें ही किती गुंफिली खचित गडे साची
मोत्यांचा हा सडा शिंपिला तव शालूवरती

खडी काढिली कीं मोत्यांची मोती चकचकती
झुडपें तूही पिंगा घाला फुगडी ही खेळा
स्वागत करण्या उषा देविचें जमला हा मेळा
कोमल सुंदर वृक्षावरतीं तळ्याच्याहि कांठीं
विहगांचीं जोडपीं वैसलीं स्वागताचसाठीं
आम्रतरूवर कोकिल सुंदर गाणें हा गाई
त्या गाण्यानें नव जीवन हें जगताला येई
पाहाडामधुनी सुंदर निर्झर हळुहळु वाहाती
बाळांच्यासम उड्या मारिती झुळ झुळकीं गाती
सृष्टि सुंदरी किति हिरवटली किती गडे फुलली
चहु बाजूंला हिरवी दाटी अति सुंदर खुलली
झुडपें लतिका पिंगा घेती गोल फेर केला
मयुरांचा नाचही त्या मधें कसा अहा ! खुलला
सृष्टि सुंदरी हा विश्वाची तूंच गडे राणी
सौंदर्याची प्रेम गुणाची खचित असें खाणी
हा मेळा ग ! सुंदर जमला स्वागत करण्याला
उषा देवि ही आली बाई तुह्मां रमविण्याला
आश्चर्यानें शोभा बघुनी विस्मित मी झालें
तटस्थावलें भान हरपलें रंगुनिया गेलें

सौ० रमातनया

———×———

## सृष्टीची मंगळा गौर

( चाल– वीरा भ्रमरा )

वन देविचा तरू लतांचा समूह जमला कसा
मजेचा वेळ गमे हा असा
हरित वस्त्र नेसून चहुकडे हिरवे दिसे
दागिनें पुष्पाचे नीटसे

ह्या लाजुन लतिका पतिसन्निध बैसल्या
नाजुक ह्या बाला गालांतच हांसल्या
ह्या विनयशालिनी गमतीनें गाइल्या
गुप्तेश्वराची पूजा करिती आळवती त्यांजला
मंगला गौर गमे ही मला
डोंगर वसले लहान मोठे आर्यमनां वाटती
तयानां पूजा कीं सांगती
सौभाग्य अढळ या ह्मणून कीं पूजती
पूजेंत रंगल्या देहभान विसरती
त्या शंकरचरणीं लीन जाहल्या किती
प्रसन्न होवो गौर तयांना अक्षय कुंका असो
आजन्महि सहवासीं त्या असो

———×——— सौ. रमातनया

## सुवर्ण पंचक.

श्लोक ( पृथ्वी वृत्त )

नमो तुजसि ईश्वरा ! सुरवरा ! दयासागरा !
कवित्व रचनार्थ दे गुणरसांबुधे ! आसरा
सुवर्ण ह्मणुनी न मी तुजसि देत हा आपटा
अकिंचन असे जरी ठकविना जना चोखटा १
फणींद्रशयना ! सदा चुरितसे पदा सिंधुजा
मला खिळियली गमे भ्रमरिशीच पादांबुजा
विमुक्त तिजला करीं क्षणभरीं उदरा ! हरी !
तरीच वरदायिनी कर धरील माझे शिरीं २
अभक्त ह्मणशील तूं तरि खराच मी चिन्मया
असे त्रिदित रावशी गृहिं सदाहि संतान्त्रिया

असंतपण नाशिसी विमल ठाउकें ब्रीद तें
ह्मणोन चरणीं असें शरण सर्वदा श्रीपते ! ३
स्वभाव तुज ठाउका जरि मदीय संतांकित
तसें विदितही असे विमल ब्रीद कां शंकित ?
किमर्थ तरि तूं न बा ? शरण जासि संतास रे !
यदीय पदसेवनें दुरित शीघ्र सारें सरे ४
अगा ! सकल जाणत्या ! वदसि काय हे माधव !
असेचि बघ पातलों खचित येथ संतास्तव
पदीं कवण हो असे ? परमभक्त विश्वीं असा-
-मिळेल तरि काय ? दे तिजकडे हवाला कसा ५

———×——— यशवंत गंगाधर कीर्तने.

## दसऱ्याचें सोनें. ( श्लोक )

सोन्यावीण जिच्या कृतार्थ दसरा, सैन्याविणें दिग्जय
सीमोल्लंघ जिचा प्रसिद्ध जगतीं अध्यात्म-तेजो-मय
कालाचे अवघाल तुच्छ करिते दृक्पात ती आमची
भू-माता, सण साजरे करुं तिचे आह्मीहि बाळें तिचीं १

सांगली. विजयादशमी शके १८४५

———×——— साधुदास.

## देवपूजा ( श्लोक )

पूजा करावी तव देवदेवा ! । वाटे मनाला बहु वासुदेवा !
पूजूं कसें बा ! मजला कळेना । साहित्य पूजेस मला मिळेना १
पाहूं कुठें सांग तुला द्याळा ! । व्यापूनि विश्वें अससी निराळा
सर्वांतरीं तूं वदतात संत, । मातें न लागे तव कांहिं अंत २
रानीं वनीं पुष्पलता अनंत । पुष्पेंहि त्यांचीं पडलीं पसंत
तोडूनि वाहूं तुजला जरी तीं । होईल कां योग्य जगांत नीति? ३
स्नानार्थ पानार्थ चराचरांना । देशी जला अर्पुनी प्रमांना

ऐशा तुला सांग कृपा करोनी । द्यावें कसें पात्र भरोनि पाणी ? ४
शीतांशु चंडांशु उजेड देती । नीलांजनाची वितथा प्रभा ती
भर्ता प्रभू तूं असशी जगाचा । नैवेद्य अर्पूं तुजला कशाचा ? ५
स्वामी जगाचा तुजवीण कोणी । नाहीं प्रभू, ही श्रुतिचीच वाणी
हस्तांजली जोडुनि एक मागों । ध्यानीं तुझ्या चंचल चित्त लागो ६
स्मरावें भजावें पदातें नमावें । सदा सर्वदा नाम वाचें वदावें
मनाला अशी बुद्धि दे रामराया । नको अन्य पूजा, गमे शीण वाया ७

—————×————— रा. अ. क्षीरसागर

## नदीपात्रावरून-संध्याकाल

सॉनेट ( सुनीत ) ( श्लोक )

आकर्षी करजाल तो रवि मही टाकी वियोगानलीं
घेतां सुंदरता नभांत चढती सौवर्णसे भासती
होई रक्त[1] दिशा जणों त्यजुनिया गेला ह्मणोनी पती
वाहे मंद सुगंध शीत करण्या वायू दिशा सुंदरी १
चांदीचा रस ओतिला जणु कुणी त्याची नदी जाहली
वायूचुंबनजन्यवारिलहरी तारा जरीच्या परी
शैवालें जलदेवता प्रिय अनी शालूहि वारीवरी
वाहे ओघ सुरम्य संथ, सरिता सौंदर्य घे सुंदरी २
रक्तावर्ण नभा रुपेरि सलिला शीतानिले मंदही
सौंदर्यास बघोन ही द्विजतती वेड्यापरी होउनी
हर्षानें फिरते नभांत वलयें भव्याकृती घेउनी
गाणीं गाउनिया, निरोप रविचा घेती जणो पक्षिही ३
जावोनी रुधिर प्रभा हळुहळू शामा निशा घेउनी
तारे भूषण लेवुनीहि रमली शोकातें झाली दिशा

—————×————— ग. अ. साबणे

1 रागावली

## विजया दशमी. (श्लोक)

श्रीरामा पुरुषोत्तमा प्रियतमा सीतामनश्चंद्रमा
ताताज्ञा प्रतिपाळिली कठिणही प्राणापरी उत्तमा
व्योमीं मित्र तशापरी विचरशी चंद्रासवें काननीं
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी १
मंदारापरि दुष्ट दैत्य पिळिले विघ्नें ढगें फोडिलीं
धैर्ये वृत्ति उदार शांत धरिली मायामयी सोडिली
केलें कार्य समस्तही निशिदिनीं सत्संगती साधुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी २
भारे दुर्मतिचे तरोत ह्मणुनी संसारमायाजलीं
कामक्रोधमदादि षण्मतिशिळा संकीर्ण संयोजिली
केली वाट अवीट त्याजकडुनी सेतू प्रभो ! बांधुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी ३
चाराया तृण कामरूप अधमा सद्वृत्तिसेनाग्रणी-
केला चिन्मय वायुपुत्र, नगरी लंका कुडी जारिणी-
त्यानें जाळियली, सखी मिळविली त्वां रावणा मारुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी ४
जयजयकार नभांगणीं सुरगणीं केला सुमें वर्षिले
दुष्टोच्चाटण धर्मरक्षण जगत्कल्याणही साधिलें
आत्माराम सदार पुष्पकनभोयानीं प्रभो बैसुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी ५
देऊं केवि सुवर्णहीन जन मी आतां तुह्मा राजया !
देती नित्य नवीं नवींहि सुकवी रत्नें करीं ज्यांचिया
देतों एक सुवर्ण पत्र ह्मणुनी रागें न हें आपटा
कांतेनेंहि दलें समर्थ पुजिलें भक्तिप्रिया चोखटा ६

—×— ह. मा. समर्थ

# श्रीमद्भगवद्गीतार्यासप्तशती.

## अध्याय १ ला.

### आर्या

मत्पुत्र आणि पांडव, कुरुच्या क्षेत्रांत एक जे झाले
युद्धेच्छेनें त्यांनीं, सांगें वा ! काय संजया ! केलें ? १
पाहुनि पांडवसेना, आचार्याच्या समीप तो गेला
प्रेमें वंदन करुनी, दुर्योधन बोल बोलता झाला २
मोठी पांडवसेना, व्यूह रचूनी असे उभी केली
धीमान्धृष्टद्युम्नें, तव शिष्यें हो पहा पुढें ठेली ३
भीमार्जुनादि जेथें, वीर धनुर्धर पराक्रमी असती
युयुधान हा तसे हे, द्रुपद विराटहि महारथी दिसती ४
चेकीत धृष्टकेतू, काशी राजा पराक्रमी पाहीं
पुरुजित्कुंतीभोजहि, शैब्य पहा थोर याहुनी नाहीं ५
विक्रांत युधामन्यू, उत्तम ओजहि पराक्रमी आहे
अभिमन्यू कृष्णासुत, सकळहि असती महारथी पाहे ६
सेनेंत आमुच्या जे, विशेष बोधार्थ वा ! द्विजश्रेष्ठा !
कथितों सेनानायक, माझ्या सत्यचि निवारितो कष्टा ७
गुरुजी आपण, भीष्महि, कर्ण कृपाचार्य हे सदा जेते
त्वत्सुत अश्वत्थामा, विकर्ण भूरिश्रवा असे नेते ८

इतरहि पराक्रमी बहु, मजसाठीं प्राण द्यावया सिद्ध
नाना शस्त्रां धरिती, युद्धकला ज्यांसि हस्तकीं बद्ध ९
अपुली अपार सेना, भीष्में रक्षण जिचें असे केलें
परिमित पांडव दळ हें, भीमानें सर्व रक्षिलें ठेलें १०
सर्व व्यूहद्वारें, धैर्यें निजभाग रोखुनी धरणें
कथितों एकचि तुम्हां सर्वांनीं भीष्मरक्षणा करणें ११
कुरुवृद्धें शांतनवें, करुनी मग सिंहनाद वाजविला
शंख बहुत जोरानें, दुर्योधनचित्तमोह घालविला १२
मग पणव शंख भेरी, आनकही गोमुखादि वाद्यांचा
एका समयीं झाला, लोकां तो शब्द कांपवी साचा १३
युक्त श्वेताश्वानें, ऐशा मोठ्या रथावरी जाणा
माधव आणि धनंजय, वाजविती दिव्य शंख मनिं आणा १४
हरि पांचजन्य वाजवि, धनंजयें देवदत्त वाजविला
पौंड्राभिध भीमानें, मोठ्या वेगें करोनि गर्जविला १५
धर्म अनंतविजयही, सुघोषमणिपुष्पकांसि वाजविती
माद्रीतनय उभयतां, कीर्ती लोकत्रयांत गाजविती १६
काश्यपराक्रम मोठा, लोक शिखंडी महारथी गणती
धृष्टद्युम्नविराटा, अपराजित सत्य सात्यकी ह्मणती १७
द्रुपद द्रौपदितनयहि, राजा, अभिमन्यु आदि वीरांनीं
निज शंख निरनिराळे, वाजविले सकळ वीर धीरांनीं १८
तो नाद कौरवांच्या, हृदयाला स्पष्ट भेदुनी शिरला
भूनगपाताळासी, व्यापुनि आकाशही सकळ उरला १९
मग कौरवसेनेला, पाही गांडीव घेउनी जेव्हां
शस्त्रास्त्रपातसमयहि, आला विजयेंहि जाणिलें तेव्हां २०
राजा ! हृषिकेशाशीं, केलें भाषण धनंजयें काय
मध्यें उभयदळांच्या, स्थापी रथ वंदितों तुझे पाय २१

युद्धेच्छु सर्व वीरां, न्याहाळुनि एकदांचि जाणीन
या युद्धांत कुमार्शी, रण करणें हें मनांत आणीन २२
योद्धयांसि पाहणें मज, जे येथें प्राप्त जाहले दिसती
दुर्बुद्धि कौरवांच्या, तोषार्थ रणासि ठाकले असती २३
राजा ! ऐसें भाषण, पार्थं करितांचि ईश्वर त्वरित
मध्यें उभयदळांच्या, उत्तम रथ आणुनी उभा करित २४
जेथें भीष्मद्रोण, प्रमुख अशा सर्वही नृपांमाजी
बोले पार्था पाहें कौरव एकत्र ठाकले आजी २५
पाहें अर्जुन तेथें, तात पितामह तसे सखे कांहीं
आचार्य मातुल सुतां, पौत्रादिक सकळ बांधवांलाही २६
पाहे उभय दळीं तो, मित्रश्वशुरादि आप्त लोकांस
युद्धासि सिद्ध ऐसे, झाला कौंतेयमानसीं त्रास २७
चित्तीं बहुत दया ये, खिन्नत्वें हेंचि पार्थ बोलतसे
कृष्णा ! स्वजनां पाहुनि, युद्धासी सिद्ध अंग कांपतसे २८
कांपति पदादि अवयव, धैर्य न चित्तांत लेशमात्र वसे
मुख कोरडेंचि झालें, रोमांचें मम शरीर युक्त असे २९
गांडिव करीं न राहे, माझें सर्वांग भाजतें पाहीं
चित्त भ्रमतें क्षणही, युद्धा सामर्थ्य राहिलें नाहीं ३०
चिन्हें विपरीत मला, दिसतीं देवा ! न सौख्यही कांहीं
मारुनि सकळ स्वजनां, युद्धीं मज लाभ लेशही नाहीं ३१
विजय नको मज देवा, नलगे राज्यहि तशीं सुखें सारीं
भोगांची काय कथा, गोविंदा ! जीवितासि तूं वारीं ३२
ज्यांस्तव इच्छितसें मी, राज्या भोगांसि या सुखां सकळां
ते युद्धास उभे हे, प्राणधनांसी करावया त्रिकळां ३३
आचार्य पुत्र पितरहि, तैसे मातुल पितामहा पाहीं
येथें पौत्रां श्वशुरां, त्यापरि संबंधि शालकांलाही ३४

ते मारीत मला परि, मारूं इच्छीत मी तयां नाहीं
लोकत्रय राज्यास्तव, भूमीची काय योग्यता पाहीं ३५
मारूनि धार्तराष्ट्रां, आह्मां वाटेल काय संतोष
लागेल पाप केवळ, जरि आहे आततायि हा दोष ३६
यास्तव योग्य न आह्मां, मारावें बांधवांसि हें लोकीं
मारावे स्वजन कसे, तेणें सुख काय होय अवलोकीं ३७
लोभाविष्ट मनानें, वधति न पापासि ते जरी देवा !
मित्रद्रोह कुलक्षय, पापांचा मेउं काय मी ठेवा? ३८
जाणुनि कुलक्षयाच्या, पापा आह्मी कसें न टाळावें
सांगें जनार्दना कीं, मारुनि आप्तां करां विटाळावें ३९
कुलधर्म जे पुरातन, चालत आले कुलक्षयें सकळ
नासुनि अधर्म होतो, तेणें कुळ सर्व होतसे विकळ ४०
कृष्णा ! अधर्म होतां, दूषित होती कुलस्त्रिया सर्व
स्त्रीदोषें वार्ष्णेया, ! सांपडतें वर्णसंकरा पर्व ४१
संकर होतां नरकप्राप्ति कुलघ्नां कुलासि नेमाची
पडती पितर तयांचे, होय न पिंडोदकक्रिया त्यांची ४२
होईल वर्णसंकर, ऐशा मोठ्या कुलघ्न दोषानें
कुलधर्मजाति शाश्वत, जाती विलयासि सत्य रोषानें ४३
कुलधर्म नष्ट होतां, मनुजाला नरक निश्चयें घडतो
मीं ऐकिलें असें कीं, रविशशि आहेत तोंवरी पडतो ४४
या राज्यसुखेच्छेनें, स्वजनां मारावया अह्मीं झालों
सिद्ध, अहाहा ! मोठें, पाप कराया्स कीं इथें आलों ४५
शस्त्र न हातीं धरितां, कौरव युद्धांत मारिती मजला
जरि, तरि कल्याणप्रद, आहे हें सत्य सांगतों तुजला ४६
बोलुनि अर्जुन ऐसें, सशरधनुष्यास देइ टाकून
स्वस्थ रथीं बैसे तो, शोकें ताच्चित्त जाहलें दून ४७

———×———

३ अलिकडे मागील चांगल्या कवींची त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या कवितांचीं स्वतंत्र पुस्तकें प्रसिद्ध होण्याचा प्रयत्न चाललेला आहे. कै. लिमयांची कविता रा. रा. अधिकारी हे लौकरच छापून प्रसिद्ध करणार आहेत. याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. आमच्याकडे त्यांचीं असलेलीं प्रकरणें सांपडल्यास व इतर माहिती आम्ही लौकरच त्यांच्याकडे पाठवूं. त्याप्रमाणें इतर कवींनींही त्यास ह्या कामीं जरूर सहाय्य करावें असें आम्ही सुचवितों. तसेंच कै. माधवानुज ( काशिनाथपंत मोडक ) यांची सर्व कविता त्यांचे चि. चिंतामणराव हे लौकरच प्रसिद्ध करणार आहेत. ह्या दोन चांगल्या कवींची कविता प्रसिद्ध होत आहे हा योग फारच चांगला आहे. कै. माधवानुजांच्या चरित्रा करितां लागणारी माहिती कृपेनें आमच्याकडे जरूर पाठवावी.

४ रा. रा. गोपाळराव पोतदार ( मनोहर कवि ) व रा. रा. एकनाथपंत निकाडकर हे अर्वाचीन कवींचा एक चांगला काव्यग्रंथ लौकरच छापणार आहेत. त्याकरितां त्यांनीं हल्लींच्या सर्व कवींस विनंतिपत्रें पाठविलीं आहेत. तरी सर्व कवींनी आपआपल्या चांगल्या कविता, स्वचरित्र व आपला फोटो हीं जरूर गोपाळ गंगाधर पोतदार बी. ए. एल्. टी. धुळें यांजकडे जरूर पाठवावीं. कवितांची निवड रसिक व मार्मिक कवींच्या देखरेखीखालीं होणार आहे.

५ रा. रा. भिसाळ वस्ती मालवण यांचीं नीतिपर पुस्तकें पोंचलीं. हीं पुस्तकें विद्यार्थ्यांस प्रौढ वाचकांस वाचण्या लायक आहेत. शाळा खात्यांतून त्यांचा जितका प्रसार होईल तितका तो इष्ट आहे. हे गृहस्थ लेखक व कवि या नात्यानें सर्व महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहेत. यांची उद्योगप्रियता खरोखर अवर्णनीय आहे. वाचकांनीं त्यांच्या पुस्तकांस जरूर आश्रय द्यावा अशी या पुस्तकांची योग्यता आहे.

रा. सा. रामकृष्णपंत मोरमकर संपादक विविधज्ञानविस्तार यांस २८ आक्टोबर रोजीं देवाज्ञा झाली. फार वाईट झालें. कै. नाडकर्णी यांच्या मागें यांनीं विस्ताराचें काम फारच चांगल्या रीतीनें करून वाङ्मयाची सेवा उत्कृष्ट केली. त्यांच्या मागें त्यांचे पुतणे श्री. अर्जुनराव हेही विस्ताराचें संगोपन चांगल्या रीतीनें करतील अशी आशा आहे.

रजिष्टर्ड नं. बी ५३७

दु० आ० तिवारीकृत आवृत्ति २ दुसरी.

# मराठ्यांचीं संग्रामगीतें.

या नव्या आवृत्तींत १८५७ सालीं स्वातंत्र्याकरितां रणकल्लोळ करणाऱ्या झांशीच्या लक्ष्मीचीं ४ प्रकरणं जास्त आहेत. [१] मर्दानी झांशीवाली, [२] घनगर्ज गर्जली तोफ, [३] फेकला तटाहून घोडा, [४] कालपीस करी कल्पांत.

शिवाय सताराचा खून, महांकाळी तोफ, हे शिर खंडेना माने, अशीं ७ प्रकरणें जास्त आहेत. लक्ष्मीबाईचें चित्रहि दिलें आहे. पृ. २३० किंमत ८१० [८११ चीं तिकिटें पाठवा]

टी. एम्. सोनाळकर.

जळगांव पूर्व खानदेश.

छापत आहे ! नांवें नोंदवा ! !

# सचित्र भक्तिकुंज.

अनेक प्रासादिक कवींच्या भक्तिरसानें ओथंबलेल्या कवितांचा यांत संग्रह केला असून, नित्य पाठाकरितां गणेश, राम, कृष्ण, विठ्ठल, शंकर, दत्त, मारुति इत्यादि दैवतांचीं स्तोत्रें, पदें, भूपाळ्या, आरत्या, ओव्या, अभंग वगैरे व्यवस्थित रीतीनें एकत्र केलीं आहेत. ३१ डिसेंबर १९२३ पर्यंत नांवें नोंदविणारांस किंमत एका प्रतीस रु. १, बारा आणे पडेल.

हरी माधव समर्थ.

परमार्थ आश्रम, जळगांव.

॥ श्री ॥

# काव्यरत्नावली

अलीकडील कविमंडळांनीं चालविलेलें

कवितेचें मासिक पुस्तक

श्लोक.

ती ती पदें नित्य विकास येती।
ज्या त्यांत अर्थांप्रति दाविताती॥
कौशल्य मोठें रचनेंत आहे।
सत्काव्य तेणें नव वाटताहे. ॥ १ ॥


नारायण नरसिंह फडणीस

यांनी आपल्या मालकीच्या प्रिंटिंग प्रेसमध्यें छापून

जळगांव पू. खा. येथें प्रसिद्ध केलें.

वर्ष ३१ वें ] डिसेंबर सन १९२३ [ अंक १२ वा

वार्षिक वर्गणी ट. ह. पो. सह १॥ रुपया

# काव्य रत्नावलीचें दप्तर.

चालू वर्षाचा दिसेंबरचा हा अंक शेवटचा आहे. ईश्वराच्या कृपेनें वर्षाची कामगिरी पार पडली. चालू वर्षांत ६५ कवींनी १९६१ कविता वाचकांस अर्पण केल्या या वर्षी स्वतंत्र कविता १९०० प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांची वर्गवारी केली तर भक्तिपर ४००, कथापर ४००, शृंगार बोध वगैरे मिळून ११५० कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. भाषांतरात्मक कविता ६१ च आलेल्या आहेत. यावरून स्वतंत्र कवितेचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे या वर्षी २५ नवीन कवि काव्यरत्नावलीस येऊन मिळाले याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों. या वर्षापासून भगवद्गीतेच्या भाषांतरास आरंभ झालेला आहे. हें भाषांतर कै. नारायण बोवा घमंडे यांनी केलेलें आहे. हे रसिक व भाविक गृहस्थ वाचकांच्या परिचयाचे आहेत. त्यांचे चि. गोपाळराव घमंडे यांनी रत्नावलीच्या वाचकांकरितां हें भाषांतर दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों.

या अंकास थोडा उशीर झाला आहे याबद्दल वाचकांनी आम्हास क्षमा करावी. जानेवारीचा अंक साहित्यचंद्रिकेसह लौकरच वाचकाकडे रवाना होईल. साहित्यचंद्रिकेस आश्रय देऊन रत्नावलीस ज्यांनी मदत केली आहे त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. चंद्रिकेच्या आश्रय दात्यांची नांवें योग्य वेळीं आम्ही प्रसिद्ध करूं.

येत्या जुलै महिन्यापासून ३२ पृष्ठें रत्नावलीत यावीत असें कित्येक हितचिंतक कळवितात परंतु किंमत वाढविल्याशिवाय ही सूचना अमलांत आणतां येत नाहीं. वाचकांस ही सूचना पसंत पडल्यास त्यांनी आपला मनोदय कळवावा.

या अंकाची अनुक्रमणिका दिलेली नाहीं. वर्षाची अनुक्रमणिका सोबत दिली आहे. त्याल ती आहे.

काव्यरत्नावलीचे जुने कवि कै. विष्णु बाबाजी कुळकर्णी कार्लेकर हे गेल्या वर्षाच्या आक्टोबर महिन्याच्या २ ऱ्या तारखेस वारले. ही बातमी देण्याचें त्या वेळीं राहिलें. यांच्या मृत्यूनें रत्नावलीची फारच हानी झाली आहे. त्यांचें त्रोटक चरित्र त्यांचे बंधु रा. रा. कृष्णाजी बाबाजी कुळकरणी यांनी आमचे कडे लिहून पाठविलें आहे. याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. सवडीनें चरित्राचा सारांश लौकरच आम्ही देणार आहोंत.

# वर्षाची अनुक्रमणिका.

कवि, विषय व पद्यसंख्या — पृष्ठांक


## १ हरी माधव समर्थ ( ४०१ )

| | | |
|---|---|---|
| ५३ | काव्यरत्नावलींचा वाढदिवस ... ... ... | १ |
| २५ | कथोपनिषद्रहस्य ... ... ... ... | २९ |
| ५ | दैव फिरल्यावर ... ... ... ... | ३६ |
| ३ | वसंत ... ... ... ... ... | ३७ |
| | छंद आणि अलंकार ... ... ... ... | ४९ |
| २५ | बंधु-संजीवन ... ... ... ... | ५४ |
| ८ | चंद्रांक ... ... ... ... ... | ५७ |
| ३५ | बुद्धि-चातुर्य ... ... ... ... | ८८ |
| ३ | सूक्तमाला ... ... ... ... | ९४ |
| ४५ | गीतेच्या आज्ञा ... ... ... | १०३ |
| ५ | प्रणतिपंचक ... ... ... | १०७ |
| ८ | कविचा आशिर्वाद ... ... ... | ११० |
| २५ | मुक्त कैदी ... ... ... ... | १३३ |
| ७ | असें कां ? ... ... ... ... | १६३ |
| ८ | संकोच कां ? ... ... ... | १६४ |
| ३३ | शिवमहिम्न ... ... ... | १६९ |
| १४ | प्रीतियोग ... ... ... | २०३ |
| १६ | अभंगसुधा ... ... ... | २०४ |
| ८ | भामा-द्रौपदी-संवाद ... ... ... | २२३ |
| ४ | कवीचें स्वप्न ... ... ... | २३७ |
| २४ | गाना-संभ्रम ... ... ... | २४१ |
| ४ | ' मनोजवं मारुततुल्यवेगं ' ... ... | २५४ |

कवि, विषय व पद्यसंख्या — पृष्ठांक

६ विजयादशमी ... ... ... २६०
३० वर्षान्त ... ... ... ... २६१
७ तें काय ? ... ... ... ... २७२

२ दुर्गाप्रसाद् आसाराम तिवारी ( २०५ )

९ हे सुंदरी ! ... ... ... ... ३८
४ काय सांगूं ! ... ... ... ४१
२५ अकस्मात् भेट ... ... ... ५८
२७ अकस्मात् भेट ... ... ... ७३
५ विद्धहरिणी ... ... ... ... ६८
६ अभंगरत्नमाला ... ... ... ६९
२८ महांकाळी ... ... ... .. ८५
१० वंचना ... ... ... ... ११४
६ वंचनेनंतर याचना संभवत नाहीं ... ११६
७ अभंगरत्नमाला ... ... ... १४३
३ गाऊं नये त्यापुढें ... ... ... १६६
६ भामिनी ... ... ... ... १६६
२७ ही ... ... ... ... १८७
१९ मर्दानी झांशीवाली ... ... ... २१७
६ अभंगमाला ... ... ... २४०
७ अभंगमाला ... ... ... २७२

३ मनोहर ( १४६ )

८ जीवनास ... ... ... ... २४
७ अभागी ... ... ... ... ६६
७६ मुशाफर ... ... ... ... ९७
५ मुग्धाबाला ( हीच कविता कांक्षित या नांवानें पान २१६ मध्यें चुकीनें पुनः छापली गेली आहे. ) १६२

| कवि, विषय व पद्यसंख्या | पृष्ठांक |
|---|---|
| ५० मुशाफर ... ... ... ... | १७५ |
| **४ केशव नारायण वैद्य ( १३९ )** | |
| ६० संक्रांतीची भेट ... ... ... | १२१ |
| ७९ संक्रांतीची भेट ... ... ... | १४५ |
| **५ अनुवादक ( १०८ )** | |
| २५ सख्य–भक्ति ... ... ... | ७७ |
| २५ सख्य–भक्ति ... ... ... | १२७ |
| २५ सख्य–भक्ति ... ... ... | १५३ |
| १५ सख्य–भक्ति ... ... ... | १८२ |
| १८ सख्य–भक्ति ... ... ... | १९३ |
| **६ श्री. बा. यरगट्टीकर ( ८९ )** | |
| ५५ माझ्या बाळपणाची आठवण ... ... | २४६ |
| ३४ माझ्या बाळपणाची आठवण ... ... | २६८ |
| **७ अनंततनय ( ६६ )** | |
| १४ मनास ... ... ... ... | २३ |
| १७ मनास ... ... ... ... | ६७ |
| २१ मनास ... ... ... ... | १०८ |
| १४ मार्जार–स्वामी ... ... ... | २५० |
| **८ कृष्णाग्रज ( ५० )** | |
| ३० राहूं सुखानें उगें ... ... ... | १० |
| २० श्रीशिवाजी महाराजांची तसबीर ... | २२६ |
| **९ विद्याधर वामन भिडे बी. ए. ( ५० )** | |
| ५० पुण्यपंक्ती ... ... ... | २६४ |
| **१० केशव नारायण डांगे ( ४५ )** | |
| ४५ स्वर्गारोहण ... ... ... | २५ |

कवि, विषय व पद्यसंख्या पृष्ठांक

११ नाथ-पाठक (४५)
४५ आत्म्याचे बोल ... ... ... २२९
१२ वसन्तविहार (४४)
१९ आनंदलहरी ... ... ... १५
७ तूं आणि मी ... ... ... १९९
१८ भेटशाल ... ... ... २३७
१३ माधव गोविंद भिडे (४०)
२१ सांप आणि कानस ... ... ... २१
१९ फलार्थी फलाच्या सजे मारुं हातें ! ... ४४
१४ भास्कर रामचंद्र तांबे (३३)
११ महा-प्रस्थान ... ... ... ८२
५ महा-प्रस्थान ... ... ... १११
४ महा-प्रस्थान ... ... ... १३२
५ महा-प्रस्थान ... ... ... २०९
८ महा-प्रस्थान ... ... ... २१०
१५ सौ. रमातनया (३०)
२८ उषास्वागत ... ... ... २५५
२ सृष्टीची मंगलागौर ... ... ... २५६
१६ तांबे दापोली (२८)
२८ वीणा ... ... ... ... ३२
१७ काव्यशेखर (२६)
१२ प्रेमगीत ... ... ... ... ७१
६ वेडा ... ... ... ... ११८
८ कै. श्रीएकनाथास ... ... ... १६१
१८ वासुदेवसुत कोल्हापूर (२४)
२४ कवि आणि राघू ... ... ... २०५

कवि, विषय व पद्यसंख्या — पृष्ठांक

१९ शामराव बाळकृष्ण देसाई ( २२)
२२ प्रतिभा ... ... ... ... २७४
२० आनंदराव कृष्णाजी टेकाडे ( २१ )
९ उषःकाल ... ... ... ४८
९ तो हा सखा ... ... ... ८३
३ दुरून वंदन ... ... ... २३९
२१ पां. रा. नंदुरबारकर ( २१ )
१४ मराठी वाङमय ... ... ... १५७
७ पंडितप्रशस्ति ... ... ... २१३
२२ अनंत कुमार ( २० )
२० ताराराणी ... ... ... २११
२३ केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर ( १४ )
३ एक विरही ... ... ... ४३
८ स्वदेशी व्रत ... ... ... ११३
३ पिकान्योक्ति ... ... ... १२०
२४ वि. गो. साठे ( १४ )
५ जन्मरहस्य ... ... ... ११७
९ घटमहिमा ... ... ... २७७
२५ गिरीश ( १३ )
७ याचना ... ... ... १८
६ याचना ... ... ... २३३
२६ बाळकृष्ण गणेश पानसे ( १२ )
१२ निसर्ग–प्रणय ... ... ... ३७
२७ श्रीनिवास पंढरीनाथ नांदेडकर ( १२ )
१२ बाई निद्रे ! ... ... ... १८९

| कवि, विषय व पद्यसंख्या | पृष्ठांक |
|---|---|
| ५३ अ. र. चिंचाळकर ( ५ ) | |
| ५ मानवी दुर्बलता ... ... ... | ७२ |
| ५४ कमलाकर ( ५ ) | |
| ५ कशाला ठेवावी ... ... ... | २१४ |
| ५५ वामन जनार्दन कुंटे ( ४ ) | |
| ४ अंधता ... ... ... ... | २३४ |
| ५६ वा. बा. देशपांडे ( ४ ) | |
| ४ झरा ... ... ... ... | २७९ |
| ५७ दिनकर ( ४ ) | |
| ४ सूर्यप्रेम ... ... ... ... | १४१ |
| ५८ गो. वि. ताडफडे ( ४ ) | |
| ४ भ्रांति ... ... ... ... | ६२ |
| ५९ शारदाभिमानी शाहीर ( ३ ) | |
| ३ श्रीमती निघे नवलाई ... ... | २५२ |
| ६० ग. अ. साबणे ( ३ ) | |
| ३ नदीपात्रावरून--संध्याकाल ... ... | २५९ |
| ६१ त्र्यंबक अनंत देशपांडे ( ३ ) | |
| ३ प्रेमाची हांक ... ... ... | २१५ |
| ६२ सिताराम विष्णु केळकर ( ३ ) | |
| ३ केवळ प्रसाद म्हणून ... ... | ६३ |
| ६३ नाथ विठ्ठल ( २ ) | |
| २ रमणीप्रेम ... ... ... | १३८ |
| ६४ साधुदास ( १ ) | |
| १ दसऱ्याचें सोनें ... ... ... | २५८ |
| ६५ श्रीकृष्ण ( १ ) | |
| १ 'हॅम्लेट' नाटकाचें सार ... ... | ४३ |
| ६६ श्रीमद्भगवद्गीतार्थसप्तशती ( स्वतंत्र पृष्ठें १ ते ८ ) | १ |

# काव्यरत्नावली

अंक १२ वा.

## वर्षान्त.

आर्या.

देवा ! पळें पळालीं, घटिका गेल्या, तसे प्रहर गेले,
गेले दिन मास ऋतू, अयनांहीं वर्षही सर्व नेलें १
गेलें बरें कुणाला सोन्यासम, कठिण लोहसेंहि कुणा
गेलें सुखदुःखानें मिश्रितसें दावुनी जनां त्रिगुणां २
जें गेलें तें गेलें, नाहीं येणार मागुतें ह्मणुनी
हर्ष नको शोक नको गेल्याचा व्यर्थ काय तो करुनी ३
झालें जें जें सारें तें झालें आपल्या बऱ्यासाठीं
चिंतून असें चित्तीं वर्तावें धैर्य बांधुनी गाठीं ४
कर्ता देव, करविता भोक्ताही तोच, तोच भोगविता
क्षयकर्ता कालहि तो, तोचि नवीं विश्वखेळणीं रचिता ५
तूं तों ' निमित्त मात्रं भव ' ऐसें वर्म बोलिला अंतीं
गीतेंत कृष्ण भगवान् तेंचि पुढें कथियलें जनां संतीं ६
तो सूत्रधार पात्रें रंगविता, आणिता जनां पुढतीं
प्रेक्षकपात्रेंचि खरीं रंगें जरि भिन्न रंगलीं असतीं ७

रंगविलीं तीं गाती दाखविती हावभाव नाचून
दुसरीं पिटती टाळया हर्ष विषादा मनांत पावून ८
रंगी बेरंगी हा खेळ दुहेरी असाच चालेल
प्रभुसत्तेनेंच जगीं कोणीही जन रडेल हांसेल ९
ती प्रभुसत्ता अद्भुत परमाद्भुत जो तियेस वागविता
ती वर्णवे न मग तो कवि कधीं स्फुट करील कविकविता १०
केव्हां प्रेक्षक केव्हां नट व्हावें त्याचिया बळें, त्याला
रंजविण्यास्तव, द्यावें त्याचें त्यालाच सर्वदा त्याला ११

वेदांत हा पुरे कीं आहे ही कर्मभूमि ह्मणतील
तेंही यथार्थ मानूं जरि त्यातें पूर्वरंग गणतील १२
'विश्वीं विश्वंभर' वा 'विष्णुमयी सृष्टि वैष्णवी धर्म'
हें आद्य तत्व वागो चित्तीं करितां समस्तही कर्म १३
आहोंत सर्व मानव वर्तू जगतीं धरून माणुसकी
हिंसा करूंन, हिंसक आहे पशु या जगीं, न माणुस कीं १४
द्वेष करूं न कुणाचा हिंसेचें मूळ यांत नित्य असे
'मूले कुठार' रीतिच योग्य कुकर्मीं अनीति तेथ नसे १५
द्वेषाचें बीज रुजे पुष्कळही हट्टवाद रानांत
तें रान जळे जेणें घर्तावें त्याच सत्यवादांत १६
'ना-फेर-फेर' नेला वाद विकोपास हट्टवाद्यांनीं
पड घेतली सुधींनीं मागें जशि संमता महात्म्यांनीं १७
होणार काय दिसतें, फेर घरीं शक्य तो न दरबारीं
मोडाया परसदना जातां तो कां न खेटरें मारी ? १८
वहिवाटदार होतो मालक कालेंकरून हा न्याय
व्यवहारीं उघड दिसे, मालक कितिही करी न कां हाय १९

कोण्या चिन्न उपाया करिती पाहूं स्थितीस घातुक या
स्वस्थपणेंचि ' पहावें जें जें होईल तें ' वदे तुकया २०
' ब्राह्मण-अब्राह्मण ' हा वाद असे तूर्त फार जोरांत
होणार काय यानें सरकारहि याच दंग घोरांत २१
जावो जाईल तरी सारींहो वृत्ति भिक्षुकी न अडो
हिंदीजनीं नच दुही माजो, ना तो स्वराज्यपथ बिघडो २२
मिटला एक तसा हा दुसराही शीघ्र हट्ट वाद मिटो
वर्षांतीं विनति अशी कीं वादें यापुढें न कर्ण किटो २३

झालें तत्वनिरूपण झालें आख्यान अल्प सांगून
संपवितोंचि कथा ही रत्नावलिचें अभीष्ट चिंतून. २४
पूर्वी त्या नानांनीं रक्षियली श्रीसती मराठ्यांची
आतां या नानांनीं गोपियलीसे सरस्वती त्यांची २५
फडणीस तोहि हाही विघ्नांना पाठ उभय देणारे
अंगीकृत कार्यास्तव दोघेही फार फार झटणारे २६
या वर्षी हे नाना दुखण्यानें जीर्ण जाहले असतां
पूर्वीहूनहि बरव्या कविता थकले न वाचकां देतां २७
कांहीं नवीन अश्रयदाते झाले तरी न तूट भरे
तीही स्वयेंचि सोसिति नाना कवि सदयहृदय रंगभरे २८
केलें जुन्या नव्यांही कविवर्गें साह्य भक्तिनें सरळ
ते स्तुतिपात्र तसे ते आश्रयदाते जुने नवे सकळ २९
रत्नावली हरिप्रिय तुज ऐशी तूंच एकली असंसी
भेटे पुढेंहि रसिकां आजवरी भेटलीस त्यास जशी ३०

ह. मा. समर्थ

## पुण्यपंक्ती.

( हिऱ्याचा खडा जरी एकच असला, तरी त्याच्या वेगळ्या वेगळ्या पैलूंवरून वेगवेगळ्या दिशांनीं प्रकाशकिरणांचें परावर्तन होतें. त्याप्रमाणें साधु पुरुषाचें साधुत्वाचे गुण भिन्न प्रसंगीं भिन्न रूपानें दिसून आले तरी त्या सर्वांचें प्रचोदक कारण एकच असतें. ह्या दृष्टीनें पुढील काव्य वाचिलें असतां त्यांत कांहीं विसंगतपणा नाहीं असें वाचकांना आढळून येईल. )

आर्या.

स्वद्योतित[1] भास्करसा, धीर अचलसा, गभीर सागरसा
गंगाजलौघसा शुचि, साधुपुरुष न स्तवार्ह होउं कसा? १
देणें पात्रिं, विपन्ना जपणें, शुचिपथ जनास दाखविणें
हें साधुचें कुलव्रत, येणें[2] तो सार्थ करितसे स्वजिणें २
धन देउनि साधूला सुपथच्युत[3] जो करूं नर झटेल
तो वाहवूं नदीला खालुनि वरती खरोखर शकेल ३
नीट मनांत विचारुनि मग साधु करावयास कार्य सजे
कीं तें योग्य न करणें अनुतापा होइ अंतिं कारण जें ४
वैभवकालीं कोमल उत्पलसें साधुचें हृदय होतें
आपत्कालीं कर्कश होतें क्षोणीधरापरि[4] अहो! तें ५
चित्तें, वचनें, देहें, चिंती, बोले, करी स्वदेशहित
तो साधु, इहपरत्रहि[5] मनुजांत सुरांत होइ तो महित ६
साधू देशहित करी, रिपुच्या लोभाविजे न लव निधिनें[6]
देशाच्या हाकेला हा केला धावयास ओ विधिनें[7] ७

---

१ स्वतःच्या प्रकाशानें झळकणारा २ याच्यामुळें ३ सन्मार्गापासून ४ पर्वतसारखें ५ ह्या लोकीं आणि स्वर्गीं ६ द्रव्यानें ७ ब्रह्मदेवानें

देशाच्या हाकेला ओ देइल तोचि साधु ह्मणिजेल
संकरपंकीं रुतला निज देश स्वस्थमन खल बघेल ८
साधू कोण ह्मणावा ? जो निज देशार्थ देह झिजवील
खल कोण ? जो धनास्तव रिपुला निज देश निस्त्रप[1] विकील
नीचाच्या संसर्गीं साधु असो, साधु नीचता न वरी
पंकांत पद्म असतें नित्य तरी पद्म मलिनता न धरी १०
सत्सरणित साधु सदा स्थिर राहे. शैलसा महीवरती
भावें त्यास मोहवात्या[2] प्रहरी हतशक्ति परतने परती ११
तृषिता, क्षुधिता, अधना द्यावें जल अन्नधन यथाशक्ति
हें उचित ह्मणुनि तें करि साधु जरि नसे तया फलासक्ति
“साधुपुरुष असुधाशन[3] देव” असें ह्मणति तें न वच खोटें
पुण्याचरणोत्थ तया शोभवि जें तेज तें असें मोठें १३
साधू भवसंतमसीं[4] दीप जणो मार्ग दाखवायास
विधि करि कीं इहलोकीं यात्रा होओ जना न सायास १४
साधुसमागम लोटी दूर अघप्रवणता[5], सुकृतसरणी—
दावी, पुरुषा लावी निःस्वार्थ मनें स्वदेशहितकरणीं १५
साधुसमागम शुचिता, शुचिता धृति दे धृति स्वजनभक्ति
ही स्वजनभक्ति मनुजा देशहित करावयास ये शक्ति १६
आत्मीय ह्मणुनि जपला तो जरि झाला कृतघ्न तरि रक्षा
वाढविला निंबतरू, तो निपजो कटु, न साधु करि रक्षा १७
शांतपणें साधु सही[6] खलकृत अपकार, हात न उगारी
विधिविलसितें विचित्रें दंड खलावरि पडे प्रखर भारी १८
मंबाजी तुकयाच्या अंगावरि थुकुनि कंड तो पावे

---

१ निर्लज्ज २ पापाच्या वासनेची वावटळ ३ अमृत न खाणारा ४ संसाररूप अंधकारांत ५ पाप करण्याकडे ६ सहन करी

छळि साधूला खल परि परिणति उलटुनि खलावरी धावे १९
परिचय पृथग्जनाशीं[1] परिणति दावी विमाननाफलक[2]
परि परिचय साधूशीं होत असे अंतिं सौख्यशमजनक २०
साधुसमागम सुखकर चंद्रातपसा[3] समस्त लोकांस
परि ह्रास असे वृद्धिक्षय, वृद्धिच केवळा असे त्यास २१
साधूच्या संगतिनें पावे साधुत्व अधम अल्प तरी
कार्पासगुण[4] सुमाच्या संसर्गे सुखद सौरभास वरी २२
साधू यथार्थनामा एकादा या बघों मिळे जगतीं
साधुंमन्य[5] शतावधि, भोंदू लक्षावधी जगीं दिसती २३
साधूच्या रूपानें अनुकरण अनेक लोक करतात
परि साधूचें पाहों अत्यल्पांशें स्वरूप त्यांच्यांत २४
भगवीं वस्त्रें लेउनि, राखूनि जटा न साधु नर होतो
व्हावी चेतःशुद्धी, बाहेर कसाहि कां नर असो तो २५
अनयपथानें चाले दुष्ट ह्मणुनि कष्ट भोगितो अंतीं
गेली घडी न येई, निष्फल मग त्यास वाटली खंतीं २६
कपिभल्लुकसाहाय्यें[6] रामें जिणिला दशानन सलील
साधुत्वलेशविरहित होता तो यातुधान[7] दुःशील २७
बोधी साधु जया तो क्षुद्र गणी स्वसुख हा नर पदार्थ
शिव[8] रामदासबोधें राज्य करी जनसुखार्थ, न स्वार्थ २८
साधु सदा सकलांना सुचवुनि सरणी सुयोग्य सुखवितसे
ती सरणी अवलंबिति काम तयांचा फलाढ्य होत असे २९
दर्शनही साधूचें सत्याचा उजळवी नरा पक्ष
शिववास भेटतां क्षणिं झाला जगदेव देशहितदक्ष ३०

---

१ हलक्या माणसाशीं २ अपमान आहे फल ज्याचें ३ चंद्राप्रमाणें ४ कापसाचा दोरा ५ स्वताला साधु समजणारे ६ वानर आणि आस्वल यांच्या मदतीनें ७ राक्षस ८ शिवाजी.

देशद्रोह गळाला देशप्रेमा तयाचिया स्थानीं
आला तिरुमल्लमनीं शिवसहवासें असें पडे कानीं ३१
परक्याचा चर[1] हरजी आला शिवराज्यरीति हेराया
देशद्रोह गळुनि तो पडला शिवभक्त होउनी पाया ३२
जो आश्रयार्थ जाई साधूला शरण तो लहे काम
येतां शरण बिभीषण लंकेचें राज्य त्यास दे राम ३३
निजदेशहितासाठीं स्वार्थ उपेक्षून साधु खटपटतो
क्षणभंगुर लाभास्तव विकितो निजदेह शत्रुला खल तो ३४
सत्संग चिरडितो परभाव जसा नृहरिमंत्रजप भूत
सत्संगजल क्षालुनि अघमल करि चित्त तूर्ण परिपूत ३५
साधूला क्षोभविणें, वायूला रोधणें गगनकोणीं
वृषभास दोहणें वा, हें केलें आजवर वदा कोणी ? ३६
खलकृत अपकारानें स्पष्ट नराचे जनास गुण दिसती
कल्पकतालिद्धत्ताभतिमत्तासहनशीलताप्रभृती ३७
कल्पकतेचें यश शिवराया देई अविधकारा[2] ती
अनलीं पडतां कालागुरु तत्सौरभ समीरण वहाती ३८
साधू दरिद्र तरिही अनघपथप्रवण[3] तो सदा राहे
पंडितशिरोमणीही साधु असुनि गर्व तो न लव वाहे ३९
आत्मीयांचें रक्षण हा क्रम जो साधु तो सदैव वरी
प्रेमें दंडी त्याला परि साधु न दे तया विपक्षकरीं[4] ४०
पुण्यें पापें करुनी स्वर्ग नरक मिळवितात साधु खल
जैसें चरित्र ज्याचें तैसें तो अनुभवी यथार्ह फल ४१
उगवेल कमळ गिरिवर, कीं जर वेलेस सिंधु लंघील
तर साधु दिल्या वचना कीं स्वीकरिल्या व्रतास सोडील ४२

---

१ हेर २ औरंगजेबाचा तुरुंग ३ पापाच्या मार्गाकडे वळलेला ४ शत्रूच्या हातीं

रामास सत्यसंधें[1] पाठविलें दशरथें निबिड गहना
यश न मळविलें त्याणें आपुलिया लंघुनी अहो ! वचना ४३
साऱ्याही व्यवहारीं साधुत्वाला असेचि अवकाश
साध्वाचरणें साऱ्या विपदांचा त्वरित होतसे नाश ४४
वैयक्तिक, सामाजिक, धार्मिक कीं राजकीय नैतिक वा
व्यवहार असो कांहीं साधुत्वाविषय, दावि तो विभवा ४५
साधुत्व प्रकटाया अवकाश न राजकारणांत मिळे
हें अनृत, अलीक वचन, आधारविहीन, भासरूप, शिळें ४६
राजव्यवहारीं न स्थल साधुत्वा असें ह्मणूंच नका
प्रभुला प्रकृतीलाही साधुत्वविभंग नेतसे नरका ४७
साधूच्या सर्व गुणां होणें आधार जरि नसे सुकर
तरि साधूचे कांहीं गुण अंगीं यावया झटोत नर ४८
ही " पुण्यपंक्ति " तुमच्या चित्तीं स्थिरपद करोनिया राहो
तन्मननें होउ तुह्मा शांतीचा इहपरत्रही लाहो ४९

अनुष्टुप् छंद.

रचिलें " पुण्यपंक्ती " हें काव्य वामननंदनें
तें लोकां मार्ग दावूनी त्यांचीं आनंदवो मनें ५०

——×—— विद्याधर वामन भिडे बी. ए.

## माझ्या बाळपणाची आठवण.

( मागील अंकावरून समाप्त )

### सरितांचा समुद्राशीं संगम.

साकी-वृत्त.

जनक नगातें निज कन्यांची पूर्ण दया येऊन
विपुल जलातें देई अपुल्यावरि मेघा ओढून ५६

१ खरी आहे प्रतिज्ञा ज्याची.

वारीभारासह त्या निघती पतिलागीं भेटाया
प्रभंजनाला पुढें धाडिती येतों हें कळवाया ५७
निज वनितांचा निरोप परिसुनि मोदें त्यांचा कांत
लक्षित राहे पंथ आदरें त्यांच्या पात्र-मुखांत ५८
भरती-प्रीती हृदयीं येउनि करी गर्जना मोठी
आनंदाच्या लाटा ज्याच्या असंख्य-उसळति पोटीं ५९
नाथा आलों धैर्य धरावें ऐशा बहु हाकांनीं
त्या सरितांनीं आळवितांना ऐके रव तो कानीं ६०
नेत्र झांकुनी आदरभावें ध्वनिला परिसत राहे
तोंच येउनी आलिंगिति त्या सप्रेमें लवलाहें ६१
प्रेमाश्रूचे त्यांच्यावरतीं गाळितसे बहु बिंदु
प्रिय पत्न्यांचा बहुत दिनांतीं संगम होतां सिंधु— ६२
प्रेमभरें तो वरतीं उसळुनि गाढालिंगन देई
मुख-चुंबन त्या घेतां होती सर्वहि पूर्ण विदेही ६३
विरह ताप हा कसा साहिला गर्जे हें सांगाया
आक्रंदाया त्याहि लागल्या प्रियकर ज्याच्या जाया ६४
ह्मणे, जरी मी शीतल तुमच्या विरहाग्नीला ओकीं
प्रथित नाम हें त्यास मिळालें वडवानल या लोकीं ६५
किती पुसावें किती कथावें यांचें कांहीं भान
न राहुनीयां दणाणवीलें त्यांहीं तेथिल रान ६६

निदाघ-कालीं पति-विरहातें साहत उगम-स्थानीं
काळ कंठिला पतिव्रतांनीं बहु कष्टें सरितांनीं ६७
कवणाच्याही दृष्टी आपण न पडावेंच ह्मणून
घेती कृश निज सर्वहि आंगां शैवालें झांकून ६८
मर्यादेतें मंदगतीतें मुग्धपणातें भावें
आदरुनी त्या वागति ज्यांचें पतीकडे मन धावें ६९

कुलवंताची कन्या जी का याच रीतिनें चाले
विरह पतीचा घडतां दैवें हृदय जिचें बहु हाले ७०
विट पुरुषाच्या वक्र दृष्टिला विद्युत्पातच मानी
भूमातेसचि पाहत चाले ती निजकुलाभिमानी ७१
कधीं न रुचती मनीं लेशही ऐश्वर्याचे भोग
पतीविना त्या सतीस भासति केवळ दुर्धर रोग ७२
हृद्यावरला मुक्तहार तो भार तिला बहु वाटे
रत्नखचित तीं नानाभरणें रुतती जैसे कांटे ७३
सौभाग्यातें दर्शक कुंकुम-तिलक मात्र तो भाळीं
सर्व कालही सतेज राहुनि पत्यभिमाना पाळी ७४
अशनीं शयनीं गमनीं अथवा वसतां कवण्या स्थानीं
पतीवाचुनी कांहिं न येई अन्य जियेच्या ध्यानीं ७५
नेत्र-सारसांवरिल सांवरी भ्रमर-कुंतलां मागें
कांतागमनाच्या पंथातें लक्षितसे अनुरागें ७६
गाल टेंकुनी हस्त-तलावरि बसतां चिंताक्रांत
स्थीर दृष्टिला गमे तियेच्या सन्मुख राहे कांत ७७
निज नाथाची मूर्ति पाहतां तोंपे राजसबाळी
भानावरतीं पुनरपि येतां लावी हात कपाळीं ७८
अश्रुभरित नेत्रांनीं पाहे पति-मार्गा निरखून
नाथा येई ह्मणूनि हाका मारी आक्रंदून ७९
जलातिरेकें तडाग भंगुनि उसळे जैसें पाणी
दुःखोर्मी ती सहन न होतां स्वतनु अश्रुनीं न्हाणी ८०
उरोजभागांतें अभिषेकी नेत्रजलानें भावें
मौक्तिक-हारा मज्जन घाली तेणें तो सुख पावे ८१
पतीविना प्रिय जगीं न वाटे कांहीं त्या साध्वीतें
मायेचे परकीय भासती स्वजन सर्वही तीतें ८२

स्वप्राणाहुनि निजपतिठायीं आवड फार जियेची
काय नवल तरि दीन दशा ही ऐशी होय तियेची ८३
पतीवाचुनी नसे स्त्रियानां दैवत अन्य जगांत
त्या साध्वीला हेंच निरंतर वागे निज हृदयांत ८४
व्रत-नियमांतें आचरुनियां कष्टवि निज देहास
उपोषणांतें करुनि आपुलें झिजवी सर्वेहि मांस ८५
रत्न-कंकणें गळति करांतुनि खळखळ शब्द करून
भूमातेला[1] सुचिर व्हावया घेती कीं मागून ८६
सांवरूनि तीं सर्व कंकणें द्वय कर ठेवुनि कानीं
नेत्र झांकुनी निज नाथाची मूर्ती आणी ध्यानीं ८७
भाळ टेंकुनी भूवरि तिजला पुनःपुन्हा वंदून
अत्यादर निज पतिच्या भावा दावी व्यक्त करून ८८

श्लोक. जैं दे वसंत नव वैभव त्या वनातें ॥
तैं जाय तें भरुनि पुष्प सुगंध-वातें ॥
जैं आम्र पक्व फलयुक्त लवून जाती ॥
तैं कोकिला सुरस मंजुल गान गाती ॥ १ ॥
पावे जईं सुकवि निश्चलशा स्थितीतें ॥
तैं वाग्वधू रुचिर गाय रसाळ गीतें ॥
स्फूर्ती स्फुरे परम उज्ज्वल जैं तयाची ॥
मूर्तीच घे जनन काव्य सुधारसाची ॥ २ ॥
ह्या मत्कृतीस लघु काव्य ह्मणावयातें ॥
लज्जा गमे बहु, सुमंदमतीस मातें ॥
होईन जैं प्रभुस पूर्ण कृपेस[2] पात्र ॥
होईन तैं सुरस काव्य-रसास पात्र[3] ॥ ३ ॥

———*——— श्री. वा. यरगट्टीकर.

---

१ याचा अन्वयः– आपण सुचिर व्हावया भूमातेला मागून घेती कीं.
२ योग्य ३ भांडें,

## तें काय ?

श्लोक.

श्रुत्यादिकीं वर्णुनि वर्णियेलें,-श्रेष्ठीं सदा जें प्रतिपादियेलें
भूदेवसंतीं बहु ऐकवीलें,-मुमुक्षुनीं नित्यहि सांठवीलें १
तत्वीं अतिश्रेष्ठ असेंचि ठेलें,-जें सेव्य लोकां अवघ्याहि वेळे,
निःशंक सर्वां म्हणि उद्धरीतें,-दास्यापदेतें सकला हरीतें २
रामायणीं व्यक्त कवीश्वरानें-केलें, असे सात्विक वाल्मिकानें,
जें भारतीं भागवतीं पुराणीं-संपादिती सादर शुद्धवाणी ३
जें साधिलें वानरसैनिकांनीं,-स्वीकारिलें जें नरपुंगवांनीं,
रानीं रणीं अक्षय गाजवीलें-प्रत्यक्ष सर्वांप्रति दाखवीलें ४
लोकीं, विलोकीं, अवघ्या प्रसंगीं-इष्टा अनिष्टाहि, प्रियांगसंगीं,
जें दाविलें उत्तम पांडवांनीं-सर्वार्थदायी रणतांडवांनीं ५
जें मावळ्यांनीं शिवरायकालीं-पृथ्वीवरी उंचहि शैलभालीं,
पुनःपुन्हाही बहु गाजवीलें-प्राणापरी संतत सांचवीलें ६
तें काय सांगा कवितेंत कोणी-या किंकराची पुरवा शिराणी,
मातें कळे तें कळवीन वादा-सोडोन, वंदून समर्थ-पादा ७

———×——— ह. मा. समर्थ.

## अभंगमाला

दुःखें गांजला-विद्वच्चूडामणी-मूर्ख होय ज्ञानी-बोधायाला
दैवें जो पीडीला-शूर रणधीर-पुढें ये अधीर-वंचायाला
भोग पुढें आला-सुनीतामंतीला-संधी तीच खलां-हंसायाला
पडत्या काळांत-पतितचि फार-करिताती वार-काळजाला

२

पावसाच्या येती, सरीवर सरी-खालीं आणि वरी. पाणी पाणी
नभ गडगडे, वीज कडकडे-लवताती झाडें, रानोरानीं
तेव्हां माकडास गेह बांधण्याची,-बुद्धि होई साची प्रतिक्षणीं
गेला पावसाळा आला जो हिवाळा-स्वछंदी तो गेला विसरोनी

३

धनुष्याचा बाण ओढोनी सोडीला-परतोनी आला काय केव्हां ?
तोफेचा जो गोळा एकदां उडाला-परतोनी आला काय केव्हां ?
शैलशृंगाहूनी ओहोळ निघाला-मागें ओसरला काय केव्हां ?
सज्जनाचा शब्द एकदां निघाला-मागें घेई त्याला काय केव्हां ?

४

हातीं घेतां माती होत होतें सोनें--मातीमोल जिणें आज होय
हातीं घेतां धोंडा होत होता देव--धोंड्यापरी दैव आज होय
उलटला काळ उलटले दिन--न काढी वचन 'हाय हाय'
भोग देवांनाही चुकलेला नाहीं--स्वस्थ राहीं पाहीं नवलाई

५

कमलाभोंवतीं दाटतें शैवाल--सारोनी मराळ पद्म सेवी
डाळिंबाभोंवतीं त्वचा सत्वहीन--शुक विदारून बीज सेवी
उद्यानाभोंवतीं कांटेरी कुंपण-भृंग तें लंघून पुष्प सेवी
विठ्ठलाभोंवतीं बडव्यांचा मेळा--सारोनी प्रभूला भक्त सेवी

६

कैसा समुद्राचा काढावा हो गळ--कैसा जनखल निर्मळावा ?
कैसा कालियाचा सोडवावा फासा-दुराचारी कैसा निरवावा
कैसें पचवावें तीव्र हालाहल-कैसा खल बोल पचवावा
निर्जन वनांत निघोनीया जावें-तुज आळवावें वाटे देवा

७

जेथें हंस खाई कमलाचा चारा-बक येरझारा घालिताती
जेथें गरुडानें मारीलया भरार्‍या-वाघुळें तीं फेर्‍या घालिताती
जेथें पंचानन गर्जे भव्य नादें-जंबुक दुःशद्बें ओरडती
जेथें मानसिंह मान कीर्ती जोडे-तेथें श्वान हाडें चघळतीं

———*——— दु. आ. तिवारी.

## प्रतिभा.

[ तोटक-वृत्त ]

प्रतिभे! अमरे! मति ही भ्रमते
दिससी मजसी वद आज कुठें?
तव दर्शन-सिंचन-वीण पहा!
विरहानल शांत न होइल हा १
अलि-गुंजनिचा स्वन का श्रवणीं
पडतां मधुपा अनुगामि वनीं-
बनली ह्मणुनी आजि ना गमली
मज योग्य असे तिज शोधियली। २
सलिलीं-कमलीं रमली असली
बिसतंतुंनि त्या तिस गुंतविली!
तरि त्यांतिल ती रस सेवुनि घे
पुनरुन्मिलनाविण केविं निघे! ३
अनुपम्य गमे जिथ रम्य उषा
नव मुग्ध गुलाब कळीच दिशा
जरि लालिमधें अससी लपली
रवि-रश्मिसवें निघ भूमितळीं ४
जिथ भूमितळीं नव हीरवळी
दंव-माळ गळां धरि सृष्टि भली
तुटली वरती सगळी घडली
तिथ मौक्तिक-संचायें कां गढली? ५
हरितांकुर-पूर्ण--तृणा कुरणीं
हरिणीं-शिशु ते वदनीं धरुनी
फिरती जिथ क्रीडति एणितती
रमशी तिथ का? तुज शोधुं किती! ६

फुलली खुलली जिथ पुष्पवटी
नव पुष्पतती सुमरंदवती
मकरंद, मरंद–सुपान घडे
ह्मणुनी तिथ कां रमलीस गडे? ७
अनुपम्य मनोहर पुष्पवटीं
लतिकातति त्या सुमभारवती
नच कुंजनिकुंज सुमीं फुलले
वद त्या स्थलिं कां लपसी विमले? ८
जरि घेत भरारि उडोनि वरी
गगनीं खग–वृंद विहार करी
तति त्या निघती जइं येत निशी
वद त्यांसह नीडगता बनसी? ९
तरणी धरणी क्रमुनी पुढती
जइं होय विलीन गिरीवरती
तइं गोधन, वत्स गृहीं निघती
अजि त्यांजमधें तव कां वसती? १०
उठतात तटाकिं तरंग जिथें
नित नैक तरंगति हंस तिथें
तव त्यासह कां घडली वसती?
वनलोच तुझ्याविण मंदमती ११
मलयानिल मंद–सुगंध सुटे
सुखदायक वायु तरंग उठे
अजि त्यासह कां फिरतेस सखी?
विजनीं मज सोडुनिया असुखीं १२
बहु तप्त तनू आजि कां असती
जलनिर्गम–बिंदु शिरीं धरिसी

करिसी तनुसी जरि शीत अशी
मजसी वद तापद होसि कशी ? १३
गगनीं रजनीवर येत जधीं
किरणीं धरणीवर वृष्टि तधीं
करि त्या किरणांत विलीन अजी —
बनसी ? सुखदा मजसी न दुजी १४
नित कोकिल चित्त वसंतिं हरी
जिथ आम्रतरूवरि गान करी
पिक-पंचम-गायन-लुब्ध अजी
बनसी सुखवी मज कोण दुजी ? १५
जिथ रानिं वनीं गिरिच्या कुहरीं
जपजाप्य तपीगण नित्य करी
अजि ध्यानिं तदीय असे वसती
वद मूढमती बनलोंच सती १६
धरणीधरिं जन्मुनि निर्झर तो
वनराइंत जो नित पाझरतो
गिरिकंदरिं सुंदरि तेथ मुदें
बनसी, वनदेविच दर्शन दे १७
पतिसंगमनोत्सुकता धरुनी
नदि घेत उड्याहि कड्यावरुनी
तिजशीं गुजगोष्टिच तूं करिसी ?
त्यजुनी मज कां भ्रमतेस अशी ? १८
भगणीं-गणिं तूं गगनांगणिच्या
अजि खेळसि का मज टाकुनिया
वद रात्रि तमोमय धात्रिवरी
दिसलों न तुला ह्मणुनीच तरी ? १९

घनसंगर-अंबरिं होत वरी
तळपे चपला--असि त्यांज करीं
मज सोडुनि त्यांत विलीन जरी
बनसी, तरि धात्रिवरी उतरी २०
आजि काय नरेंद्रगृहीं वससी ?
जलधीमधिं मज्जन वा करिसी ?
वद गे! कवण्या स्थलिं शोधुं तुला ?
अपराध कधीं मजसीं घडला ? २१
नित नीरद्-बिंदुंस चातकसा,
हिम-अंशु-जलार्थ चकोर जसा
अजि तडत मी झणिं ये सुभगे ?
कविही तुजवीण गतप्रभ गे! २२

——*—— शामराव बाळकृष्ण देसाई.

## घटमहिमा.

श्लोक.

रसातळाला जरि जासि आपण
परोपकारीं रत तूं घटा! पण!
गुणाश्रयें[1] ये वरतीं महाशय
तुझ्या चरित्रांतिल हाच आशय १
धरून हातीं तव कंठ पालथा
तुला निजार्थी[2] जन होय घालता
बघून पाण्यांतहि त्यास तारिसी
परोपकारें अपकार फेडिसी २

---

१ दोरानें सद्गुणानें २ स्वार्थी पोहून जगण्यासाठीं. पालथें आणि पाण्यांत पाहणें हा श्लेष.

खुशाल घालोत गळ्यांत दोरणी[१]
तुला पिपासू बुडवोत धोरणी[२] !
पया निजौष्ठस्थहि[३] देसि त्या तरी
भल्या बुऱ्या तोषद सारख्यापरी ! ३
जसें जसें ये जल तें तवोदरीं
तसा तसा हर्षनिनाद[४] ये वरी
सुपूर्ण होतांच पथास लागला
परोपकारीं न विलंब कीं भला ! ४
जलागमें हर्ष तसा तदत्ययें[५]
तुझी निनादीं समता कळून ये
जिथे कधीं स्वार्थ नसेच माहित
सदा स्वभावें मन तें समाहित[६] ! ५
परोपकारार्थ वहासि जीवन
कसा शिरोधार्य न होसि सज्जन
पयोधरा[७] पूजिति देवपूजनीं
तुलाच आधीं; गुण पूज्य कीं जनीं ६
न धन्य रत्नाकर[८] ; तूं जसा घटा
धरून पोटीं तव पुत्र[९] एकटा
सरत्नही सागर जो सलील[१०] पी
कथूं यशा गी[११] न शके लिहूं लिपी ७
कुलाल निर्मी घट हा महाशय
घटांत लोकोत्तर हो सुतोदय
पित्यास जे पुत्र यशीं दुणाविती
जगांत त्यांना कवि कां न वानिती ? ८

---

१ दोर. २ धोरणानें. ३ ओठाला लावलें, कंठगत. ४ बुडतेवेळीं बुड-बुडते. ५ बाहेर जाण्यानें ६ समाधान पावलेलें. ७ जलपूर्ण कलश. ८ पुत्राला पुत्ररत्न ह्मणतात. ९ आगास्ति. १० सहज ११ वाणी.

मालिनीवृत्त

मज घटमहिमा हा वानिता ये तसाच
अनुदिन वळवाया काय येईल साच ?
अनुचित पण शंका; बुद्धिदाता समर्थ
प्रभु पदविनतांचे साधितो सर्व अर्थ !

विनायक गोविंद साठ्ये

---

## झरा.

( चाल–भृंगा दंग अहा होशी. )

निशिदिनीं वाहे झरा पहा
मंजुळ झुळ झुळ गात अहा !
आदि नसे अंतहि यासी
स्थलहि नसे विश्रांतीसी
एकमार्गि हा खरा खरा !
जन असो जरी भला बुरा
सुखदुःखाचे
खाचे खोचे
तुरवित साचे
जाइ निरंतर सरळ पथीं
मंजुळ झुळ झुळ गात अती १

तोषवि सारे पशु पक्षी
सकल जगाला हा रक्षी
पीउनि शुचि सलिलामृत तें
आनंदें जग हें डुलतें

निर्जन रानीं
घोर काननीं
दरीदरींतुनि
जाइ निरंतर मंद गती
तुडवित सान्या आपली २
खगगण कोकिळ मयूर ते
आनंदें गाती तेथें
प्रफुल्ल होउनि वनवेली
स्वागत करण्या उत्सुकली
झुळ झुळ गानीं
मंजुळ तानीं
रत होवोनी
अहंभाव परि विसरोनी
सन्मार्ग जगासी दावोनी
सृष्टिदेविचा हा प्राण
जाई तन्मय होऊन ३
हिरवळ कोमल गवताचें
हिरवे हिरवे गालीचे
सृष्टिदेवीनें तुजसाठीं
पसरालि सान्या दिक्पाठीं
सौगंधाचे
आनंदाचे
नव बहरीचे
सुवास मधु मधु दरवळले
आनंदें जग हें खुललें

———*——— वा. वा. देशपांडे

गीतार्यासप्तशती, केली नारायणें सुरसपूर्ण
पहिला अध्याय तिचा, येथें झाला असेचि संपूर्ण ॥

# अध्याय २ रा.

## आर्या

नेत्रीं अश्रु भरूनी, पूर्णकृपाविष्ट मानसीं झाला,
ऐशा विषादयुक्ता, मधुसूदन हेंचि बोलला त्याला. १
स्वर्गा बुडवुनि नरका, देणारें पाप अर्जुना! तुजला,
नीचासि योग्य विषमीं, आलें कोठोनि सांग बा! मजला. २
शत्रूतापद पार्था, षंढपणा हा मुळीं न तुज साजे,
दुबळेपण चित्ताचें, टाकीं रणदुंदुभी पहा गाजे. ३
बाणें भीष्मद्रोणां, वंद्य अशा ईश्वरा कसा मारूं?
सांगे विचार करुनी, तूंच मला पापसागरीं तारूं. ४
गुरुसी महानुभावा, मारुनि राज्यासि भोगण्याहून,
भिक्षावृत्ती बरवी, भोग नको रुधिरलिप्त होऊन. ५
युद्धांत जय कुणाला, सत्य मिळे हें कुणा नसे ठावें,
धृतराष्ट्रसुतां मारुनि, इष्ट न आह्मीं जगांत वांचावें. ६
धर्मे विमूढमानस, झालों क्षात्रत्व राहिलें नाहीं,
कल्याण होय ऐसें, सांगें शिष्यास निश्चयें कांहीं. ७
इंद्रियशोषकदुःखा, वारण करण्या समर्थ जें होई,
त्रैलोक्याचें राज्य न, तैसें देवाधिपत्यही पाहीं. ८
यापरि बोलोनि हृषी-केशासी विजय शत्रुकुलहंता,
युद्ध न करीन बोले, स्वस्थ बसे नमन करुनि भगवंता. ९
श्रीकृष्ण अर्जुनातें, उपहासें काय बोलला तेव्हां,
उभय दळांच्या मध्यें, विषण्ण पाहे धनंजया जेव्हां. १०

शोक अशोकीं करिसी, ज्ञान्यापरि बोल बोलसी पाही,
शोक जित्यामेल्यांचा, पंडित कोणी कधीं करित नाहीं. ११
तूं, मी, सकळ नृपति हे, मागें होतों पुढेंहि होणार,
प्रस्तुत आहोंत असे, साक्षी यासी श्रुतीहि देणार. १२
जैशा या देहातें, बाल, तरुण, वृद्ध या दशा दिसती,
देहांतरास तैसें, मानुनियां शांत धीर जन असती. १३
स्पर्शोचि इंद्रियांच्या, सुखदुःखा शीत उष्ण देतात,
आद्यंत अस्थिरासी, सोशी देहासि नित्य होतात. १४
हे नच पीडा ज्यासी, देती तो धीर या जगीं पाही,
सम सुखदुःखां मानी, मोक्षातें योग्य त्याविना नाहीं. १५
असताभाव न लोकीं, अभाव तैसा सतास ही नाहीं,
दोघांचाही निर्णय, हृदयीं तो तत्वदर्शि नर पाही. १६
अविनाशी त्या जाणी, ज्यानें हें व्यापिलें सकल आहे,
त्याचा नाश कराया, समर्थ कोणीहि अर्जुना ! नोहे. १७
हे देह नष्ट होती, कधिंहीं जीवासि वा नसे मरणें,
अपरिच्छिन्नविनाशी, यास्तव युद्धासि अर्जुना ! करणें. १८
एक वदे हा मारी, दुसरा बोले तसेंचि हा मेला,
दोघेहि नेणती त्या, नच मारी तो न मारला गेला. १९
नाहीं जन्म मरण या, झाला होणारही पुढें नाहीं,
शाश्वत पुराण अज हा, मर्त्य शरीरीं न मारला जाई. २०
अविनाश नित्य यातें, अज अव्यय मानसीं सदा मानीं,
तो पुरुष पार्थ ! कोणा, मारी नच मारवी मनीं आणीं. २१
टाकूनि जीर्ण वसनें, नूतन घेती जगीं जसे लोक,
जीर्ण शरीरा टाकुनि, देही घे नूतनासि अवलोक. २२
शस्त्रें न तोडिती या, नच जाळी अग्नि अर्जुना ! पाहीं,
उदक न भिजवी यासी, वायूही शुष्क या करित नाहीं. २३

हा छेदा जाळाया, शक्य नसे सांद्र शुष्क व्हायास,
नित्य स्थाणु सनातन, अचलचि हा सर्वगत पहा यास. २४
अव्यक्ताचिंत्यहि हा, अविकारी यासि बोलती पाहीं,
ऐसें जाणुनि करणें, शोक तुला योग्य अर्जुना ! नाहीं. २५
अथवा नित्य मरे हा, तैसा उत्पन्न होउनी राही,
ऐसें चित्तीं ये तरि, शोक तुला योग्य अर्जुना ! नाहीं. २६
जन्मा नियमें मरणें, तैसें मरणीं हि निश्चयें जनन,
न टळे त्यास्तव पार्था ! टाकुनि शोका करीं सदा मनन. २७
अव्यक्त आदिअंतीं, भूतें मध्येंचि वाटती व्यक्त,
दुःख तयांस्तव न करीं, सुज्ञ न होती तयांवरी सक्त. २८
आश्चर्यापरि बघती, कोणी आश्चर्य बोलती याला,
आश्चर्यापरि ऐकति, ऐकुनि कोणी हि नेणती त्याला. २९
देही नित्य असोनी, अवध्य तैसाचि अर्जुना ! पाहीं,
सर्वा भूतांस्तव तूं, करणें हा शोक वाजवी नाहीं. ३०
पाहुनि निज धर्म मनीं, कंपित होणें तुला उचित नाहीं,
श्रेयस्कर युद्धाहुनि, धर्म्यें अशा क्षत्रिया नसे कांहीं. ३१
इच्छा नसतां झालें, स्वर्गाचें द्वार मोकळें पार्था !
धन्य क्षत्रिय लोकीं, पावतसे सत्य युद्धरूपार्था. ३२
नच धर्म्य युद्ध करितां, स्वधर्मकीर्ती लयास जाईल,
कथितों सत्य तुला मी, चालुनि पातक घरास येईल. ३३
होईल अकीर्ति मोठी, निंदा सकलहि दिगंतरीं दाटे,
संभावितां अकीर्ती, मरणाधिक अर्जुना ! मनीं वाटे. ३४
अर्जुन भयें पळाला, ऐसें ह्मणतिल महारथी जेव्हां,
ज्यां मान्य आजवरि तूं, लघुता त्यांमाजि पावसिल तेव्हां. ३५
न वदावें तें वदतिल, शत्रु तुझे अर्जुना ! सदा लोकीं,
निंदुनि तव सामर्थ्या, याहुनि बहु दुःख काय अवलोकीं. ३६

मरतां स्वर्गप्राप्ती, जितल्या पृथ्वी मिळेल भोगाया,
युद्धास ऊठ यास्तव, पार्था ! योग्यचि जगांत हो गाया. ३७
लाभालाभ जयाजय, सुखदुःखांसी समान तूं पाहीं,
चित्तीं विचार करुनी, युद्ध करीं पापलेश तुज नाहीं. ३८
सांख्या कथिलें आतां, योगाची बुद्धि सांगतों तुजला,
ज्यायोगें कर्माचा, बंध न बाधेल अर्जुना ! तुजला. ३९
सत्कर्मारंभातें, नाश नसे प्रत्यवाय ही नाहीं,
धर्म स्वल्प असो परि, मोठें भय वारितो सदा पाहीं. ४०
ईशाराधन करवी, बुद्धी एकचि अशी जगीं आहे,
करविति विषयासक्ती, अगणित बुद्धी अशा मनीं पाहे. ४१
ऐसी पुष्पित वाणी, अज्ञानी बोलती जगीं पार्थ !
रत वेदवादिं जन ते, स्वर्गातें मानितीच परमार्थ. ४२
स्वर्गेच्छु जन्म कर्मा, फल देणारें असें सदा गणती,
बहुलां क्रियाविशेषां, भोगैश्वर्यांसि दे असें ह्मणती. ४३
ऐश्वर्य भोगण्याचा, ज्याच्या चित्तास मोह बहु झाला,
अस्थिर समाधियोगीं, बुद्धी जाऊं न देतसे त्याला. ४४
त्रैगुण्यविषय वेद, त्रिगुणरहित अर्जुना ! सदा राहीं,
द्वंद्वां योगक्षेमा, टाकीं सत्वस्थ नित्य तूं होईं. ४५
स्वल्पोदक फल देतें, पाहें पार्था ! महानदी तेंच,
स्वर्गासि वेद देती, देती मोक्षास मानवा हेच. ४६
कर्माधिकार केवळ, कर्मफलाचा नसे तुला लवही,
कर्मफलाशा न धरीं, कर्माचा त्याग योग्यही नाहीं. ४७
योगस्थ कर्म करुनी, लवहि फलाशा मनीं नसे ज्याला,
सिद्धी असिद्धि होतां, सम मानिति योग बोलती त्याला. ४८
बुद्धीहुनि पार्था ! तूं, कर्मातें ऊन सर्वदा धरणें,
दीन फलास्तव करिती, कर्म, जगीं बुद्धि मात्र अनुसरणें. ४९

तसेंच रत्नावलीचे जुने रसिक कवि रा. सा. सरदार पांडुरंग बाळकृष्ण दप्तरदार वकील सांवतवाडी हे गेल्या महिन्याच्या १५ व्या तारखेस परलोकवासी झाले. हें कळविण्यास आह्मास फार वाईट वाटतें. यांची कविता सुबोध आणि चित्ताकर्षक असे. हे इंग्रजी कविताही फार चांगल्या करीत असत. ता. १ आगष्ट १८७१ रोजीं यांचा जन्म झाला. यांचें संक्षिप्त चरित्र त्यांचे कोणी स्नेही रत्नावलीकरितां लिहून पाठवितील अशी आह्मी आशा करितों.

खडकी एज्युकेशन सोसायटीचा रिपोर्ट पोंचला. रिपोर्टावरून सोसायटीचें काम फार चांगलें चाललें आहे असें दिसतें. आलेगांवकर मंडळीचा शिक्षणासंबंधींचा प्रयत्न चांगला चिकाटीचा आहे. शाळेंतील शिक्षक मंडळीचे परिश्रम हे शाळेच्या उत्कर्षाचें कारण आहे.

शिवशार्दूल— हा नारा चौकांचा पोवाडा आहे. शिवशाहींतील एक अपूर्व प्रसंग यांत गाइला आहे. असले स्फूर्तिदायक पोवाडे गातांना देहभान विसरवितात. पोवाड्याची रचना शौर्योत्पादन करणारी आहे. कवितेची रचना पोवाड्यांत असल्यानें अर्थात त्यांतील परकीय शब्द कानाला वाईट लागत नाहीत. इतकेंच नव्हे तर तडफदार भाषला ते अनुरूप असेंच आहेत. एकंदर रचना निर्दोष आहे. रचना सरळ असल्यानें अर्थ ग्रहण सहज होतो. वाचकांनी हा शिवशार्दूल अवश्य बाळगावा. पोवाडा गाणारे नारायण रामचंद्र मोरे रेवदंडा जि. कुलाबा यांचें आह्मी अभिनंदन करितों. याची किंमत पांच आणे फार नाहीं. चिरकुडांच्या रवींद्र प्रिंटिंग छापखान्याची छपाई फार चांगली आहे.

कवि दु. आ. तिवारी यांच्या संग्रामगीतांची द्वितीयावृत्ति आली ती पोहोंचली. प्रथमावृत्तींत कांहीं नवीन प्रकरणांची भर घालून ही दुसरी आवृत्ति लोकांपुढें ठेवण्यांत आली आहे. या कविता पूर्वींच प्रसिद्ध झाल्या असून त्यावर निरनिराळ्या ठिकाणीं अभिप्रायही देण्यांत आले आहेत. आह्माला रा. तिवारी कवि यांस यासंबंधानें अशी सूचना करावीशी वाटतें कीं, वीररसपर गीतें लिहितांना परिणामीं शत्रूंचा जय झाल्याचीं प्रकरणें निवडण्याचें ऐवजीं आमचा विजय ज्यांत अखेर झाला आहे अशीं कथानकें पसंत करून ती गीतांत गोंविलीं जातील तर वीररसाला खरोखरच बहार उडेल. तृतीयावृत्तिचे वेळीं ही सूचना ते अमलांत आणतील काय ?

रजिष्टर्ड नं बी ५३७

श्री. हरी माधव समर्थ कृत.

# साहित्य-चंद्रिका.

हें काव्यविषयक नवीन पुस्तक आम्ही छापिलें आहे. काव्यविषयांत प्रगति होण्यास आणि कविता रचूं इच्छिणारांस ज्या अनेक गोष्टींचें ज्ञान असावयास पाहिजे त्यापैकीं छंद, अलंकार, रस, गुण, इत्यादिकांचें या पुस्तकांतून सोप्या भाषेंत पद्धतशीर आणि सोदाहरण विवेचन केलेलें आहे. जुन्या व नव्या कवींच्या काव्यांतील उत्कृष्ट उतारेही दिले आहेत. पुस्तक संग्राह्य झालें आहे असें विद्वानांचें मत आहे. किंमत एक रुपाया टपाल हंशील निराळें.

संपादक, काव्यरत्नावली

जळगांव पू. खानदेश

---

छापत आहे ! नांव नोंदवा ! !

# सचित्र भक्तिकुंज.

अनेक प्रासादिक कवींच्या भक्तिरसानें ओथंबलेल्या कवितांच्या यांत संग्रह केला असून, नित्य पाठाकरितां गणेश, राम, कृष्ण, विठ्ठल, शंकर, दत्त, मारुति इत्यादि देवतांचीं स्तोत्रें, पदें, भूपाळ्या, आरत्या, धांवे, अभंग वगैरे व्यवस्थित रीतीनें एकत्र केलीं आहेत. अगाऊ नांव नोंदविणारांस किंमत एका प्रतीस फक्त बारा आणे पडेल.

हरी माधव समर्थ.

सरदार आश्रम, जळगांव.